| 58 | End Mill Cutter Dia 16,18,12<br>Addison<br>1 Each | 4144.50 | 1340.00 | 1805.00 | 4117.00 | **1017.00** | 1350.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 59 | Compressor oil (Refrigeration) 2 Ltr. | ------ | ------ | ------ | **180.00** | 270.00 | ------ |
| 60 | A/c Relay 1522 Anapurna 2 Nos. | ------ | ------ | ------ | ------ | **162.00** | ------ |
| 61 | Piercing valve 1/4 2 Nos | ------ | ------ | ------ | ------ | **202.50** | ------ |
| 62 | Freon 12 gas 2 kg. | ------ | ------ | ------ | **750.00** | 1071.00 | ------ |
| 63 | Freon 22 gas 4 kg. | ------ | ------ | ------ | **750.00** | 1071.00 | ------ |
| 64 | Hi watt 9 v battery 2 Nos. | ------ | ------ | ------ | ------ | **30.00** | ------ |
| 65 | L.P.G. Brazing kit 2 Nos. | ------ | ------ | ------ | 3946.00 | **1687.50** | ------ |
| 66 | Flezible wire 2.5 mm Finolex 1 Coil | ------ | ------ | 4200.00 | **1811.00** | 3091.00 | ------ |
| 67 | Flezible wire 4 mm Finolex 1 Coil | ------ | ------ | 5600.00 | **3381.00** | 4674.00 | ------ |
| 68 | Diamond Dresser 1.5 Carrot 8 Nos | 2035.13 | 810.00 | 435.00 | 828.00 | 400.00 | **281.25** |
| 69 | Tap m6 Totem 2 Nos. | 1063.13 | 198.00 | **160.00** | 190.00 | 330.00 | 534.38 |
| 70 | Internal Grinding Wheel 20x25x8 bore Norton 10 Nos. | 101.25 | ------ | '5.00 | 136.00 | **56.00** | 61.88 |
| 71 | Internal Grinding Wheel 25x25x10 bore Norton 10 Nos. | 101.25 | ------ | 76.00 | 136.00 | **56.00** | 61.88 |
| 72 | Internal Grinding Wheel 25x25x12.7 bore (white Allumunum Oxide) Norton 75 Nos. | 121.50 | ------ | 80.00 | 136.00 | **38.00** | 56.25 |
| 73 | Central Drill B.S. 4 (Addision Make) Addison 25 Nos. | 243.00 | 310.00 | 180.00 | 274.00 | **122.00** | 146.25 |
| 74 | Central Drill B.S. 5 (Addision Make) Addison 2 Nos. | 334.13 | 410.00 | 240.00 | 357.00 | **165.00** | 196.88 |
| 75 | Surface Grinding Wheel Straight carborundum / Norton make 180x13x31.75, 38A60K5VBE Norton 30 Nos. | 394.88 | 370.00 | **316.00** | 404.00 | 395.00 | 337.50 |
| 76 | Surface Grinding Wheel Straight carborundum / Norton make 180x13x31.75, 39 C 60L5VK Norton 05 Nos. | 607.50 | ------ | **460.00** | 575.00 | 559.44 | 483.75 |
| 77 | Taper Shank drill Dia 19.5 mm Addisio Maker Addison 1 No. | 1620.00 | 1048.00 | 960.00 | 1162.00 | 1048.00 | **675.00** |
| 78 | Taper Shank drill Dia 17.5 mm 24.5, 15.5, 14 mm IT 1 Each | 6115.50 | 4200.00 | 3848.00 | 4693.00 | 4368.00 | **3375.00** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 79 | Grinding Wheel<br>150x20x15.88 Alluminium<br>Oxide<br>Norton<br>1 No. | ---- | 265.00 | **250.00** | 291 00 | 281.61 | 281.25 |
| 80 | Grinding Wheel<br>150x20x15 88 Silicon<br>Carbide<br>Norton<br>1 No. | 961.88 | 470.00 | **408.00** | 684 00 | 497.00 | 450.00 |
| 81 | Bench Grinder Wheel One<br>rough & One fine<br>250x25x31 75 bore dia<br>Norton<br>1 Each | 1028.25 | 1620 00 | 1550 00 | 880 00 | **868.45** | 1743 75 |
| 82 | HSS Cutting Tools 400S 3/8"<br>x 3/8" x 6"<br>Miranda<br>10 Nos. | 982.80 | 874.00 | 814.00 | 1050.00 | **330.00** | 420.00 |
| 83 | HSS Cutting Tools 400S<br>3/8" x 3/8" x 8"<br>Miranda<br>10 Nos. | 1398.60 | 1240.00 | 1158 00 | 1494 00 | **440.00** | 630 00 |
| 84 | HSS Cutting Tools 400S<br>1/2" x 1/2" x 6"<br>Miranda<br>20 Nos. | 1548 75 | 1375.00 | 1280.00 | 1654.00 | **508.00** | 630.00 |
| 85 | HSS Cutting Tools 400S<br>1/2" x 1/2" x 8"<br>Miranda<br>08 Nos. | 2100.00 | 1920.00 | 1785 00 | 2304 00 | **685.00** | 840.00 |
| 86 | HSS Cutting Tools 400S<br>1/4" x 1/4" x6"<br>Miranda<br>20 Nos. | 661 50 | 587.00 | 545.00 | 706 00 | **203.00** | 262.50 |
| 87 | HSS Cutting Tools 400S<br>5/8" x 5/8" x6"<br>Miranda<br>12 Nos. | 2419 20 | 2158.00 | 1990.00 | 2593.00 | **796.00** | 945.00 |
| 88 | HSS Cutting Tools 400S<br>Dia 3 mm x 6"<br>Miranda<br>02 Nos | 567.00 | -------- | -------- | 641.00 | **145.00** | 210 00 |
| 89 | HSS Cutting Tools 400S<br>Dia 4 mm x 6"<br>Miranda<br>02 Nos. | 585.90 | --------- | -------- | 555.00 | **168.00** | 210 00 |
| 90 | HSS Cutting Tools 400S<br>Dia 6 mm x 6"<br>Miranda<br>02 Nos. | 661.50 | --------- | ------- | 760.00 | **235.00** | 262 50 |
| 91 | HSS Cutting Tools 400S<br>Dia 8 mm x 6"<br>Miranda<br>01 No. | 859 95 | -------- | ------- | 988.00 | **285.00** | 346 50 |
| 92 | HSS Cutting Tools 400S<br>Dia 10 mm x 6"<br>Miranda<br>01 No. | 983.85 | --------- | ------ | 1221.00 | 352.00 | 420.00 |
| 93 | Cutting Tools Dia 12 mm x 6"<br>Miranda<br>01 No. | 1554 00 | -------- | 852.00 | 1781 00 | **570.00** | 630.00 |
| 94 | Oil Stone Carborundum<br>Coarse on one side 100x50x18<br>Norton 02 Nos. | 213.75 | --------- | [illegible] | **130.00** | 164.00 | 196 88 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 95 | Oil Stone Carbonandum Coarse on one side 100x40x15 Norton 02 Nos. | 185.63 | --------- | 156.00 | **130.00** | 164.00 | 196.88 |
| 96 | Slot Drill Dia 3 mm Addison 01 No. | --------- | --------- | 393.00 | 639.00 | --- | **225.00** |
| 97 | Slot Drill Dia 4 mm Addison 01 No. | --------- | --------- | 393.00 | 639.00 | **145.00** | 225.00 |
| 98 | Slot Drill Dia 6 mm Addison 01 No. | --------- | --------- | 416.00 | 685.00 | **145.00** | 225.00 |
| 99 | Slot Drill Dia 8 mm Addison 01 No. | --------- | --------- | 416.00 | 685.00 | **145.00** | 253.13 |
| 100 | Slot Drill Dia 10 mm Addison 01 No. | --------- | --------- | 435.00 | 711.00 | **145.00** | 264.38 |
| 101 | Slot Drill Dia 12 mm Addison 01 No | --------- | --------- | 475.00 | 775.00 | **230.00** | 292.50 |
| 102 | Slot Drill Dia 14 mm Addison 01 No. | --------- | --------- | 610.00 | 992.00 | **293.00** | 360.00 |
| 103 | Slot Drill Dia 15 mm Addison 01 No. | --------- | --------- | 686.00 | 1117.00 | 450.00 | **416.25** |
| 104 | Slot Drill Dia 16 mm Addison 01 No. | --------- | --------- | 686.00 | 1117.00 | 450.00 | **427.50** |
| 105 | Slot Drill Dia 20 mm Addison 01 No. | --------- | --------- | 845.00 | 1374.00 | 615.00 | **517.50** |
| 106 | Slot Drill Dia 25 mm Addison 01 No. | --------- | --------- | 1168.00 | 1900.00 | 932.00 | **708.75** |
| 107 | Two Fluted "T" max cutter straight shank Dia 20 mm Addison 01 No | --------- | --------- | ----- | 14470.00 | ---- | **5062.50** |
| 108 | Two Fluted "T" max cutter straight shank Dia 40 mm Addison 01 No | --------- | --------- | ----- | 41786.00 | ---- | **9112.50** |
| 109 | Side & Face Milling Cutter Dia 100x20x27 mm Bore Addison 01 No. | 8600.63 | --------- | 5610.00 | 7625.00 | 3800.00 | **3037.50** |
| 110 | Side & Face Milling Cutter Dia 100x12x27 mm Bore Addison 01 No. | 6026.63 | --------- | 4310.00 | 5863.00 | 2582.00 | **2362.50** |
| 111 | Parallel Shank end mill Dia 6, Dia 10, Dia 12, Dia 16 Double Fluted Addison 02 Each (04 Nos.) | 2112.75 (3 nos) | --------- | 2022.00 | --------- | **897.00 (2 nos.)** | 1912.50 |
| 112 | Slot Drill H.S.S. ( Straight Shank) 3mm to 14 mm in step of 1mm Addison 01 Each | --------- | --------- | 4790.00 | --------- | **1984.00** | 5625.00 |
| 113 | Drill Chuck key for 13mm drill Capacity 04 Nos | 843.75 | --------- | **119.00** | 511.00 | 486.00 | 168.75 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | COPA | | --------- | | | | |
| 114 | Optical mouse (USB/PS2)<br>UMAX<br>10 Nos. | -------- | --------- | 325.00 | **162.00** | 220.00 | -------- |
| 115 | Keyboard (USB/PS2)<br>UMAX<br>10 Nos. | -------- | -------- | 390.00 | **239.00** | 315.00 | --------- |
| 116 | 1 TB Hard Disk<br>01 No. | --------- | -------- | 5922.00 | 5175.00 | **4105.00** | -------- |
| 117 | Wi-Fi Router /24 Port<br>01 No. | --------- | --------- | 3240 00 | **2329.00** | 2868.00 | -------- |
| 118 | Switch wireless conectivity option 01 No | --------- | -------- | 2650 00 | -------- | **1087.00** | -------- |
| 119 | Digital multimiter,3.5 digit handheld type<br>01 No | -------- | -------- | 6000.00 | -------- | **1250.00** | --------- |
| 120 | Bluetooth Headphone and mice set<br>01 No. | --------- | --------- | 3500.00 | **809.00** | ------ | -------- |
| 121 | RJ 45 Jack<br>01 No | -------- | -------- | 145.00 | **6.00** | 10.00 | --------- |
| 122 | SMPS<br>01 No. | -------- | -------- | 865.00 | 712.00 | **567.00** | -------- |
| 123 | CMOS Batteries<br>30 Nos. | -------- | -------- | 80.00 | 13.00 | **10.00** | -------- |
| 124 | 3 Pin Power Chord<br>10 Nos | -------- | -------- | 200.00 | 52.00 | **45.00** | -------- |
| 125 | Cat 5/5e cable<br>100 Meter | --------- | -------- | 30.00 | 1035.00 | **21.00** | -------- |
| 126 | AAA Battery for remote<br>20 Nos. | -------- | -------- | 38.00 | -------- | **12.00** | -------- |
| 127 | Antivirus/total security<br>02 Nos. | -------- | -------- | 850 00 | 1617.00 | **435.00** | -------- |
| | IT& ESM | | | | | | |
| 128 | Resistor 1kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 129 | Resistor 5kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 130 | Resistor 2kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | --------- |
| 131 | Resistor 1.5kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 132 | Resistor 230kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | --------- |
| 133 | Resistor 300Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 134 | Resistor 66Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1 00 | **0.32** | -------- |
| 135 | Resistor 570Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1 00 | **0.32** | -------- |
| 136 | Resistor 33kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1 00 | **0.32** | -------- |
| 137 | Resistor 64Ω<br>30 Nos | -------- | -------- | -------- | 1 00 | **0.32** | -------- |
| 138 | Resistor 470Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 139 | Resistor 4.7kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |
| 140 | Resistor 1.8kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | --------- |
| 141 | Resistor 1.2kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | **0.32** | -------- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 142 | Resistor 200kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | 0.32 | -------- |
| 143 | Resistor 100Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | 0.32 | -------- |
| 144 | Resistor 680Ω<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 1.00 | 0.32 | -------- |
| 145 | Resistor 2 2kΩ<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 13.00 | 0.32 | -------- |
| 146 | Zero PCB<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | 30.00 | -------- |
| 147 | POT 10KΩ<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 20 00 | 6.30 | -------- |
| 148 | POT 5KΩ<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 20.00 | 6.30 | -------- |
| 149 | POT 1KΩ<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 20 00 | 6.30 | -------- |
| 150 | Inductor (Axial lead Inductor)<br>100μH<br>100 Nos. | -------- | -------- | -------- | 20.00 | 1.90 | -------- |
| 151 | Inductor (Axial lead Inductor)<br>200μH<br>100 Nos. | -------- | -------- | -------- | 20.00 | 1.90 | -------- |
| 152 | Inductor (Axial lead Inductor)<br>50μH<br>100 Nos. | -------- | -------- | -------- | 20 00 | 1.90 | -------- |
| 153 | Transformer (Step-down) 6v<br>10 Nos | -------- | -------- | -------- | 80.00 | 57.00 | -------- |
| 154 | Transformer (Step-down) 12v<br>10 Nos. | -------- | -------- | -------- | 80.00 | 57.00 | -------- |
| 155 | Transformer (Center tapped)<br>6v<br>10 Nos. | -------- | -------- | -------- | 80 00 | 57.00 | -------- |
| 156 | Transformer (Center tapped)<br>12v<br>10 Nos. | -------- | -------- | -------- | 80 00 | 57.00 | -------- |
| 157 | Ceramic Capacitor 100μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4.00 | 1.90 | -------- |
| 158 | Ceramic Capacitor 0 01μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4 00 | 0.65 | -------- |
| 159 | Ceramic Capacitor 1μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4 00 | 1.30 | -------- |
| 160 | Ceramic Capacitor 4.7μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4.00 | 1.30 | -------- |
| 161 | Ceramic Capacitor 1000μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 10.00 | 6.30 | -------- |
| 162 | Electolataic Capacitor 100μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4.00 | 1.90 | -------- |
| 163 | Electolataic Capacitor 150μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 6 00 | 3.15 | -------- |
| 164 | Electolataic Capacitor 20μf<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 4.00 | 1.30 | -------- |
| 165 | Electolataic Capacitor 4.7μf<br>30 Nos | -------- | -------- | -------- | 4 00 | 1.30 | -------- |
| 166 | Rectifire Diode IN4007<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 2 00 | 0.65 | -------- |
| 167 | Zener Diode 6.2v<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 75 00 | 1.30 | -------- |
| 168 | UJT 2N2646<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 250.00 | 45.36 | -------- |
| 169 | JBET BFW-10<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 250.00 | 158.00 | -------- |
| 170 | MOSFET 20 Nos. | -------- | -------- | -------- | 130 00 | 25.20 | -------- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 171 | SCR TYN604<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 15.12 | -------- |
| 172 | DIAC<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 10.00 | 1.30 | -------- |
| 173 | TRIAC<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30 00 | 12.60 | -------- |
| 174 | IC 7408<br>20 Nos | -------- | -------- | -------- | 30 00 | 8.82 | -------- |
| 175 | IC7432<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 8.82 | -------- |
| 176 | IC 7404<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 8.82 | -------- |
| 177 | IC 7400<br>20 Nos | -------- | -------- | -------- | 30 00 | 8.82 | -------- |
| 178 | IC 7402<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 8.82 | -------- |
| 179 | IC 7486<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 8.82 | -------- |
| 180 | IC 7483<br>20 Nos | -------- | -------- | -------- | 30.00 | 101.00 | -------- |
| 181 | IC 7805 / 7812 / 7912<br>20 Nos | -------- | -------- | -------- | 30.00 | 8.82 | -------- |
| 182 | IC Scoket<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 10 00 | 3.00 | -------- |
| 183 | LED (Different Colour)<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 4.00 | 1.10 | -------- |
| 184 | Soldering Flux<br>1 kg. | -------- | -------- | 900 00 | -------- | 400.00 | -------- |
| 185 | Solder wire 60-40<br>1 kg. | -------- | -------- | 800.00 | 906.00 | 2140 00 | -------- |
| 186 | Button Cell<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 25.00 | 10.00 | -------- |
| 187 | Connectin Wire<br>2 Bundle | -------- | -------- | -------- | 45.00 | 240.00 | -------- |
| 188 | Brade Board<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 160.00 | 74.00 | -------- |
| 189 | Pencil Cell AA size 1 5v<br>100 Nos. | -------- | -------- | -------- | 16.00 | 9.00 | -------- |
| 190 | Battery pack 9v<br>30 Nos. | -------- | -------- | -------- | 30.00 | 30.00 | -------- |
| 191 | Pencil Cell AAA size<br>20 Nos. | -------- | -------- | -------- | 16 00 | 12.00 | -------- |
| 192 | Hukup wire (Red)<br>1 Bundal | -------- | -------- | -------- | 350 00 | 180.00 | -------- |
| 193 | Hukup wire (Black)<br>1 Bundal | -------- | -------- | -------- | 350.00 | 180.00 | -------- |
| 194 | Flexible Wire<br>1 Bundal | -------- | -------- | 1500.00 | -------- | 240.00 | -------- |
| 195 | Transistor SL100<br>30 Nos | -------- | -------- | -------- | 30.00 | 11.25 | -------- |
| 196 | Stepper Motor<br>2 Nos | -------- | -------- | -------- | 400.00 | 280.00 | -------- |
| 197 | 3pin scoket (5amp/230v)<br>10 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | 35.00 | -------- |
| 198 | Switch (SPST) 5amp/230v<br>10 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | 35.00 | -------- |
| 199 | Hand Brush<br>05 Nos. | -------- | -------- | 60 00 | -------- | 15.00 | -------- |
| 200 | RAM 1GB<br>10 Nos. | -------- | -------- | 1900.00 | 750.00 | 472.50 | -------- |
| 201 | CMOS Battery<br>20 Nos. | -------- | -------- | 120 00 | 10.00 | 10.00 | -------- |
| 202 | Cat 5/6 cable<br>300 Meter | -------- | -------- | -------- | 5500.00 | 21.00 | -------- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 203 | RJ-45 Connector<br>200 Nos. | -------- | -------- | 10.00 | 4.00 | 1.30 | -------- |
| 204 | RJ -11 Connector<br>200 Nos | -------- | -------- | 10.00 | 5.00 | 6.90 | -------- |
| 205 | Hard disk-16GB or Higher (SATA)<br>02 Nos. | -------- | -------- | 2400.00 | 1550.00 | 1638.00 | -------- |
| 206 | Crimping tool for RJ45 Connector<br>02 Nos. | -------- | -------- | 525.00 | 250.00 | 202.50 | -------- |
| 207 | Ecoder & Decoder kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 208 | Multiplexer & Demultiplexer kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 209 | RS Flip-Flop kit<br>02 Nos | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 210 | JK Flip-Flop kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 211 | MS-JK Flip-Flop kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 212 | D Flip-Flop kit<br>02 Nos | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 213 | A/D Converter kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 214 | D/A Converter kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 215 | Shift Registers using F/F kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 216 | Right Shift Register kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 217 | Lift Shift Register kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 218 | Serial - in- Parallel out kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 219 | Parallel -in-serial out kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |
| 220 | K-Map kit<br>02 Nos. | -------- | -------- | -------- | -------- | -------- | -------- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सत्र २०१४-१५ च्या प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रात्यक्षिकासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कंझ्युमेबल मटेरीयल खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना व ज्याकामी समान दर आलेले आहेत त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा. ज्या कंझ्युमेबल मटेरीयल खरेदीकामी दर आलेले नाहीत त्यासाठी फेर निविदा काढण्यात याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

१० ब्लड बँक विभागातील विविध मशिन्सचे कॅलीब्रेशन करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय घेणेबाबत.

श्री साईनाथ रुग्णालयाच्या श्री साईनाथ ब्लड बँक विभागात विविध कंपन्याचे विविध मशिन्सचे कॅलिब्रेशन करणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि. 25/09/2014 चे सभेतील विषय क्र. 48 व निर्णय क्र. 856 अन्वये सविस्तर चर्चा होऊन, ब्लड बँक विभागातील 37 नग मशिन्सचे कॅलिब्रेशन विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहीत पध्दतीने कॅलिब्रेशन करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे किंमत रु.35,618/-चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील विविध कॅलिब्रेशन करणाऱ्या खलील कंपन्यांना पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

1) मे. उद्यमश्री इंजिनीअर्स, सांगली
2) मे. करंदीकर लॅब प्रा. लि., नाशिक,
3) मे. लब डब मेडीकल टेक्नोलॉजीस प्रा. लि., चेन्नई
4) मे. सर्व्हीस वन, ठाणे
5) मे. टेक्नोमेड सर्व्हीसेस, दिल्ली
6) मे. लॅपटॉप इन्स्ट्रुमेंट प्रा. लि., ठाणे

वरील पैकी खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

1) मे. सर्व्हीस वन, ठाणे

2) मे टेक्नोमेड सर्व्हीसेस, दिल्ली

3) मे. लब डब मेडीकल टेक्नोलॉजीस प्रा. लि., चेन्नई

तसेच मे. करंदीकर लॅब प्रा. लि., नाशिक यांचे कोटेशन सामान्य प्रशासन विभागाकडुन उघडुन प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त प्राप्त कोटेशनधारकांपैकी निम्नतम दर असलेल्या कंपनीकडुन ब्लड बँक विभागातील 37 नग मशिन्सचे कॅलिब्रेशन करून घेता येईल असे नम्र मत आहे

तरी ब्लड बँक विभागातील 37 नग मशिन्सचे कॅलिब्रेशन करणेकामी प्राप्त कोटेशन प्रत्यक्ष उघडुन तसेच पुढील पाच वर्षाकरीता सदर कॅलिब्रेशन करणेसाठी दर निश्चित करणेस मान्यता असावी.

ब्लड बँक विभागातील ३८ नग मशिन्सचे कॅलिब्रेशन करावयाचे असून त्यासाठी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, चारही कोटेशनमधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. no. | Machine Name | Qty | M/s. Lubdub Medical Tech., Chennai | M/s. Karandikar Lab. Pvt, Ltd.,Mumbai | M/s. Service One, Thane | M/s. Techno med Servics, New Delhi |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | PC Based Central Monitoring System | 1 | 2500 | 4500 | 2400 | 5000 |
| 02 | Centrifuge Machine – Remi R8C | 1 | 500 | 2000 | 800 | 2000 |
| 03 | Centrifuge Machine – Remi R8C | 1 | 500 | 2000 | 800 | 2000 |
| 04 | VDRL Rotary Shaker – Remi | 2 | N.Q | 2500 | 750 | 1000 |
| 05 | Lab Incubator | 1 | 750 | 3000 | 750 | 3000 |
| 06 | Lab Incubator | 1 | 750 | 3000 | 750 | 3000 |
| 07 | Gel Centrifuge – Diamond | 1 | 500 | 2000 | 750 | 2000 |
| 08 | Stop watch-(Racer) | 1 | 500 | 550 | 700 | 1000 |
| 09 | Refrigerator for Blood Storage Remi-(Model-BR 280SR) | 1 | 1000 | 2500 | 800 | 2000 |
| 10 | Refrigerator for Blood Storage Remi (Model-BR-120SR) | 1 | 1000 | 2500 | 800 | 2000 |
| 11 | Refrigerator for Blood Storage Remi (Model- BR 120SR) | 1 | 1000 | 2500 | 800 | 2000 |
| 12 | Refrigerator for Blood StorageRemi- (Model- BR 120SR) | 1 | 1000 | 2500 | 800 | 2000 |
| 13 | Refrigerator-Terumo penpol (Model- 165L-GD) | 1 | 1000 | 2500 | 800 | 2000 |
| 14 | Deep Freezer -70°c Remi-(Model-UDF-165) | 1 | 1000 | 3000 | 800 | 3000 |
| 15 | Deep Freezer -40°c Remi--(Model-RPFV 240) | 1 | 1000 | 3000 | 800 | 3000 |
| 16 | Platelet Agitator & Incubator-Terumo-penpol | 1 | 1500 | 2500 | 800 | 3000 |
| 17 | Platelet Agitator & Incubator-Remi- ( PI 10 With PR 10) | 1 | 1000 | 2500 | 800 | 3000 |
| 18 | Portable Fridge (SV 3612) | 2 | 1000 | 3000 | 750 | 2000 |
| 19 | S/S Autoclave-Equitron 431) | 1 | 750 | 3500 | 750 | 2000 |
| 20 | Blood Collection monitor Terumo penpol (Model-D-601) | 2 | 1250 | 4000 | 800 | 2500 |
| 21 | Compo safe CS 250 Terumo Penpol | 2 | 1250 | 4000 | 750 | 1500 |
| 22 | Laminar Air flow-Micro master | 1 | NQ | 2500 | 10000 | 5000 |
| 23 | Heavy Duty Cooling centrifuge Remi (Model-KBM 70 | 1 | 1000 | 2000 | 800 | 3500 |
| 24 | Component separation Centrifuge. Remi (Model-KBM 70 Plus) | 1 | 750 | 2000 | 800 | 2500 |
| 25 | PH Meter Electronic-(5358236) | 1 | 1000 | 2200 | 1000 | 1000 |
| 26 | Elisa plate reader with thermal graphic printer (Model-Stat Fax 325 ) | 1 | NQ | 4500 | 7000 | 5000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 27 | Elisa plate washer with all accessories-(Model-Stat Fax 2600) | 1 | NQ | 4500 | 1000 | 5000 |
| 28 | Micropipettes Finpipettes<br>1)200-1000micro-ltr<br>2)5-40 micro-ltr<br>3)40-200 micro-ltr<br>4)5-50 micro-ltr<br>5)100 micro-ltr | 5 | 1250 | 1500 | 800 | 1000 |
| 29 | Thermometers<br>1) Mercury Thermometer<br>2) Red alcohol Thermometer | 2 | 500 | 850<br>1000 | 700 | 500 |
| | एकूण- | ३८ नग | 33250 (अपात्र) | 98100 | **47000** | 84000 |

ब्लड बॅंक विभागातील ३८ नग मशिन्सचे कॅलीब्रेशन करणेकामी उघडणेत आलेल्या कोटेशन्सपैकी मे.लब डब मेडीकल टेक्नोलॉजीस प्रा. लि., चैन्नई यांनी फक्त ३३ नग मशिन्सचे कॅलिब्रेशन करणेकरीता दर दिलेले आहेत. त्यामुळे मे.लब डब मेडीकल टेक्नोलॉजीस प्रा. लि., चैन्नई यांचे कोटेशन अपात्र ठरत आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ब्लड बॅंक विभागातील विविध ३८ नग मशिन्सच्या सर्व साहित्यांचे पुढील पाच वर्षांकरिता एकाच कंपनीकडून कॅलीब्रेशन करुन घेणे योग्य राहील. त्याकरिता याकामी मे.सर्व्हीस वन, ठाणे यांचे प्रतिवर्षी एकूण रु.४७,०००/- सर्व करांसहीत मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सदरहूकामी कार्यादेश देण्यास व याकामी येणा-या रु.२,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक, साईनाथ रुग्णालय)

---

११ **साईआश्रम भक्तनिवास येथील ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम- २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खड (त्र) अन्वये भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतूद आहे.

**प्रस्ताविका–** संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास येथे मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि.०१/१०/२०१४ रोजी पहाणी केली असता ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजुकडील ज्या ठिकाणी घनकचरा, मिनरल वॉटरच्या प्लास्टीक बाटल्या, चहाचे पॉली कप टाकले जातात, त्याठिकाणी एस.टी.पी. प्लॅन्टचे दक्षिणेकडील व सेप्टीक टॅंकचे उत्तरेकडील भाग मोकळा असल्याने तो अस्वच्छ दिसतो. त्यासाठी सदरहू ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसवून घ्यावे अशा सूचना दिल्या होत्या त्यानुसार साईआश्रम भक्तनिवास यांनी दि.०१/१०/२०१४ रोजीचे पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव:-** सदरहू परिसरातील मोकळ्या असलेल्या भागात ६१२ चौ.मिटर,६० एम.एम. जाडीचे पॉलिमर कॉटेड फिनिश असलेले पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी सन २०१३-२०१४ चे जिल्हा दर सूचीनुसार इकडील विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणेत आले असून, याकामी रु.९,२७,९६०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी याकामी येणारे रु.९,२७,९६०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयार्थ सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील ॲम्फिथिएटरच्या पूर्व बाजूचे मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.९,२७,९६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१२ **श्री साईप्रसादालय येथे प्रकाशने विभागासाठी नवीन काऊंटर तयार करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:** अधिनियमाचे कलम-२१ मधील पोटकलम (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्ताव:** श्री साई प्रसादालय येथे प्रसाद भोजनाचा लाभ घेणेसाठी येणारे साईभक्तांना साईबाबांचे जिवनावरील चरित्र/ पुस्तके व फोटो खरेदी करता यावे करीता श्री साईप्रसादालयामध्ये तळमजल्यावर 2726चौ. फुटामध्ये प्रकाशने विभागासाठी पुस्तक/ फोटो विक्री काउंटर तयार करणेत आलेले असून त्यासाठी रक्कम रुपये ७,२९,८५१/- मात्र खर्च आलेला आहे. सदर काउंटरवर पुस्तके व इतर साहीत्य खरेदी करणा-या साईभक्तांची संख्या अत्यल्प असल्यामुळे मा. कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे दि. १२/१०/२०१४ रोजीचे पहाणी दरम्यान सदरचे पुस्तक विक्री काउंटर प्रसादालय परिसरात एन्ट्रन्स पोर्चचे पश्चिमेस व तिकीट विक्री रेलींगचे पूर्वेस स्थलांतरीत करुन सध्याचा हॉल प्रसादालयातील

साहीत्य ठेवणेसाठी सूचना केल्या आहेत. याबाबत श्री साईप्रसादालय विभागाने त्यांचे दि.२२/१०/२०१४ रोजीचे पत्राव्दारे कळविले आहे.

याकामी प्रकाशने विभागाचे प्रतिनीधी यांचे समवेत पहाणी केली असता उपलब्ध पुस्तके व फोटो इ. ठेवणेसाठी किमान १५ फुट लांब व १० फुट रुंद असे काउंटर तयार करुन मिळणे आवश्यक आहे असे पहाणी अंती सागीतले. यासाठी श्री साईप्रसादालय येथे प्रकाशन विभागाचे काउंटर तयार करणेसाठी खालील पर्यायांचा विचार करता यईल.

१. प्रकाशने विभागाच्या काऊंटरकरीता PUF panel वापरून प्रसादालय परिसरात वरीठ ठिकाणी केबीन तयार करता येईल. १५ फुट लांब व १० फुट रुंद केबीन खरेदी करण्यासाठी अंदाजे रू. २,२५,०००/- मात्र खर्च येईल.
२. संस्थानचे व्दारावती परिसरातील गेटचे आतील बाजू ा ठेवलेली FRP केबीन प्रकाशने विभागाच्या काउंटर करीता वापरता येईल.

तरी विषयाकीत कामासाठी उपरोक्त पर्याय क्र.०१ नुसार कार्यवाही करावयाची झाल्यास, येणा-या खर्चास मा.उपसमिती सभेत मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल. उपरोक्त पैकी योग्य त्या पर्यायाप्रमाणे प्रकाशने विभागाचे काऊंटर करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथे प्रकाशने विभागासाठी नवीन काऊंटर तयार करणेसाठी प्रस्तावातील पर्याय क्र.०१ नुसार कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१३ **श्री साईनाथ रुग्णालयाचे दक्षिण बाजूकडील कंपाउंड भिंतीचे बांधकाम करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधिल तरतुद:-** अधिनियमाच्या कलम 21 मधिल पोटकलम (1) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईनाथ रुग्णालयाचे दक्षिण बाजूला सन 2000 मध्ये तात्पुरत्या स्वरुपात कॉंक्रीट ब्लॉकचे बांधकामामध्ये कंपाउंड भिंतीचे बांधकाम करणेत आले होते. ऑगस्ट महिन्यामध्ये पावसामुळे इमारतीचे दक्षिणेकडील सुमारे 190 मी. लांबीची कंपाउंड भित पडली आहे. करिता संरक्षणाचे दृष्टीने सदर ठिकाणी 5 फुट उंचीची कंपाउंड भिंत बांधून त्यावर 3 फुट उंचीची चेनलिंक जाळी बसविणे गरजेचे आहे. सदर कंपाउंड भिंतीला पुर्वी वापरण्यात आलेली चेनलिंक जाळी व ॲंगल वापरता येईल.

**प्रस्ताव :-**उपरोक्त विषयांकीत कामाकरिता सन 2013-2014 चे जिल्हा दरसुचीनुसार रु. 9,85,952/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे तरी याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाचे दक्षिण बाजूकडील कंपाउंड भिंतीचे बांधकाम करणेस व याकामी येणा-या रु.९,८५,९५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१४ **अग्निशमन प्रशिक्षणाबाबत.**

फायर ॲण्ड सेफ्टी विभागातील 13 स्थायी कर्मचाऱ्यांपैकी 07 किमान 10 वी पास स्थायी फिजीकल फिटणेस असलेले कर्मचारी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे मार्फत आयोजित केले जाणारे प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षणास पाठवावयाचे आहेत.यासाठी जा.नं.एसएसएस/ फायर ॲण्ड सेफ्टी/ 4184 / 2014 दि.03.12.2014 रोजी मा.अग्निशमन सल्लागार, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आला होता.

त्यानुसार महाराष्ट्र अग्निशनम सेवा संचालनालय मुंबई यांचे दि.14/11/2014 रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.09/12/2014 रोजी प्राप्त झाले आहे सदरचे प्राप्त पत्र सोबत जोडण्यात आले आहे.त्याचा संक्षिप्त तपशिल खालील प्रमाणे आहे.

राज्य अग्निशमन सेवा संचालनालय यांचे प्रशिक्षण सत्र दि.01.01.2015 ते दि.31.03.2015 (14 आठवडे) या कालावधीत होणार आहे. त्यासाठी त्यांनी पाठविलेला विहीत नमुण्यातील फॉर्म भरुन पाठविणेची अंतिम मुदत **दि.15.12.2014** रोजी पर्यंत आहे

**प्रशिक्षणासाठी प्रती कर्मचारी खर्च खालील प्रमाणे आहे.**

| अ.नं. | प्रशिक्षनार्थ्याचा खर्चाचा तपशिल | प्रति कर्मचारी | 1 कर्मचारी एकूण खर्च | 7 कर्मचारी एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| 01 | प्रवेशअर्ज फी | प्रती कर्मचाऱ्यासाठी 150/- प्रमाणे डी.डी. | 150/- | 1,050/- |
| 02 | प्रशिक्षण शुल्क प्रति कर्मचारी 150 x 14 आठवडे | प्रती कर्मचाऱ्यासाठी 150 x 14 आठवडे | 2,100/- | 14,700/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03 | शासकिय उपक्रमे प्रति कर्मचारी 200 x 14 आठवडे | प्रती कर्मचाऱ्यासाठी 200 x 14 आठवडे | 2,800/- | 19,600/- |
| 04 | प्रमाणपत्र व गुणपत्रिका शुल्क प्रती कर्म. | प्रती कर्मचाऱ्यासाठी 300/- रु. | 300/- | 2,100/- |
| 05 | अनामत रक्कम प्रति कर्मचारी | प्रती कर्मचाऱ्यासाठी 1000/- रु. | 1,000/- | 7,000/- |
| 06 | सेवा शुल्क 140 x14 आठवडे | प्रती कर्मचाऱ्यासाठी 140 x 14 आठवडे | 1,960/- | 13,720/- |
| 07 | भोजन खर्च द.म. अंदाजे 4000/- ते 4500/- प्रती कर्मचारी (7 कर्मचारी) | प्रती कर्मचाऱ्यासाठी 4000/- ते 4500/- रु. प्रती महीना या प्रमाणे. | 13,500/- | 94,500/- |
| 08 | प्रशिक्षण साहीत्य अंदाजे प्रती कर्मचारी रु. 6000/- ते रु. 7000/- | प्रती कर्मचाऱ्यासाठी 6000/- ते 7000/- रु. प्रती महीना या प्रमाणे. | 21,000/- | 1,47,000/- |
| | 7 प्रशिक्षनार्थ्यांसाठी तिन महिने कालावधीसाठी अंदाजे खर्च | | 42,810/- | 2,99,670/- |

तरी मा.अग्निशमन सल्लागार ,राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांचे यांचे कडे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे 7 कर्मचारी तिन महीने कालावधीकरीता पाठविणेकामी रु.2,99,670/- (अक्षरी रुपये दोन लाख नव्यान्नव हजार सहाशे सत्तर मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सामान्य प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/1881/2014 दि.04.08.2014 रोजीचे आदेशानुसार मा.उपसमितीस रु.25001/- ते रु.10,00,000/-पर्यंतचे खर्चास मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करणेत आलेले आहे.

तरी,

**अ)** महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय मुंबई येथे फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे 7 स्थायी कर्मचारी तिन महीने कालावधीकरीता ऑन ड्युटी पाठविणेस, संबधित प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना मुंबई येथे जाणे व येणेसाठी संस्थान वाहन मिळणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**ब)** प्रशिक्षण खर्चाची मंजूर रक्कम विभागाचे लिपीक कामकाज पाहणारे कर्मचारी श्री प्रतापराव कोते यांचे नावे ॲडव्हान्स मिळणेस मान्यता असावी.

उपरोक्त नमुद अ व ब बाबत मा.उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अग्निशमन प्रशिक्षणाबाबत उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या अ व ब प्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- फायर ॲण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**१५ ICICI CC/DC Swapping मशिन जोडणेकामी अंतर्गत दुरध्वनी नंबर देऊन त्या सर्व नंबरला "0" डायलींगच्या सुविधेसह दुरध्वनी पॉईंट करुन मिळणेबाबत.**

अधिनियम २००४ मधिल तरतूद क्र.२१-१(क) नुसार समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागांना अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.या मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय, साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थान (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स, शैक्षणिक संकुल, अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी सिमेंस कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच साई आश्रम १ व साई धर्मशाळा येथे "मॅट्रीक्स" कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविलेल्या आहेत. या सहाही दुरध्वनी यंत्रणेचे कॉल देवाण-घेवाण, कॉल बिलींग हे शांती निवास इमारतीत बसविण्यात आलेल्या मुख्य दुरध्वनी यत्रणेतुनच होत आहे.

१) जनसंपर्क कार्यालय येथील दुरध्वनी नंबर हे शांतीनिवास मेन दुरध्वनी एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

२) व्दारावती निवासस्थान इमारती मधील कार्यालय व मदतनीस यांचे दुरध्वनी नंबर हे श्री साईबाबा हॉस्पिटल येथील दुरध्वनी एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

३) साईप्रसाद निवासस्थान १ व २ इमारती मधील कार्यालय, मदतनीस, स्टोअर रुम, विद्युत विभाग जनरेटर रुम, पर्यवेक्षक कार्यालय, खरेदी व भांडार विभाग कार्यालये, व्हीआयपी रुम्स मदतनीस तसेच व्हीआयपी रुम नं.१ ते २२ इत्यादी ठिकाणचे सर्व दुरध्वनी नंबर हे शांती निवास मेन दुरध्वनी एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

४) साई आश्रम निवासस्थान येथील कार्यालय व सर्व इमारती मधील दुरध्वनी नंबर हे साई आश्रम येथील एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

५) साई धर्मशाळा येथील कार्यालय व सर्व इमारती तसेच ज्युनियर कॉलेज मधील दुरध्वनी नंबर हे साई धर्मशाळा येथील एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

६) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील सर्व कार्यालये,मदतनीस,शैक्षणिक संकुलातील सर्व दुरध्वनी नंबर, अधिकारी व डॉक्टर्स निवासस्थाने तसेच वाहन विभाग येथील सर्व दुरध्वनी नंबर हे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

७) साई प्रसादालयातील सर्व दुरध्वनी नंबर तसेच आयटी विभागातील सर्व दुरध्वनी नंबर हे साई प्रसादालयातील इमारतीतील एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

८) बुक शॉप येथील दुरध्वनी नंबर शांती निवास मेन एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

९) कॅंटीन विभागाकरीता देण्यात आलेले दुरध्वनी नंबर हे शांती निवास मेन एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

१०) श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व दुरध्वनी नंबर्स हे श्री साईबाबा हॉस्पिटल येथील एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

११) लाडु प्रसाद काऊंटर येथील दुरध्वनी नंबर हे शांती निवास मेन एक्सचेंज मधुन देण्यात आलेले आहेत.

वरील सर्व ठिकाणी संपर्कासाठी दुरध्वनी नंबर हे काही ठिकाणी दुरध्वनी एक्सचेंज पासुन अंडरग्राऊंड केबल टाकुन नंतर पुढे सींगल पेअर केबल केसींग कॅपींग करुन देण्यात आलेले आहेत.तसेच काही ठिकाणी दुरध्वनी नंबर हे दुरध्वनी एक्सचेंज पासुन सींगल पेअर केबल केसींग कॅपींग करुन देण्यात आलेले आहेत.जनसंपर्क कार्यालय व निवासस्थान इमारतीमध्ये नविन दुरध्वनी नंबर द्यावयाचे असुन त्याकरीता नविन टेलीफोन केबल कामाचे टेंडर काढलेले असुन प्रक्रिया चालु आहे.

उपरोक्त संदर्भान्वये आयटी विभागाने संस्थानचे विविध विभागाकरीता १३ ठिकाणी ICICI CC/DC Swapping मशिन जोडणेकामी स्वतंत्र अंतर्गत दुरध्वनी नंबर देवुन त्या सर्व दुरध्वनी नंबरला "0" डायलींगच्या सुविधेसह दुरध्वनी पॉईंट करुन मिळणेबाबत कळविलेले आहे.

याकरीता उपरोक्त सर्व १३ ठिकाणी संबधित दुरध्वनी एक्सचेंज पासून प्रत्येक Swapping मशिनकरीता स्वतंत्र दुरध्वनी नंबरसाठी नविन दुरध्वनी केबल केसींग कॅपींग करुन टाकावी लागणार आहे.तसेच त्या ठिकाणी भविष्यात काही मशिन वाढवावयाचे असल्यास आताच जादा टेलीफोनची केबल टाकुन ठेवावी लागणार आहे. तसेच सदरील सर्व ठिकाणी टेलीफोन केबल केसींग कॅपींगचे काम हे टेलीफोन ठेकेदार यांचेकडून निविदा मागवुन करुन घ्यावे लागणार आहे.त्याकरीता करावे लागणा-या टेलीफोन कामाचा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-10-2 | Supplying, erecting Telephone cable 2 pair with 0.5 mm dia,laid in provided PVC casing / conduit as per specification No.WG-1W | 2200 Mtr. | 19.95 | 43,890.00 |
| 02 | 1-8-15 | Supplying, erecting modular type Telephone socket one gang with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate & box with wiring connection complete. | 15 Nos. | 85.05 | 1275.75 |
| 03 | 1-8.27 | Supplying, erecting PVC surface modular switch box with double mounting plate for 1 module complete duly erected in & approved manner. | 15 Nos. | 131.25 | 1968.75 |
| 04 | 1-2-11 | Supplying & erecting PVC trunking (PVC casing-n-capping) of size 25 mm with accessories on wall / ceiling as per specification nos. | 2000 Mtr. | 37.80 | 75,600.00 |
| | | **Total Amount Rs** | | | **1,22,734.50** |

उपरोक्त प्रमाणे सदरचे काम बाहेरील ठेकेदाराकडुन निविदा मागवून करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,२२,७३४.५० इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ICICI CC/DC Swapping मशिन जोडणेकामी अंतर्गत दुरध्वनी नंबर देऊन त्या सर्व नंबरला "0" डायलींगच्या सुविधेसह दुरध्वनी पॉईंट करणेचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून बाहेरील ठेकेदाराकडून करुन घेणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,२२,७३४.५० मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१६ **साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) मेन गेट सुरक्षा केबीन करीता करावयाचे टेलीफोन केबल कामाबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी व्यवस्थेकरीता मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम येथे सिमेन्स कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली असुन या दुरध्वनी यत्रणेतुन संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम इमारतीतील कार्यालयात व प्रत्येक मजल्यावरील मदतनीस यांचे करीता तसेच शैक्षणिक संकुल (आयटीआय,इंग्लिश मिडीयम स्कुल,कन्या शाळा) तसेच अधिकारी व डॉक्टर्स स्टाफ कॉर्टर्स इत्यादी ठिकाणी जवळपास १०० दुरध्वनी नंबर देण्यात आलेले आहेत.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुमचे मेन गेटवर सुरक्षा रक्षकासाठी सुरक्षा चौकी तयार करण्यात आलेली असुन तेथे सुरक्षा रक्षकांना तातडीचे वेळी संपर्कासाठी अंतर्गत दुरध्वनीची सोय नसल्याने फारच अडचण निर्माण होत आहे.असे संरक्षण विभागाने संदर्भीय पत्राव्दारे कळविलेले आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुमचे इमारतीत दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली असुन तेथुनच सर्व ठिकाणी दुरध्वनी नंबर देण्यात आलेले आहेत. उपरोक्त सुरक्षा चौकी ही मुख्य प्रवेशव्दारावर असुन दुरध्वनी यंत्रणेपासून सदरचे अंतर हे लांब असुन भक्तांच्या व संस्थानच्या मोठया बसच्या रहदारीमुळे तसेच केबीनच्या आजुबाजूला केबल टाकणेसाठी सपोर्ट नसल्याने दुरध्वनी यंत्रणेपासून मेनगेट सुरक्षा केबीन पर्यंत सींगल पेअरची ओव्हरहेड टेलीफोन केबल टाकता येत नाही.तसेच पुर्वी या ठिकाणी सुरक्षा चौकी नसल्याने मेनगेटवर दुरध्वनीची केबल अंडरग्राऊंड टाकलेली नाही.

तरी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुमचे मेन गेटवर सुरक्षा रक्षकासाठी तयार करण्यात आलेल्या सुरक्षा चौकी मध्ये अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेसाठी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल येथे असलेल्या टेलीफोन डीपी बॉक्स पासून मेन गेट पर्यंत १० पेअरची नविन आरमाड टेलीफोन केबल इंग्लिश मिडीयम स्कुलचे इमारती मध्ये सॅडलींग करुन व काही ठिकाणी भिंतीचे आतील बाजुने अंडरग्राऊंड करुन टाकता येईल.यामुळे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुमचे मेन गेटवर सुरक्षा रक्षकासाठी तयार करण्यात आलेल्या सुरक्षा चौकीचा टेलीफोनचा कायमस्वरुपी प्रश्न मिटणार आहे.

| Sr.No | C.S.R.No. | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-10-14 | Supplying & erecting Jelly filled armoured telephone cable 10 pair with 0.5 mm dia.laid in provided trench as per specification No.WG-TW | 500 Mtr. | 123.90 | 61,950.00 |
| 02 | 1-11-12 | Supplying, erecting & commissioning Junction Box suitable for 10 pair as per specification No.WG-TW | 01 Nos. | 605.85 | 605.85 |
| 03 | 16-1-2 | Making the trench in Hard Murum/Tar road of suitable width and depth as per IS for laying provided telephone cable up to 10 sq.m.m.complete. as per specification No.CW-EXN-CTR | 100 Mtr. | 160.65 | 16,065.00 |
| 04 | 1-11-31 | Supplying, installing, testing & commissioning approved type Push button telephone Instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner. | 01 Nos. | 700.35 | 700.35 |
| | | | Total Amount | | 79,321.20 |
| | | | Roundup | | 79,321.00 |

उपरोक्त प्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) मेन गेट सुरक्षा केबीन करीता करावयाचे टेलीफोन केबल कामासाठी अंदाजे रक्कम रुपये ७९,३२१.०० इतका खर्च अपेक्षित आहे.सदरचे केबल टाकणेचे काम करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील मेन गेट सुरक्षा केबीन करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टेलीफोन केबलचे काम करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७९,३२१/- मात्रचेखर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१७ **मंदिराचे दक्षिण बाजुकडील द्वारकामाई मंदिर रेलींग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेबाबत.**

दिनांक 20/11/2014 रोजी मा. श्री शशिकांत कुलकर्णी साहेब, अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा. श्री अनिल कवडे साहेब, जिल्हाधिकारी व मा. श्री लखमी गौतम साहेब, पोलीस अधिक्षक व मा. कार्यकारी अधिकारी साहेब याचे उपस्थितीत साई मंदिर सुरक्षेबाबत सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत झालेल्या चर्चेनुसार मंदिराचे दक्षिण बाजुकडील सध्या लावलेले बॅरीगेटस् मधून मोबाईल, कॅमेरे किंवा काही आक्षेपार्ह वस्तु आत येण्याची शक्यता असल्याने, लावणेत आलेल्या बॅरीकेटस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेची कारवाई करणेबाबत संरक्षण विभाग जा.नं./4090/2014 दिनांक 27/11/2014 चे पत्राने कळविलेले आहे.

त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असून, सदरचे काम बाहेरील फेब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागवून तयार करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे मटेरीअल खर्च अपेक्षित आहे:

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | एम.एस. ॲंगल - 35 x 35 x 5 एम.एम. | 1,268 किलो | 70.00 | 88,760.00 |
| 2. | एम.एस. ॲंगल - 25 x 25 x 5 एम.एम. | 110 किलो | 70.00 | 7,700.00 |
| 3. | एम.एस. फ्लॅट पट्टी - 35 x 5 एम.एम. | 135 किलो | 70.00 | 9,450.00 |
| 4. | जी.आय. परफोरेटेड शीट - 8' x 4' x 18 गेज | 50 नग | 3,000.00 | 1,50,000.00 |
| 5. | एशियन मेक काळा कलर | 60 लिटर्स | 320.00 | 19,200.00 |
| | | | एकूण रुपये: | **2,75,110.00** |

उपरोक्तप्रमाणे मंदिराच्या दक्षिण बाजुकडील सध्या लावलेले बॅरीकोटस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी लावणेकामी अंदाजे रुपये 2,75,110.00 (अक्षरी रुपये दोन लाख, पंच्याहत्तर हजार, एकशे दहा मात्र) खर्च अपेक्षित आहे. याकामी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द् करुन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन बोलाविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये 2,75,110.00 खर्चास मान्यता मिळणेस मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिराचे दक्षिण बाजुकडील द्वारकामाई मंदिर रेलींग ते गुरुस्थान दक्षिणेकडील गेट येथे लावण्यात आलेल्या बॅरीकेडस् ऐवजी बारीक छिद्राची उंच जाळी बसविणेचे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेसाठी वर्तमानपत्रामध्ये तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व या कामी येणा-या अंदाजे रु.२,७५,११०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१८ **ENT Microdebrider मशिनचे दुरुस्तीबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयाचे कान, नाक व घसा शस्त्रक्रिया विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 4040/2006, दि. 24/03/2006 अन्वये मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांचे भारतातील अधिकृत विक्रते मे. चिमको बायोमेडीकल इंजिनीअरींग कंपनी, मुबई यांचेकडुन एक मायक्रो-डीब्रायडर युनीट एकुण रु. 5,40,488.25/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर युनीट श्री साईनाथ रुग्णालयात दि. 14/07/2006 रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन कंपनीने सदर युनीटकरीता दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 13/07/2007 रोजी संपला आहे. सध्या सदर युनीटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागाकडुन येथेच केली जाते आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्टची आवश्यकता असल्यास मशिन कंपनीकडे पाठवुन दुरुस्त करुन घेतले जाते.

सध्या सदर मायक्रो-डीब्रायडर युनीट व्यवस्थीत काम देत नसल्याचे ई.एन.टी ऑपरेशन थिएटर विभागाने पत्र दि. 12/05/2014 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर मशिनची तपासणी केली असता काही स्पेअर पार्टची आवश्यकता असल्यामुळे कंपनीकडे दुरुस्तीसाठी पाठविणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर युनिटचे मुळ उत्पादक कंपनी मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडे पत्र क्र. 1201,दि. 13/05/2014 रोजी दुरुस्ती करीता पाठविण्यात आले आहे. त्यानुसार कपनीने दुरुस्तीचे त्याचे पत्र क्र. 20001831, Dt. 19/09/2014 अन्वये (रूग्णालये प्राप्त दि.11/11/2014) सर्व करांसहीत एकुण रू 1,35,000/- (अक्षरी रु.एक लाख पस्तीस हजार मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रकमेची कपनीने आगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील मायक्रो-डीब्रायडर युनीट श्री साईनाथ रूग्णालयामध्ये प्राप्त झालेनंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती

दर्शविली आहे. सदर मायक्रो-डीब्रायडर युनीटचे स्पेअर पार्ट करीता मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली हे एकमेव पुरवठाधारक आहेत व त्यांचेकडेच सदर मायक्रो-डीब्रायडर युनीट चे स्पेअर पार्ट उपलब्ध असतात.

तरी मे.कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली याचेकडुन मायक्रो-डीब्रायडर युनीट दुरूस्त करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 1,35,000/- च्या खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील ENT Microdebrider मशिन दुरुस्त करणेऐवजी सदरचे मशिन नवीन खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१९ **लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट दुरुस्तीबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये लॅप्रोस्कोपी सर्जरी करणेकरीता मा.व्य.समिती दि.05/11/2005 च्या सभेतील निर्णयानुसार लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट सेट मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं.मुंबई यांचेकडुन एकुण रु.२०,००,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आला आहे सदरचा लॅप्रोस्कोप जनरल ऑपरेशन थिएटर विभागात दैनंदीन लॅप्रोस्कोपीक शस्त्रक्रीयांकरीता नियमीत वापरात असून त्यांची दुरुस्ती व देखभाल श्री साईबाबा हॉस्पिटलचे बायोमेडीकल इजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते.

सदर लॅप्रोस्कापी सेटमधील एक Telecam Camera शस्त्रक्रीया करताना खराब झाल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. 286, दि. 27/10/2014 अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर Camera ची तपासणी केली असता Camera Head Cable खराब झाल्याचे निदर्शनास आले सदर केबल येथे दुरुस्त होउ शकत नसल्यामुळे दुरुस्तीकरीता इकडील पत्र क्र.1231, दि.29/10/2014 अन्वये मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचे अधिकृत सर्व्हीस मे. चेअर मेडीकल टेक्नोलॉजी नवी मुंबई यांचेकडे पाठविणेत आले आहे. कंपनीने सदर Camera Head Cable ची तपासणी करुन दुरुस्तीच्या खर्चाचे त्यांचे पत्र क्र. 20002210, दि. 10/11/2014 अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. 60,371/- (अक्षरी रु. साठ हजार तीनशे एकाहात्तर मात्र) इतका खर्च येणार असुन सदर रक्कमेची कंपनीने आगाउ मागणी केलेली आहे. सदर Camera Head Cable दुरूस्ती करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे. सदर लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट सेटचे स्पेअर पार्ट करीता मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली. हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडुन Camera Head Cable दुरुस्त करून घेणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. 60,371/- चे खर्चास आणि सदरची रक्कम कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील लॅप्रोस्कोपी इन्स्ट्रुमेंट (Camera Head Cable) मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि., नवी दिल्ली यांचेकडुन दुरुस्त करुन घेणेस व याकामी येणा-या रु.६०,३७१ मात्रचे खर्चास व सदर रक्कम कंपनीस आगाऊ पाठविणेस मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२० **श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता नवीन संगणक संच खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल सन २००६ मध्ये कार्यान्वीत झाले. हॉस्पिटल कार्यान्वीत होणेपुर्वी १११ संगणक संच खरेदी करण्यात आले होते. तद्नंतर आवश्यकतेनुसार वेळोवेळी संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणेत आले आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रूग्णांना वैद्यकीय सेवा जलद गतिने मिळावी या करिता आवश्यक असणारे सॉफ्टवेअर कार्यान्वीत करणेत आले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत झाली असुन पंचक्रोशीतील रुग्ण याचा लाभ घेत आहेत. दिवसेंदिवस येथे रूग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याच बरोबर दैनंदिन कामकाजही वाढले आहे. सध्या हॉस्पिटलमध्ये वापरात असणारे संगणक, पुर्णपणे बंद पडलेले संगणक व बंद पडणेच्या स्थितीत असणा-या संगणक व संगणकीय साहीत्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

परिशिष्ट " अ "

| तपशिल | एकुण संख्या | सध्या कार्यान्वीत | पुर्ण बंद पडलेले | बंद पडणेच्या स्थितीत |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ८८ | ६३ | ६० |
| प्रिन्टर्स | १०३ | ७२ | २३ | ५७ |
| युपीएस | १३७ | ५० | ८७ | ५० |
| स्विचेस | १८ | १६ | ०३ | १३ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ० | ०१ |

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये HIMS Software कार्यान्वीत करण्यात येणार आहे सदरकामी श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता नवीन संगणक, प्रिंटर्स, युपीएस, स्वीच, सर्व्हर इ. संगणकीय साहीत्यांची आवश्यकता आहे. परंतु उपरोक्त परिशिष्ट " अ " मध्ये नमुद केलेप्रमाणे बरेचसे संगणक व संगणकीय साहीत्य बंद स्वरुपात आहेत. तसेच बरेचसे संगणक,

प्रिंटर्स, युपीएस, स्वीच बद पडणेच्या मार्गावर आहेत. सदर साहीत्यांचे स्पेअर पार्ट मार्केटमध्ये उपलब्ध नसल्याने दुरुस्तीकामी अडचणी येतात. सदर संगणकीय साहीत्य हे आय.बी.एम. या नामांकीत कंपनीचे असुन ते साधारणतः ९ वर्षापुर्वीचे आहे. सदर संगणकीय साहीत्य अपडेट करणेकामी येणारा खर्च हा अधिक असुन या खर्चात नवीन संगणक खरेदी करता येईल.

सध्याच्या आवश्यकतेनुसार श्री साईबाबा हॉस्पिटलकरिता १५ संगणक, ५ प्रिंटर्स, ४० युपीएस खरेदी करणे आवश्यक आहे. सदर संगणकीय साहीत्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९,५०,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख पंनास हजार) मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे याकरिता सध्याच्या आवश्यकतेनुसार १५ संगणक, ५ प्रिंटर्स, ४० युपीएस विहीत पध्दतीनुसार खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,५०,०००/- खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा हॉस्पिटलकरिता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नवीन संगणक संच खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.९,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२१. **श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजूरी मिळणे बाबत.**

श्रींना अर्पण केलेले नारळ फळे विक्री करणे, विक्रीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यास निवीदा मागवून नारळ फळांची विक्री करणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत सादर केला होता. त्यावर दि. 05/06/2014 रोजीच्या सभेत विषय क्र. 128 निर्णय क्र. 416 अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावीत कामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणे बाबत निर्णय झालेला आहे. सदरचे निर्णयास अनुसरून ॲड. श्री संजय आर. चौकीदार यांचे मार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे कडे कोर्टात सिव्हील अर्ज क्र. 9623/2014 दि. 20/09/2014 रोजी दाखल केलेले आहे. दि. 11/11/2014 रोजी प्रस्तुत प्रकरणांचे संदर्भात मा. कार्यकारी अधिकारी यांनी बोलावीले असता त्यांचेशी झालेल्या चर्चे नुसार श्रींना अर्पण करण्यात आलेल्या नारळ फळाची विक्री करणेबाबतचा विषय फेर सादर करून मान्यता घेण्यात यावी असे ठरले. त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेबाबतची जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि. 06/12/2014 रोजी नाशीक, अहमदनगर वृत्तपत्रामधुन शासकीय दराने प्रसिध्द करण्यात आलेली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि.15/12/2014 रोजी संपलेली असुन अद्याप 6 निवीदाची विक्री झालेली आहे. तसेच सिलबद निवीदा सादर करावयाची मुदत दि.17/12/2014 अखेर संपलेली असुन अद्याप 6 दरपत्रके प्राप्त झालेली आहे.

प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पार्टीचे नाव | आवक नंबर - दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | इरफान लतीफ मन्सुरी, येवला | 017656 - 17/12/2014 | बंद लिफाफा |
| ०२ | रामनारायण दशरथ कराळे, निमगाव | 017721- 18/12/2014 | बंद लिफाफा |
| ०३ | आदिनाथ पंढरीनाथ बानकर, शनि शिंगणापुर | 017722 - 18/12/2014 | बंद लिफाफा |
| ०४ | सुलतान सुभान मन्सुरी, येवला | 017723 - 18/12/2014 | बंद लिफाफा |
| ०५ | रखमाजी मुरलीधर गाढे, बेलापुर खुर्द | 017726 - 18/12/2014 | बंद लिफाफा |
| ०६ | इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगाव | 017738 - 18/12/2014 | बंद लिफाफा |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०६ सिलबंद दरपत्रक आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित दरपत्रकधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | पार्टीचे नाव | दरपत्रकातील प्रती नग दर रु. |
|---|---|---|
| ०१ | इरफान लतीफ मन्सुरी, येवला | २.०० |
| ०२ | रामनारायण दशरथ कराळे, निमगाव | ५.५१ |
| ०३ | आदिनाथ पंढरीनाथ बानकर,शनि शिंगणापुर | ४.६५ |
| ०४ | सुलतान सुभान मन्सुरी, येवला | ३.०० |
| ०५ | रखमाजी मुरलीधर गाढे, बेलापुर खुर्द | ५.२६ |
| ०६ | इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगाव | ६.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींना अर्पण केलेल्या नारळ फळांची विक्री करणेकामी इम्तीयाज रफिक पठाण, कोपरगाव यांचे प्रती नग रु.६/- मात्र हे उच्चतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

२२ **शैक्षणिक संकुलातील वार्षीक स्नेह संमेलनाकरीता कापडी मंडप व बॅरेकेटींग उभारणी करणेबाबत.**

(अ) श्री साईबाबा संकुलातील श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी यांचे वार्षिक स्नेहसंमेलन दि.२२/१२/२०१४ ते दि.२४/१२/२०१४ अखेर ०३ दिवस शैक्षणिक संकुलाचे स्टेजवर होणार असल्याने, सदरहू कार्यक्रमासाठी इकडील विभागामार्फत स्टेज समोरील लॉनवर मंडप व इतर अनुषगीक व्यवस्था करून मिळणेबाबत दि.१७/१२/२०१४ पत्राव्दारे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यानी कळविले आहे. तसेच दि.१९/१२/२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये शैक्षणीक संस्थेने कळविले आहे. तसेच याकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५३ अन्वये मंडप व इतर व्यवस्थेकरीता रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेणेत आलेबाबत कळविले आहे.

(ब) करीता वरिल पत्रामध्ये नमूद केलेप्रमाणे शैक्षणिक संकुलाचे वार्षीक स्नेहसमंलेन कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषगीक व्यवस्था खालीलप्रमाणे करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | साईज |
|---|---|---|
| ०१ | शैक्षणिक सकुलाचे लॉनवर बिछायतीसह एस.एम. पाईपचा सांगाडा असलेला कापडी मंडप उभारणी उभारणी करणे. | १२०'x९०' चौ.फुट |
| ०२ | मडपाचे मध्यभागी बैठक व्यवस्थेसाठी ४ फुट अंतर ठेऊन ४ फुट उंचीचे लाकडी/ बांबुचे बॅरेकेटींग करणे. | १५२ रनिंग फुट |
| ०३ | स्टेजचे आतिल भागात पडदे बांधणे. | ४२'x१५'x२ नग<br>३५'x१५'x२ नग |

वरिलप्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी अंदाजे रु.४७,१९०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

वरिल ब परिछेदात नमूद केलेनुसार मंडप व बॅरेकेटींग व्यवस्था करुन घेणेकामी अल्प कालावधी असल्याने, खालील मडप ठेकेदार यांचेकडून दि.१९/१२/२०१४ रोजी दरपत्रके मागविणेत आले आहे.

१. रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
२. न्यु बालाजी मंडप, मनमाड
३. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर
४. कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर

वरिल ठेकेदार यांचेकडून प्राप्त झालेली सिलबंद दरपत्रके दि.२०/१२/२०१४ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. त्यामध्ये कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर यांचे एकत्रित रु.३५,०००/- दर निम्नतम आहेत.

सदरहू काम तातडीचे असल्याने निम्नतम दराचे ठेकेदार कल्याणी टेन्ट हाऊस, नांदूर यांना काम चालू करणेबाबत सूचना देण्यात आल्या व त्यानुसार ठेकेदार यांनी सदरहू ठिकाणी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्थेचे काम पूर्ण करुन दिले आहे.

तरी वरिलप्रमाणे करण्यात आलेल्या व्यवस्थेकरीता रक्कम रु.३५०००/- मात्रचे खर्चास व उपरोक्त प्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलातील वार्षीक स्नेह संमेलनाकरीता कापडी मंडप व बॅरेकेटींग उभारणी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या रु.३५,०००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२३ **सुटटी बुंदी पॅकिंगसाठी ०३ नग मशिन देणगी स्वरुपात घेणेस, देणगीदार न मिळाल्यास खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद.-** सन २००४ चा महा ॰॰ अधिनियम क्रमांक १४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्तावीक–** उपरोक्त संदर्भान्वये मंदिर दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत लाडू प्रसादऐवजी मोफत बुंदी प्रसाद वाटप करणेबाबद निर्णय झालेला आहे. त्यास अनुसरुन साईभक्ताना श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) दिनांक ०२/१०/२०१४ पासून श्रीचे दर्शन रांगेत प्रत्येक साईभक्तांस मोफत बुंदी प्रसाद वाटप कॅन्टीन विभागामार्फत सुरु करण्यात आलेले आहे.

साईभक्ताना दररोज सरासरी ७० ते ८० हजार प्रसाद बुंदी पॅकेट दर्शनरांगेत वाटप करण्यात येत आहे. गर्दीचे काळात साधारणत: १ लाख पॅकेट वाटप होते.

सध्या बुंदी प्रसाद पॅकेट पॅकिंगचे काम हे ठेकेदाराकडील कर्मचारी स्वत: (मॅन्युअली) करतात. साईभक्तांचे वाढते गर्दीचे प्रमाण, सिहस्थ कुभमेळा, साईशताब्दी वर्ष इ. चा विचार करता या कामात गती येणेसाठी बुंदी पॅकिंग करिता सध्या ०३ मशिन असणे गरजेचे आहे. त्यामुळे साईभक्तांना प्रसाद बुंदी पॅकेट वेळेत व तत्परतेने उपलब्ध होऊ शकेल असे नम्र मत आहे.

**विभागाची मागणी-** मार्केटमध्ये पॅकिंग करीता विविध प्रकारची स्वयंचलित मशिन उपलब्ध असून संस्थान कामाचे दृष्टीने खालिल तपशिलाप्रमाणे बुंदी पॅकिंग मशिन घेता येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | मशिन टाईप | व्हर्टीकल विथ व्हॅल्युमेट्रीक फिलर |
| २) | ऑपरेटिंग शिस्टम | न्युमरीक (एअर कॉम्प्रेसर सह) |
| ३) | पाकिटे पॅकिंगचा वेग | ताशी प्रती १५००० पॅकेटस |
| ४) | पॅकिंग क्षमता | १०० ग्रॅम प्रती पॅकेट |
| ५) | इतर सुविधा | बॅच कोड व दिनांक यंत्रणेसह - |
| ६) | एका मशिनची अंदाजे किंमत | रुपये ३ लाख |

एका मशीनचा एका तासाचा स्पीड १५००पॅकेट असल्यास ०८ तासासाठी एका शिफ्ट मध्ये साधारणतः १२,००० पाकिटे तयार होतील अशा ०३ मशीन घेतल्यास एका शिफ्टसाठी ३६००० हजार (१२००० × ०३ ) पाकिटे तयार होतील. व दोन शिफ्टमध्ये साधारणतः ७२००० (३६०००+३६०००) प्रसाद पाकिटे तयार होतील

न्युमॅटीक पध्दतीची मशीन खरेदी केल्यास पार्टची झीज कमी प्रमाणात होते तसेच मेन्टेन्सचा खर्च कमी येतो.

उपरोक्तप्रमाणे ०३ स्वयंचलित बुंदी पॅकिंग मशिन व मशिनला एअर पुरविणेकामी ७.५ एच. पी. चे एक एअर कॉम्प्रसर खरेदीकामी एकुण रुपये ०९ लाख (अक्षरी रु. नऊ लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त मशिन विहीत पध्दतीने खरेदी करता येतील अथवा साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारता येतील.

**विभागाचे स्पष्ट मत /अभिप्राय-** बुंदी प्रसाद पॅकिंगकरिता ०३ ॲटोमेटिक मशिन खरेदी करणेकामी रु ९ लाख मात्रचे खर्चास अथवा देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारणेस मान्यता असावी असे नम्र मत आहे.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिराचे दर्शनरांगेत साईभक्तांना मोफत प्रसाद म्हणून वाटप करणेत येत असलेली सुटटी बुंदी पॅकिंग करणेकरिता ०३ नग ॲटोमेटिक पॅकींग मशिन देणगीदार साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू प्रसाद निर्मिती विभाग)

---

२४. **श्री साईलीला व्दैमासिक मराठी व हिंदी– इंग्रजी माहे जानेवारी- फेब्रवारी २०१५ व मार्च-एप्रिल २०१५ या दोन अंकांची मागील दराने छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ कलम नं.१७ (२) (ठ) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील."

यानुसार श्री साईबाबाच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने श्री साईलिला-मराठी/ हिंदी– इंग्रजी व्दैमासिक प्रकाशित केले जाते. मे.टॅको व्हिजन,मुंबई यांना इकडील जा.नं.३१४६ दि.१५.१०.२०१३ अन्वये माहे सप्टेंबर–ऑक्टोंबर २०१४ अखेर मासिके छपाईचा कार्यादेश देण्यात आलेला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.११.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.९५८ नुसार माहे नोव्हेंबर– डिसेंबर-२०१४ अंक मागील दराने छपाई करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसारटॅको व्हीजन्स प्रा.लि., मुंबई यांना छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. परंतु पुढील अंकांची एक वर्षासाठी छपाई करणेकामीच्या छपाई कामाच्या निविदा काढणे. तसेच छपाईकामी येणा-या अदाजे रक्कम रु.२३,००,०००/- चे खर्चास व विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे अर्ज दाखल केला असून अद्याप पावेतो मान्यता मिळालेली नाही.मागील कार्यादेशाची मुदत डिसेंबर २०१४ अखेर संपत असून,वर्गणीदारांना पुढील व्दैमासिक अंक वेळेत पाठविता यावा म्हणून माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१५ व मार्च-एप्रिल २०१५ या मराठी व हिंदी – इंग्रजी व्दैमासिकाची छपाई मागील वर्षाच्या मंजूर दराने करुन घेणे क्रमप्राप्त आहे. मे.टॅको व्हिजन प्रा.लि. यांना दूरध्वनीवरुन याबाबत विचारणा केली असता, त्यांनी मागील दराने छपाई करुन देणेस दि.११.१२.२०१४ रोजीचे मेलव्दारे संमती दर्शविली आहे. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | मागिल मंजूर दर रुपये पैसे | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईलीला अंक मराठी व्दैमासिक पाने ३२+४= ३६ पाने | २०,००० नग (१०,०००x२ अंक) | १०.७५ | २,१५,०००/- |
| २ | श्री साईलीला अंक हिंदी इंग्रजी / व्दैमासिक ३२+४=३६पाने | २८,००० नग (१४,००० नग x २ अंक) | १०.६५ | २,९८,२००/- |
| | | | एकुण रुपये | ५,१३,२००/- |

दरम्यानचे काळात मा.उच्च न्यायलयाची मान्यता मिळाल्यास विहीत पध्दतीने निविदा मागवून कार्यवाही केली जाईल.

सबब प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला व्दैमासिक मराठी/हिंदी- इंग्रजी माहे जानेवारी-फेब्रुवारी २०१५ व मार्च-एप्रिल २०१५ या दोन अंकांची मागील मंजूर दराने मे टॅको व्हिजन्स प्रा.लि.मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.५,१३,२००/- चे खर्चास मान्यतेसाठी सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे जानेवारी-फेब्रवारी २०१५ व मार्च-एप्रिल २०१५ या दोन श्री साईलीला द्वैमासिक मराठी व हिंदी- इंग्रजी अंकांची मागील मंजुर दराने छपाई करुन घेणेस व याकामी येणा-या रु.५,१३,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

२५. **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी टू सिटर बेंचेस खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद** – क्र.१७ (१) व १७ (२) (ळ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.**- मा.त्रिसदस्य समितीचे दि.२६/०७/२०१३चे सभेतील निर्णय क्र.५९७

**प्रस्ताविक**- श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सन २०१४-१५ मध्ये इयत्ता ११वी कला व वाणिज्य शाखेच्या प्रत्येकी १-१ तुकडी सुरु करण्यात आलेली आहे. सदरच्या तुकडया नैसर्गिक वाढ होऊन सन २०१५ -१६ मध्ये वाढ होणार आहे. सदर विद्यार्थ्यांना बसणेसाठी टू सिटर बेंचेस खरेदी करणे आवश्यक आहे.यापूर्वी मा.त्रिसदस्य समितीचे दि.२६/०७/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५९७ अन्वये जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी-कनिष्ठ/४८१६/२०१४ दि. १८/०१/२०१४ नुसार रोहन एन्टरप्राईझेस, अहमदनगर यांचेकडून टू सिटरचे १०० नग बेंचेस दर रु. ८७५०/- प्रती नग याप्रमाणे खरेदी करण्यात आलेले आहे. सन २०१५-१६ करीता १०० नग बेंचेसची आवश्यकता आहे. त्यांनी मागिल दराने बेंचेस पुरवठा करणेबाबत दि. १०/१२/२०१४ चे पत्राने बेंचेस १०० नग पुरविणेस तयार असलेबाबत पत्र दिले आहे.

**मागणी**– सन २०१५-१६ चे १२वी कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यासाठी खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे बेंचेस खरेदी करावयाचे आहेत.

| अ.नं. | बेंचेस तपशिल | साईज | मागणी संख्या | सर्व करांस दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | Godrej Make Achiever Two Seater Bench Model -3 | Hd-744mm<br>W-1100 mm<br>D- 915 mm<br>Hs – 440 mm | 100 | 8750/- | 875000/- |

वरील प्रमाणे बेंचेस १०० नग प्रती दर रु.८७५०/- प्रमाणे खरेदीकामी एकूण रु. ८,७५,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख, पंच्याहत्तर हजार) मात्र खर्च येणार आहे. सदरचा खर्च सन २०१४-१५ चे मंजूर बजेट तरतुद रु.२६,००,०००/- मधून अदा करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान** – अर्थिक खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत**- रोहन एन्टरप्राईझेस, अहमदनगर यांचेकडून टू सिटरचे १०० नग बेंचेस दर रु.८७५०/- प्रती प्रमाणे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु. ८,७५,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख, पंच्याहत्तर हजार) मात्र खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले १०० नग टू सिटर बेंचेस विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

२६. **डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ90 वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०१५ बाबत.**

संस्थानचा दैनंदिन पत्रव्यवहार फ्रॅकिंग करुन पोष्टाव्दारे पाठविणेकामी सामान्य प्रशासन जावक विभागासाठी डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ90 दि.१/१/२०१२ रोजी मे.कोरस इंडिया लि.पुणे या कंपनीकडून खरेदी करण्यात आले आहे.सदर फ्रॅकिंग मशिनचा ०१ जानेवारी २०१२ पासून वापर सुरु करण्यात आलेला आहे. या फ्रॅकिंग मशिनचा वारंटी पिरियड दि.३१/१२/२०१४ अखेर संपुष्टात आलेनंतर,सन २०१३ व सन २०१४ मध्ये या मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट थेट कंपनीसोबत करणेत आलेले आहे.सन २०१४ मध्ये (चालू वर्षी) दि.०१/१/२०१४ ते ३१/१२/२०१४ अखेर सर्व्हिस कॉन्ट्रक्टपोटी रक्कम रुपये ७८,६५२/- मात्र दि.४ मार्च २०१४ रोजी आदा करणेत आलेली आहे. सदर सर्व्हिस कॉन्ट्रक्टचा कालावधी दि.३१/१२/२०१४ रोजी संपत आहे.

आता मे.कोरस इंडिया लि.पुणे यांनी दि.१६/१२/२०१४ च्या पत्रान्वये दि०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेबाबत कळविले आहे. सोबत त्यांनी करारपत्राचा मसुदा पाठविला असून य वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्टसाठी येणारा खर्च खालीलप्रमाणे कळविला आहे.

| अ.क्र. | तपशिल | कालावधी | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ90 वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट | दि.०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ | ७८,६५२/- | ७०,०००/- ( मुळ रक्कम ) + ८,६५२/- (सर्व्हिस टॅक्स ) |
| | | | | ७८,६५२/- |

( अक्षरी रक्कम रुपये अठ्याहत्तर हजार सहाशे बावन्न मात्र )

फ्रँकिंग मशिनचे देखभाल दुरुस्तीसाठी सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे आवश्यक आहे. वर नमुद केल्याप्रमाणे सन २०१५ साठीचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करीता रक्कम रुपये ७८,६५२/- मात्रचे चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सामान्य प्रशासन मधील जावक विभागासाठी डिजीटल फ्रँकिंग मशिन IJ90 चे मे.कोरस इंडिया लि.पुणे यांचेकडून दि०१/०१/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ७८,६५२/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-११)

---

२७. **श्री साईनाथ रुग्णालयाकरिता नवीन संगणक संच खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये उच्च शिक्षा विभुषित तज्ञ डॉक्टर्स, अनुभवी पॅरामेडिकल स्टाफ व अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने अत्यंत माफक दरामध्ये विविध आजारांवर पंचक्रोशीतील रुग्णांवर उपचार केले जातात. श्री साईनाथ रुग्णालयास शासनाची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना प्राप्त झाल्याने येथे दिवसेंदिवस रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. त्याच बरोबर दैनंदिन कामकाजही वाढले आहे. रुग्णांना वैद्यकीय सेवा अति जलद गतीने मिळावी याकरिता रुग्णालयामध्ये संगणकीय प्रणाली कार्यान्वीत करणे आवश्यक असल्याने संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे.

यापुर्वी सन २००६ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करण्यात आले होते. यापैकी श्री साईनाथ रुग्णालयाकरिता १५ नग संगणक संच व संगणकीय साहीत्य पुरविण्यात आले होते. सध्या दोन्ही रुग्णालयामध्ये वापरात असलेल्या संगणक संचाचा तपशिल खालीलप्रमाणे.

परिशिष्ट "अ"

| तपशिल | एकुण संख्या | सध्या कार्यान्वीत | पुर्ण बंद पडलेले | बंद पडणेच्या स्थितीत |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ९० | ६१ | ६० |
| प्रिन्टर्स | १०३ | ७४ | २९ | ५९ |
| युपीएस | १३७ | ५६ | ८१ | ५६ |
| स्विचेस | १८ | १६ | ०२ | १४ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ० | ०१ |

श्री साईनाथ रुग्णालयाचे कामकाज सुरळीतपणे चालणेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे संगणक व संगणकीय साहीत्याची आवश्यकता आहे.

परिशिष्ट " ब "

| संगणक | प्रिन्टर्स | युपीएस |
|---|---|---|
| २० | १० | २० |

याबाबत नामांकीत कंपन्यांचे प्रतिनीधींकडे चौकशी केली असता अति उत्तम प्रतिचे सर्व सुविधांनी युक्त असलेले संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणेकामी अंदाजे रु.९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख) मात्र खर्च अपेक्षित असल्याचे समजते

तरी श्री साईनाथ रुग्णालयाकरिता प्राथमिक स्वरुपात परिशिष्ट "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे संगणक व संगणकीय साहीत्य खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्तावावर मा. उप समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरिता आवश्यक असलेले २० नग संगणक, १० नग प्रिंटर्स तसेच २० नग युपीएस खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३** **दिनांक ०६.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०३** दिनांक ०६.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्रींचे द्वारकामाई मंदिराचे पवित्र धुनीवरील चिमणीचे नुतनीकरण करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.१,७०,०००/-)**

**साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे", अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-**

दि.०५/०६/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत श्री द्वारकामाई मंदिरातील धुनीवरील चिमणीचे नूतनीकरण करणेचे काम करणेसाठी येणारे रक्कम रु. १,७०,०००/- मात्र खर्चानुसार देणगीदार साईभक्त

सुनितादेवी (आक्का) यांचेकडून बांधकाम विभागाचे देखरेखीने करुन घेणेकामी प्रस्ताव सादर केला असता याकामी निर्णय क्र.४४८ खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री द्वारकामाई मंदिरातील धुनीवरील चिमणीचे नूतनीकरणाचे काम कोणत्याही साईभक्ताकडून करुन घेऊ नये, ते काम संस्थानमार्फत करणेत यावे" असे ठरले*

**प्रस्ताव:-** याकामी इकडील दि.०८/११/२०१४ रोजीचे टिपणी अन्वये वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर निविदा सुचना प्रसिध्द करुन सिलबद निविदा मागविण्यात आल्या होत्या. निविदा सुचनांनुसार कोरे निविदा फॉर्म विक्री दि.२६/११/२०१४ ते ०८/१२/२०१४ अखेर व सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि.१०/१२/२०१४ अखेर होती.

अ) विहीत मुदतीत खालील ठेकेदार यांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | दिनांक |
|---|---|---|
| ०१ | पुजा स्टील कार्पोरेशन, रिझवी पार्क एस.व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई- ५४ | २९/११/२०१४ |
| ०२ | विश्वास स्टील वर्क्स, तळवडे, पुणे | २९/११/२०१४ |
| ०३ | मेटल स्कील, वसई (पुर्व) ठाणे | २९/११/२०१४ |

ब) विहीत मुदतीत खालीलप्रमाणे ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | आवक क्र /दिनांक |
|---|---|---|
| ०१ | पुजा स्टील कार्पोरेशन, रिझवी पार्क एस.व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई- ५४ | ३०९३/ ०९.१२.२०१४ |
| ०२ | विश्वास स्टील वर्क्स, तळवडे, पुणे | ३०९४/ ०९.१२.२०१४ |
| ०३ | मेटल स्कील, वसई (पुर्व) ठाणे | ३०९५/ ०९.१२.२०१४ |

उपरोक्त कामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत आला. त्यामधील मूळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | पूजा स्टील कार्पोरेशन, सांताक्रुज, मुंबई | १,२७,५००/- |
| २ | मेटल स्कील, वसई, ठाणे | १,४१,१००/- |
| ३ | विश्वास स्टील वर्कस्, तळवडे, पुणे | १,४९,६००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे द्वारकामाई मंदिराचे पवित्र धुनीवरील चिमणीचे नुतनीकरण करणेकामी पूजा स्टील कार्पोरेशन, सांताक्रुज, मुंबई यांचे रु.१,२७,५००/- मात्र निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,८३,५६०/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय:** मा. त्रिसदस्य समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६२४ खालील प्रमाणे समत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,८३,५६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:** मा. त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीसाठी दि.२५/११/२०१४ ते दि.११/१२/२०१४ पर्यंत मुदत देणेत येऊन या कालावधीत खालील प्रमाणे निविदांची विक्री करणेत आली आहे.

१. मोहसिन शौकत शेख, श्रीरामपूर
२. श्री. कृष्णा दामू शिंदे, शिर्डी
३. सौरभ डेकोरेटर्स, पुणे
४. आर्दे इलेक्ट्रीकल्स्, अ. नगर
५. श्री समर्थ कृपा पेन्टींग वर्क, मुंबई
६. श्री. संजय गणपत गायकवाड, राहाता

जाहिरातीनुसार सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि.१५/१२/२०१४ रोजी देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | सौरभ डेकोरेटर्स, पुणे | ०१७१७३, ०१७१७४, दि.११/१२/२०१४ |
| ०२. | श्री समर्थ कृपा पेन्टींग वर्क, मुंबई | १७५५१, दि.१५/१२/२०१४ |
| ०३. | आर्दे इलेक्ट्रीकल्स, अ. नगर | १७५६८, दि.१५/१२/२०१४ |
| ०४. | मोहसिन शौकत शेख, श्रीरामपूर | १७५६९, दि.१५/१२/२०१४ |
| ०५. | श्री. कृष्णा दामू शिंदे, शिर्डी | १७५७०, दि.१५/१२/२०१४ |
| ०६. | श्री संजय गणपत गायकवाड, राहाता | १७६०९, दि.१५/१२/२०१४ |

उपरोक्त कामी प्राप्त झालेल्या ०६ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आला. त्यामधील मूळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | सौरव डेकोरेटर्स, पुणे | ८,२१,५०७/- (निविदादरात १२.३०% कमी) |
| २ | श्री समर्थ कृपा पेन्टींग वर्कस्, मुंबई | ८,८०,५२१/- (निविदादरात ६% कमी) |
| ३ | आर्दे इलक्ट्रीकल्स, अहमदनगर | ८,८९,९८१/- (निविदादरात ४.९९% कमी) |
| ४ | मोहसिन शौकत शेख, श्रीरामपूर | अपात्र |
| ५ | श्री.कृष्णा दामू शिंदे, शिर्डी | अपात्र |
| ६ | श्री.संजय गणपत गायकवाड | ९,१७,९९०/- (निविदादरात २% कमी) |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीचे आतील भागास रंगकाम करणेकामी सौरव डेकोरेटर्स, पुणे याचे रु.८,२१,५०७/- मात्र निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **संस्थान रुग्णालयांकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) करीता वार्षिक देखभाल दुरुस्ती (O & M) करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,००,०००/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:**

**०१.** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०४/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. २६४ (०३) अन्वये खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कामासाठी विहीत करण्यात आलेल्या Minimum Qualifying Criteria नुसार वरीलपैकी एकाही निविदाधारक पात्र होत नाही. त्यामुळे उपरोक्त सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात व सदरहूकामी पूर्व पात्रता निकष शिथील करणेत येऊन नव्याने फेर निविदा मागविण्यात याव्यात, अशी उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली. "

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८११ (०७) अन्वये खालील प्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता निविदाधारकांनी निविदेमध्ये दिलेल्या दरात फारच तफावत दिसून येत आहे. सदरहू कामीचे निम्नतम दर धारक साज वॉटर ट्रिट इंडीया प्रा. लि., अ. नगर याचे दर इतर ठेकेदारांचे तुलनेत अतिशय कमी असल्याने त्यानी निविदेतील सर्व नियम व अटी विचारात घेऊन निविदा सादर केली आहे किंवा कसे? याबाबत त्यांचे प्रतिनिधींनी दरपृथ करण सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या त्यांचेकडून दरपृथःकरण प्राप्त झालेनंतर ते पुढील सभेमध्ये सादर करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. "

**प्रस्तावना:** उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार सदरहू कामी निम्नतम दर सादरकर्ते साज वॉटर ट्रिट इंडीया प्रा. लि., अहमदनगर यांना दि.15/09/2014 रोजीचे मा. उपसमितीचे सभेपुढे त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये सुट देणार किंवा कसे याबाबत त्याना बोलविणेत आले असता, त्याचे उपस्थित प्रतीनिधी याना निविदा दराबाबत माहिती देता आली नाही. निविदेतील दराबाबत सविस्तर माहिती सादर करतो असे त्यांनी बैठकीत सांगीतले त्यानंतर त्यांनी दि.29/09/2014 रोजी खालीलप्रमाणे पत्र सादर केले आहे.

".. With the above reference, our quoted value Rs. 4,25,000/- (Rs. Four lakhs twenty five thousand only) for Operation and Maintenance of STP. Qty 02.

This cost is given without chemicals. We extremely apologies for not considering and overlooking the clause no. 24 page No. 09 given in your tender.

The following chemicals required for running plants during maintenance.

- Sodium Hypo Chloride-(Approx.) 20 Ltr. Per day for both plants.
- Ferric Alum -(Approx.) 10 Kg Per day for both plants.
- Poly Sulpha Sponge-(Approx.) 1 Kg Per day for both plants.

The minimum most cost for the chemicals will be Rs. 2,85,000/- (Rs. Two lakhs eighty-five thousand only). You are requested to add Rs. 2,85,000/- to our quoted value in tender.

The total amount of our AMC quotation will be Rs.7,10,000/- (Rs. Seven lakhs ten thousand only)."

त्यानी देऊ केलेली एकत्रीत रक्कम रु. 7,10,000/- इतर निविदाधारकांपेक्षा कमी आहे. सदरहू कामी वरील निविदा ह्या फेर निविदा मागविण्यात आलेल्या असल्याने, याकामी पून्हा जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा विक्रीसाठी दि. ०८/१२/२०१४ ते दि. २२/१२/२०१४ अखेर मुदत देणेत येऊन या कालावधीत खालील प्रमाणे निविदांची विक्री करणेत आली आहे.

1. वमने विजय मच्छिंद्र, माळेवाडी ता. श्रीरामपूर
2. साई एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा. लि., हैद्राबाद
3. साज वॉटर अण्ड सोलर अप्लॅएन्स्, अहमदनगर
4. यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे
5. रविराज इंजिनिअर्स, कोल्हापूर

जाहिरातीनुसार सिलबंद निविदा सादर करणेची मुदत दि.२५/१२/२०१४ रोजी देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत उपरोक्त पैकी खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | आवक क्र. व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | साई एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि., हैद्राबाद | ०१८१७०/ २३.१२.२०१४ |
| ०२. | वमने विजय मच्छिंद्र, माळेवाडी ता. श्रीरामपूर | ०१८२७९/ २५.१२.२०१४ |
| ०३. | साज वॉटर अण्ड सोलर अप्लॅएन्स्, अहमदनगर | ०१८२८०/ २५.१२.२०१४ |
| ०४. | यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे | ०१८२८१/ २५.१२.२०१४ |

उपरोक्त कामी प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या. त्यामधील मूळ दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| १ | साई एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि., हैद्राबाद | १७,५०,०००/- |
| २ | विजय मच्छिंद्र वमने, श्रीरामपूर | अपात्र |
| ३ | साज वॉटर अॅण्ड सोलर अप्लॅएन्स, अहमदनगर | १२,५८,४३२/- |
| ४ | यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे | ७,८०,०००/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्र (STP) करीता वार्षिक देखभाल दुरुस्ती (O & M) करणेसाठी यश एन्व्हायरो टेक्नॉलॉजीस, पुणे यांचे रु.७,८०,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०४ श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता Electromechanical Operation Table with Remote खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.५,३४,०००/-)**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागात वेगवेगळ्या प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Electromechanical Operation Table with Remote ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे असलेले ०३ नग O.T.Table हे वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांनी दि. १५/०२/२०१२ रोजीचे मागणीपत्रान्वये ०४ नग Electromechanical Operation table with Remote ची मागणी केलेली आहे. त्यापैकी ०२ टेबल हे तातडीने पाहिजे असल्याने सदरचे खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव ठेवण्यात आला आहे तर ऊर्वरित ०२ नग टेबल खरेदी करावयाचे आहे.

सदर ०२ नग Electromechanical Operation Table with Remote खरेदीकामी M/s. IVES Healthcare Pvt. Ltd., Ahmedabad याचेकडून अंदाजे खर्चासाठी दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. IVES Healthcare Pvt. Ltd., Ahmedabad यांनी दि. १६/०१/२०१३ चे पत्रान्वये सदर Electromechanical Operation Table with Remote चे दर कळविलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | **Electromechanical Operation Table with Remote**<br>"Surgident Electromac 1"– Electro Mechanical Operation Table<br>• Five section x-ray translucent top<br>• In-built kidney bridge<br>• Interchangeable head & leg section<br>• 304 grade stainless steel fully electro-polished.<br>• Minimum height 30"<br>• Maximum height 44"<br>• Die pressed SS cover on base<br>• Very heavy base for total stability<br>• Electric floor locking mechanism<br>• Provides all surgical positions via corded remote<br>• Additional control on table top<br>• Fully electro polished stainless steel<br>• Base size: 50 mm thick x 60 density<br>• Mattress Size : 50mm thick x 60 density<br>• Side railing 30mm x 10mm<br>• Approx. weight 250 kg | 02 | 2,45,000.00 | 4,90,000.00 |
| 02. | Laminectomy frame | 01 | 22,000.00 | 22,000.00 |
| 03. | Restroscopy attachment | 01 | 22,000.00 | 22,000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **5,34,000.00** |

उपरोक्त ०२ नग Electromechanical Operation Table with Remote खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५,३४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. २७/०४/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. २७ निर्णय क्र. ३७० अन्वये ०२ नग Electromechanical Operation Table with Remote विहीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या रक्कम रु. ५,३४,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सामना- औरंगाबाद, पुढारी – पुणे, लोकशाही वार्ता – नागपूर, Free Press या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळांवर दि. ०५/०८/२०१३ ते दि. १५/०८/२०१३ या कालावधीत देण्यात येऊन दि २२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण १७ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

परंतु माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.२९/०४/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये घेण्यात आलेल्या Digital Signature Certificate पैकी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे Certificate ची मुदत संपुष्टात आलेली होती. तसेच श्री. दिनेश दिलीप कानडे– लिपीक यांची Digital Signature Certificate खराब झालेली होती, त्यामुळे वरील तारखेच्या सदर निविदा Open झाल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि. २३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिपणीअन्वये औषध भांडार विभागास कळविण्यात आलेले होते त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार सस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत Free Press– Mumbai, प्रहार– मुंबई या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दि. २३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतू IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे वरील "अ" तक्त्यातील तारखेप्रमाणे सदर ई - निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध होऊ शकल्या नव्हत्या.

त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि. ०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि. ०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि. ०२/१०/२०१३ रोजीच संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे ब-याच निविदाधारकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई– निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर जाहिरात देण्यात येऊन दि. ३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्या निविदाधारकांनी पहिल्या जाहिरातीस अनुसरुन निविदा सादर केल्या होत्या त्यांना पुन्हा फक्त कमर्शियल निविदा Online सादर करणेबाबत दि. १३/११/२०१३ रोजीचे ई-मेल पत्रान्वये कळविण्यात आले होते. कारण त्यांनी तात्रिक निविदेचे बंद पाकिट सादर केलेले होते. परंतू काही निविदाधारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन Online निविदा सादर केलेली नव्हती.

सुरुवातीच्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक निविदा व नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन ६ तांत्रिक निविदा अशा एकूण २३ तांत्रिक निविदांचे बंद पाकीट सादर झाले होते.

सदरच्या प्राप्त बंद तांत्रिक निविदा दि. ०५/१२/२०१३ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. तसेच ज्या निविदाधारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन कमर्शियल निविदा सादर केल्या आहे किंवा कसे याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती, परंतु काही निविदाधारकांनी त्या Online सादर केल्या नाहीत.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या आहे, त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असा प्रस्ताव दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ४६९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई – निविदा मागील आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा / वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळ्या सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे. त्यापैकी रु. १० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणा-या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन निविदा / ई – निविदांची मागणी करणेत यावी.

तसचे यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा / वाटाघाटी होणार नाहीत, निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अंदाजे दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले होते.

त्यानुसार LED Shadowless Lamp खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर– मुंबई, सार्वमत– श्रीरामपुर, पुण्यनगरी– नाशिक, पुढारी– पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०९/०९/२०१४ ते दि.२०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना दि १०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल व्दारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 23/09/2014 |
| 02. | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 23/09/2014 |
| 03. | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 23/09/2014 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद तांत्रिक निविदा दि. ०८/१०/२०१४ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन तीनही निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे specification दिलेले आहे. त्यामुळे तीनही निविदाधारक पात्र असुन त्यांच्या कमर्शियल ई- निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता भारतीय बनावटीच्या Electromechanical Operation Table with Remote ची मागणी होती. परंतु तांत्रिक निविदा उघडल्यानंतर सर्व निविदा विदेशी बनावटीच्या ऑपरेशन टेबलसाठी असल्याचे निदर्शनास आले व आपणास भारतीय बनावटीच्या टेबलची आवश्यकता असल्यामुळे याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदरहू निविदांमध्ये भारतीय बनावटीबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०५ **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता LED Shadowless Lamp खरेदीकामी प्राप्त कमर्शियल ई-निविदा उघडून निर्णय घेणेबाबत. (रु.९,००,०००/-)**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाने निरनिराळ्या प्रकारच्या (गायनॅक आर्थोपेडिक व जनरल इ.) शस्त्रक्रिया करणेकामी LED Shadowless Lamp हे सन १९९९ साली खरेदी केले होते. परंतु सदर Shadowless Lamp हे वापरुन खराब झाल्यामुळे त्यांनी दि. ०३/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०३ नग Shadowless Lamp ७+४ Dome ची मागणी केलेली आहे.

सदर Shadowless Lamp ची अंदाजे किंमत प्रति नग रु. ३,००,०००/- इतकी असुन ०३ नग Shadowless Lamp खरेदीकामी अदाजे रु. ९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Shadowless Lamp (Gynaec- 2 & Surgery – 1) (Min. 2.50 Lux.) | 03 | 300000.00 | 900000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **900000.00** |

दि. ३०/०३/२०१३ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं १४, निर्णय क्र. २७५ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाकरिता LED Shadowless Lamp खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सामना - औरंगाबाद, पुढारी– पुणे, लोकशाही वार्ता– नागपूर, Free Press या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे संकेत स्थळांवर दि. ०५/०८/२०१३ ते दि. १५/०८/२०१३ या कालावधीत देण्यात येऊन दि. २२/०८/२०१३ अखेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या त्यास अनुसरुन एकूण १७ निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

परंतु माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि. २९/०४/२०१३ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये घेण्यात आलेल्या Digital Signature Certificate पैकी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे Certificate ची मुदत संपुष्टात आलेली होती. तसेच श्री.दिनेश दिलीप कानडे– लिपीक यांची Digital Signature Certificate खराब झालेली होती, त्यामुळे वरील तारखेच्या सदर निविदा Open झाल्या नाहीत.

त्यानंतर सदरचे खरेदीकामी पुन्हा Re-Schedule करण्यात यावे असे माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दि. २३/०८/२०१३ रोजीची मंजूर टिपणीअन्वये औषध भाडार विभागास कळविण्यात आलेले होते त्यानुसार पुन्हा तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत Free Press - Mumbai, प्रहार– मुंबई या वर्तमानत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दि. २३/०९/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

परंतू IT विभागाकडून Digital Signature Certificate वेळेत तयार न झाल्यामुळे वरील "अ" तक्त्यातील तारखेप्रमाणे सदर ई - निविदा संकेत स्थळावर प्रसिद्ध होऊ श[illegible]ल्या नव्हत्या.

त्यामुळे पुन्हा सुधारीत तारखा देऊन त्याप्रमाणे IT विभागाकडून www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा देण्यात येऊन दि. ०९/१०/२०१३ अखेर बंद होणार होत्या परंतू IT विभागाकडून दि. ०२/१०/२०१३ अखेर अशी तारीख झाल्यामुळे दि. ०२/१०/२०१३ रोजीच संकेत स्थळावरुन निविदा बंद झाल्या होत्या. त्यामुळे ब-याच निविदाधरकांना निविदा पाहून देखील निविदा सादर करता आल्या नाहीत. सदरचे खरेदीकामी पुन्हा फेर ई–निविदा मागविणेकामी संस्थानच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात तसेच www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फेर जाहिरात देण्यात येऊन दि. ३०/११/२०१३ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.

ज्या निविदाधारकानी पहिल्या जाहिरातीस अनुसरुन निविदा सादर केल्या होत्या त्यांना पुन्हा फक्त कमर्शियल निविदा Online सादर करणेबाबत दि. १३/११/२०१३ रोजीचे ई-मेल पत्रान्वये कळविण्यात आले होते. कारण त्यांनी तांत्रिक निविदेचे बंद पाकिट सादर केलेले होते. परंतू काही निविदा धारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन Online निविदा सादर केलेली नव्हती.

सुरुवातीच्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या १७ तांत्रिक निविदा व नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन ६ तांत्रिक निविदा अशा एकूण २३ तांत्रिक निविदाचे बद पाकीट सादर झाले होते.

सदरच्या प्राप्त बंद तांत्रिक निविदा दि. ०५/१२/२०१३ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समोर उघडण्यात आल्या होत्या. तसेच ज्या निविदाधारकांनी नंतरच्या जाहिरातीस अनुसरुन कमर्शियल निविदा सादर केल्या आहे किंवा कसे याबाबत दुरध्वनीवरुन विचारणा करण्यात आली होती, परंतु काही निविदाधारकांनी त्या Online सादर केल्या नाहीत.

सदरचे खरेदीकामी तीन वेळेस जाहिरात देण्यात आली होती. त्यामुळे सद्यपरिस्थितीत प्रत्येक मशिनरी उपकरणांची काही ठिकाणी दोन तर काही ठिकाणी तीन पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या आहे, त्यामुळे आहे त्या प्राप्त कमर्शियल निविदा मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे समक्ष उघडून त्यावर निर्णय व्हावा असा प्रस्ताव दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. ४६९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील मशिनरी/ उपकरणे/ इन्स्ट्रुमेंट/ कन्झुमेबल स्पेअर पार्ट खरेदीकामी मागविणेत आलेल्या ई– निविदा मागील आर्थिक वर्षातील असल्यामुळे व त्या प्राप्त होऊन सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर निविदा ऑनलाईन बंद झालेल्या आहेत. त्यामुळे आजचे सभेमध्ये या निविदा उघडू शकल्या नाही व चर्चेसाठी बोलविणेत आलेल्या निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये वेगवेगळ्या सात प्रकारच्या साहित्यांची खरेदीबाबत उल्लेख आहे. त्यापैकी रु. १० लाख मात्रपेक्षा कमी खर्च येणारे व त्यापेक्षा जास्त खर्च येणा-या साहित्यांची विभागणी करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन, नवीन प्रस्ताव तयार करणेत यावा आणि वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध करणेत येऊन निविदा/ ई – निविदांची मागणी करणेत यावी.

तसेच यापुढे हॉस्पिटल साहित्य खरेदीकामी चर्चा/ वाटाघाटी होणार नाहीत. निम्नतम दरधारकांस पुरवठा आदेश देण्यात येईल, याकरिता अदाजे दर देण्यात यावे, याबाबतचा निविदेमध्ये स्पष्ट उल्लेख करावा, असे ठरले होते.

त्यानुसार LED Shadowless Lamp खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर– मुंबई, सार्वमत– श्रीरामपुर, पुण्यनगरी– नाशिक, पुढारी- पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि.०९/०९/२०१४ ते दि.२०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांना दि.१०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल व्दारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 23/09/2014 |
| 02. | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 23/09/2014 |
| 03. | M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai | 23/09/2014 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद तांत्रिक निविदा दि. ०८/१०/२०१४ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे. सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन तीनही निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे specification दिलेले आहे. त्यामुळे तीनही निविदाधारक पात्र असुन त्यांच्या कमर्शियल ई- निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडून निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता भारतीय बनावटीच्या ०३ नग LED Shadowless Lamp ची मागणी होती. परंतु तांत्रिक निविदा उघडल्यानंतर सर्व निविदा विदेशी बनावटीच्या LED Shadowless Lamp साठी असल्याचे निदर्शनास आले व आपणास भारतीय बनावटीच्या LED Shadowless Lamp ची आवश्यकता असल्यामुळे याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात. तसेच सदरहू निविदांमध्ये भारतीय बनावटीबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०६ **श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदीकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून निर्णय होणेबाबत. (रु.२,५०,०००/-)**

श्री साईनाथ रक्तपेढी विभागाने दि. २५/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे एक Ranbaxy कंपनीचे Elisa Plate Reader असुन ते सन २००७ या वर्षात खरेदी केलेले असुन त्या मशिनचा Display खराब झालेला आहे व कंपनीकडून दुरुस्तीकामी Service देखील मिळत नाही. त्यामुळे त्यांनी नवीन Elisa Plate Reader with UPS With Printer ची मागणी केलेली आहे.

सदरहू ०१ नग Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र ७३१ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत रक्तपेढी विभागाकरीता १ नग Elisa Plate Reader with UPS with Printer विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु २,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि १०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health care, Pune | 25/11/2014 |
| 2 | M/s. J. K. Sales & Services, Aurangabad | 25/11/2014 |
| 3 | M/s. Meril Diagnostics Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 4 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 25/11/2014 |
| 5 | M/s. Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | 25/11/2014 |
| 6 | M/s. Universal Chemicals, Nashik | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक सिलबद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरिता Elisa Plate Reader with UPS with Printer खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०७ **श्री साईनाथ रुग्णालयाकरिता कर्ण तपासणी शिबीराकामी श्रवण यंत्र खरेदी करणेसाठी प्राप्त तांत्रिक निविदा उघडणेबाबत. (रु.१,७०,०००/-)**

श्री साईनाथ रुग्णालयात दि. 14/05/2014 रोजी श्री साईनाथ रुग्णालयाच्या रुग्ण सेवेस 50 वर्ष पुर्ण झाले असल्याने सुवर्ण जयंती उत्सव साजरा करणेसाठी विविध मोफत शिबीरे घेणेबाबत मा. त्रिसदस्य समितीच्या सभेतील विषय क्र. 19 निर्णय क्र.951 दिनांक 13/01/2014 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तसेच शिर्डी परिसरातील गरीब व गरजू ज्येष्ठ नागरिकांसाठी दिनांक 19 मे ते 21 मे 2014 रोजी रुग्णांची ऑडीओमेट्रिद्वारे कर्ण तपासणी करण्यात आली, यात अंदाजे 300 रुग्णांना श्रवण यंत्र देण्यात आले आहेत. तथापि, रुग्णांची संख्या जास्त असल्याने साधारणत: 200 रुग्ण हे श्रवण यंत्र मिळण्यापासून वंचित राहिले आहेत. त्यांची प्रतिक्षा यादी तयार करुन ठेवली आहे. सदरचे रुग्ण वेळोवेळी मशिन आले किंवा नाही याबाबत विचारणा करीत आहेत. सदर रुग्णांना मशिन द्यावयाचे असल्याने यापूर्वी ज्या कंपनी कडून सदरचे श्रवण यंत्र घेतले आहेत, त्या कंपनीला पुर्वीच्याच दराने मशिन देणार का अशी चौकशी केली असता, त्यांनी संस्थानसाठी पूर्वीच्याच दराने श्रवण यंत्र पुरविण्याची तयारी दर्शवली आहे.

परंतु दि. 07/07/2014 चे टिपणीवर मुख्यलेखाधिकारी सो. यांनी सदरचे श्रवणयंत्र खरेदीबाबत वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करुन श्रवणयत्र खरेदी करणे योग्य होईल, असे आदेश दिलेले आहेत. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर आदेशानुसार कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. उपरोक्त मशिन खरेदीकामी 200 रुग्ण x रुपये 850/- = 1,70,000/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.28/08/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.732 अन्वये श्री साईनाथ रुग्णालयाकरिता कर्ण तपासणी शिबीराकामी श्रवण यंत्र खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.1,70,000/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जरनल- मुंबई, लाईफ 365 इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी-नाशिक, पुण्यनगरी-औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात 03 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Alps International Pvt Ltd., Delhi | 24/11/2014 |
| 2. | M/s. Arphi Electronics Pvt Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 3. | M/s. Elkon Private Limited, Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरिता कर्ण तपासणी शिबीराकामी श्रवण यंत्र खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 करिता Surgical Instrument खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.७९,०५०/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT I या विभागाने दि. १३/०६२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये खालीलप्रमाणे Surgical Instrument ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Instrument हे वापरुन खराब झालेले असुन कार्डियाक शत्रक्रियेकरिता सदरहू Instrument आवश्यक असतात त्यामुळे सदरचे Instrument खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Kalelker Surgical Industries, Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Instrument | Qty. | App. Rate in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Wire Holder 7" | 15 Pc | 1330.00 | 19950.00 |
| 02. | Wire Twister with T/C Jaws, 18 cm/7" | 4 Pc | 6730.00 | 26920.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 03. | Wire Twister with T/C Jaws, 20 cm/8" | 2 Pc | 8020.00 | 16040.00 |
| 04. | Needle Holder Mayo-Heger 20 cm/8" | 6 Pc | 630.00 | 3780.00 |
| 05. | Needle Holder Mayo-Heger 15 cm/6" | 6 Pc | 530.00 | 3180.00 |
| 06. | Scalpel / B.P. Handle No. 7 18 cm | 4 Pc | 155.00 | 620.00 |
| 07. | Scalpel / B.P. Handle 14 cm No. 4 | 4 Pc | 140.00 | 560.00 |
| | | | Total Rs. | 71050.00 |

त्यांचे दरानुसार सदरचे Surgical Instrument खरेदीकामी रक्कम रु. ७१,०५०/- इतका खर्च अपेक्षित आहे

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र.७२३ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT- I करिता Surgical Instrument खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ७१,०५०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ ईंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते [illegible]/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरून शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Axenic Labs Pvt. Ltd., Nashik | 22/11/2014 |
| 2 | M/s.Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 3 | M/s.Kelcker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 4 | M/s.South India Surgical Co. Ltd., Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 करिता Surgical Instrument खरेदी करणेसाठी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०९ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.१ या विभागाकरिता LED Light Source with Lamp खरेदीकामी प्राप्त कमर्शियल निविदा उघडून निर्णय होणेबाबत. (रु.३,४७,०००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ. टी. १ या विभागाकरिता वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेकामी LED Light Source with Lamp ची आवश्यकता आहे. कारण सध्या त्यांच्याकडे असलेले LED Light Source with Lamp हा सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेला होता. सदर LED Light Source with Lamp हा खुप जुना झालेला असुन त्यांच्या Light ची तीव्रता कमी झालेली असल्यामुळे त्यात स्पष्टपणे दिसत नाही. त्यामुळे त्यांनी दि. ०३/०४/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग LED Light Source with Lamp ची मागणी केलेली आहे.

सदर LED Light Source with Lamp खरेदीकामी अंदाजे रु. ३,४७,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. ७२ निर्णय क्र. ५२२ अन्वये ०१ नग LED Light Source with Lamp विहीत पद्धतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.३,४७,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार LED Light Source with Lamp खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर– मुंबई, सार्वमत– श्रीरामपुर, पुण्यनगरी– नाशिक, पुढारी– पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती निविदा विक्रीची मुदत दि. ०९/०९/२०१४ ते दि. २०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेते यांना दि.१०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| Sr. No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 23/09/2014 |
| 02. | M/s. Cher Medical Technologies, Mumbai | 23/09/2014 |

| | | |
|---|---|---|
| 03. | M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi | 22/09/2014 |
| 04. | M/s. Visionary Meditech Solution Pvt. Ltd., Ahmedabad | 20/09/2014 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबद तांत्रिक निविदा दि. ०८/१०/२०१४ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहे सदर तांत्रिक बाबींच्या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन चारही निविदाधारांनी आपण Specification मध्ये मागणी केल्याप्रमाणे Specification दिलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ कमर्शियल ई- निविदा आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| Sr. No. | Description | Qty | M/s. Visionary Medtech Solutions Pvt. Ltd., Ahmedabad | M/s. Sairam Biomedics, Mumbai | M/s. Cher Medical Technologies, Mumbai | M/s. B.L.Lifesciences Pvt. Ltd., New Delhi |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per in Rs | Rate per in Rs | Rate per in Rs | Rate per in Rs |
| 1 | LED Light Source with Head Lamp | 1 | 178500 00 | 213750.00 | **148125.00** | 357000.00 |
| | Warranty - 3 Years. | | 3 Years | | 1 Years | 3 Years |
| | AMC/CMC Cost - AMC should be 3% of basic cost including Taxes | | | AMC – ISt - 1900.00 [illegible] – 2000 00 IIIrd – 2200 00 | AMC - 3% | AMC - 3% + Taxes Extra |
| | CMC should be 5% of basic cost including Taxes It should be fixed for next 5 years. | | | CMC – ISt - 5700 00 IInd – 5750.00 IIIrd – 6000.00 | CMC - I st - 14,812/- II nd - 16,293/- III rd - 17,775/- IV th - 19,256/- V th - 20, 737/- | CMC - 4th to 8th Year 5% + Taxes Extra |

**श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.१ या विभागाकरिता ०१ नग LED Light Source with Lamp खरेदीकामी M/s. Cher Medical Technologies, Mumbai यांचे रु.१,४८,१२५/- मात्र दर निम्नतम आहेत. तथापि त्यांनी निविदेमध्ये मागणी केलेले C.M.C. चार्जेस ५% ऐवजी १०% दिलेले आहेत. तसेच वॉरंटी कालावधीदेखील ३ वर्षाऐवजी १ वर्ष दिलेला आहे.**

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय संचालक यांनी M/s. Cher Medical Technologies, Mumbai यांचेबरोबर निविदेमधील अटीप्रमाणे C.M.C. चार्जेस व वॉरंटी कालावधीबाबत चर्चा करावी व त्यांना कार्यादेश देणेचा अंतीम निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१० **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-II विभागाकरिता Fully Automatic Horizontal Autoclave Machine Buyback करुन नविन खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.४,९५,०००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी. II या विभागात वेगवेगळ्या प्रकारच्या हृदय शस्त्रक्रिया होत असतात. सदर शस्त्रक्रियेकरिता लागणारे Surgical Instruments निर्जंतुक करण्यासाठी उपरोक्त Autoclave Machine चा वापर होत असतो. **सध्या सी.व्ही.टी.एस. ओ. टी.– II या विभागात असलेले** Autoclave Machine हे सन २००६ या वर्षात मे. एम. शहा अॅण्ड कंपनी, पुणे यांचेकडून खरेदी केले होते. परंतु सध्या ते नादुरुस्त झालेले आहे व ते दुरुस्त देखील होणार नाही, असा बायोमेडिकल विभागाचा अभिप्राय आहे. त्यामुळे सी.व्ही.टी.एस. ओ.टी. II या विभागाने नविन मशिनची मागणी केलेली आहे.

उपरोक्त ०१ नग Fully Automated Horizontal Autoclave Machine खरेदीकामी अंदाजे रु. ४,९५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७२२ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ. टी. II विभागाकरिता Fully Automated Horizontal Autoclave Machine Buyback करुन नविन खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. ४,९५,०००/- चे खर्चास तसेच जुने Fully Automated Horizontal Autoclave Machine Buyback करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळालेली आहे त्यानुसार इकडील पत्र क्र. २७२७, दि. २४/०८/२०१३ अन्वये विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता त्यानुसार महाराष्ट्र

शासन विधी व न्याय विभाग, निर्णय क्र. सासवि- २०१३/३३९/ प्र.क्र. ७५/का.सोळा/, दिनांक २१/०७/२०१४ अन्वये सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरून शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Emshah, M. Shah and Company, Pune ( 3 Envelope) | 22/11/2014 |
| 2 | M/s.Kevin Medi - Equip, Vadodara (2 Envelope) | 26/11/2014 |
| 3 | M/s.Mack Auraa, Mumbai ( 2 Envelope) | 25/11/2014 |
| 4 | M/s.Modi Enterprises (India) Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-II विभागाकरिता Fully Automatic Horizontal Autoclave Machine Buyback करुन नविन खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

११ **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-1 करिता Defibrillator Machine खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.२,०८,१२५/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाने दि. ०५/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Defibrilator Machine ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे २० खाटांचे ICCU आहे त्यामध्ये काही रुग्ण हे कार्डियाक व कार्डिओलॉजी अशा दोन्ही शस्त्रक्रियेचे असतात. सदर मशिन हे रुग्ण अत्यावस्थेत असल्यावर जेव्हा त्याचे ह्दय बंद पडण्याचे स्थितीत असते त्यावेळेस अशा रुग्णांना सदर मशिनने शॉक देऊन ते पुन्हा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करणेकामी वापरण्यात येते. सदर विभागात असलेले 1 नग Defibrillator मशिन कमी पडत आहे, त्यामुळे त्यानी नवीन एक नग मशिनची मागणी केलेली आहे.

वरीलप्रमाणे Defibrillator Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी त्यांचे दि. १८/०७/२०१४ रोजीचे ई-मेल द्वारे खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे

| Sr. No. | Item Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| .01 | DEFIBRILLATOR (Biphasic with recorder) Biphasic with 24 event recording, synchronized cardion version, thermal printing. | 1 | 2,08,125.00 | 2,08,125.00 |
| | | | Total In Rs. | 2,08,125.00 |

उपरोक्त प्रमाणे 01 नग Defibrilator Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. २,०८,१२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२८/०८/२०१४ निर्णय क्र. ७२६ अन्वये मा. त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाकरिता ०१ नग Defibrilator Machine खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.२,०८,१२५/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Austin Health care, Pune | 25/11/2014 |
| 2 | M/s.Axenic Labs Pvt. Ltd., Nashik | 22/11/2014 |
| 3 | M/s.Hospitech, Mumbai | 25/11/2014 |
| 4 | M/s.Schiller Healthcare India Pvt. Ltd., Pune | 25/11/2014 |
| 5 | M/s.Summit Healthcare (P) Ltd., Mumbai (2 Envelope) | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-1 करिता Defibrillator Machine खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१२ **राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांकरिता औषधे खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडणेबाबत. (रु.५,०४,१३१/-)**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन 2013-14 करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्र. 564 अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.25/10/2013 रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करून मा. त्रिसदस्य समिती सभा दि. 15/03/2014 चे सभेतील निर्णय क्र. 254 अन्वये दि. 19/03/2014 रोजी एकूण 66 पुरवठाधारकांना एकूण रु. 30,52,88,358/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. विविध वॉर्ड विभागातुन वार्षीक औषधे खरेदी व्यतिरिक्त वेगवेगळया प्रकारची औषधांची मागणी केली जाते. परंतु ती वार्षीक खरेदीमध्ये मागणी नसल्यामुळे वेळोवेळी खरेदी करावी लागतात. त्यामुळे दि.02/05/2014 रोजीचे परिपत्रकान्वये वार्षीक मागणी व्यतिरिक्त राजीव गांधी जीवनदायी योजना रुग्णासाठी लागत असेल त्याची मागणी करावी असे कळविण्यात आले होते. त्यानुसार सोबतच्या यादीप्रमाणे सध्या औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झ्युमेबल साहित्याची नविन मागणी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार मा. त्रिसदस्य समिती दि.17/07/2014 रोजीचे सभेत थोडी थोडी औषधे खरेदी करण्या ऐवजी डॉक्टरांकडून मागणी से [illegible] रु.900000/- (अक्षरी रक्कम रु नऊ लाख मात्र) पर्यंत लागतील ती औषधे खरेदी करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार सदरची खरेदी करता येईल.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य सोबतच्या यादी प्रमाणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. 504131/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख चार हजार एकशे एकतीस मात्र) इतका खर्च येणार आहे.

दि.28/08/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. 735 अन्वये राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.504131/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जरनल-मुंबई, लाईफ 365 इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी-नाशिक, पुण्यनगरी-औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या / पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात 05 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Addissun Lifescience Pvt. Ltd., Pune | 24/11/2014 |
| 2. | M/s. Rudraksh Pharma, Nashik | 25/11/2014 |
| 3. | M/s. S.S. Health Services, Rahata | 25/11/2014 |
| 4. | M/s. Balaji Drugs Chemical Agencies, Nashik | 25/11/2014 |
| 5. | M/s. Getwell Distributors, Nashik | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार घेणा-या रुग्णांकरिता औषधे खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१३ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरिता फर्नीचर खरेदीकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडणेबाबत. (रु.७,९९,४२१/-)**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाने विविध प्रकारच्या हॉस्पिटल/ कार्यालयीन फर्नीचरची मागणी केलेली आहे. रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढल्यामुळे कॉटची संख्या देखील वाढत आहे, त्यामुळे तेथे नविन फर्नीचरची मागणी केलेली आहे तसेच बऱ्याच वॉर्ड/ विभागातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले आहे, त्यामुळे त्यांनी नविन फर्नीचर मिळणेबाबत मागणी केलेली आहे. विविध वॉर्ड/ विभागाने मागणी केलेल्या फर्नीचरचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्नीचर खरेदीकामी अदाजे रक्कम रु.7,9९,421/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.28/08/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. 724 अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरिता फर्निचर खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.7,99,421/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्रि प्रेस जरनल-मुंबई, लाईफ 365 इंग्लिश-पुणे, दिव्य मराठी-नाशिक, पुण्यनगरी-औरंगाबाद या वर्तमानपत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण 72 उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.10/11/2014 ते 22/11/2014 पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.25/11/2014 अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन येथील कार्यालयात 06 निविदा प्राप्त झालेल्या आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Quali Surge Surgical Pvt Ltd , Pune | 22/11/2014 |
| 2 | M/s. Sanjivani Hospital Furniture, Pune | 24/11/2014 |
| 3. | M/s. Sai Enterprises, Shrirampur | 25/11/2014 |
| 4. | M/s. Austin Healthcare, Pune | 25/11/2014 |
| 5 | M/s. Axenic Labs Pvt Ltd., Nashik | 25/11/2014 |
| 6. | M/s. Janak Healthcare Pvt Ltd., Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०६ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरिता फर्नीचर खरेदीकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१४ **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Working Element खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.१,४८,१६९/-)**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ. टी. विभागाने दि. २६/११/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग Working Element ची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे सध्या असलेले Working Element हे सन १९९९ या वर्षी खरेदी करण्यात आलेले होते. सध्या ते वापरुन वापरुन खराब झालेले आहे. सदरचे Working Element हे युरोलॉजी शत्रक्रिया करण्याकरिता आवश्यक असतात. सध्या असलेले Working Element हे वापरुन खराब झाल्यामुळे त्यांनी नवीन खरेदी करुन मिळणेबाबत मागणी पत्रान्वये कळविले आहे

सदरचे Working Element खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Karl Stroz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून ई-मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आले होते, त्यांनी दि. २६/०६/२०१४ रोजीचे ई-मेल द्वारे सदर Working Element करिता प्रति नग रु १,४८,१६९/- इतके दर कळविलेले आहे, M/s. Karl Storz Endoscopy India Pvt. Ltd., New Delhi यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रु.१,४८,१६९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०३/०८/२०१४ निर्णय क्र. ६५९ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. करिता Working Element खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु. १,४८,१६९/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री- प्रेस जरनल- मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश- पुणे, दिव्य मराठी- नाशिक, पुण्यनगरी- औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच

संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, तर मुंबई कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे–

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Austin Health care, Pune | 25/11/2014 |
| 2 | M/s.Endosys International, Mumbai | 21/11/2014 |
| 3 | M/s.Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ तांत्रिक सिलबद निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ओ.टी. करिता Working Element खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१५ **श्री साईबाबा मंदिर सुरक्षेच्या अनुषंगाने साईभक्तांची तपासणीकामी लाकडी बॉक्स तयार करणेबाबत.**

श्री साईबाबा मंदिर सुरक्षेच्या अनुषंगाने समाधी मंदिर परिसरातील चार प्रवेशद्वारावर साईभक्तांची सुरक्षा कर्मचारी/ पोलीस कर्मचारी साईभक्तांची बारकाईने शारीरीक तपासणी करतांना दिसून येत नसल्याने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक भाविकाची गळयापासून ते पायापर्यंत बारकाईने तपासणी होणे अनिवार्य आहे. मात्र भक्तांची संख्या लक्षात घेता अशा प्रकारे प्रत्येक भाविकाची तपासणी करणे शक्य होत नाही. कारण समांतर जमिनीवर उभे राहून वरीलप्रमाणे तपासणी करणेकामी सुरक्षा/ पोलीस कर्मचारी याना वाकावे लागेल शारीरीकदृष्टया ही बाब अशक्य असून, आग्रा व मथुरा येथील तपासणी प्रणालीचा अवलंब केल्यास फायदेशीर ठरेल. याकामी प्रवेशद्वारावर दोन फुट उंचीचा लाकडी बॉक्स तयार करुन त्यावर चढण्या- उतरण्यासाठी एकेक पायरी तयार करण्यात यावी म्हणजे भाविक त्या बॉक्सवर उभा राहिल्यावर त्याची गळयापासून पाया पावेतो अचूकपणे व वेगाने तपासणी करणे सहज शक्य होईल. तसेच महिलाचे रांगेत बॉक्स भोवती आडोसा निर्माण करण्यात यावा. याप्रमाणे मंदिर परिसरात प्रवेश करण्याच्या चारही प्रवेशमार्गावर ही पध्दत अवलंबविण्यात यावी असे बी.डी. डी. एस. यांनी त्यांचे पत्रातील मुद्याप्रमाणे कळविले असल्याचे संरक्षण विभागाने संदर्भिय पत्रान्वये उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

<u>प्रस्ताव</u>– मंदिर परिसरातील तीन प्रवेशद्वारावर साई भक्तांची तपासणी करणेकामी एम.एस.ॲंगलमध्ये फ्रेमवर्क तयार करुन त्यावर वाटरप्रुफ प्लायवूड बसविता येईल. तसेच महिला भाविकांची तपासणी करणेकामी प्लायवूडमध्ये केबीन तयार करता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मटेरियलचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एम.एस. ॲंगल २५x२५x४ एम.एम. 75Rmt. | १०५ | किलो | ५०/- | ५,२५०/- |
| ०२ | वॉटर प्रुफ प्लायवूड – १९ एम.एम. साईज – ६' x ४' १२ नग = २८८ चौ. फुट | २८८ | चौ. फुट | १२०/- | ३४,५६०/- |
| ०३ | वॉटर प्रुफ प्लायवूड – १२ एम.एम. साईज – ८' x ४' ९ नग = २८८ चौ. फुट | २८८ | चौ. फुट | ८२/- | २३,६१६/- |
| ०४ | सागवान लाकूड साईज – २" x २" = १९२ र. फुट | ५.३३ | घन फुट | २२००/- | ११,७२६/- |
| ०५ | केबीनचे आतील व बाहेरुन ऑईल पेंटमध्ये रंगकाम करणे. ऑईल पेंट | १० | लिटर | २४०/- | २,४००/- |
| ०६ | प्रायमर (वुड) | ५ | लिटर | १७५/- | ८७५/- |
| | | | | एकूण रक्कम रु. | ७८,४२७/- |

वरीलप्रमाणे प्रवेशद्वारावर साईभक्ताची तपासणी करणेकामी एम.एस. ॲंगलमध्ये फ्रेमवर्क तयार करुन त्यावर प्लायवूड बसविणेकामी आवश्यक मटेरिअल खरेदीकरिता रु.७८,४२७/- मात्र खर्च अपेक्षित आहे. यासाठी ॲंगलमध्ये फ्रेम तयार करण्याचे काम संस्थानचे मॅकेनिकल विभागामार्फत करुन घेता येईल. तसेच प्लायवूड बसविणेचे काम इकडील विभागामार्फत करता येईल.

तरी वरील प्रमाणे काम करणेकामी आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व काम विभागामार्फत करुन घेणेस तसेच याकामी येणारे रक्कम रु.७८,४२७/- मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर सुरक्षेच्या अनुषंगाने साईभक्तांची तपासणी करणेकामी लाकडी बॉक्स तयार करुन घेणेसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या प्रत्येक मटेरीयल खरेदीकामी स्वतंत्रपणे विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.७८,४२७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१६ **मुसळगाव, ता.सिन्नर येथील संस्थानच्या पालखी थांब्याचे नूतनीकरण व परिसर विकास कामांबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या **कलम** 21 मधिल पोटकलम (1) च्या खंड (क्) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय दि.30/03/2013 रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र. 270 संमत झालेला आहे.

*" ...यावर सविस्तर चर्चा होवून, संस्थानचे मुसळगाव ता. सिन्नर येथील पालखी थांब्याचे नुतनीकरण व परिसर विकासाचे काम करणारे ठेकेदार श्री चद्रशेखर भाउसाहेब काजळे, मु.पो. शिंगणापुर कोपरगाव यांना दिलेला कार्यादेश रद्द करणेत येवून, त्याची अनामत रक्कम जप्त करणेत यावी. तसेच, उर्वरीत कामाचे नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. "*

**प्रस्तावना :-**

मुबई, गुजरात व परिसरातून श्री साईबाबांची पायी पालखी घेवून शिर्डीस येणाऱ्या साईभक्तांना निवास तथा विश्रांतीसाठी संस्थानने मुसळगाव ता. सिन्नर येथील सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, सिन्नर यांचे जागेत पालखी थांब्यासाठी 40 मी. X 20 मी. साईजचे पत्राशेड व किचन/स्टोअर रुम, 10 संडास व 10 बाथरुमची व्यवस्था केलेली आहे.

सदरहु शेडची उंची जास्त असल्याने वादळी पावसात पावसाचे पाणी शेडमध्ये येवून भक्तांची धावपळ व गैरसोय होते. करीता सदरहु ठिकाणी असलेल्या शेडला दोन्ही बाजुंनी छतापासून खाली 8 फुटापर्यंत आणि शेडचे पाठीमागील रुंदीचे बाजूस सात फुट उंचीपर्यंत विट बांधकाम करून उर्वरीत भागात टाटा ब्ल्यु स्कोप शीट बसविणेकामी ठेकेदार श्री. चद्रशेखर भाउसाहेब काजळे, मु.पो. शिंगणापूर ता. कोपरगाव यांना रु.21,79,640/- मात्र रकमेचा कार्यादेश इकडील जा.क्र.3588/2014 दि.08/10/2011 अन्वये देण्यात आला होता. तथापि ठेकेदार यांनी मुख्य शेडमधील दोन रुमचे बांधकाम, आतील-बाहेरील प्लॅस्टर, खिडकीचे एम.एस. ग्रील तसेच शेडचे बाजुने टाटा ब्ल्यु स्कोप शीटचे क्लॅडींग बसविणेकामी स्ट्रक्चरल स्टीलचे फॅब्रिकेशनचे काम झाल्यानंतर दि. 25/03/2012 पासून काम बंद ठेवले होते. तत्पुर्वी ठेकेदार यांचे झालेल्या कामाचे रनिंग बिल क्र. 01 पोटी रु.2,88,476/- मात्र इतकी रक्कम दि.22/06/2012 अन्वये अदा करणेत आली होती.

उर्वरीत काम पूर्ण करणेबाबत ठेकेदार यांचेकडे वारंवार पाठपुरावा करुनही त्यांचेकडून प्रतिसाद न मिळाल्याने दि.30/03/2013 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत वर नमूद निर्णय क्र. 2070 संमत करणेत आलेला आहे. त्यानुसार इकडील दि.20/11/2013 रोजीचे टिपणीअन्वये ठेकेदार श्री. चद्रशेखर भाऊसाहेब काजळे, मु.पो. शिंगणापूर ता. कोपरगाव यांचे संस्थानकडे जमा असलेली रु.72,365/- मात्र इतकी अनामत रक्कम लेखाशाखेमार्फत जप्त करणेत आली आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्त विषयांकीत कामातर्गत उर्वरीत शेडला क्लॅडींगसाठी टाटा ब्ल्यु स्कोप शीट बसविणे, दरवाजे, ॲल्युमिनियम स्लायडींग खिडक्या बसविणे, रंगकाम, प्रवेशद्वार व परिसर विकास कामांतर्गत पेव्हींग ब्लॉक्स बसविणे या कामाकरीता सोबत जोडलेले एस्टीमेट प्रमाणे सन 2013-2014 चे जिल्हा दरसुचीनुसार रु.9,27,876/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरहू खर्चास व याकामासाठी वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे मुसळगाव, ता.सिन्नर येथील संस्थानच्या पालखी थांब्याचे नूतनीकरण व परिसर विकास करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.९,२७,८७६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१७ **निमगाव-को-हाळे येथील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये,मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे

**प्रस्ताव**:- निमगांव को-हाळे हद्दीत वर्ग ४ कर्मचारी यांचे निवासाकरिता सेवाधाम निवासस्थान बांधण्यात आलेले आहे. त्यातील A, B, C. व D इमारतीचे मागील व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगतची जागा मोकळी असून तेथील घुशींनी जमीन भुसभुशीत केली आहे त्या ठिकाणी जमीनीवर गवत व झाडे झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे त्याठिकाणी साप व सरपटणारे प्राणी निघतात असे वर्ग ४ स्टाफ क्वार्टर मधील रहिवाशी कर्मचारी यांनी दि.०४/१०/२०१४ रोजीच्या अर्जात नमूद केले आहे सदर इमारती पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हर ब्लॉक बसविल्यास आरोग्य विभागाचे कर्मचा-यांना तेथील सफाई करणे सोयीचे होईल.

याकामी सोबत जोडलेल्या सन २०१३ – २०१४ च्या जिल्हा दरसुचीनुसार Paving Block बसविणेसाठी अंदाजे रक्कम रु.९,२७,५८६/- मात्रचा खर्चयेईल

तरी याकामी येणारा रक्कम रु ९,२७,५८६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, निमगाव-को-हाळे येथील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान पाठीमागे व दक्षिण बाजू कंम्पाऊंड लगत पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,२७,५८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१८ **श्री साईनाथ रुग्णालय वार्डमधील भिंतीतील कपाटांना प्लायवूडचे दरवाजे बसविणेबाबत.**

**साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे", अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना**:-

श्री साईनाथ रुग्णालयातील वार्डच्या भिंतींना रुग्णांचे साहित्य अथवा औषधे ठेवणेकरीता कडप्प्यामध्ये रॅक तयार करण्यात आलेल्या कपाटांचा वापर करण्यात येतो. सदर रॅकला शटर बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे रुग्णांचे साहित्य अथवा औषधे रॅकमध्ये उघड्यावर ठेवण्यात येतात. श्री साईनाथ रुग्णालयातील वार्डमध्येअशा प्रकारचे एकूण ५२ रॅक आहेत. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी दि.२१.११.२०१४ रोजी श्री साईनाथ रुग्णालय येथे राऊंड घेतला असता, सदर कपाटांना दरवाजे बसवून घेणेबाबत सुचित केले आहे याबाबत दि.१०/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा. वैद्यकीय अधिक्षक यांनी इकडील विभागास कळविले आहे.

**प्रस्ताव**.- उपरोक्त विषयांकीत कामाकरिता खालील प्रमाणे मटेरीयल व मजुरीची आवश्यकता आहे

| अ.नं. | मटेरीयल तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १८ mm कमर्शिअल प्लायवूड | ६२ | नग | २४००/- | १,४८,८००/- |
| ०२ | बी.टी.सी नं १ सागवाणी पट्टी | ५५५० | र फुट | १२/- | ६६,६००/- |
| ०३ | स्टेनलेस स्टील बिजागिरी-३" | ४१६ | नग | २८/- | ११,६४८/- |
| ०४ | स्टेनलेस स्टील ताडी पट्टी-६" | १०४ | नग | ६०/- | ६,२४०/- |
| ०५ | स्टेनलेस स्टील हॅन्डल- ६" | २०८ | नग | २२/- | ४,५७६/- |
| ०६ | २५ x ८ स्क्रु | ३२०० | नग | ० ५० | १,६००/- |
| ०७ | २० x ७ स्क्रु | १८०० | नग | ०.२५ | ४५०/- |
| ०८ | ३५ x ८ स्क्रु | १४०० | नग | ०.८० | १,१२०/- |
| ०९ | १९ नं टेकम | २.०० | किलो | ८२/- | १६४/- |
| १० | एस एच फेवीकॉल | ५.०० | किलो | १६५/- | ८२५/- |
| ११ | वुड प्रायमर वुडगाइट (एशियन) | २०.०० | लिटर | १६०/- | ३,२८०/- |
| १२ | व्हाईट ऑईल पेंट | ४०.०० | लिटर | २३०/- | ९,२००/- |
| १३ | स्टेनर | २०० ०० | एम.एल. | ०.८० | १६०/- |
| | | | | **रक्कम रु.** | २,५४,५६३/- |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे सदरहू विषयांकीत कामी रक्कम रु.२,५४,५६३/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी याकामी मटेरीयल खरेदी करणेसाठी येणारे रक्कम रु.२,५४,५६३/- मात्रचे खर्चास व सदरहू काम इकडील विभागामार्फत करुन घेणेस मान्यतेस्तव सविनय सादर

**याबर सविस्तर चर्चा होऊन, बांधकाम विभागामार्फत श्री साईनाथ रुग्णालय वार्डमधील भिंतीतील कपाटांना प्लायवूडचे दरवाजे बसविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रु.२,५४,५६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

१९ **साईआश्रम विभागाकडील सेवा-सुविधा बाबतचे माहिती पत्रकांचे छपाई खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना:-** जा.नं.एसएसटीएस/ वशी-काआ/ ३३११/२०१४ दि.१४/१०/२०१४ चे परिपत्रकानुसार भक्तांसाठीच्या भक्तनिवासस्थानांमध्ये निवास करणा-या साईभक्तांना रुमची चावी देतेवेळी रुममध्ये व परिसरात उपलब्ध असणा-या सेवा-सुविधांचे माहिती पत्रक देण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी केलेल्या आहेत.

मा.कार्यकारी अधिकारी साहेब यानी आदेशीत केल्याप्रमाणे येथील निवासस्थानी येणा-या भक्तांना खोल्यांमधील व परिसरातील सुविधेची माहीती होणेकामी दि.१३/११/२०१४ व दि.०५/१२/२०१४ नुसार मराठी/ इंग्रजी भाषेतील माहिती पत्रकाचा मसुदा मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता त्यास मान्यता मिळालेली आहे.

**प्रस्ताव:-**विभागात एकूण१५३६ खोल्या असून एका वर्षासाठी अंदाजे ५,६०,६४० माहिति पत्रके छापावे लागतील, यासाठी स्थानिक प्रेसधारकाला समक्ष कार्यालयात बोलावून एका १०० पानाच्या पॅडला किती खर्च येईल ? याबाबत विचारणा करण्यात आली तेंव्हाएकाच पानावर पाठ-पोट म्हणजेच दोन्ही बाजूने छापता येईल. त्यासाठी रु.२६/- प्रति पॅड खर्च येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** सदरची अशी माहिती आपण प्रथमच भक्तांच्या हातात देत असून ही माहिती देतांना संस्थानला कोणतीही अडचण येऊ नये म्हणून तुर्त प्रायोगिक तत्वावर १५३६ खोल्यांसाठी कमीत-कमी ४ महिने पुरतील अशा हिशोबाने १,९०० पॅड म्हणजेच १,९०,००० माहिति पत्रके छापुन घ्यावीत असे नम्र मत आहे.

त्यासाठी मान्य झालेला मराठी व इग्रजी भाषेतील सेवा-सुविधा माहिती पत्रकाचा मसुदा एकाच पानावर पाठ-पोट म्हणजेच दोन्ही बाजूने छापता येईल. त्याचे सविस्तर विवरण खर्चासह खालील तक्त्यात दर्शविलेले आहे.

| अ.नं. | माहिति पत्रकाचा तपशील | साईज | पॅड संख्या | पॅडचे दर | संभाव्य खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | क्रिमो पेपरवर पाठ-पोट छपाई असलेले १०० नगाचे पॅड. खालच्या बाजूस पुठ्ठा व वरील बाजूस रगीत कव्हर | A4 पेपरचा अर्धा भाग | १,९०० | २६/- | ४९,४००-/ |
| | | | अंदाजे संभाव्य खर्च | | ४९,५००-/ |

सबब, मान्यतेनंतर सोबत सादर केलेल्या शेड्यूलप्रमाणे खरेदी विभागामार्फत दरपत्रके मागवून छपाई करुन घेण्याची कार्यवाही करता येईल.

तरी सदरचे सेवा-सुविधेची माहितीपत्रके साईभक्ताना रुम देतेवेळी वाटप करणेस व त्याची छपाई करुन घेणेकामी येणा-या रक्कम रु.४९,५००/-चे खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम विभागाकडील सेवा-सुविधा बाबतचे माहिती पत्रकांची विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून छपाई करणेस व त्याकामी येणा-या रु.४९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

२० **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा हॉस्पीटल मधील आर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे नुतनीकरण करुन आयसीसीयु वॉर्ड तयार करण्यात येणार असल्याने त्या ठिकाणी श्री साईबाबा हॉस्पीटलच्या मागणीनुसार वायरींगचे काम करुन दयावे लागणार आहे. याकामी बाहेरील विद्युत ठेकेदारांकडून वायरींगचे काम करुन घ्यावे लागणार आहे. वायरींगचे काम करुन देण्याकरीता येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Non C.S.R. | Point wiring for Light / Fan / Bell in PVC Casing caping / pvc pipe with 3 x 1.5 Sq.mm. FR Grade copper wire 3 Plate Celing rose and Modular Accessaries complete on PVC surface box. | 25 Nos. | 700.00 | 17,500.00 |
| 02) | Non C.S.R. | Supplying and erecting flush type shockproof plug socket 6A.& 16A (6 pin) with 16A switch combined with indicator lamp and fuse with concealed MS box | 04 Nos | 350.00 | 01,400.00 |
| 03) | 1-2-8 | Supplying and erecting rigid PVC conduit 25mm. dia with PVC accessories welding of spacer on channel / square or round pipe / angel as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.1 | 50 Mtr. | 79.80 | 03,990.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 04) | 1-2-12 | Supplying and erecting rigid PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32mm. with accessories on wall/ ceiling as per specification No: WG-MA/CON, para no.1.1.2 | 400 Mtr. | 45.15 | 18,060.00 |
| 05) | 1-3-4 | Supplying & erecting mains with 1x1.5 Sq.mm F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 100 Mtr. | 19.425 | 01,942.50 |
| 06) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 1x2.5 Sq.mm F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 500 mtr | 28.35 | 14,175.00 |
| 07) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 2x2.5 Sq.mm F.R.L.S. copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 100 mtr | 56.70 | 05,670.00 |
| 08) | 1-3-8 | Supplying and erecting mains with 2x4.0 sq.mm. F.R.L.S. stranded/solid copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No:WG-MA/BW | 500 Mtr. | 80.85 | 40,425.00 |
| 09) | 1-3-10 | Supplying & erecting mains with 1x 6 sq.mm F.R L.S copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WG-MA/BW | 100 Mtr | 57 75 | 05,775.00 |
| 10) | 1-3-12 | Supplying & erecting mains with 2x10 sq.mm F.R.L.S copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 200 Mtr | 197 40 | 39,480.00 |
| 11) | 1-8-1 | Supplying and erecting modular type switch 6A/10A, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete | 02. Nos. | 90.30 | 00,180.60 |
| 12) | 1-8-6 | Supplying and erecting modular type switch 16/20A, with indicator ISI mark. approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete with neon indicator | 120. Nos. | 150.15 | 18,018.00 |
| 13) | 1-8-10 | Supplying and erecting modular type 3 pin 6A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 02 Nos. | 105.00 | 00,210.00 |
| 14) | 1-8-11 | Supplying and erecting modular type 3 pin 6A/16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 120. Nos. | 164 85 | 19,782.00 |
| 15) | 1-8-15 | Supplying and erecting modular type telephone socket one gang with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 01 No | 85.05 | 00,085.05 |
| 16) | 1-8-35 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 1 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner. | 05 No. | 203.70 | 01,018.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 17) | 1-8-36 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double moun ı ʒ plate for 2 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner. | 05 No. | 203.70 | 01,018.50 |
| 18) | 1-8-37 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 3 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner. | 10 Nos. | 236 25 | 02,362.50 |
| 19) | 1-8-40 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 8 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner | 11 Nos. | 432.60 | 04,758.60 |
| 20) | 1-8-41 | Supplying and erecting unbreakable concealed type modular switch box with double mounting plate for 12 module duly erected flush to wall with required chiseling and finishing with cement morter / POP as per required to match the background in an approved manner. | 23 Nos. | 488.25 | 11,229.75 |
| 21) | 1-10-2 | Supplying & erecting telephone cable 2 pair with 0.5 mm dia. laid in provided PVC casing / conduit asper specification No. WG-TW | 50 Mtr. | 19.95 | 00,997 50 |
| 22) | 1-11-31 | Supplying, installing, testing & commissioning approved type Push button telephone instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner | 01 No. | 700.35 | 00,700.35 |
| 23) | 2-1-10 | Supplying and erecting T8 Flurosccnt tube day light 1200mm 36 W | 10N os | 59 85 | 00,598.50 |
| 24) | 2-4-5 | Supplying & erecting approved make 1 x 36/40W white stove enamelled / powder coated, decorative end caps box type fluo.fitting with 40 W electronic ballast having pf>0.9 fixed at ceiling or on wall as per specification No. FG-IDF/ BFF | 10 Nos | 630.00 | 06,300 00 |
| 25) | 2-13-3 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG | 10 Nos | 1883.70 | 18,837.00 |
| 26) | 5-3-2 | Supplying, Erecting and marking SPMCB 6A to 32A C-series.(for motor/power) in provided distribution board as per specification No.SW-SWR/MCB | 36 Nos. | 181.65 | 06,539.40 |
| 27) | 5-4-7 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SPMCB of 4 ways (12 Poles) on iron frame/laminated board. (Horizontal type)as per specification No SW-SWR/ MCBDB | 01 No. | 2682.75 | 02,682.75 |
| 28) | 5-4-8 | Supplying and erecting triple and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mounted SPMCB of 8 ways (24 Poles) on iron frame/laminated board. (Horizontal type) as per specification No.SW-SWR/ MCBDB | 01 No. | 3893.40 | 03,893.40 |
| 29) | 5-6-7 | Providing, erecting & commissioning RCCB of electro magnetic type with 30/100/300 mA sens` · ity and having capacity of 80A, 4 pole complete as per specification No. SWRCCB/RCCB | 02 Nos. | 4940 25 | 09.880.50 |
| | | | Total Rs. | | 2,57,510.40 |
| | | | Round up Rs. | | 2,57,510.00 |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींगचे काम करुन देणेकामी अंदाजे रक्कम रु.२,५७,५१०/- इतका खर्च अपेक्षित आहे श्री साईबाबा हॉस्पीटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींगचे काम करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ऑर्थो तसेच न्युरो ऑपरेशन थिएटरचे रिकव्हरी युनिटचे वायरींग काम करणेसाठी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,५७,५१०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२१ **अंतर्गत दुरध्वनी दुरुस्ती देखभाली करीता नविन दुरध्वनी संच खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागाना अंतर्गत व बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.या मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारे (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल, श्री साईनाथ रुग्णालय,साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थान (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स,शैक्षणिक संकुल,अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी सिमेंस कपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत.तसेच साई आश्रम व साई धर्मशाळा येथे मॅट्रीक्स" कंपनीच्या दुरध्वनी यत्रणा बसविलेल्या आहेत.या सहाही दुरध्वनी यंत्रणेचे कॉल देवाण घेवाण, कॉल बीलींग हे शांतीनिवास इमारतीत बसविणेत आलेल्या मुख्य दुरध्वनी यंत्रणेतुनच होत आहे.वरील सर्व दुरध्वनी यंत्रणेतून संस्थानचे विविध विभागांचे कार्यालये, प्रत्येक इमारती व विभागांतर्गत असलेले उपविभाग तसेच दोन्हीही रुग्णालयातील सर्व विभाग व सर्व वॉर्ड,संस्थान अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने इमारती इत्यादी ठिकाणी एकमेकांशी संपर्कासाठी जवळपास १००० दुरध्वनी नंबर दिलेले आहेत.

विविध विभागांना बसविण्यात आलेले दुरध्वनी संच हे बरेचशे जुने झालेले असुन तसेच कायम हाताळुन नादुरुस्त झालेले आहेत. जे दुरध्वनी संच दुरुस्ती करण्यासारखे असतात,ते विभागामार्फत दुरुस्त करण्यात येतात,परंतु काही संच हे पुर्णपणे नादुरुस्त झाल्याने त्याठिकाणी नविन दुरध्वनी संच बसविणे आवश्यक असते.तसेच विविध विभागांची नविन दुरध्वनी नंबरची मागणी येत असते अशा ठिकाणी नविन दुरध्वनी संच बसवावे लागतात. सध्या विद्युत विभागाकडे नविन दुरध्वनी सच शिल्लक नसल्याने दुरध्वनी दुरुस्ती देखभाली करीता अडचणी निर्माण होतात. या पुर्वी (१) दि.१२/१२/२०११ रोजी २५ नग खरेदी केलेले आहेत.(२) दि.१५/१२/२०१२ रोजी १२ नग खरेदी केलेले आहेत.(३) दि.०१/०७/२०१४ रोजी २५ नग खरेदी केलेले आहेत. वरील खरेदी केलेले दुरध्वनी संच हे दुरुस्ती देखभालीसाठी विविध विभागांमध्ये व नविन कनेक्शन दिलेल्या ठिकाणी बसविण्यात आलेले असुन सध्या विद्युत विभागाकडे नविन दुरध्वनी संच शिल्लक नाहीत. सध्या एकुण स्टॉकमधिल १०८ नग नादुरुस्त संच शिल्लक असुन सदरचे संच हे रेकॉर्ड विभागामार्फत स्क्रॅप मध्ये विक्री करण्यात येत आहे.

तरी विविध विभागांची नविन दुरध्वनी कनेक्शनची मागणी पुर्ण करणे तसेच ज्या ठिकाणाचे दुरध्वनी संच नादुरुस्त झालेले आहेत अशा ठिकाणचे संच बदलणेसाठी व दुरध्वनी दुरुस्ती देखभाली करीता खालील प्रमाणे नविन दुरध्वनी संच खरेदी करणे अत्यावश्यक आहे.सदरील दुरध्वनी सच हे नामांकित टेलीफोन कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन निविदा मागवुन करुन घ्यावे लागणार आहे.

| Sr.No | C.S.R.No. | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 1-11-31 | Supplying, installing, testing approved type Push button telephone Instrument desk top/wall mount unit as per specification in approved manner. | 300 Nos. | 700.35 | 2,10,105.00 |
| | | | **Total Amount** | | 2,10,105.00 |
| | | | **Roundup** | | **2,10,105.00** |

उपरोक्त प्रमाणे अंतर्गत दुरध्वनी दुरुस्ती देखभाली करीता नविन दुरध्वनी संच खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,१०,१०५/- इतका खर्च अपेक्षित आहे.सदरचे दुरध्वनी संच खरेदी करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व सस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अंतर्गत दुरध्वनी दुरुस्ती देखभाली करीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नविन दुरध्वनी संच खरेदी करणेसाठी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,१०,१०५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२२ श्री साई प्रसादालय गॅस प्लँट परीसरामध्ये Flame Proof लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेबाबत.

अधिनियम २००४ मधील तरतुद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साई प्रसादालयाच्या उत्तर बाजूस गॅस प्लँटची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी रात्रीचे प्रकाशयोजनेकरीता अंतर्गत भागामध्ये स्ट्रीट लाईटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

दिनांक १५-१२-२०१४ रोजी मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या कक्षामध्ये संस्थानचे सर्व परीसरातील सुरक्षा विषयी मिटींग आयोजित करण्यात आली होती. त्यावेळेस श्री साई प्रसादालय गॅस प्लँटच्या बाहेरील बाजूस रात्रीचे वेळेस अंधार असतो. त्यामुळे सदर ठिकाणी समाजकंटकांकडून काही दुष्कृत्य घडू नये, याकरीता गॅस प्लँटच्या सभोवताली रात्रीचे वेळेस बाहेरील बाजूस उजेड पडेल असे फोकस लाईट बसवून द्यावेत म्हणून सुचविण्यात आले आहे.

गॅस प्लँट परीसरात व बाहेरील बाजूस रात्रीचे प्रकाशयोजनेकरीता आपणास Flame Proof लाईट फिटींग व संबंधीत साहित्य विद्युत ठेकेदार यांचेकडून टेंडर मागवून खरेदी करुन बसवावे लागणार आहेत. सदरील कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Non CSR | Supplying and erecting Bajaj make Flame Proof non-Integral flood light fitting with 250 watt HPSV Lamp & Choke.<br>Specification-Epoxy finish Lm-6 aluminium alloy housing with heat resistant and thoughned glass cover mounting bracket minaire Type BJFFL 250 NI, Product code =169644 | 20 Nos. | Rs.25,700/- | Rs.5,14,000.00 |
| 02) | Non CSR | Supplying and erecting Street light hexagonal bracket. Bracket made from 25 x 5mm M.S. angle for erection of above 4 fittings on each bracket. Each side of bracket welded to pole cap of 140mm dia 300 mm long duly welded. | 4 Nos. | Rs.2,900/- | Rs 0,11,600.00 |
| 03) | Non CSR | Supplying, erecting & testing and commissioning of Bajaj make Flame Proof junction box.<br>Specification=Epoxy finish LM-6 aluminium only housing with accessories and three cable entries luminaries Type=BJJB 100-4way (LM-6), Product code : 020206 | 4 Nos. | Rs.2,700/- | Rs.0,10,800.00 |
| 04) | 7-2-9 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 4 core 4 sq.mm. copper conductor continuous 5.48 sq.mm. (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trysses / pole or laid in provided trench / pipe as per specification no. CB-LT/CU | 200 mtr. | Rs.310 80 | Rs.0,62,160.00 |
| 05) | 7-7-2 | Supplying and erecting flange type brass cable glands for 3 to 4 core 6 sq.mm./2 to 4 core 10 sq.mm for PVC armoured cable as per specification No.CB-GL | 15 Nos. | Rs.61.42 | Rs 0,00,921.37 |
| 06) | 7-9-1 | Supplying and erecting crimping type copper lugs for cable upto 16 sq.mm. complete as per specification No.CB-CL/CU | 50 Nos. | Rs.15.75 | Rs.0,00,787.50 |
| | | | | Total:- | Rs.6,00,268.87 |
| | | | | **Round up Total:-** | **Rs.6,00,269.00** |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय गॅस प्लँट परीसरामध्ये **Flame Proof** लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ६,००,२६९/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साई प्रसादालय गॅस प्लँट परीसरामध्ये Flame Proof लाईट फिटींग खरेदी करुन बसविणेसाठी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.६,००,२६९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

२३ **संस्थान निर्मित सी.डी. व व्ही.सी.डी. निर्मिती खर्चाचे कामास मान्यता मिळणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषयनं.७१निर्णय क्र.७१ नुसार सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि मुंबई यांचेकडील सीडी/व्हीसीडी निर्मितसाठी असलेल्या शर्ती/अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडूनकायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडीचे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांना सीडी/व्हीसीडी निर्मितीचा कार्यादेश देतेवेळी कार्यादेशात नमुद केलेप्रमाणे एकूण नगांच्या निर्मितीसाठी १०० टक्के पूर्ण रक्कम आगाऊ आदा करण्यात येत होती. परंतु दि.१३.१२.२०१४ रोजी प्रफुल पोपली, जनरल मॅनेजर सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इं प्रा.लि., मुंबई हे शिर्डी येथे आले असता त्यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षेत्प्रत्यक्ष चर्चाकरुन १०० टक्के पूर्ण रक्कम आगाऊ न देता, मालाचा पुरवठा पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसात कंपनीस बिलाची रक्कम आदा करावी असे सुचित केले आहे व त्याप्रमाणे दि.१५.१२.२०१४ चे इमेलव्दारे कळविलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि १८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई करणे, संस्थान प्रकाशित सीडी निर्मिती करणे व विक्री किंमत ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पध्दत त निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं.१७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पध्दत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे.

सोनी कपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा. व्यवस्थापनसमितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावेव त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश दयावेत असे ठरले आहे. संस्थान निर्मित खालील सीडी /व्हीसीडीचा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुर्ननिर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इं.प्रा.लि.,मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.१५.१२.२०१४ चे इमेलमधील दराने प्रस्तावित परिमाणाचे पुर्ननिर्मिती खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ.नं | तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | दर | एक्साईज दर | व्हॅटसह | एकूण दराची रक्कम | एकूण रक्कम | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र तेलगू एमपी-३ (२ सीडीचा संच) | ९५१ | १ | ५००० | ५८.५० | १.२१ | २.९९ | ६२.७० | ३१३५००/- | ८०.०० |
| ०२ | श्री साई सतचरित्र मराठी एमपी-३ (२ सीडीचा संच) | २०० | १ | ४३०० | ७८.२५ | १.६१ | ३.९९ | ८३.८५ | ३६४०९५/- | १००.०० |
| ०३ | श्री साई मंदिरातील आरत्या एमपी-३ (१ सीडी) | ४० | ० | ५००० | १८.[illegible] | ०.४[illegible] | ०.९२ | १९.[illegible] | [illegible]/- | [illegible] |
| ०४ | श्रीसाईबाबा आरती व्हीसीडी (२ सीडीचा संच) | ० | ० | ५००० | ३५.५० | १.०० | १.८३ | ३८.३३ | १९१६५०/- | ७५.०० |
| | | | | | | | | एकूण रु | ९९५८४५/- | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सीडी व व्हीसीडी यांची पुर्ननिर्मिती मे.सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.९,९५,८४५/- (अक्षरी रुपये- नऊ लाख, पच्यान्नव हजार, आठशे पंचेचाळीस) मात्र खर्च अपेक्षित आहे.

सबब SONY DADC MANUFACTURING INDIA PVT. LTD., MUMBAI यांचेकडून प्रस्तावितकाम करुन घेणेस त्याकामी येणारे रु.९,९५,८४५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस तसेच सीडींचा पुरवठा केल्यानंतरत्यांना बिल आदा करणेस निर्णयार्थ सादर.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सीडी व व्हीसीडी यांची पुर्ननिमिती मे.सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणा-या रु.१,९५,८४५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

२४ **Nephroscope 6 दुरुस्त करणेबाबत.**

श्री साईनाथ रूग्णालयामधील मे.कार्ल स्टोअर्स एन्डोस्कॉपी इंडिया प्रा.लि.,नवी दिल्ली या कंपनीचा Nephroscope 6⁰ दुरूस्त करणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि.**11/09/2014** चे सभेतील विषय क्र. **12**, निर्णय क्र. **804** अन्वये सविस्तर चर्चा होउन Nephroscope 6⁰ विहीत पध्दतीने निविदा मागवुन दुरूस्त करणेकामी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रू. 94,500/- चे खर्चास मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार विविध वर्तमान पत्रामध्ये सदर निविदा बाबत जाहिरात देण्यात आली होती. सदर निविदा श्री साईबाबा हॉस्पीटलचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात व श्री साईबाबा संस्थानचे मुंबई कार्यालयात दि. 20/11/2014 ते 05/12/2014 या कालावधीत विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या. सदर निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि. **08/12/2014** ही होती.

दि. **08/12/2014** अखेरीस खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1. M/s. Surgicare Enterprises pvt Ltd, Mumbai
2. M/s. Shree Endoscopy pvt Ltd, Mumbai
3. M/s. V.K.Endoscope pvt Ltd, Mumbai
4. M/s. Raj Surgical, Mumbai

**श्री साईनाथ रूग्णालयामधील Nephroscope 6⁰ दुरूस्त करणेसाठी प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमितीसमोर उपस्थित निवीदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील मूळ दर रू. |
|---|---|---|
| १ | M/s. Surgicare Enterprises pvt Ltd, Mumbai | 55,125/- |
| २ | M/s. Shree Endoscopy pvt Ltd, Mumbai | 55,125/- |
| ३ | M/s. V.K.Endoscope pvt Ltd, Mumbai | 47,000/- |
| ४ | M/s. Raj Surgical, Mumbai | 54,562/- |

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयामधील Nephroscope 6⁰ दुरूस्त करणेकामी मे.व्ही.के. इंडोस्कोप प्रा.लि., मुंबई यांचे रु.४७,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

२५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दैनंदिन वापराकरीता साबण, निरमा, बॅटरी सेल इ.खरेदीबाबत.**

श्री साईबाबा व साईनाथ रूग्णालयाकरिता दैनंदिन वापरासाठी लागणारे साबण, निरमा, बॅटरी सेल, पेन्सील सेल इ. साहित्य दरवर्षी वार्षिक औषधे खरेदीमध्ये निविदा मागवून खरेदी करण्यात येतात. सन 2013-14 या वर्षात सदरचे खरेदीकामी कोणाचीही ई-निविदा प्राप्त झालेली नव्हती त्यामुळे दि.07/03/2014 चे मंजुर टिपणीन्वये व मा. व्यवस्थापन समिती सभा दि.12/06/2014 चे सभेतील निर्णय क्र.452 (ब) अन्वये स्थानिक विक्रेत्याकडून कोटेशन मागवुन खरेदी करण्यात आली होती. सदर साहित्यामधील खालील साहित्याचा साठा संपत आलेला आहे. त्यामुळे खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर साहित्याची पुढील वार्षीक सन 2015-16 मध्ये मागणी केलेली असून सदर खरेदीची प्रक्रिया पुर्ण होण्यासाठी आजुन चार ते पाच महिने लागेल तो पर्यत कामाची गैरसोय होऊ नये म्हणुन स्थानिक पुरवठाधारकांकडून कोटेशन मागवुन खरेदी करता येईल.

दोन्ही रूग्णालयांच्या दैनंदिन वापरासाठी वार्षीक मागणीतील खालीलप्रमाणे साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Simple Shaving Blades Qty. in Nos. | 5000 | 1.25 | 6250.00 |
| 03. | Lifebuoy Soap 125 GM | 500 | 30 | 15000.00 |
| 04. | Nirma Washing Powder Packing in KG | 500 | 40 | 20000.00 |
| 05. | Steel Battery Cell Hyper (Pencil) | 200 | 10 | 2000.00 |
| 06. | Steel Battery Cell Hyper (Big) | 100 | 15 | 1500.00 |
| 07. | Steel Battery Cell Hyper (Medium) | 100 | 15 | 1500.00 |
| 08. | Battery Cell 9.0 Volt (For Pacemaker) | 20 | 40 | 800.00 |
| | Total | | | 47050.00 |

उपरोक्त प्रमाणे सदरचे खरेदीस अंदाजे रु.47050/- (अक्षरी रुपये सत्तेचाळीस हजार पन्नास मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे साहित्य खरेदीकामी कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणारा अंदाजे खर्च रु. 47050/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दैनंदिन वापराकरीता साबण, वॉशिंग पावडर, बॅटरी सेल इ.खरेदीस मान्यता घेते वेळेस त्यामध्ये विशिष्ट कंपनीच्या नावाचा उल्लेख करणेत येऊ नये. तसेच सदरहू साहित्यापैकी २-३ महिन्याचे कालावधीसाठी लागणारे साहित्य मा.कार्यकारी अधिकारी यांना असलेल्या रु.२५,०००/- मात्र खर्चाचे मर्यादेत विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२६ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल फर्निचर खरेदी करणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड / विभागाने त्याचे विभागात सध्या असलेली फर्नीचर वापरुन खराब झालेली आहे तसेच काही वॉर्डमध्ये रुग्णांची सख्या वाढल्यामुळे सध्या त्यांचेकडे असलेली फर्नीचर कमी पडत आहे. त्यामुळे त्यांनी नविन हॉस्पिटल फर्नीचरची मागणी केलेली आहे. सदर मागणी बाबतचे सविस्तर तक्त्यात दर्शविण्यात आलेला आहे.

उपरोक्त फर्नीचर खरेदीकामी अदाजे रक्कम रु.7,33000/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही मा. त्रिसदस्य समिती सभेची मान्यता मिळाल्यानतर विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदी करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार सस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:- तरी सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे फर्नीचर विहीत पध्दतीने वतर्मान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.7,33000/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वार्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल फर्निचर खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.७,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२७ **श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 या विभागाकरिता Manman Saw Handpiece मे.मनमन, पुणे यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

श्रीसाईबाबा हॉस्पीटलमधील CVTS OT 1 या विभागाकरिता Manman Saw Handpiece ची दिनांक 28/10/2014 औषध भांडार विभाग प्राप्त दिनांक 14/11/2014 अन्वये मागणी केलेली आहे.

सदर Handpiece हा कार्डियाक ऑपरेशन थिएटरमध्ये रुग्णांचे Bypass करते वेळेस Bone Cutting साठी आवश्यक असते. सध्या त्यांचेकडे असलेला Handpiece सन 2006 मध्ये खरेदी केलेला होता. तो आता हा वापरुन खराब झालेला आहे आपणाकडे Manman कपनीचे मोटार असल्याने व त्याच कंपनीचा Saw Handpiece वापरावा लागतो. तेव्हा सदर Saw Handpiece थेट उत्पादक कंपनी M/S Manman, Pune यांचेकडून खरेदी करता येईल.

सदर Manman Saw Handpiece ची खरेदीकामी M/S Manman, Pune यांचेकडून दर पत्रक मागविण्यात आले होते. M/S Manman, Pune त्यांचे दि. 21/11/2014 रोजीचे पत्रान्वये दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Manman Saw Handpiece | 1 | 36,125.00 | 36,125.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 36,125.00 |

उपरोक्त Manman Saw Handpiece चे खरेदीकामी रक्कम रु. 36,125.00 इतका खर्च येणार आहे.

मागणी– श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT 1 विभाग यांचे 28/10/2014 (औषध भांडार विभाग प्राप्त दि. 14/11/2014 चे मागणी पत्रक

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान– अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT 1 या विभागामध्ये Manman कंपनीचे मोटार असल्यामुळे त्यास कंपनीचा Saw Handpiece पाहिजे आहे. तेव्हा सदर Saw Handpiece थेट उत्पादक कंपनी M/S Manman, Pune यांचेकडून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त Saw Hanpiece मे.मनमन, पुणे यांचेकडून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. 36,125/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CVTS OT-1 या विभागाकरिता Manman Saw Handpiece मे.मनमन, पुणे यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.३६,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२८ **श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाकरिता Foot Operated Sealing Machine खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाने दिनाक 21/07/चे 2014 मागणीपत्रान्वये नग 1Foot Operated Sealing Machine ची मागणी केलेली आहे सदर Foot Operated Sealing Machine हे Cath Lab विभागातील पुर्नवापर होणारे सर्जिकल साहित्य निर्जंतुक (ETO) करून ते ETO पेपर मध्ये ते पुन्हा मशिनव्दारे पॅक करण्यात येते.

सदर Foot Operated Sealing Machine खरेदीकामी मेभकौस्तु . एन्टरप्रायजेस, मुंबई याचेकडून दिनांक 02/09/ रोजी 2014Email पत्रान्वये अंदाजे खर्चासाठी दर पत्रक मागविण्यात आले होते नुसारत्या .मेभकौस्तु . एन्टरप्रायजेस, मुंबई त्यांचे दि. 24/11/ रोजीचे 2014Email पत्रान्वये दर कळविले आहे.

त्याचा तपशिल खालील प्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Foot Operated Sealing Machine | 1 | 28125.00 | 28,125.00 |
| | | | Total Amt. in Rs. | 28,125.00 |

उपरोक्त Foot Operated Sealing Machine खरेदीकामी अंदाजे रक्कम रु .28,125.00 इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab विभाग यांचे दिनांक 21/07/ 2014 (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१६.०८.२०१४) चे मागणीपत्रक.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान–** अधिनियमातील समितीने कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाकरिता सदर Foot Operated Sealing Machine चे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त Foot Operated Sealing Machine चे विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु.२८,१२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होउन श्री साईबाबा रुग्णालयातील Cath Lab या विभागाकरिता ०१ नग Foot Operated Sealing Machine खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२८,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

२९ **सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

(अ) अधिनियम 2004 मधील तरतुद:- 17-2(ण)

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.25/08/2012 निर्णय क्रमांक 720 Clause No.6 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करून रु. 25,000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करून केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात लागणारे वार्षिक औषधे सन 2013-14 करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्र. 564 अन्वये तर मा. उच्च न्यायालयाचे दि.25/10/2013 रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने निविदेवर निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या खरेदी समितीने पुरवठा

धारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन मा. त्रिसदस्य समिती सभा दि.15/03/2014 चे सभेतील निर्णय क्र. 254 अन्वये दि.19/03/2014 रोजी एकूण 66 पुरवठाधारकांना एकूण रु.30,52,88,358/- रक्कमेचा वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

सोबतच्या यादीतील औषधे / सर्जिकल साहित्य इत्यादींची वार्षिक खरेदी मध्ये मागणी केलेली होती, परंतु त्यासाठी एकाही निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले नाही तर औषधांची निवड करत असताना ज्या ठिकाणी काही औषधांसाठी एकाच कंपन्याचे दर आलेले आहे परंतु ते नामांकित कंपन्यांचे किंवा मागणी प्रमाणे नाहीत अशा औषधांच्या फेरनिविदा मागविण्यात यावेत असे ठरले. तेव्हा निविदा न आलेले व फेर निविदा मागविण्याची शिफारस केलेली अशी एकुण 605 औषधांकरिता पुन्हा दि. 15/07/2014 अखेर ई- निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

सदर निविदा उघडून त्यावर समितीचा निर्णय होऊन अंतिम निर्णय घेणेकामी अंदाजे 1 ते 2 महिन्यांचा कालावधी लागेल तो पर्यंत सोबतच्या यादीतील औषधे जी दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे, ती मागील वर्षाचे (सन 2012-13) मंजूर दराने खरेदीचा प्रस्ताव आहे.

कारण दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत दयावी लागतात. त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहे.

सदर औषधे व सर्जिकल साहित्य मागील वार्षिक मंजुर दरानुसार (सन 2012-13) वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. 210132/- इतका खर्च येणार आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरेटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:- रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत उपचार घेणारे रुग्णांकरीता दयावयाची औषधे खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. 210132/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी हि विनंती

---

**(ब)** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्रमांक 564 Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधाच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी याचे मान्यतेने खरेदी करुन रु. 25,000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन 2013-2014 या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण 66 पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. 30,52,88,358/- चे दि.19/03/2014 रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.16/11/2013 रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.26/07/2013 चे निर्णय क्र.564 अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण 58 औषधांसाठी एकुण रक्कम रु.1,38,47,412 चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.12/04/2014 रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून 1 वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधाचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव

गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधाचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी व कन्झ्युमेबल साहित्य वार्षीक मजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे सस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

वार्षीक खरेदीमध्ये औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी रक्कम रु.48,66,64,252/- चे खरेदीस दि.26/07/2013 चे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.564 अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.25/10/2013 रोजी मान्यता मिळालेली आहे. त्यातील काही औषधे ही वार्षीक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे जास्त लागतात. जी मुळ मागणी पेक्षा जास्त लागतात ती वार्षीक मंजुर दराने (Annual Rate Contract) खरेदीचा प्रस्ताव आहे. रु.33,66,64,252/- या मंजुर रक्कमेपेक्षा जास्त रक्कम झालेली नसून दि 24/11/2014 अखेर रु.218457290/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरेटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि 15/03/2014 निर्णय क्र. 254 अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.9,75,654/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी हि विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ व ब या प्रस्तावांची व त्यामधील खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

३०. **श्री रामनवमी उत्सव- २०१५ करीता निमंत्रण पत्रिका छपाई कामी प्राप्त झालेल्या निवीदा उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री रामनवमी उत्सव -२०१५ हा शुक्रवार दिनांक २७/०३/२०१५ ते रविवार दिनांक २९/०३/२०१५ अखेर तीन दिवस संस्थानमार्फत साजरा होणार आहे.

सन २०१५ मध्ये होणा-या श्री रामनवमी उत्सव करीता निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आलेली असुन त्यामध्ये निविदा विक्री दिनाक २३/१२/२०१४ ते दिनांक २९/१२/२०१४ अशी मुदत देण्यात आलेली होती आणि निविदा भरुन स्विकारण्याची मुदत दिनांक ३१/१२/२०१४ अखेर देण्यात आलेली होती. मुदतीत ०४ निविदा प्राप्त झाल्या आहेत तसेच मुदतीनंतर ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. एकुण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदाचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव व पत्ता | आवक नंबर | आवक दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | १८५३८ | २९/१२/२०१४ | बंद पाकिट |
| ०२ | देवगिरी ऑफसेट, नाशिक | १८७३९ | ३१/१२/२०१४ | बंद पाकिट |
| ०३ | रोहन प्रिंटर्स ऑफ स्टेशनरी | १८६२४ | ३१/१२/२०१४ | बंद पाकिट |
| ०४ | प्रवरा ऑफसेट,लोणी | १८९८९,१८९९० | ३१/१२/२०१४ | बंद पाकिट |
| ०५ | श्री गणेश रुलर्स अॅण्ड प्रिन्टर्स, कोपरगांव | १९१०८ | ०३/०१/२०१५ | बंद पाकिट उशीरा प्राप्त झालेले निविदा |
| ०६ | संगिता प्रिंटर्स,मुंबई | १९१९६ | ०५/०१/२०१५ | बंद पाकिट उशीरा प्राप्त झालेले निविदा |

अ.नं.०१ ते ०४ निविदा मुदतीत प्राप्त झालेल्या आहेत. व अ.नं. ०५ ते ०६ निविदा मुदतीनंतर (उशिरा) प्राप्त झालेल्या आहेत. उशिरा प्राप्त झालेल्या निवीदा उघडणे बा ,ग आदेश होणेस विनंती.

**श्री रामनवमी उत्सव- २०१५ करीता निमंत्रण पत्रिका छपाई कामी विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमितीसमोर उपस्थित निवीदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.**

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव व पत्ता | अ<br>निमंत्रण पत्रिका दोन्ही बाजूने छपाई करणे (फोर कलर विथ फोल्डींग), पाकिटे छपाई (फोर कलर), पाकीटासाठी गम टेप वापरणे, पाकीटावर स्पष्ट दिसेल असे आमंत्रिकाचे पत्ते प्रिंट करणे, कागदाचा प्रकार- ९० जी.एस.एम. आर्ट पेपर पत्रिकेसाठी व ९० जी.एस.एम. मॅपलिथी पेपर पाकिटांसाठी<br>दर प्रती नग रु. | ब<br>निमंत्रण पत्रिका दोन्ही बाजूने छपाई करणे (फोर कलर विथ फोल्डींग), पाकिटे छपाई (फोर कलर), कागदाचा प्रकार- ९० जी.एस.एम. आर्ट पेपर पत्रिकेसाठी व ९० जी.एस.एम. मॅपलिथी पेपर पाकिटांसाठी<br>दर प्रती नग रु. | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | २.१६ | १.७६ | पात्र |
| ०२ | देवगिरी ऑफसेट, नाशिक | २.९५ + ५% व्हॅट | १.९५ + ५% व्हॅट | पात्र |
| ०३ | रोहन प्रिंटर्स ऑफ स्टेशनरी | ३.३९ | १.९७ | पात्र |
| ०४ | प्रवरा ऑफसेट, लोणी | २.४० | १.५८ | बयाणा रकमेचा डी.डी. जोडलेला नसल्यामुळे अपात्र |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१५ करीता वरील तक्त्यातील ब पर्यायामध्ये नमुद केलेप्रमाणे आवश्यक त्या निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्यात, त्याकामी निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचे सर्वसमावेशक प्रती नग रु.१.७६ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

३१. **वेबसाईटवरील ऑनलाईन दर्शन सुविधेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उघडणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) नुसार भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र :** 1) दि. 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57.
2) दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 399.

**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनां : 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57 अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना वेबसाईटवरील ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तांचे सेवेकामी तीन वर्षाकरीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना दिनाक 07/03/2011 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे वेबसाईटवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Private Limited यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनाक 21/03/2014 अखेर संपुष्टात आली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर सुविधा कार्यादेशातील तिसऱ्या वर्षाच्या दरानुसार चालु ठेवणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरीता जी उच्चतम देणगी ठरेल तो दर Vistaas Digital Media Private Limited यांना देणगी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधा निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Private Limited यांचेमार्फत चालु ठेवणेत यावी व त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले. त्यानुसार सबंधीत कंपनीस दिनांक 06/06/2014 रोजीचे ई-मेल व्दारे कळविण्यात आले असुन त्यांनी सदर दर देणेस तयार असल्याचे दिनाक 06/06/2014 व दिनांक 09/09/2014 रोजीचे ई-मेल/पत्राव्दारे कळविले आहे.

तरी वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) दिनांक 17/10/2014 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि.22/10/2014 ते दि.10/11/2014 या कालावधीत ई-निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र निविदाधारकांचे Commercial Tender मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव सादर करता येईल

मागणी: वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र

निविदाधारकांचे Commercial Tender मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान: तांत्रिक, आर्थिक व कायदेशीर.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत: वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र निविदाधारकांचे Commercial Tender मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेमधील Technical Tender आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले असता, त्यामध्ये फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधा देणेसाठी दोनच तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे सदरहूकामी फेर ई-निविदांची मागणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

३२. **मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधेकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक ई-निविदा उघडणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) नुसार भक्तगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं :** 1) दि. 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 57.

2) दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 399.

**प्रास्ताविक:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57 अन्वये Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना मोबाईलवर ऑनलाईन दर्शन सुविधा श्री साईभक्तांचे सेवेकामी तीन वर्षाकरीता सुरु करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना दिनांक 07/03/2011 रोजी कार्यादेश देण्यात आलेला होता. श्रींचे मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन सुविधा पुरविणेस Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक 21/03/2014 अखेर संपुष्टात आली असल्याने निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सदर सुविधा कार्यादेशातील तिसऱ्या वर्षाच्या दरानुसार चालु ठेवणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 05/06/2014 रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर पुढील कालावधीकरीता जी उच्चतम देणगी ठरेल तो दर Vistaas Digital Media Limited., Mumbai यांना देणगी स्वरुपात संस्थानला द्यावा लागेल, या अटीवर श्रींचे मोबाईलवर लाईव्ह दर्शन सुविधा निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Vistaas Digital Media Limited., Mumbai यांचेमार्फत चालु ठेवणेत यावी व त्यांना लेखी कळविणेत यावे, असे ठरले. त्यानुसार संबंधीत कंपनीस दिनांक 06/06/2014 रोजीचे ई-मेल व्दारे कळविण्यात आले असुन त्यांनी सदर दर देणेस दिनांक 06/06/2014 चे ई-मेलव्दारे व दिनांक 09/09/2014 रोजीचे ई-मेल/पत्राव्दारे तयारी दर्शविली आहे.

तरी मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन पुढील तीन वर्षाकरीता दर निश्चित करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर (www.sai.org.in) दिनांक 01/10/2014 रोजीचे मजुर टिपणी अन्वये दि.03/09/2014 ते दि.08/10/2014 या कालावधीत ई-निविदा मागविणेकामी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ई-निविदेस कोणत्याही कंपनीने प्रतीसाद न मिळाल्याने याकामी दिनांक 22/10/2014 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये दि. 01/11/2014 ते दि. 29/11/2014 या कालावधीमध्ये फेर ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत त्यानुसार प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा. उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र निविदाधारकांचे Commercial Tender मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव सादर करता येईल.

**मागणी:** मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा.उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र निविदाधारकांचे Commercial Tender मा त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी प्राप्त झालेल्या पुरवठाधारकांच्या ई-निविदेमधील प्रथम Technical Tender मा उप-समितीचे सभेपुढे उघडुन त्यातील पात्र निविदाधारकांचे Commercial Tender मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी व निर्णयार्थ प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**उपरोक्त प्रमाणे प्राप्त ई-निविदेमधील तांत्रिक निविदा आजचे उपसमिती सभेपुढे उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.**

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल तयार करणेत येऊन, त्या अहवालासह कमर्शिअल निविदा उघडणेसाठी त्रिसदस्य समितीसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

३३. **सिंहस्थ कुंभमेळा - २०१५ निमित्त नागपुर येथे उपस्थित राहाणेकामी प्रवासाचे बीलाबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधील तरतुद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथानुसार, मंदीरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेची निधीची विनयोग करण्याची तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्ताना मंदीरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदीरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना–** सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ नाशिक येथे होणा-या सिहस्थ कुंभमेळ्या निमित्त शिर्डीत श्री साईबाबा समधी दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन व त्याबाबत संस्थानने उपलब्ध करून दयावयाच्या सोई सुविधांसाठी करावयाच्या पुर्वतयारी व उपायायोजनाकरीता संस्थान व्यवस्थापनाने सिंहस्थ कुंभमेळा कक्षाची स्थापना केलेली आहे.

**प्रस्ताव–** उपरोक्त विषयांकीत सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे नियोजनाकरिता व करावयाच्या उपायोजनांच्या अनुषंगाने नागपुर येथे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजीत करण्यात आली असल्याचे उपजिल्हाधिकारी, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा कक्ष यांचेकडील जा.क्र.सिंहस्थ/ ५०८/ २०१४, दि.१०/१२/२०१४ रोजीचे पत्रानुसार, मा. मुख्य सचिव याचे बैठकीस उपस्थित राहाणेकामी मा. श्री. अनिल कवडे, जिल्हाधिकारी तथा सदस्य मा. त्रिसदस्यीय समिती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.१५/१२/२०१४ रोजी मुंबई ते नागपुर व दि.१६/१२/२०१४ रोजी नागपुर ते मुंबई असा विमानाने प्रवास केलेला आहे. तसेच मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.१४/१२/२०१४ ते १६/१२/२०१४ रोजी नागपुर ते मुंबई असा प्रवास केलेला आहे.

याबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो यांचे कक्षाकडून मे. हसमुख ट्रॅव्हल्स एजंट, प्रा.लि. पुणे यांचेकडून बुकींग केलेल्या रूपये ६५.१७३/- मात्र ची विमान तिकीट प्रवास बिले इकडील कक्षाकडे दिनांक २९/१२/२०१४ रोजी प्राप्त झालेली असून तरी सदरचे रू ६५.१७३/- मात्र (अक्षरी रक्कम रूपये पासष्ठ हजार एकशे त्र्याहात्तर मात्र) खर्चास कार्योत्तर मान्यता मिळून नोंद घेणेसाठी सादर.

उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिहस्थ कुंभमेळा- २०१५ चे नियोजनाकरिता व करावयाच्या उपायोजनांच्या अनुषगाने नागपुर येथे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीसाठी नागपुर येथे उपस्थित राहाणेकामी झालेल्या रु.६५,१७३/- मात्र प्रवास बीलाचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३४. **समाधी मंदिरामध्ये रथ पालखी ठेवलेल्या ठिकाणी अॅल्युमिनिअम पार्टिशन करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ (१) मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्त व्यवस्थेचा मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्त व्यवस्थेचा निधी वापरणे अथवा खर्च करणे तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्रीं चे समाधी मंदीरामध्ये दक्षिण व्दाराचे शेजारी रथ व पालखी ठेवण्यात आलेल्या आहेत. रथ पालखी मिरवणूकीचे वेळी बाहेर काढल्या जातात मंदीर सुरक्षेकरीता असलेल्या डॉग स्कॉड सुरक्षा पथकाचे अधिकारी यांनी रथ पालखीचे समोरील बाजुस पार्टिशन करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. या ठिकाणी अज्ञात व्यक्तीने काही घातक वस्तु ठेवल्यास समस्या निर्माण होऊ शकते, असे [illegible]जा.न.एसएसएसटी/मंदिर/३७८/२०१४ दि.१२/१२/२०१४ रोजीचे पत्राने मंदिर विभागाने कळविले आहे.

**प्रस्ताव:-** श्रीं चे समाधी मंदीरामध्ये दक्षिण व्दाराचे शेजारी रथ व पालखी ठेवण्याच्या जागेला अॅल्युमिनिअम मध्ये पार्टीशन करून दोन स्लायडींग दरवाजे बसविता येतील यासाठी खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं | तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | Providing and fixing in position **colour anodized extruded alluminium partitions**, having frame made out of extruded tubular section of 16 gauge, size 65mmX40mm, with 5 mm thk. selected quality float glass panels fixed with aluminium glazing clips 12mm.x12mm. (conical) rubber cushioning to glass as | २०५ | चौ.फुट | २८०/- | ५७,४००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | per approved detailed drawings etc. complete.<br>Alluminium Section- Make- Jindal.<br>Glass- Make- Saint-Gobain,<br>Size- 1) 9'6" X10'6"<br>2)9'8" X 10'6" | | | | |
| २. | **Providing and fixing in position double Shuttered Sliding alluminium extruded colour anodized door** of overall size 4'9"X10'6" each with sliding shutters comprising of colour anodized section having bottom and lock rail of size 150mm x 44 45 mm, 2.90mm thk. top rail 47.62mm x 44.45mm 3.18 mm thk., vertical styles 47.62 x 44.45 mm , 3.00mm tk. and 5 mm thk. selected quality float glass panels for shutter, Sliding kit of heavy duty having I.S.I mark, heavy duty concealed lock at center, necessary beading glazing clips, PVC gaskets, two tower bolts etc. complete as per design & drawing.<br>Alluminium Section- Make- Jindal.<br>Glass- Make- Saint-Gobain,<br>Size: 4'9"X10'6" – 2 Nos | १०० | चौ.फुट | ३५०/- | ३५,०००/- |
| | | | | एकूण रक्कम- | ९२,४००/- |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे श्रीं चे समाधी मंदिरात रथ व पालखी ठेवलेल्या जागेवर ॲल्युमिनिअम पार्टिशन करणेसाठी विहीत पद्धतीने निविदा मागवून काम करून घेता येईल. यासाठी अंदाजे रक्कम रुपये ९२,४००/- (अक्षरी रक्कम रुपये ब्यान्नव हजार चारशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं चे समाधी मंदिरामध्ये रथ, पालखी ठेवलेल्या जागेवर ॲल्युमिनिअम पार्टिशनचे काम करुन घेणेसाठी विहीत पद्धतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९२,४००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

३५. **सन २०१५-२०१६ साठी फ्लेक्स बोर्ड व बॅनर्सचे कोटेशन मागविणेबाबत.**

संस्थानच्यवतीने आयोजित केलेले तीन उत्सव,शिर्डी महोत्स व आदि कार्यक्रमांचे फ्लेक्सबोर्ड व बॅनर्स तसेच मंदिर व परिसरातील खराब झालेले मार्गदर्शक फलक वजासुचना आदिचे फ्लेक्स बोर्डबॅनर्स/ वेळोवेळी तयार करुन घेण्याची जाबाबदारी जनसंपर्क विभागाकडे आहे. सदर कामी दरपत्रके मागवून वार्षीकदर निश्चित करुन घेणे लेखापरिक्षणाच्या दृष्टीने क्रम प्राप्त असल्याने शिर्डी व परिसरातील स्थानिक पुरवठादाराकडून कोटेशन मागवून न्युनतम दरधारकास वार्षिक टेंडर देण्यात येते. कामीवर्षाला सुमारे 45 ते 50 हजार रुपये इतका खर्च येतो सदरचा खर्च प्रशासनशाखा वशी-05 चे उत्सवाकरीता मंजूरकरण्यात आलेल्या अंदाजपत्रकातून करण्यात येतो. फ्लेक्सबोर्ड व बॅनर्स बनविण्याचे काम हे नेहमीच तातडीचे व आयत्यावेळी करावे लागते, बहुतेक कामेकरण्यासाठी वेळ अत्यंत कमी असतोतसेच , लहान आकारचा एखादा बोर्ड बनविण्यासाठी बाहेरील पुरवठादार येत नाहीत असा आतापर्यंतचा अनुभव आहेत्यामुळे , फक्त शिर्डी व परिसरातील पुरवठाधारकांकडून कोटेशन मागविण्यातयेतात

तथापि, उपरोक्त सदर्भीय पत्रान्वये रुपये 25 हजार व त्यापुढील खर्च येणाऱ्या कामासाठी दरपत्रके/ कोटेशन मागविणेबाबत कळविलेले आहे. त्यानुषंगाने सन 2015-16 यावर्षाकारीता शिर्डी व परिसरातील ज्या पुरवठादारांनी मागील वर्षी निविदा सादरकेल्या आहेत अशा व शिर्डी परिसरातील इतर पुरवठादारां कडून निविदा मागविण्यास मान्यता असावी असे मत आहे.

मागील वर्षी निविदा सादर केलेल्या पुरवठादारांची नांवे खालील प्रमाणे.

| अन | पुरवठादाराचे नांव |
|---|---|
| 01 | हेमंत आर्टस, शिर्डी |
| 02 | उमासाई ग्राफीक्स, कोपरगाव |
| 03 | स्वामी फ्लेक्स प्रिंटर्स, कोपरगाव |
| 04 | पेंटर एम. सय्यद, शिर्डी |

तरी उपरोक्त कामासाठी येणाऱ्या सुमारे 50,000/- रुपये खर्चास व शिर्डी आणि परिसरातील पुरवठादाराकडून निविदा मागविणेस मा.उपसमितीचे मान्यतेसाठी सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात संस्थानकरिता फ्लेक्स बोर्ड व बॅनर्स बनवून घेणेकामी शिर्डी आणि शिर्डी परिसरातील पुरवठादारांकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या रु.५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

३६. **श्रीसत्यनारायण पूजा व अभिषेक पूजेचे साहित्य ठेवणेकामी कपाटे खरेदी करणे अथवा देणगी स्विकारणेबाबत.**

सध्या सत्यनारायण हॉलमध्ये पुजेकरीता स्टेनलेस स्टिलची भांडी वापरुन सत्यनारायण पुजा करण्यात येतात. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०९.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३१ नुसार श्री सत्यनारायण पुजेकरीता तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.१०.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०१ नुसार श्रींचे अभिषेक पुजेकरीता तांब्याची भांडी वापरणेबाबत निर्णय झालेला आहे. तसेच सध्या सदरचे तांब्याची भांडी तसेच इतर साहित्य देणगीदाखल स्विकारणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

श्रीसत्यनारायण पूजेकरीता तसेच श्रींचे भक्तअभिषेक पूजेकरीता वापरावयाचे तांब्याची भांडी हे दोन सेट मध्ये घेण्यात येणार आहे. पूजेकरीता वापरण्यात येणारे तांब्याची भांडी महाग असल्याने ते सुरक्षीत ठेवणे आवश्यक आहे. करीता श्रीसत्यनारायण पूजेकरीता दोन व श्रींचे अभिषेक पूजेकरीता दोन असे एकूण चार नग (५४"x२६"६'x६४") या साईजचे प्रत्येकी पाच कप्पे असलेले स्टेनलेस स्टिलचे हेवी (भक्कम) कपाटे खरेदी करता येतील. या कपाटाकरीता प्रति नग अंदाजे रु.५०,०००/- प्रमाणे रु.२,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे कपाटे खरेदी करणेकामी मान्यता असावी तसेच कोणी देणगीदार स्टील कपाटे देण्यास इच्छुक असल्यास देणगी स्विकारणेस मान्यता असावी, ही विनती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसत्यनारायण व अभिषेक पूजेचे साहित्य ठेवणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ०४ नग स्टील कपाटे दानशूर साईभक्तांकडून देणगी स्वरुपात स्विकारणेत यावेत. देणगी स्वरुपात प्राप्त न झाल्यास विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

३७. **झेरॉक्स मशीन मॉडेल नं.७५५६ चा ए.डी.एफ. पार्ट खराब झाल्यामुळे नवीन पार्ट खरेदी करणेबाबत.**

झेरॉक्स मशीन मॉडेल नं.७५५६ हे दि. २१/०२/२०१२ रोजी (किमत रु.८,३९,०००/-) देणगी मिळालेले आहे. आज अखेर सदर मशीनवर ९,४४,८१२ झेरॉक्स प्रती झालेल्या आहेत.

मशीनच्या वरच्या बाजुस ए.डी.एफ.पार्ट असतो. जास्त पानांचे झेरॉक्स काढावयाचे असल्यास अगर त्यांचे सेट तयार करावयाचे असल्यास, सदरच्या ए.डी.एफ. मध्ये झेरॉक्स करावयाचे कागदांचा गठ्ठा ठेवल्यानंतर एक मिनिटात साधारण ५६ प्रतीचे सर्कॅनिंग होते व आपल्याला पाहिजे तितके सेट झेरॉक्स होऊन मशीनच्या ट्रेमध्ये एकावर– एक तयार होत असतात.

सदर मशीनचा ए.डी एफ.पार्ट खराब झाल्यामुळे ए डी.एफ वर करुन त्याखालील काचेवर एका वेळी एकच कागद ठेवावा लागतो. कागद काचेवर ठेवल्यानंतर ए.डी.एफ खाली करुन बटन दाबल्यानंतर कागदाचे स्कॅनिंग होऊन झेरॉक्स कॉपी बाहेर येते. झेरॉक्स कॉपी बाहेर आल्यानंतर पुन्हा ए.डी.एफ वर करुन दुसरा कागद काचेवर ठेवला जातो. यामध्ये झेरॉक्स कामासाठी फार वेळ लागतो.

**ए.डी.एफ मधून झेरॉक्स काढणे व काचेवर कागद ठेवून झेरॉक्स काढणे याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.**

| ए.डी.एफ मधून झेरॉक्स काढणे | काचेवर कागद ठेवून झेरॉक्स काढणे |
|---|---|
| एका मिनिटात साधारण ५६ प्रतीचे एकाच वेळेस स्कॅनिंग होऊन झेरॉक्स निघते. | एका मिनिटात साधारण २० प्रतीचे स्कॅनिंग होऊन झेरॉक्स होतात. |
| ए.डी.एफ वर-खाली करावा लागत नाही, त्यामुळे हात दुखत नाही. झेरॉक्सचे काम लवकर होते. | काचेवरील ए.डी.एफ हा पार्ट प्रत्येक कागदाची झेरॉक्स काढतांना वर खाली करावा लागतो. त्यामुळे हात दुखतो. झेरॉक्ससाठी जास्त वेळ लागतो. |
| पाहिजे तितके झेरॉक्स सेट मशीनमध्ये तयार होतात. | मशीनमध्ये झेरॉक्स सेट तयार होत नाही. ते पूर्ण झेरॉक्स झाल्यानतर हाताने सेट करावे लागतात. |
| ए.डी.एफ मधून पेपर सरळ ओढल्यामुळे झेरॉकस सरळ येतात. | काचेवर घाईमध्ये कागद तिरपा ठेवला गेल्यास झेरॉक्स तिरप्या येतात. |
| एकाच वेळी सर्व कागदाचे स्कॅनिंग केले जाते त्यामुळे स्कॅनरचा वापर कमी होऊन स्कॅनरचे आयुष्य वाढते. | प्रत्येक कागदाच्या वेळी स्कॅनर काचेवर मागे-पुढे होत असल्यामुळे स्कॅनरचा वापर जास्त होऊन स्कॅनरचे आयुष्य कमी होते. |
| ए.डी.एफ मध्ये ठेवलेल्या सपूर्ण कागदासाठी एकदाच बटनाचा वापर करावा लागतो. बटनाचा वापर कमी झाल्याने बटनाचा बोर्ड लवकर खराब होत नाही. | प्रत्येक कागदाच्या झेरॉक्ससाठी प्रत्येक वेळेस बटनाचा वापर करावा लागतो. त्यामुळे बटनाचा बोर्ड लवकर खराब होतो. |

सध्या मा.न्यायालयात दाखल करावयाचे कागदपत्र, मा.न्यायालयातुन चौकशीसाठी आलेले १४ प्रस्ताव, शासनास सादर करावयाचे प्रस्ताव, माहीती अधिकारात येणा-या अर्जदारांनी मागणी केलेल्या माहीतीच्या झेरॉक्स, कार्यालयीन कामाच्या झेरॉक्स, मा.व्यवस्थापन समिती समोरील विषय व कार्यवाहीच्या झेरॉक्स, अशा प्रकारचे झेरॉक्सचे काम जास्त प्रमाणात वाढलेले आहे. मशीनचा ए.डी.एफ. खराब झाल्यामुळे काचेवरुन झेरॉक्स काढण्यासाठी जास्त वेळ लागत आहे. झेरॉक्स चे सेट हाताने तयार करावे लागत आहे.

झेरॉक्स कंपनीचे सर्व्हिस मॅनेजर श्री.महेंद्र पाटील यांनी ए.डी.एफ. पार्टची किंमत टॅक्ससह रु.१० हजार पर्यंत आहे. असे दुरध्वनीद्वारे सांगितले आहे. तसेच कंपनी थेट मालाचा पुरवठा करीत नसल्यामुळे डिलरकडुन माल घ्यावा लागणार आहे. असे सांगितले आहे.

झेरॉक्स मशीनच्या साहित्याचे, पुणे, सातारा, नागपुर, औरंगाबाद, नाशिक येथील ७ पुरवठादारांचे नांव पत्ते इकडे उपलब्ध आहे. त्या सर्वांना पत्र देऊन त्यांचेकडुन ए.डी.एफ चे कोटेशन मागवता येतील व आलेले कोटेशन मा.उपसमितीचे सभेपूढे सादर करुन मा.उपसमितीचे निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल.

प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशीन मॉडेल नं.७५५६ चा ए.डी.एफ. पार्ट खरेदी करणेकामी त्याच कंपनीच्या पुरवठाधारकांकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी- १२)

---

**३८. देणगी लाडू पॅकींग मशीनमध्ये लाडू ठेवणेसाठी प्लास्टिक कप खरेदीबाबत.**

सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियम मधील २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

<u>प्रस्ताविक:–</u> मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१२/०६/२०१४ निर्णय क्र.४६८ अन्वये श्री अन्सीलरी इंडस्ट्रिज मुंबई यांना मॅकेनिकल विभागामार्फत दि.१६/०७/२०१४ रोजी पत्रव्यवहार करुन लाडू पॅकिंग मशीन देणगी स्वरुपात घेणेस मान्यता मिळालेली आहे. दिनांक २४/१२/२०१४ रोजी देणगी स्वरुपात एक लाडू पॅकिंग मशीन प्राप्त झालेले आहे. दिनांक २४/१२/२०१४ रोजी मशीनचे मॅकेनिकल विभागामार्फत उभारणी करुन मान्यवरांचे हस्ते पुजन करणेत आलेले आहे.

साईभक्ताना लाडू प्रसाद कॅन्टीन विभागामार्फत विक्री करण्यात येत आहे. सदरचे मशीनमुळे साईभक्तांना लाडू प्रसाद तत्परतेने व मागणीप्रमाणे उपलब्ध होणेस मदत होईल. सदरचे लाडू पॅकिंग मशीनला ०३ नग लाडू ठेवणेसाठी प्लास्टिक कपाची आवश्यकता आहे. त्यामुळे लाडू पॅकिंग करतेवेळी लाडू फुटणार नाही व भक्तांना प्रसादलाडू देतेवेळी प्लास्टीक कपामुळे लाडू सुरक्षित राहातील

लाडू मशीनला लाडू ठेवणेकामी खालील तपशिलाप्रमाणे प्लास्टिक कप खरेदी करावे लागतील.

P.V.C फुड ग्रेड मटेरीयल

१०० – २०० मायक्रॉन

१५० mm Length, 25 mm Hight, 50 mm width.

दररोज सरासरी अंदाजे २२,००० लाडू प्रसाद पॅकेटची कॅन्टीन विभागामार्फत विक्री होते. साधारण: ३ महीने म्हणजेच टेंडर प्रक्रीयेची पुर्तता झालेनंतर पुरवठा आदेश दिलेपासुन पुढे ९० दिवसांसाठी प्लॅस्टीक कप खरेदी करावे लागतील. एका कपासाठी सुमारे रु ०.५० पैसे खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च किराणा माल खरेदी व इतर खरेदी" बजेट मधुन करता येईल त्यासाठी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रु.४२१४५१०००/- बजेट तरतुद मंजुर आहे. या खर्चातुन प्लॅस्टीक कप खरेदी करता येतील.

<u>विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–</u> खालील तपशिलाप्रमाणे प्लॅस्टीक कप खरेदी करावे लागतील.

| एका दिवसाला लागणारे कप | एकुण दिवस | दर प्रती कप | एकुण अपेक्षित खर्च रु. |
|---|---|---|---|
| २२,००० (नग) | ९० | ०.५० पैसे | ९,९०,०००/- |

एका दिवसाला साधारण: २२,००० नग तर एका महिन्याला (३० दिवसास) ६,६०,००० नग प्लॅस्टीक कप लागतील. तीन महिन्यास १९,८०,००० नग प्लॅस्टीक कपासाठी एकुण खर्च रक्कम रु ९,९०,००० (अ.रु नऊ लाख, नव्वद हजार मात्र) अपेक्षित आहे सदरची खरेदी ही विहीत पध्दतीने जनसपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन करता येईल त्यास मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, देणगी मिळालेल्या लाडू पॅकींग मशीनमध्ये लाडू ठेवणेसाठी प्लास्टिक कप खरेदीचा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- लाडू प्रसाद निर्मिती विभागप्रमुख)

---

३१. जादा वैद्यकिय बीलाच्या परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –** १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-१७ दि. १६/०१/११११.

२) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ- संस्थानचे मान्य यादीत असलेले व रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| 1 | श्री.गोरक्ष सोमनाथ रगनाथ विभाग- I.T.I हुद्दा- व. लिपिक | स्वत: | Neuroplasti Humer Head | डॉ खुराणा | संचेती हॉस्पिटल, पुणे | 80593.00 | 79833.00 |
| 2 | श्री.संतोष चंद्रभान देवकर विभाग- विद्युत हुद्दा- तारतंत्री | मुलगा | Pain In abdomen & Loose motion & Votiming | डॉ राम नाईक | आनद ऋषी हॉस्पिटल, अहमदनगर आदित्य बीर्ला मेमोरीयल हॉस्पिटल, पुणे | 56558.00 | 38595.00 |
| 3 | श्री.अशोक गणपत कुरणे विभाग- पाणी पुरवठा हुद्दा- मदतनीस | स्वत: | Left Foot Chronic Woud | डॉ किरण गोरे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 15007.00 | 15007 00 |
| | | | | | **एकूण** | | 133435.00 |
| | **ब- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| 4 | श्री.विठ्ठल काशिनाथ महांकाळे विभाग- नविन भक्त निवास हुद्दा- मदतनीस | पत्नी | Acute pancreatitis with calcuis cholecystit and ARF | डॉ रेड्डी | गॅलक्सी हॉस्पिटल, अहमदनगर | 326810 00 | 255752 00 |
| | एकूण | | | | | | 255752.00 |
| | **क - संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| 5 | श्री.क्षीरसागर किशोर केशव विभाग- मुंबई कार्यालय हुद्दा- लिपिक-टंकलेखक | वडील<br>आई | Asthama<br>Cancer | Dr. Sanjay Pruthi<br>डॉ. राऊत | Life Line Hospital & ICU, Mumbai | 67061.00 | 44817 00 |
| 6 | श्री बनकर अशोक आनाजी विभाग- संरक्षण हुद्दा - पहारेकरी | स्वत. | Acut DVD with B/L Pre embolisam | डॉ. जपे | Wockhardt Hospitals, Nashik | 70247.00 | 47978.00 |
| 7 | श्री मधूकर जयराम महाजन विभाग- मुंबई कार्यालय हुद्दा - व. लिपिक | आई/ मुलगा | Antipsychiatrist with child & General Diabetis | डॉ. अद्वैत | मानस हेल्थ सेंटर | 3695.00 | 2956.00 |
| 8 | श्री. माणिक तुकाराम गोपिनाथ विभाग- मुंबई कार्यालय हुद्दा- कार्यालय अधिक्षक | पत्नी/ मुलगा/ स्वत: | General | Dr. B.M. Karwa/ Dr Upasani | Karwa Hospital / Shri Ram Nursing Home | 24872 00 | 17512 00 |
| | | | | | | **एकूण** | 113263.00 |
| | | | | | | **अ+ब+क = एकूण** | 502450.00 |

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान- सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम 5,02,450/- इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत- नियमावली प्रमाणे छाननी केली असुन मा. व्यवस्थापन समितीचे पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान कायम कर्मचा-यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४** **दिनांक १९.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०४** दिनांक १९.०१.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा भक्त निवासस्थान (५०० रुम्स) चे लगत पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.८,९१,३३२/-)**

**श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीअधिनियम 2004 मधीलतरतुद: अधिनियमकलम 21 (1)** अन्वयेसमितीकडून विश्वस्तव्यवस्थानिधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:**

01. मा. त्रीसदस्यसमितीचेदिनांक 12/06/2014 रोजीचेसभेतीलनिर्णयक्र.481.
02. मा. त्रीसदस्यसमितीचेदिनांक 03/08/2014 रोजीचेसभेतीलनिर्णयक्र. 620.

**प्रस्ताविक:** संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम्स) इमारतीचे पश्चिम बाजूने डांबरीरस्ता करणेत आलेला आहे. सदर रस्त्याचे बाजुने तसेच इमारतीचे सभोवताली असलेल्या मोकळया जागेत डांबरीकरण केलेले नसल्याने परिसर साफसफाई करणेस अडचण येते त्यामुळे परिसर अस्वच्छ राहतो. घुशी, सरपटणारे प्राणी इत्यादींचा काही वेळा त्रास होतो. तसेच पावसाळयाचे दिवसात चिखल होतो. त्यामुळे नेहमीच मुरुम टाकावा लागतो. तसेच खोल्यांमध्ये धुळही येते करीता सदरचा परिसर स्वच्छ राहून सुंदर दिसावायासाठी सदरहू इमारतीचे पूर्व व पश्चिम भागातलगतचे बाजूने मोकळ्या असलेल्या भागात 840 चौ.मी. एम.20 ग्रेडचे 60 एम.एम. जाडीचे लेकरफिनिश पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मा. त्रीसदस्य समितीचे दि.03/08/2014 रोजीचे सभेत निर्णय क्र. 620 खालील समंत करणेत आलेला आहे.

"... यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान (500 रुम्स) चे लगत पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हिंगब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु 8,91,332/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यातआली."

**प्रस्ताव:** मा.त्रीसदस्य समितीचे उपरोक्त मान्यतेनुसार सदरहूकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दि.13/10/2014 ते दि.28/10/2014 याकालावधीत निविदा विक्रीची मुदत ठेवणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत दोन ठेकेदारांनी कोरे निविदा फार्म विकत घेऊन सादर केले होते. विषयांकीत कामासाठी फक्त दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याने, सदरहू निविदा संबधितांना परत करणेत येऊन, याकामी फेरनिविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेस प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार विषयांकित कामासाठी संस्थानचे संकेतस्थळावर व दैनिक पुढारी व दैनिक देशदुत फेरनिविदा सूचना प्रसिध्द करुन दि.12/12/2014 ते दि.26/12/2014 याकालावधीत निविदा विक्रीची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फार्म विकत नेतलेले आहेत.

1. श्री. सारंग सुरेश मांडवकर, विटाता, खानापूर जि. सांगली
2. श्री. संतोष ज्ञानेश्वर कडू, तिसगांव
3. श्री. प्रसाद शिवाजीराव शेळके, शिर्डी
4. साई नॅचरल स्टोन, साकुरी
5. मे. अे. एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद
6. श्री. पकज हनुमंत माळी, नाशिक
7. श्री. गणेश चांगदेव दिघे, संगमनेर
8. एस. एस. कन्स्ट्रक्शन, नाशिक
9. एम. एस. विरभद्रफ्लाय यश ब्रिक्स, राहाता
10. श्री. धावणे दादासाहेब राऊसाहेब, लोणी

सदरच्या सिलबंद निविदासादर करणेसाठी दि.29/12/2014 ही मुदत ठेवणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारानी सिलबंद निविदासादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचेनांव | आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| 01. | श्री. सारंग मांढवकर. विटा ता. खानापूर जि. सांगली | 018121 / 23.12.2014 |
| 02. | साई नॅचरल स्टोन, साकुरी | 018373 / 26.12.2014 |
| 03. | मे. एस. एस. कन्स्ट्रक्शन्स्, नाशिक | 018476 / 29.12.2014 |
| 04. | श्री. गणेश सी. दिघे, सगमनेर | 018481 / 29.12.2014 |
| 05. | श्री संतोष ज्ञानेश्वर कडू, तिसगांव | 018527 / 29.12.2014 |
| 06. | श्री. धावणे दादासाहेब राऊसाहेब, लोणी बु. | 018529 / 29.12.2014 |
| 07. | श्री. प्रसाद शिवाजीराव शेळके, शिर्डी | 018534 / 29.12.2014 |
| 08. | मे. अे. एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 018536 / 29.12.2014 |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०८ सिलबद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दराचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.न. | निविदासादरकर्त्याचेनांव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| 01. | श्री सारंग मांढवकर, विटा ता. खानापूर जि. सांगली | अपात्र |
| 02. | साई नॅचरल स्टोन, साकुरी | अपात्र |
| 03. | मे. एस. एस. कन्स्ट्रक्शन्स्, नाशिक | १०,३०,३८०/-<br>(निविदादरावर १५.६०% जास्त) |
| 04. | श्री. गणेश सी दिघे, सगमनेर | ८,९०,४४१/-<br>(निविदादरात ०.१०% कमी) |
| 05. | श्री. सतोष ज्ञानेश्वर कडू, तिसगांव | ८,४४,८०४/-<br>(निविदादरात ५.२२% कमी) |
| 06. | श्री. धावणे दादासाहेब राऊसाहेब, लोणी बु. | ८,४६,७६५/-<br>(निविदादरात ५% कमी) |
| 07. | श्री. प्रसाद शिवाजीराव शेळके, शिर्डी | अपात्र |
| 08. | मे. अे.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | ६,८६,३२६/-<br>(निविदादरात २३% कमी) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) चे लगत पूर्व व पश्चिमेकडील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे. अे.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे रु.६,८६,३२६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **द्वारावती भक्तनिवास इमारतीच्या पुर्व व पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.९,३७,३१२/-)**

**श्रीसाईबाबासंस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीअधिनियम 2004 मधील तरतुदः** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय:** मा.त्रिसदस्य समितीचे दिनांक 11/09/2014 रोजीचे सभेत **निर्णय क्र.** 749 खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीच्या पुर्व व पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व **याकामी येणा-या अंदाजे रु.9,37,312/- मात्रचे खर्चास मान्यता** देण्यात आली."

**प्रस्तावना:** मा.त्रिसदस्य समितीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी संस्थानचे संकेतस्थळावर व दैनिक पुढारी व दैनिक देशदुत फेरनिविदा सुचना प्रसिध्दकरुन दि.12/12/2014 तेदि.26/12/2014 या कालावधीत निविदा विक्रीची मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फार्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | नांव | अ.न. | नांव |
|---|---|---|---|
| 01. | श्री. शाम निकम, कोपरगाव | 08. | एस. एस. कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| 02. | श्री. शेळके प्रसाद शिवाजीराव, शिर्डी | 09. | एम. एस. विरभद्रफ्लायायशब्रिक्स्, राहाता |
| 03. | साई नॅचरल स्टोन, साकुरी | 10. | श्री. धावणेदादासाहेबराऊसाहेब, लोणी |
| 04. | अे. एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 11. | श्री सचिनज्ञानेश्वरआठशेरे, अंगणगांव |
| 05. | श्री पंकज हनुमंत माळी, नाशिक | 12. | श्री. पांडुरंगयशवंतगाडेकर, राहाता |
| 06. | श्री. गणेश चांगदेव दिघे, संगमनेर | 13. | मे एन. एस बनकरपाटील ॲण्डकंपनी, श्रीरामपूर |
| 07. | श्री. गडाख भारत रामनाथ, पारेगावबु. | | |

सदरच्या सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. 29/12/2014 ही मुदत ठेवणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचेनाव | आवक नं. / दिनांक |
|---|---|---|
| 01. | साई नॅचरल स्टोन, साकुरी | 018372 / 26.12.2014 |
| 02. | श्री. गडाख भारत रामनाथ, पारेगांव बु. ता. संगमनेर | 018477 / 29.12.2014 |
| 03 | मे. एस. एस. कन्स्ट्रक्शन्स, नाशिक | 018479 / 29.12.2014 |
| 04. | श्री. गणेश सी. दिघे, सगमनेर | 018480 / 29.12.2014 |
| 05. | श्री. धावणे दादासाहेब राऊसाहेब, लोणीबु. | 018528 / 29.12.2014 |
| 06. | मे. विरभद्रफ्लाय यश ब्रिक्स, राहाता | 018530 / 29.12.2014 |
| 07. | श्री. सचिन ज्ञानेश्वर आठशेरे, अंगणगांव | 018531 / 29.12.2014 |
| 08. | मे. एन. एस. बनकर पाटील अँण्ड कंपनी, श्रीरामपूर | 018532 / 29.12.2014 |
| 09. | श्री शेळके प्रसाद शिवाजीराव, शिर्डी | 018535 / 29.12.2014 |
| 10. | मे. अे. एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | 018537 / 29.12.2014 |
| 11. | श्री. पांडुरंग यशवंत गाडेकर, राहाता | 018538 / 29.12.2014 |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ११ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचेनांव | निविदेमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| 01. | साई नॅचरल स्टोन, साकुरी | अपात्र |
| 02. | श्री. गडाख भारत रामनाथ, पारेगांव बु. ता. संगमनेर | ७,६८,५९६/-<br>(निविदादरात १८% कमी) |
| 03. | मे. एस. एस. कन्स्ट्रक्शन्स, नाशिक | १०,८२,५९५/-<br>(निविदादरावर १५.५% अधिक) |
| 04 | श्री. गणेश सी. दिघे, सगमनेर | ९,३४,९६९/-<br>(निविदादरात २५% कमी) |
| 05. | श्री. धावणे दादासाहेब राऊसाहेब, लोणी बु. | ८,९०,४४६/-<br>(निविदादरात ०५% कमी) |
| 06. | मे. विरभद्रफ्लाय यश ब्रिक्स, राहाता | अपात्र |
| 07 | श्री सचिन ज्ञानेश्वर आठशेरे, अंगणगांव | ७,९६,७१५/-<br>(निविदादरात १५% कमी) |
| 08. | मे. एन. एस. बनकर पाटील अँण्ड कंपनी, श्रीरामपूर | ८,५२,९५४/-<br>(निविदादरात ९% कमी) |
| 09. | श्री. शेळके प्रसाद शिवाजीराव, शिर्डी | अपात्र |
| 10. | मे. अे. एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | **६,९३,६११/-**<br>**(निविदादरात २६% कमी)** |
| 11. | श्री. पांडुरंग यशवंत गाडेकर, राहाता | ९,१४,२५४/-<br>(निविदादरात २.४६% कमी) |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीच्या पुर्व व पश्चिमेकडील मोकळया जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणेकामी मे.अे.एस. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे रु.६,९३,६११/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०३ **दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाजवळील दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टील जाळी बसविणेबाबत. (रु.४५,५६०/-)**

मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक 06/11/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 948 अन्वये दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाजवळील दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टील जाळी बसविणेकामी बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागविण्यास व याकामी येणाऱ्या अदाजे रुपये 45,560/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागविण्यात आले होते:

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव | अ.नं. | कोटेशनधारकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1. | सुपर फॅब्रिकेशन अँण्ड फर्निचर्स, साकुरी | 6. | रविंद्र रबर प्रॉडक्ट अँण्ड फॅब्रिकेशन, श्रीरामपूर |
| 2. | साई इडस्ट्रीज, कोपरगांव | 7. | अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स |

| | | | |
|---|---|---|---|
| 3. | ऋषीकेश फॅब्रिकेशन, साकुरी | ८. | शुभम स्टील रेलींग्ज् ॲण्ड् फर्निचर, नाशिक |
| 4 | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | 9. | साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| 5. | शितल किरण इंजिनिअरींग, बाभळेश्वर | | |

वरीलप्रमाणे मुदतीत एकूण 9 फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून कोटेशन मागविण्यात आले होते. कोटेशन सबमिशन तारीख 31/12/2014 अशी होती. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे 5 कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकांचे नाव | अ.नं. | कोटेशनधारकांचे नाव |
|---|---|---|---|
| 1. | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | 4. | शितल किरण इंजिनिअरींग, बाभळेश्वर |
| 2. | ऋषीकेश फॅब्रिकेशन, साकुरी | 5. | साई इंजिनिअर्स, अंबड, नाशिक |
| 3 | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | | |

दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाजवळील दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टील जाळी बसविणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उपस्थित कोटेशन्सधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मूळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.न. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील मूळ दर रु. |
|---|---|---|
| 01 | सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी | ३८,६००/- |
| 02. | ऋषीकेश फॅब्रिकेशन, साकुरी | ४१,४००/- |
| 03. | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, गणेशनगर | ३९,८००/- |
| 04. | शितल किरण इजिनिअरींग, बाभळेश्वर | ४८,०००/- |
| 05. | साई इजिनिअर्स, अबड, नाशिक | ६४,८००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी कक्षाजवळील दर्शन रांगेतील गेटला स्टेनलेस स्टील जाळी बसवून घेणेकामी सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड् फर्निचर्स, साकुरी यांचे रु.३८,६००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

०४ **श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागाकरिता Syringe Pump खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.५,१०,०००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाने दि. ०५/०५/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये १० नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे. सदर Syringe Pump हे अत्यवस्थ रुग्णांना इंजेक्शनची मात्रा (प्रमाण) नियंत्रित करुन देणेकामी उपयोग होतो. सध्या CRU I विभागात २८ Syringe Pump असुन ते त्यांना कमी पडत आहेत, त्यामुळे त्यांनी नवीन १० नग Syringe Pump ची मागणी केलेली आहे

सदर Syringe Pump खरेदीकामी अंदाजे प्रती नग रु. ५१,०००/- याप्रमाणे १० नग Syringe Pump खरेदीकामी अंदाजे एकूण रक्कम रु. ५,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि. २८/०८/२०१४ निर्णय क्र. ७३३ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत CRU I विभागाकरिता १० नग Syringe Pump विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अदाजे खर्च रु. ५,१०,००००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जर्नल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते

निविदा विक्रीची मुदत दि १०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. २५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, अशा एकूण ०९ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Allwin Lifecare Mumbai | 24/11/2014 |
| 2 | M/s. Austin Health care, Pune | 25/11/2014 |
| 3 | M/s. B. Braun Medical India Pvt. Ltd., Mumbai. | 25/11/2014 |
| 4 | M/s. Candour Medical Instruments Pvt. Ltd., Pune (2 Envelope) | 25/11/2014 |
| 5 | M/s. Excel Corporation, Nashik | 25/11/2014 |
| 6 | M/s. Gandhi Enterprises, Ahmednagar | 25/11/2014 |
| 7 | M/s. Schiller Healthcare India Pvt. Ltd., Pune | 25/11/2014 |
| 8 | M/s. South India Surgical Co. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 9 | M/s. Vida Lifesciences Pvt. Ltd., Pune ( 2 Envelope) | 25/11/2014 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०१ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडून मिळाव्यात ही विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागाकरिता Syringe Pump खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०५ **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदी करणेकामी प्राप्त तांत्रिक निविदा उघडून मिळणेबाबत. (रु.६,०२,७००/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे रक्ताच्या वेगवेगळया तपासण्या करणेसाठी आवश्यकता असते. त्याच्याकडे असलेले Fully Automatic Blood Gas Analyser Machine हे सन २००५ साली रु. ६७५०००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून सदर मशिन हे वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे बायोमेडीकल विभागाने दि २२/१२/२०१२ चे पत्रान्वये सदर मशिन बायबॅक करणेबाबत शिफारस केलेली आहे.

सदरचे Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी ५ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून इकडील पत्र क्र.९५७२ दि.२३/०३/२०१३ अन्वये अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानूसार M/s.Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai & M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी दर कळविलेले आहे. M/s. Transasia Bio-Medicals Ltd., Mumbai. यांचे दरानूसार सदर Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदीकामी रु. ६०२७००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.२९/०६/२०१३ निर्णय क्र. ४६९ अन्वये मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागात Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अदाजे खर्च रु. ६०२७००/- चे खर्चास तसेच जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine बायबॅक करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळालेली आहे. तसेच त्यानुसार इकडील पत्र क्र. २७२७, दिनाक २४/०८/२०१३ अन्वये विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग निर्णय क्र. सामवि-२०१३/३३९/प्र.क्र.७५/का-सोळा, दिनाक २१/०७/२०१४ अन्वये सदर जुने मशीन बायबॅक करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात फ्री - प्रेस जरनल - मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश - पुणे, दिव्य मराठी - नाशिक, पुण्यनगरी - औरंगाबाद या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण ७२ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते.

निविदा विक्रीची मुदत दि.१०/११/२०१४ ते २२/११/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि २५/११/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती.

त्यास अनुसरुन शिर्डी येथील कार्यालयात ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, तर मुंबई कार्यालयात ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, असा एकूण ०५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.DHR Holding India Pvt. Ltd., Mumbai | 25/11/2014 |
| 2 | M/s.J. K. Sales & Services, Aurangabad | 25/12/2014 |
| 3 | M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad | 25/12/2014 |
| 4 | M/s.Transasia Bio - Medicals Ltd, Mumbai | 25/11/2014 |
| 5 | M/s Srushti Healthcare, Pune | 25/11/2014 |

तरी उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ तांत्रिक सिलबंद निविदा आजचे सभेपुढे संबंधीत निविदा धारकांचे समक्ष उघडून मिळाव्यात ही विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील जुने Fully Automatic Blood Gas Analyser Machine खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या तांत्रिक निविदांचा अहवाल पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०६ **शिर्डी बसस्थानकाचे एक्सटर्नल इलेक्ट्रीकल व स्ट्रीट लाईट केबल करिता आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद**:- अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतुद आहे.

**शासन मान्यता**:- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि २००६/६०७/(८७)/का.सोळा, दिनांक १३/०१/२००९ अन्वये संस्थानतर्फे बस स्थानक बांधकामाकरीता रु.७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देणेत आली आहे

**प्रस्तावना**:- संस्थानमार्फत शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे.पाटील कन्सट्रक्शन अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि.पुणे याचेमार्फत सुरु आहे. याबाबत अर्किटेक्ट यांचेकडून इलेक्ट्रीकल कामातील एक्सटर्नल हायटेन्शन केबल व स्ट्रीट लाईट केबलचे लेआऊट ड्राईंग प्राप्त झाले असून, सदरचे ड्रॉईंग नुसार कम्पाऊंड लगत १५० mm व्यासाचे ५०० रनिंग मीटर व २२५ mm व्यासाचे ४२० रनिंग मीटर आर.सी.सी पाईप टाकावयाचे आहेत. तसेच ९०० x ९०० mm या साईजमध्ये ३० नग व ९००x६०० mm या साईजचे १५ असे ४५ नग वीट बांधकामात चेंबर तयार करावयाचे आहेत. सदरचे काम करणेकामी आर्किटेक्ट यांनी रक्कम रू ५,४७,५००/- मात्रचे खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. तसेच सदर काम ठेकेदार यांचेमार्फत करणेकामी ठेकेदार यांना दि.१५/१०/२०१४ रोजीच्या पत्रान्वये आर्किटेक्ट यांनी कळविले होते.

आता याबाबत ठेकेदार यानी दि.०९/१२/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की इलेक्ट्रीकल केबल करीता पाईप लाईन टाकणे या कामाचा समावेश निवदेनुसार त्यांचे स्कोपमध्ये नाही. बसस्थानकाचे उर्वरीत काम पूर्ण करणे हे त्यांचे उद्दीष्ठे असून सदरचे पाईप लाईन टाकणेचे काम ट्रीमीक्स कॉक्रीटीकरणापूर्वी संस्थानमार्फत करावे असे कळविले आहे.

**प्रस्ताव**:- वर नमूद इलेक्ट्रीकल केबलकरीता भूमिगत आर.सी.सी पाईपलाईन टाकण्याचे कामाचा मूळ निविदेत समावेश नसल्याने ठेकेदार मे.पाटील कन्सट्रक्शन अण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि, पुणे यांचे स्कोप मध्ये सदर काम येत नाही. तसेच सदर ठेकेदार यानी त्यांचे कामेही अद्याप पूर्ण केलेले नाहीत व त्यासाठी सदर ठेकेदार याचे कडून मोठा विलंब झालेला आहे. ठेकेदार यानी बस पार्किंगचे मुख्य भागाचे ट्रीमीक्स कॉक्रीटचे ६०% काम पूर्ण केले असून उर्वरीत काम सुरू आहे. त्यामुळे इलेक्ट्रीकल केबलकरीता आर.सी.सी पाईप टाकणेचे काम प्राधान्याने पूर्ण करणे आवश्यक आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपक्षीत आहे.

| Sr. no. | Description | Qty | Rate | Unit | Amount |
|---|---|---|---|---|---|
| १) | Providing & Laying Concrete pipes if I S NPZ Class in proper line level Including necessary collars, excavation, laying, Fixing with collars in C M 1:1& refilling the trench complete. | | | | |
| | **1) 150 mm dia c.c pipes of I.S Np2 class** | 500 | 270.00 | Rgm | 135000.00 |
| | **2) 225 mm dia c.c pipes of i.s Np 2 class** | 420 | 320.00 | Rgm | 134400.00 |
| २) | Providing & Construing brick Masonry inspection chamber 0.90 x 0.90 m including 1:2.4 Cement concrete channels half round G.S.W pipes brick Masonry plastering from inside& airtight with 75 cm thk R.C.C Top cover should exactly match With the pavement surface etc. Complete | | | | |
| | **1) 900x900 mm** | 30 | 5200.00 | Nos | 156000.00 |
| | **2) 900x600 mm** | 15 | 4200.00 | Nos | 63000.00 |
| | | | | **Total-** | **488400.00** |
| | | | | **Add contingencies 5% -** | **24420.00** |
| | | | | **Total Rs -** | **512820.00** |
| | | | | **Grand total Rs -** | **513000.00** |

उपरोक्त प्रमाणे इलेक्ट्रीकल कामातील स्ट्रीट लाईट केबल व मुख्य एच.टी केबल टाकणेकरिता व केबललाईनवरील चेंबर बांधणेसाठी एकुण रू.५,१३,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरहू खर्च वर नमुद शासन मान्यतेची मर्यादेत राहील असा अदाज आहे. तसेच उपरोक्त काम हे नियोजीत इमारतीचा वापर करण्याचे दृष्टीने आवश्यक आहे. तरी सदरचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करणेकामी मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे शिर्डी बसस्थानकाचे एक्सटर्नल इलेक्ट्रीकल व स्ट्रीट लाईट केबल करिता आर.सी.सी. पाईप टाकणे व चेंबर बांधकाम करणेसाठी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर निविदा प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या रु.५,१३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०७ **कापडी पायपुसणी खरेदी करणेकामीचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतुद– २१ (ग) भक्तांना मंदीरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मीक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्तावना:-** या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फतभक्तांची निवासव्यवस्थाची सोय व सुविधा करण्यात येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास मधील खोल्या साईभक्ताचे निवासासाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेले असुन या ठिकाणी १२ इमारतीमधुन १५३६ खोल्या आहेत.

**प्रस्ताव:-** प्रत्येक खोली मधील शौचालय व बाथरूमच्या मध्यभागी १ नग कापडी पायपुसणी ठेवण्यात येते. त्या सततच्या वापरामुळे खराब होत असून त्या जागी नव्याने कापडी पायपुसणी आवश्यक असून १५३६ खोल्यामध्ये १५३६ नग कापडी पायपुसणी आवश्यक असून अधिकच्या जादा ६४ मिळवून १६०० नग खरेदी करणे गरजेचे आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशील | साईज | संख्या | दर प्रती नग | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कापडी पायपुसणी | २'x १'.६" | १६०० नग | रू. १००/- | रू. १,६०,०००/- |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-**कापडी पायपुसणी खरेदी कामी अंदाजे रक्कम रुपये १,६०,०००/- (अंदाजे अक्षरी रुपये एक लाख साठ हजार मात्र) चे खर्च येणार असल्याने खर्चास मान्यता मिळाल्या नंतर खरेदी विभागामार्फत प्रचलीत पध्दतीने सोबत जोडलेल्या शेड्युल प्रमाणे खरेदी प्रक्रीया करता येईल.

तरी कापडी पायपुसणी नग १६०० व त्या कामी अंदाजे येणारे रु.१,६०,०००/- चे खर्चास मान्यता असावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास मधील खोल्यांसाठी १६०० नग कापडी पायपुसणी खरेदीकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

०८ **कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे सिक्युरिटी पॉईटवर बोर्ड लावणेबाबत.**

दि.22.12.2014रोजी मा कार्यकारी अधिकारी सो यानी मंदिर व मंदिर परिसरात राऊंड घेतला असता कायम व कंत्राटी कर्मचाऱ्याचे पॉईट चेक केले मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी सर्व कायम व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे पाईटचे ठिकाणी कर्मचाऱ्यांचे नाव,पॉईटचे ठिकाण नमूद असलेला बोर्ड लावण्यात यावा.असे तोंडी निर्देश दिले होते.

त्यानुसार संरक्षण विभागातील कायम कर्मचारी व संरक्षण विभागाअंतर्गत खाजगी सुरक्षा एजन्सीचे कामाचे पॉईट खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सी | कामाचे ठिकाण | एकुण पॉईट |
|---|---|---|---|
| 01 | कायम सुरक्षा कर्मचारी | मंदिर व संस्थान सलंग्न परिसर | 54 |
| 02 | ईगल आय सिक्युरिटी प्रा लि. | मंदिर व महाद्वार | 28 |
| 03 | मॉडर्न व्ही आर सिक्युरिटी प्रा लि. | नविन भक्तनिवासस्थान वाहन विभाग शैक्षणिक संकुल अधिकारी निवासस्थाने व परिसर | 25 |
| 04 | मे सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा लि. | साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल द्वारावती निवासस्थान व परिसर | 40 |
| 05 | रक्षक सिक्युरिटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम प्रा लि पुणे. | साईबाबा मंदिर व मंदिर परिसर | 40 |
| 06 | रक्षक सिक्युरिटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम प्रा लि पुणे | साईप्रसादालय जुने व नविन | 39 |
| 07 | रक्षक सिक्युरिटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम प्रा लि पुणे | साईआश्रम भाग -01 | 53 |
| 08 | रक्षक सिक्युरिटी सर्व्हीसेस ॲण्ड सिस्टीम प्रा लि पुणे | साईआश्रम भाग -02 | 32 |
| | | एकूण = | 311 |

उपरोक्त प्रमाणे संरक्षण विभागातील व कंत्राटी सुरक्षा एजन्सीचे एकुण 311 पॉईंट असून सर्व पॉईटवर कामाचे ठिकाण सुरक्षा कर्मचाऱ्याचे नाव असलेले बोर्ड हे प्रति नग 2 प्रमाणे एकुण 622 नग बोर्ड व कामाचे ठिकाणाने 311 बोर्ड असे एकूण 933 खालील नमुन्याप्रमाणे बनविणे आवश्यक आहे.

सिक्युरिटी पॉईटचे 622 नग बोर्ड (साईज 6 इंच X 9 इंच) शिटवर खालील प्रमाणे बनविता येईल.

| | |
|---|---|
| सुरक्षा रक्षक कामाचे ठिकाण<br>क्र.01<br>(गुरुस्थान)<br><br>कर्मचाऱ्यांचे नाव<br><br>(पुढील बाजू) | **Security Point**<br>**No -1**<br>**(Gurusthan)**<br><br>कर्मचाऱ्यांचे नाव<br><br>( मागील बाजू ) |

तसेच 311 पॉईटचे बोर्ड खालील नमुन्याप्रमाणे व 12 इंच X 18 इच या साईजमध्ये बनविता येतील.

सुरक्षा रक्षक कामाचे ठिकाण

| |
|---|
| सुरक्षा रक्षक कामाचे ठिकाण<br>क्र.01<br>(गुरुस्थान मंदीर ) |

उपरोक्त बोर्ड बनविणेकामी ॲक्रलिक शिट, फोमशिट व कंपोझिट पॅनल बोर्ड अशा तीन प्रकारच्या बोर्ड नमुने पाहिले असता फोमशिटचे बोर्ड जादा दिवस टिकणार नाही असे समजले. तसेच कंपोझीट शिटचे बोर्ड हे एकाच बाजुने प्रिंट करता येत असल्याने दुस-या बाजूने स्टिकरणे रंगविता येईल परंतू स्टीकरने रंगविलेल्या भागाची मुदत जास्तीत जास्त 06 ते 07 महिने कालावधी असेल. तसेच स्टिकरने रंगविलेल्या भागाचे सहजासहजी नखाने तसेच उन्हामुळे स्टीकर खराब होवून गळून पडण्याची दाट शक्यता आहे. ॲक्रलिक शिटचे बोर्डवर मार्कर पेनने सुरक्षा रक्षकाचे नांव टाकून पुन्हा पुसता येणार असल्याने ॲक्रेलिकचेच बोर्ड बनविणे योग्य राहील असे नम्र मत आहे. सदर बोर्ड बनविणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | शिटचा प्रकार | प्रतिनग अंदाजे किंमत | एकुण नग | येणारा अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| 01. | ॲक्रलिक शिट<br>6 इच X 9 इंच साईजचे | 150/- | 622 | 93,300/- |
| 02. | ॲक्रलिक शिट<br>12 इंच X 18 इच साईज | 415/- | 311 | 1,29,065/- |
| | | अपेक्षीत एकूण खर्च | | 2,22,365/- |

उपरोक्त प्रमाणे 6 इच X 9 इंच साईजचे 622 बोर्ड व 12 इंच X 18 इंच साईजचे 311 असे एकूण 933 बोर्ड बनविणेकामी अंदाजे अक्षरी रु.दोन लाख बावीस हजार तीनशे पासष्ट रुपये खर्च अपेक्षीत आहे.

तरी ॲक्रेलीकचे बोर्ड बनविणेकामी स्थानीक प्रिंटर्स यांचेकडून कोटेशन घेवून बनवून घेणेस व अंदाजे रु.2,22,365/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कायम व कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे सिक्युरिटी पॉईटवर कर्मचा-यांच्या नावासह प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ॲक्रेलीकचे बोर्ड बसविणेस मान्यता देण्यात यावी. तसेच सदरहू काम तातडीने करुन घेणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांचे खर्चाचे अधिकारात टप्प्या-टप्प्याने करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

०९ **वाहनांचे टायर्स रिमोल्डींगकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

वाहन विभागाकडील स्कुल बसेसचा वापर श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलचे विद्यार्थी शाळेत ने-आण करणे कामी होत आहे. टाटा पॅसेंजर व अशोक लेलॅण्ड पॅसेंजर बसेसचा वापर साई आश्रम निवासस्थान व श्री साईबाबा भक्तनिवास स्थान येथे निवास करणाऱ्या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे ने-आण करणे कामी होत आहे. तसेच टाटा-407 शववाहीकावाहनाचा वापरदोन्हीरुग्णालयातील डेडबॉडीघरीसोडविणेकामीहोतआहे. सदर वाहनांचे टायर्स सततचे वापरामुळे खराब झालेनतर वेळोवेळीरिमोल्डींगकरुनवापरण्यातयेतात.

अ) वाहन विभागाकडील दि 27/09/2014 रोजीचे मजुर टिपणीनुसार, खालील तपशिलातील जुने टायर्स रिमोल्डींग करणेकामी परिसरातील टायर्स रिमोल्डींग वर्क्स याचेकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.50,000/- (अक्षरी रक्कम रु. पन्नास हजार) पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार न्युमतम दरधारक,

सुर्याटायर्स रिमोल्डींगवर्क्स, लोहगांव, बाभळेश्वर यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ वाहन/3515/ 2014 दि.22/10/2014 रोजीचे पत्राने कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार त्यांचेकडून सदर टायर्स रिमोडींग करुन ताब्यात मिळालेली आहे.

| अ.नं. | टायरसाईज | नग | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 01 | 9:00:20 | 08 | 3,700.00 | 29,600.00 |
| 02 | 7·50:16 | 04 | 2,575.00 | 10,300.00 |
| 03 | 7.00:16 | 04 | 2,150.00 | 8,600.00 |
| | **एकुणरक्कम (रु.) "अ"** | | | **48,500.00** |

**ब)** वाहन विभागाकडील दि.16/12/2014 रोजीचे मंजुर टिपणीनुसार, 9:00:20 या साईजचे-07 व 10:00:20 यासाईजचे 06 असेएकुण 13 टायर्स तातडीने रिमोल्डींग करुन घेणे आवश्यक होते. याबाबत सुर्या टायर्स रिमोल्डींग वर्क्स, लोहगांव, बाभळेश्वर यांना विचारणा केली असता त्यांनी दि.22.10.2014 रोजीचे पुरवठा आदेशातील 09:00:20 या टायर साईजचे दरातच (प्रति नग रु.3700/-प्रमाणे) सदर 13 टायर्स रिमोल्डींग करुन देण्यास तयारी दर्शविल्याने त्यांना इकडील जा.क्र.एसएसएस/ वाहन/ 4667/ 2014, दि.26/12/2014 रोजीचेपत्राने कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार त्यांचेकडून सदर टायर्स रिमोल्डींग करुन ताब्यात मिळालेली आहे.

| अ.नं. | टायरसाईज | नग | दर (रु.) | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| 01 | 9:00:20 | 07 | 3,700.00 | 25,900.00 |
| 02 | 10:00:20 | 06 | 3,700.00 | 22,200.00 |
| | | | **एकुणरक्कम (रु.)"ब"** | **48,100.00** |

वरील प्रमाणे वाहनांचे टायर्स रिमोल्डींग करुन घेणे कामी "अ" नुसार रु.48,500/-मात्रव "ब"नुसार रु.48,100/- मात्र असे एकुण रक्कम रु.96,600/- (अक्षरी रक्कम रु.शेहान्नव हजार सहाशे) मात्र खर्च आलेला आहे.

**संस्थान अधिनियम/ ठरावानुसार छाननी/ शासन निर्देश तात्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान-** आर्थिक खर्चाची बाब आहे.

**मागणी/ विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** वाहनांचे टायर्स रिमोल्डींग करुन घेणेकामी आलेल्या एकुण रक्कम रु.96,600/- (अक्षरी रक्कम रु.शेहान्नव हजार सहाशे) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणे वाहन विभागातील वाहनांचे टायर्स रिमोल्डींग करणेसाठी आलेल्या रु.९६,६००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी. तसेच यापुढे प्रत्येक वाहनांसाठी नवीन टायर्स घेतल्यापासून किती किलोमिटरनंतर रिमोल्डींग केले यासंदर्भातील संपुर्ण माहितीसाठी स्वतत्र रजिष्टर ठेवणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

१० **अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करिता निविदा मागविणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थानचे विविध विभागांना अंतर्गतव बाहेरील दुरध्वनी संपर्कासाठी शांतीनिवास इमारतीमध्ये सिमेंस कंपनीची दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.या मुख्यदुरध्वनी यंत्रणेतुन ओएफसी केबलव्दारें (१) समाधी मंदिर परीसर (२) श्री साईबाबा हॉस्पिटल,श्री साईनाथ रुग्णालय,साईनगर स्टॉफ क्वार्टर्स व व्दारावती निवासस्थान (३) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ५०० रुम्स, शैक्षणिक संकुल, अधिकारी व डॉक्टर्स क्वार्टर्स (४) नविन प्रसादालय या चार ठिकाणी सिमेंस कपनीच्या दुरध्वनी यत्रणा बसविण्यात आलेल्याआहेत.या दुरध्वनी यंत्रणा विनाखंडीत चालु राहणेकामी मे.सिमेंस एन्टरप्राईज कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई यांचेशी अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेचा दि.०१/०९/२०१३ ते दि.३१/०८/२०१४ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी दुरुस्ती देखभाल करार करण्यात आलेला होता. मे.सिमेंस एन्टरप्राईज कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई या कंपनीचे दि.१८/१०/२०१३ पासून मे.युनिफाय एन्टरप्राईज कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई या नावाने बदल झालेला आहे.

सिमेंस कपनीच्या Hipath 4300 ही दुरध्वनी यंत्रणा सन २००४ साली कार्यान्वित केलेली असुन सदरचे मशिनरीस जवळपास १० वर्ष झालेले आहेत. अंतर्गत दुरध्व नी यत्रणेचा दि.०१/०९/२०१३ ते दि.३१/०८/२०१४ अखेर एक वर्षाचा दुरुस्ती देखभाली करीता करार करण्यात आलेला होता. सदरचा कालावधी दि.३१/०८/२०१४ रोजी संपुष्ठात आलेला आहे.AMC साठी कंपनीकडे वारंवार संपर्क साधण्यात आलेला आहे परंतु कंपनीकडुन पाहीजे तसा प्रतीसाद मिळत नाही. तसेच सदरची मशिनरी ही जुनी झालेली असल्याने मशिनचे जुने स्पेअर्स कंपनीकडे उपलब्ध होत नाहीत असे सांगण्यात येत आहे.

दिनाक ०२/१२/२०१४ रोजीने फोनिक्स इन्फोकॉम मुंबई यानी Hipath 4300 या दुरध्वनी यंत्रणेच्या दुरुस्ती देखभाली करीता AMC चा रु.८,४२,७००/- प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच मे.युनिफाय एन्टरप्राईज कम्युनिकेशन प्रा.लि.मुंबई यानीही दिनांक ०२/१२/२०१४ रोजी AMC चा रु.३,३५,७६३/- प्रस्ताव सादर केलेला आहे. दोन्हीही कपन्यांनी Siemens Hipath 4300 या दुरध्वनी यंत्रणेच्या दुरुस्ती देखभाली साठी प्रस्ताव दिलेले आहेत.तसेच फोनिक्स इन्फोकॉम मुबई ही कपनी Siemens Hipath 4300 या मशिनरींचे दुरुस्ती देखभालीचे काम करते असे कंपनीने कळविलेले आहे.

तसेच साई आश्रम १ व साई धर्मशाळा या दोन्ही ठिकाणी अंतर्गत व बाहेरील संपर्कासाठीमॅट्रीक्स कंपनीच्या दुरध्वनी यंत्रणा बसविण्यात आलेल्या असुन या दोन्हीही मशिनरीचे दुरुस्ती देखभालीचा (AMC) कालावधी फेब्रुवारी २०१५ पासुन चालु होणार आहे.त्यामुळे सिमेंस व मॅट्रीक्स या दोन्हीही दुरध्वनी कंपन्याचे मशिनरीचे दुरुस्ती देखभालीकरीता एकत्रित अथवा दोन्ही करीता स्वतत्र (AMC) द्यावी लागणार आहे.याकरीता अदाजे रक्कम रु.६,००,०००/- पर्यंतचा खर्च एका वर्षाकरीता अपेक्षीत आहे.

दोन्हीही कपनीचे प्रस्ताव पाहता Siemens Hipath 4300 व मॅट्रीक्स या दोन्हीही दुरध्वनी कंपन्याचे मशिनरीचे दुरुस्ती देखभाल (AMC) करीता निविदा मागविण्यात याव्यात असे मत आहे. Siemens Hipath 4300 व मॅट्रीक्स या दुरध्वनी यंत्रणेच्यादुरुस्ती देखभाल (AMC) एका वर्षाकरीता अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.सदरचे कामासाठी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती देखभाल (AMC) करिता वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

११ **एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांची सन- २०१५ करिता पाणी तपासणी करणेकामी नेमणूक करणेबाबत.**

पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून शुध्द केलेले पाणी पिण्यासाठी व इतर वापरासाठी संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी वितरीत केले जाते. सदरचे शुध्द केलेले पाणी पिण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत पाण्याची नमुन्याची तपासणी होणे आवश्यक असल्याने त्याची दरमहा संस्थानचे कनकुरी साठवण तलाव येथील प्रयोगशाळेत, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर व एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि. नाशिक येथे तपासणी करण्यात येते. यापैकी सन २०१४ (जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४) करीता एनव्हायरो केअर लॅब यांची मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने रासायनिक व अणुजीव तपासणी करणेसाठी नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांचेकडे दरमहा विविध ठिकाणचे आठ पाणी नमुने तपासणी करणेकरीता पाठविण्यात येत होते व पाणी नमुने तपासणी अहवाल मागविण्यात येवून त्यांनी केलेल्या सुचना आमलात आणून पाणी शुध्दीकरणासाठी उपाय योजीले जात आहेत.

पाणी पुरवठा विभाग दि. २२ नोव्हेंबर, २०१३ रो जीचे मंजुर टिपणीन्वये एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांना माहे जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१४ अखेर पाणी तपासणी करणेसाठी नेमणूक करणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रं ९७० नुसार खालीलप्रमाणे निर्णय समत झालेला होता.

*" यावर सविस्तर चर्चा होवून, एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांना पुर्वीचेच अटी-शर्तीवर प्रती सॅम्पल रुपये १,०५०/- मात्र (दरमहा ०८ सॅम्पल + रु. ६००/- व्हीजीट चार्ज ) + १२ % सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H.Edu Cess १ % याप्रमाणे दि. ०१ जानेवारी, २०१४ ते दि. ३१ डिसेंबर, २०१४ अखेर पाणी तपासणी कामी नेमणूक करणेत यावी, असे ठरले.*

*तसेच याकामी येणा-या अंदाजे रु. १,२१,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली."*

वरील निर्णयास अनुसरुन एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांनी सन २०१४ करीता पूर्वीचेच अटी-शर्तीवर नेमणूक करण्यात आलेली होती. एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांची सलग १२ वर्षापासून पाणी तपासणी करणेकामी नेमणूक असून, उपरोक्त कालावधीत त्यांचे काम समाधानकारक असल्याने तसेच पाणी शुध्दीकरणांसाठी त्याचे मार्गदर्शनाची आपणास आवश्यकता असल्याने त्यांची पुर्वीप्रमाणेच पाणी तपासणी करणेसाठी नेमणूक करण्यात यावी असे नम्र मत आहे.

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांची पाणी नमुणे तपासणी करणेची मुदत माहे डिसेंबर, २०१४ अखेर समाप्त होत असल्याने त्यांनी पुढील कालावधी (माहे जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१५) करीता प्रशासनशाखा आवक नं. १७३८६, दि. १२/१२/२०१४ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचे प्रस्तावात त्यांनी प्रती शॅम्पल रुपये १,१००/- मात्र दरमहा आठ शॅम्पल + रुपये ३५०/- मात्र व्हीजिट चार्ज + १२ % सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H.Edu.Cess १ % प्रमाणे मागणी केलेली आहे

एनव्हायरो केअर लॅब प्रा.लि., नाशिक यांना पूर्वीचेच अटी-शर्तीनुसार त्यांनी कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराप्रमाणे प्रती शॅम्पल रुपये १,१००/- मात्र दरमहा आठ शॅम्पल + रुपये ३५०/- मात्र व्हीजिट चार्ज + १२ % सर्व्हीस टॅक्स + E.Cess २ % + S.H.Edu.Cess १ % याप्रमाणे दिनाक ०१ जानेवारी, २०१४ ते ३१ डिसेंबर, २०१४ अखेर पाणी नमुने तपासणी करणेसाठी एकुण रु. १,२८,०९०/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१५ करिता संस्थानमधील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागवून एजन्सीची नेमणूक करणेत यावी, याकामी येणा-या जाहिरातीच्या व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

११ **श्री साईप्रसादालयातील मुख्य किचनमध्ये स्टेनलेस स्टील एल.पी. गॅस पाईपलाईन व जुन्या गॅस प्लॅन्ट येथे खराब झालेली पाईप लाईन बदलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

श्री साईप्रसादालयात साईभक्तांना वेळेवर प्रसाद भोजन देणेसाठी किचनमध्ये आवश्य् क आटोमायझेशन करणेत आलेले आहे. श्री साई प्रसादालयामध्ये दररोज सरासरी 40,000 साईभक्त् प्रसादभोजनाचा लाभ घेतात. साई प्रसादालयातील किचनमध्ये नेहमीचे वापरामुळे सध्या बसविणेत आलेली एम.एस. ची गॅस पाईप लाईन खराब झालेली आहे. यापुर्वी खराब झालेली पाईप लाईन कट करुन नविन पाईप बसविण्यात आलेले आहे. परंतु स्वयंपाकासाठी मिठ व पाणी याचा वापर जास्त् असल्याने सदर पाईप लाईनवर पडते व परिणामी पाईप लाईन खराब होत आहे.

गॅसची पाईप लाईन खराब होऊन लिकेज हे याचे शक्यता जास्त असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने श्री साई प्रसादालयातील मुख किचनमध्ये १३ भट्याकरीता स्टेनलेस स्टीलची गॅस पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. स्टेनलेस स्टील पाईन लाईनवर मीठ व पाणी पडल्यास पाईप लाईन खराब होत नाही. त्याकरीता खालीलप्रमाणे मटेरिअलची आवश्यकता आहे:

परिशिष्ट् A

| अ.नं. | तपशील | संख्या | दर | एकूण रक्क् म | कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SS 304 Pipe sd 40 IS Code 1239 "1" 2.75mm thick | 100 feet | 235.00 | 23500.00 | Sumitomo |
| 2 | SS 304 Pipe sd 40 IS Code 1239 "1/2"2.75mm thick | 70 feet | 185.00 | 12950.00 | Sumitomo |
| 3 | SS Socket Bend Seamless sd 40 "1" | 12 nos | 235.00 | 2820.00 | STD. |
| 4 | SS Socket Bend Seamless sd 40 "1/2 " | 25 nos | 175.00 | 4375.00 | STD. |
| 5 | "M' Clamp "1" | 20 nos | 35.00 | 700.00 | STD. |
| 6 | "M' Clamp "1/2" | 40 nos | 30.00 | 1200.00 | STD. |
| 7 | SS Baral Nipple "1" x 9" Seamless sd 49 | 1 nos | 90.00 | 90.00 | STD. |
| 8 | "SS 304 "T" "1" Connection sd 40 | 8 nos | 265.00 | 2120.00 | STD. |
| 9 | SS Flanges "1" 150 # | 3 set | 750.00 | 2250.00 | STD. |
| 12 | SS Adaptor "3/8" Heavy Duty | 30 nos | 75.00 | 2250.00 | STD. |
| 13 | Copper Burner Pigtails "24 " Hd | 13 nos | 260.00 | 3380.00 | STD. |
| 14 | SS Elbow "3/8" | 13 nos | 155.00 | 2015.00 | STD. |
| 16 | Fire Safe Ball Valve "1/2 " S.E. Nilon Make | 13 nos | 1150.00 | 14950.00 | Nilon |
| 17 | SS SD 40 Baral Nipple 1/2" x 6 Seamless | 8 nos | 115.00 | 920 00 | STD. |
| 18 | SS Cuppling "1/2' x 3/8" HD | 13 nos | 85.00 | 1105.00 | STD. |
| 19 | Brass Cuppling 3/8" | 13 nos | 85.00 | 1105.00 | STD. |
| 21 | Installation Charges Including Testing Transportation ,Colouring Welding ETC. | 1 Job | 25000.00 | 25000.00 | |
| | | | **Total Rs. :** | **1,00,730.00** | |

तसेच जुना गॅस प्लॅन्ट् येथे 10 टन क्षमतेचे दोन स्टोअरेज टँक सन 1989 मध्ये बसविलेले आहे. सध्या दोन्ही स्टोअरेज टँकचा वापर लाडू प्रसाद किचन व चहा कॅन्टीन करीता करण्यात येत आहे. परंतु टँकवरील स्प्रींकलरचे पाण्यामुळे टँक जवळील पाईप लाईन खराब झालेली आहे. सदरच्या पाईप लाईनला वारंवार ऑईलपेन्ट् कलर देण्यात आलेला आहे परंतु पाईप लाईनला जास्त् दिवस झालेले असल्याने लिकेज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर ठिकाणी नविन पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे त्याकरीता मटेरिअल व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आवश्यक आहे.

परिशिष्ट् B

| अ.नं. | तपशील | संख्या | दर | एकूण रक्कम | कंपनी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2" C Class pipe | 150 feet | 160.00 | 24000.00 | Tata |
| 2 | 1½" C Class Pipe | 70 feet. | 140.00 | 9800.00 | Tata |
| 3 | 2" long Bend M.S. | 8 Nos. | 200.00 | 1600.00 | Tata |
| 4 | 1½" long Bend M.S. | 3 Nos | 180.00 | 640.00 | Tata |
| 5 | M Clamp 2" | 20 Nos. | 80 00 | 1600.00 | STD |
| 6 | M Clamp 1½" | 8 Nos. | 60.00 | 480.00 | STD |
| 7 | 2" machining flange & nut, gasket. | 14 sets | 280.00 | 3920.00 | Tata |
| 8 | 1½" machining flange & nut, gasket | 4 sets | 225.00 | 900.00 | Tata |
| 9 | Earth Jumper | 18 Nos. | 75.00 | 1350.00 | STD |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | Labour charges (Installation, Welding, Fitting & Painting) | 1 Job | 16000.00 | 16000.00 | |
| | | | **Total Rs. :** | **60,290.00** | |

उपरोक्त परिशिष्ठ 'A' व 'B' कामांकरीता साहित्य, मजूरीसह अदाजे अनुक्रमे रुपये **1,00,730/-** व रुपये **60,290/-** अशी एकत्रित रुपये **1,61,020/-** खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त दोन्ही कामे **एक्सप्लोझीव्ह विभाग**, भारत सरकार याचे मान्यता प्राप्त एजन्सीकडून करुन घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे साई प्रसादालयातील मुख्य् किचनमधील गॅस पाईप लाईन व जुन्या गॅस प्लॅन्ट् येथील स्टोअरेज टॅंक येथील खराब झालेली पाईप लाईन बदलविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्क् म रुपये 1,61,020/- पर्यंतच्या खर्चास मान्यता घेणेकामी तसेच वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द् करुन एक्सप्लोझीव्ह् विभाग, भारत सरकार यांचे मान्यता प्राप्त् एजन्सीकडून निविदा मागविणेकामी मान्यतेचा प्रस्ताव मा. उप-समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील मुख्य किचनमध्ये स्टेनलेस स्टील एल.पी. गॅस पाईपलाईन व जुन्या गॅस प्लॅन्ट येथे खराब झालेली पाईप लाईन बदलविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या रु.१,६१,०२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१३ **श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जरी व गायनॅक ओ.टी. विभागाकरिता Boyles Machine with Ventilator खरेदी व जुने Hospitech कंपनीचे मशिन बायबॅक करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जरी गायनॅक ओ.टी. या विभागाने दि. १३/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये Boyles Machine with Ventilator ०२ नगांची मागणी केली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले Drager कंपनीचे Boyles Machine with Ventilator मशिन जुने असल्यामुळे सतत बंद पडत असुन त्याचे स्पेअर पार्ट हे सुद्धा बाजारात उपलब्ध नसतात कारण सदर कंपनी ही नवीन GE कंपनीने घेतलेली असुन मुळ कंपनीकडून स्पेअर पार्ट मिळत नाही. त्यामुळे त्यांनी नवीन ०२ नगांची मागणी केलेली आहे. परंतु सध्या त्यांना तातडीने एक मशिन खरेदी करुन देता येईल. सध्या त्यांचेकडे असलेले Hospitech कंपनीचे without Ventilator Boyles मशिन हे सन २००५ साली रक्कम रु. २८,०००/- इतक्या रकमेत खरेदी केलेले होते. सदर मशिन बायबॅक करणेबाबत जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे मागणीपत्रकात वरिष्ठ बायोमेडिकल अभियंता यांनी शिफारस केलेली आहे. त्यानुसार सदर मशिन बायबॅक करावयाचे असुन त्याची घसारा वजा जाता येणारी किंमत रु. २,१०२.३७ (पुर्णांकित रक्कम रु. २,१०२/-) इतकी आहे

दि. २३/०५/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ३२१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडिक) या विभागाकरिता एक नग खरेदीस रु. ७,२५,०००/- इतकी मंजूरी मिळालेली आहे. त्याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेरनिविदा मागविण्याची कार्यवाही चालु आहे. सदर खरेदीचे वेळेस अजुन एक नग संख्या वाढवून घेऊन सदर मशिन खरेदी करता येईल.

**<u>मागणी</u>**– श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर व गायनॅक ऑपरेशन थिएटर विभागाचे दि. ०९/०८/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २०/०८/२०१४).

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात

२) सदर मशिनची घसारा वजा जाता दि. ३१/१०/२०१४ अखेर किंमत रु. २,१०२/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीकामी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**– श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल सर्जरी व गायनॅक ओ.टी. विभागाकडे असलेले Hospitech कंपनीचे Boyles Machine without Ventilator हे सन २००५ मध्ये खरेदी केलेले आहे. सदर मशिन जुने असल्यामुळे सतत बंद पडत असुन त्याचे स्पेअर पार्ट हे सुद्धा बाजारात उपलब्ध नसतात. त्यामुळे जुने मशिन बायबॅक करुन नवीन मशिन खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे एक नग Boyles Machine with Ventilator श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर (आर्थोपेडिक) या विभागाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या Boyles Machine with Ventilator चे मंजूर दराने खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ७,२५,०००/- चे खर्चास खर्चास तसेच जुने मशिन Buyback करणेस मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या रु.७,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१४ **श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागाकरिता Fully Automatic Autoclave मशिन खरेदीबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ. टी. विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर शस्त्रक्रियेकरिता लागणारे Surgical Instrument व Operation Theator मधील लिनन निर्जतुक करण्यासाठी उपरोक्त Autoclave Machine चा वापर होत असतो. सध्या त्यांचेकडे कार्यान्वित असलेले Autoclave Machine हे सन २००६ या वर्षात मे. एम. शहा ॲण्ड कं., पुणे यांचेकडून रु. १,३८,४६०/- इतक्या किंमतीत खरेदी केले होते. तसेच Operation Theator मधील लिनन हे खुप जास्त प्रमाणात असते. त्यामुळे एक Autoclave मशीनमध्ये Surgical Instrument व Operation Theator मधील लिनन निर्जतुक होत नाही. त्यामुळे त्यांनी आणखी एक Autoclave Machine ची मागणी केलेली आहे.

परतु सदर Autoclave काही कारणास्तव बंद पडल्यास लिनन व Instrument Autoclave होऊ शकणार नाही व दैनंदिन कामाची गैरसोय होईल, त्यामुळे त्यांनी अजुन एक Autoclave ची मागणी केलेली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Fully Automated Horizontal Autoclave Machine | 01 | 4,95,000.00 | 4,95,000.00 |
| | | Total Amt. in Rs. | | 4,95,000.00 |

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ. टी. विभागाचे दि. १९/११/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २०/११/२०१४).

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. सदर शस्त्रक्रियेकरिता लागणारे Surgical Instrument व लिनन निर्जतुक करण्यासाठी उपरोक्त Autoclave Machine चा वापर होत असतो. सध्याचे Autoclave हे आठ वर्षापूर्वीचे आहे ते जर अचानक बंद पडले तर कामाची गैरसोय होईल.

दि. २८/०८/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील विषय नं. ४६ निर्णय क्र. ७२२ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. २ विभागाकरिता एक Fully Automatic Autoclave मशिन विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदी करण्यास मान्यता मिळालेली आहे, व त्यासाठी विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करण्याची प्रक्रिया चालु आहे. तेव्हा त्याच मंजुर दराने मशिन खरेदी करता येईल.

तरी सदरचे खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ४,९५,०००/- चे खर्चास तसेच श्री साईबाबा रुग्णालयाकरिता खरेदी करण्यात येत असलेल्या मशिनचे मजुर दराने खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या रु.४,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१५ **श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता नवीन Oil Free Electro Mechanical Operation Table खरेदी करुन जुना Operation Table परत (Buyback) करणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागात वेगवेगळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदर Operation Table ची आवश्यकता असते. सध्या त्यांचेकडे ०३ नग O.T.Table आहे त्यापैकी एक नग Sttan कंपनीचा तर दोन नग Janak कंपनीचे आहेत. त्यातील Janak कंपनीचा एक नग Operation Table हा Manually Operate करावयाचा असून तो सध्या नादुरुस्त आहे. त्यामुळे जनरल ओ.टी. विभागाने दि.२०/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्रान्वये ०१ नग Oil Free Electro Mechanical Operation Table ची मागणी केलेली आहे.

सध्या त्यांचेकडे असलेले Manually Operate करावयाचा जनक कंपनीचा Operation Table सन २००५ साली रक्कम रु.५८,२७६/- इतक्या किंमतीत खरेदी केलेला असून तो सध्या नादुरुस्त असल्यामुळे परत (Buyback) करावयाचा आहे. सदर Operation Table ची घसारा वजा जाता येणारी किंमत रु.१३,४९८/- इतकी आहे.

नवीन Oil Free Electro Mechanical Operation Table खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Oil Free Electro Mechanical Operation Table | 01 | 3,00,000.00 | 3,00,000.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **3,00,000.00** |

उपरोक्त प्रमाणे ०१ नग Oil Free Electro Mechanical Operation Table खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाचे दि.२०/०९/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ३०/१०/२०१४)

संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करून अनुमान— अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

2) सदर मशिनची घसारा वजा जाता दिनांक ३०/११/२०१४ अखेर किंमत रु.१३,४९८/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रुपये ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) अन्वये सदरचे मशीन Buyback करणेकामी शासनाची पूर्व मान्यता घेण्याची आवश्यकता नाही

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत— श्रीसाईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागातील सन २००५ साली खरेदी केलेला टेबल नादुरुस्त असल्याने तो Buyback करुन खरेदी करण्यास हरकत नाही.

सदर ०१ नग Oil Free Electro Mechanical Operation Table विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ३,००,०००/- चे खर्चास तसेच जुना Operation Table परत (Buyback) करणेस मान्यता असावी

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ.टी. विभागाकरिता आवश्यक असलेला ०१ नग Oil Free Electro Mechanical Operation Table विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास तसेच तेथील जुना Operation Table परत (Buyback) करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

१६ **सन २०१३-१४ मधील (Annual Rate Contract) वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

(अ) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्रमांक 564 Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधाची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. 25.000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झुमेबल साहित्याकरीता सन 2013-2014 या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण 66 पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. 30,52,88,358/- चे दि.19/03/2014 रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झुमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

०१) महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर विभागाने जागतिक बँक प्रकल्पाच्या माध्यमातून या राज्यमार्गावरील शिर्डी - राहाता या शहरांच्या दरम्यान २३ किलोमीटर लांबीच्या दुपदरी बाह्यवळण रस्त्यासह कोल्हार - कोपरगांव राज्यमार्गाचे चौपदरीकरणाचे काम बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर आता संबंधीत बांधकाम ठेकेदार सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर, अहमदनगर यांचेमार्फत करणेत येत आहे. बाह्यवळण रस्त्याचे महत्व लक्षात घेऊन, कोपरगांव - अहमदनगर या राज्यमार्गाचे अंतर्गत, विशेष करुन शिर्डी शहरातुन जाणाऱ्या रस्त्यावर जड वाहतुकीचा मोठा ताण असल्याने, शिर्डी शहरालगत दक्षिण व उत्तर बाजूने नेहमी वाहतुकीचा प्रचंड खोळंबा होतो.

त्यामुळे कोपरगांव - अहमदनगर या रस्त्याचे चौपदरीकरणाचे कामातर्गत पिंप्री निर्मळ ते सावळीविहीर खुर्द या अंदाजे १३ किलोमीटर लांबीचे बाहयवळण रस्त्याच्या कामाचा समावेश करणेत आलेला आहे.

०२) बाहयवळण रस्त्याचे महत्व लक्षात घेता सदरहू काम प्राधान्याने व तातडीने सुरु होणे आवश्यक आहे. सदरहू बाहयवळण रस्त्याचे काम सुरु करणेबाबत विविध स्तरावरुन तगादा करण्यात येत आहे. मात्र सदरहू रस्त्याचे काम अद्याप सुरु झालेले नाही. ऑगस्ट २०१५ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होत आहे. याकालावधीत शिर्डी मध्ये श्री साईबाबाचे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक भक्त येणार आहे. तसेच सन २०१७ मध्ये श्री साईबाबांची शताब्दी महोत्सव संपन्न होणार आहे. याकालावधीतही सुमारे २५ लाख भाविक एकाच दिवसात येतील असे अपेक्षित आहे. याबांबीचा साकल्याने विचार करता सुरळीत वाहतुकीसाठी भक्तांचे प्रवास सुसह्य व्हावा यादृष्टीने सदरहु बाह्यवळण रस्ता, सिंहस्थ कुंभमेळ्यापुर्वी विकसीत होणे अत्यंत आवश्यक आहे. याबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा समिती सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यानी याकामी निधी अभावी सदरहु रस्त्याचे काम हाती घेण्यात येत नसल्यास सदरहू रस्त्याचे कामासाठी आर्थिक सहाय्य, साईभक्तांची सोयी सुविधा व सावर्जनीक हित लक्षात घेऊन काही अटी शर्तीवर संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. असे निर्देश दिले आहेत सदरचे काम व कामाचा खर्च संस्थान विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सार्वजनिक बाधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेने करील तसेच पर्यवेक्षणाचे काम ही सार्वजनिक बांधकाम विभागाने करण्यास संस्थानची काही एक हरकत नाही.

सदरहू काम संस्थानमार्फत हाती घेणेसाठी योग्य असा सविस्तर प्रस्ताव सार्वजनीक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्त झाल्यास याबाबत त्रिसदस्य समितीचे सभेत सकारात्मक निर्णय घेता येईल. अशाही सूचना दिल्या होत्या त्यानुसार

१) इकडील कार्यालयाचे जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४७२६/२०१४,दि.२९/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यानेकडे बाह्यवळण रस्त्याचे काम संस्थानमार्फत हाती घेणेसाठी योग्य असा सविस्तर प्रस्ताव सादर करणेस विनती केली आहे

२) इकडील कार्यालयाचे जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/४७२६/२०१४,दि.२९/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे बाह्यवळण रस्त्याचे कामाबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना सविस्तर प्रस्ताव सादर करणेस आदेश करणेबाबत विनंती केली आहे.

३) इकडील कार्यालयाचे जा.क्र.एसएसएसटीकुंभमेळा-शताब्दी/४९५५/२०१५,दि.०८/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मत्रालय, मुबई यांचेकडे अहमदनगर- कोपरगाव राजमार्गावर पिंप्रीनिर्मळ ते सावळीविहीर हा बाह्यवळण रस्ता संस्थानमार्फत विकसीत करणेस व याकामी येणा-या अंदाजे १४० कोटी रुपये खर्चास मान्यता मिळणेसाठी पत्रव्यवहार केलेला आहे.

४) याबाबत् अधिक्षक अभियंता सार्वजनिक बाधकाम मडळ, अहमदनगर यांनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बाधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक याना दि.०३/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, शिर्डी बाहयवळण रस्ता ०/०० ते १३/ ३०० (नियोज ते निर्मळ पिंप्री सोबत नकाशा सादर). दोन पदरी रस्त्याचे काम खाजगी करणांतर्गत मंजुर असून रस्त्याच्या पूर्ण लांबीमध्ये भू-संपादन पुर्ण झालेले आहे. सदर रस्त्याच्या अशतः लांबीमध्ये भराव व दोन लहान पुलाचे काम पूर्ण झालेले आहे. सदर काम अत्यंत मंद गतीने प्रगतीत आहे.

खाजगी करणांतर्गत मजुर रस्त्याचे काम दुपदरी असून कोल्हार ते कोपरगाव हा चौपदरी रस्ता आहे. कोल्हार ते कोपरगाव रस्त्यावरील वाहतुक वर्दळ पहाता शिर्डी बाहय वळण रस्ता चौपदरीकरण करणे अपरिहार्य आहे. सदर बाहयवळण रस्त्याचे चौपदरीकरण करणे करिता सुमारे रु.१४० कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर बाहयवळण रस्ता तातडीने पूर्ण करणे करिता श्री साईबाबा शिर्डी संस्थानने निधी देण्यास संमती दर्शविली आहे.

दरम्यान शिर्डी- राहाता या शहरांना दुपदरी बाहयवळण रस्ता विकसित करणेकामी सार्वजनीक बांधकाम विभागास निधी उपलब्ध करुन देणेकरीता तत्वतः मान्यतेबाबत निर्णय झाल्यास पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल. तद्नंतर याकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खडपीठ औरंगाबाद याची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच याकरीता विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांची देखील मान्यता घ्यावी लागेल.

वर नमूद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत शिर्डीमध्ये श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन करणेसाठी संस्थानमार्फत करावयाचे कामांसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार वर नमूद केलेप्रमाणे सुमारे रुपये १,९७५,४८०,०००/- (अक्षरी रु. एकशे सत्त्याण्णव कोटी चौपन्न लक्ष ऐंशी हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे.

सदरहु खर्च हा "Major Financial decision" या स्वरूपाचा असल्याने त्यासाठी मा.उच्च् न्यायालय, मुंबई खडपीठ औरंगाबाद यांनी PIL NO.18/2011 मधिल CA NO 12056/2012 मध्ये दि १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशान्वये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद याची पुर्व परवानगी व शिर्डी व राहाता या शहराबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणे तसेच इतर अनुषंगीक कामासाठी निधी उपलब्ध करुन देणेसाठी शासनाने विधी व न्याय विभागाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी वर नमूद केलेप्रमाणे प्राथमिक अंदाजानुसार येणारे एकुण रु.१,९७५,४८०,०००/- (अक्षरी रु. एकशे सत्याण्णव कोटी चौपन्न लक्ष ऐंशी हजार मात्र) मात्रचे खर्चास व उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.०६ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली.

याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी.

तसेच शिर्डी व राहाता या शहराबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.(कार्यवाही-बांधकाम विभाग/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.७** **सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चास मंजुरी मिळणेबावत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खड (ख) अन्वये *"रुढी व प्रथानुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खड (ग) अन्वये "भक्ताना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेतर्फे प्रतीवर्षी प्रमाणे याहीवर्षी दि २७/०३/२०१५ ते दि.२९/०३/२०१५ अखेर "श्री" चा श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. त्यामुळे उन्हापासून साईभक्ताचे संरक्षण व्हावे याकरीता मंदिर परिसर, भक्तनिवास (५०० रुम्स) परिसर, श्री साईनाथ रुग्णालय परिसर व जुने प्रसादालय या ठिकाणी तसेच मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी खर्डी, गोलभान, कसारा बायपास, लतिफवाडी, घोटी, सिन्नर, खोपडी, पांगरी, वावी, पाथरे, पोहेगाव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा, व निमगाव- को-हाळे येथे कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत व विद्युत व्यवस्थेसह तात्पुरते उभारणी करणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(अ) **श्री रामनवमी उत्सव २०१५ करीता करावयाची मंडप व्यवस्था:-**

**अ (१) समाधी मंदिर, जुने प्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईनगर इ. परिसरात करावयाचे मंडप, स्टेज, पार्टीशन, बॅरेकेटींग व दर्शनरांगेकरीता कनात इ. व्यवस्था**

**(कालावधी दि. २७/०३/२०१५ ते दि.२९/०३/२०१५)**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | अंदाजे परिमाण/एकक |
|---|---|---|
| ०१ | मंगल कार्यालय, तसेच पालखी स्वागतासाठी नगरपंचायत व पोलिस स्टेशन जवळ शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह उभारणे. तसेच कुस्ती ग्राउंडवर शामियाना मंडप उभारणे | ८२२० चौ.फुट |
| ०२ | साईनगर मैदानावर कलाकारांचे कार्यक्रमासाठी ३०'x२०' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ६०० चौ.फुट |
| ०३ | मंदिर परिसरामध्ये सभाकुड येथे किर्तनासाठी १६'x२४' साईजचे स्टेज व इतर व्यवस्था करणे. | ३८४ चौ फुट |
| ०४ | दर्शन व भोजन व्यवस्थेसाठी बॅरेकेटींग व्यवस्था | १५०० र.फुट |
| | अ (1) मधिल कामाकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु. | १,२५,९५०/- |

**अ (२) मुंबई येथून पायी पालखी घेवून येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी/ शामियाना मंडप, कनात, बिछायत तसेच विद्युत व्यवसथेसह व्यवस्था-**

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण/एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | मुंबई ते शिर्डी मार्गावर खर्डी गोलभान, कसारा, बायपास, लतिफवाडी व घोटी येथे कापडी मंडप. कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ३१,६०० चौ.फुट | दि २१/०३/२०१५ ते दि.२५/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| ०२ | मुंबई ते शिर्डी मार्गावर सिन्नर, खोपडी, पांगरी व वावी येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवस्थेसह | ७६,६५१ चौ.फुट | दि.२२/०३/२०१५ ते दि.२६/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| ०३ | मुंबई ते शिर्डी मार्गावर पाथरे व पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोनफाटा, झगडेफाटा व निमगांव-को-हाळे येथे शामियाना मंडप, कनात व बिछायतीसह तसेच जनरेटर, लाईट व्यवसथेसह | ३२,७३० चौ फुट | दि.२२/०३/२०१५ ते दि.२६/०३/२०१५ अखेर ०५ दिवस |
| | अ (2) मधिल कामांकरीता येणारा अपेक्षित अंदाजे खर्च रु. | | ६,७५,४६०/- |
| **श्री रामनवमी उत्सवाकरीता करावयाचे मंडप व इतर अनुषगिक व्यवस्थेसाठी येणारा एकूण अपेक्षीत खर्च (अ) रु.** | | | ८,०१,४१०/- |

(ब) सन २०१५ मधिल उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी करावयाची मंडप व्यवस्था:-

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | परिमाण/एकक | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (एम.एस.पाईप व कैच्यांचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:- मंदिर परिसरामध्ये समाधी मंदिर उत्तर बाजू सभाकुड तसेच साई कॉम्प्लेक्स समोरील मोकळया जागेत (१६ आर) | २४,६०० चौ.फुट | दि.०१/०३/२०१५ ते दि.१५/०६/२०१५ अखेर १०७ दिवस |
| ०२ | ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप (लाकडी बल्ल्या व बांबुचे स्ट्रक्चर असलेले) उभारणे:- समाधी मंदिर दक्षिण बाजू गुरुस्थान मंदिर, श्रींचे चावडी समोर, नंदादीप मागील बाजू, दर्शनव्दार ते शनिमंदिर गेट, शनि, महादेव, श्री गणेश मंदिर समोर, समाधी मंदिर उत्तरे कडील मंडप ते शाम सुंदरहॉल पर्यंत, गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर गेट नं.४ चे बाहेरील बाजुने,उदी काउंटर समोर, दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर, पिंपळवाडी रस्त्यावर नगर-मनमाड रस्ता व पिंपळवाडी रस्त्याचे फुटपाथव, दर्शन लाईन प्रवेशव्दार पूर्व व पश्चिम बाजू, लाडू कांऊटर समोर श्रीसाई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर, श्रीसाई प्रसदालय प्रवेशव्दार ते तिकीट काऊंटरपर्यंत व श्री साईबाबांचे शिल्पापर्यंत इ. भागात ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे. | ५८,५०० चौ.फुट | |
| ०३ | जुने प्रसादालय, परिसरामध्ये शामियाना मंडप, कनात व छिद्रायतीसह उभारणे | ८५०० चौ.फुट | |
| | उन्हाळ्याचे कालावधीत करावयाचे मंडप व्यवस्थेसाठी येणारा अपेक्षित अंदाजे खर्च (ब) रु. | | २१,६७,०७१/- |
| (क) | उत्सवा निमित्त उभारणेत येणारे डेकोरेशन करीता बांबु गोल्ट भाडे तत्वावर घेणे | | १०,०००/- |
| (ड) | उत्सवानिमित्त विविध सूचना बोर्ड व दिशादर्शक फ्लेक्समध्ये तयार करणे | | १५,०००/- |
| (ई) | उत्सवानिमित्त मंदिर परिसरातील शनिमंदिर, श्री गणेश मंदिर तसेच समाधी मंदिर चावडी व व्दारकामाई मंदिरातील रंगकाम | | १०,०००/- |
| | एकूण खर्च अ + ब + क + ड + इ | | ३०,०३,४८१/- |
| | पूर्णांकित रु. | | ३०,०४,०००/- |

मागिल वर्षीचे सन २०१४ मधिल श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्ताचे सोयीसाठी मंडप व्यवस्था व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.२५.३५ लक्ष मात्र खर्च झालेला आहे. सन २०१५ मधिल श्री रामनवमी उत्सव व उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी मागिल वर्षीच्या मंजूर दरात १०% वाढ गृहीत धरुन वरीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

उपरोक्त श्री रामनवमी उत्सव २०१५ तसेच उन्हाळ्याचे कालावधी करीता साईभक्तांचे सोयी सुविधेसाठी मंडप उभारणीसह इतर अनुषंगीक सुविधा पुरविणेकामी सिलबंद निविदा मागविणेसाठी वर्तमानपत्रात व संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविता येतील

तरी वरीलप्रमाणे मंडप व इतर व्यवस्था करुन घेणेकामी येणारे एकूण अंदाजे रु.३०.०४ लक्ष मात्रचे अपेक्षित खर्चास व या कामासाठी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर निविदा सूचना प्रसिध्द करुन सिलबंद निविदा मागविणेस मान्यतेस्तव सविनय सादर

**निर्णय क्र.०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**सामान्य प्रशासन, उत्सव विभाग यांनी श्री रामनवमी उत्सवानिमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या खर्चाचा समावेश श्रीरामनवमी उत्सवाचे अंदाजपत्रकामध्ये केलेला असल्यामुळे सदरहू खर्च वगळता प्रस्तावातील ब मध्ये नमुद केलेप्रमाणे उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणा-या अंदाजे रु.२१,६७,०७१/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभाग/ विधी विभाग)

---

**विषय नं.८** **सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धूणे/ इस्त्री करणेकामी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेस व नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपावेतो सन २०१५-१६ मध्ये, आहे त्याच मागील वर्षाचे दरात दरमहा मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी संबधीत लॉन्ड्री कॉन्ट्रॅक्टर याना मा.व्यवस्थापन समिती दि.१५/०२/२०१४ चे सभेतील निर्णयक्र.१६६ व मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचीखर्चास व मागील वर्षाच्या आहे त्याच दरात कॉन्ट्रॅक्ट देणेबाबतची मान्यता घेऊन मे साईश्रध्दा लॉन्ड्रीअॅन्ड सर्विसेस, प्रोप्रा.श्री विजय अशोक चव्हाण, सावळीविहीर

यांना जा.नं.एसएसएस/ वशी-साईआश्रमभक्तनिवास/ ३ ११/२०१४, दि.१६/१०/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी या विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर, चादर व टॉवेल धूणे/इस्त्री करणे या कामाचे कॉन्ट्रॅक्ट देणे असून, संबधीत कॉन्ट्रॅक्टर यानी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या पुढील ३ वर्षासाठी आहे त्याच दरात काम करण्याची तयारी दर्शविली असून सदरचे काम करण्याची संधी द्यावी, असे दि.०४/१२/२०१४ अन्वये विनंती पत्र दिलेले आहे.

**प्रस्ताव:-** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये माहे ऑक्टोंबर,२०१४ अखेर सात महिन्यांमध्ये रु.३२,२७,३२९/- एवढा खर्च झालेला आहे. म्हणजेच दरमहा सरासरी अंदाजे रु.४,६१,०४७/- एवढा खर्च येतो. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी एकूण अंदाजे खर्च रु.५६,००,०००/- अपेक्षीत राहील. (रु.४,६१,०४७/- दरमहा सरासरी खर्च x १२ महिने = वार्षिक खर्च ५५,३२,५६४/- = पुर्णांकित अपेक्षीत खर्च रु.५६,००,०००/-)

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** १) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता बेडशीट, उशी कव्हर,चादर व टॉवेल धूणे/ इस्त्री करणे कामाकरीता रु.५६,००,०००/- चे खर्चास व त्याकामी दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणे याकरीता मा.हायकोर्ट यानेकडे सिव्हिल ॲप्लीकेशन सादर करुन मान्यता घ्यावी लागणार आहे.

२) उपरोक्त मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेकामीचे प्रक्रियेस जादा कालावधी लागणार असल्याने नविन कॉन्ट्रॅक्टरला कार्यादेश देई पावेतो, आहे त्याच मागील वर्षाचे दरात संबधीत कॉन्ट्रॅक्टरला सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील काही महिन्यांसाठीदरमहा रु.४,६७,०००/- चे खर्चासह,दरमहा मुदतवाढीना कार्यादेश देणेस. याकामी सदरची ई-निविदा प्रक्रिया सोबत जोडलेल्या शेड्यूल प्रमाणे करण्यात येईल.

उपरोक्त १ व २ प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यता असावी, ही विनंती

**निर्णय क्र.०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या १ व २ नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम/ विधी विभाग)

---

**विषय नं.९** **संस्थान अधिकारी/ कर्मचारी वगळता इतर शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना तात्पुरते निवासासाठी देणेत आलेल्या संस्थान निवासस्थानांबाबत.**

**प्रस्ताव-** (अ)श्री संजय भा.काळे यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रं.25/2012 मध्ये श्री साईबाबा संस्थानच्या कामकाजाबाबत मुद्दे व त्यावरील श्री साईबाबा संस्थानने सादर केलेला खुलासा व तपशिल विचारात घेऊन मा.शासनाने दि.28/10/2013 रोजीचे पत्राने खालील निर्देश दिलेले होते:

*"... अधिनियमात कोणतीही तरतूद नसूनही किंबहूना 17(3) नुसार स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय श्री साईबाबा संस्थानचे अधिकारी/ कर्मचारी वगळता अन्य कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांना दिलेली संस्थानच्या मालकीची निवासस्थाने तात्काळ संबंधीतांकडून रिक्त करुन घ्यावीत. तसेच संबधीतांकडून घरभाडे भत्ता, विद्युत आकार, सेवा आकार इ.येणे असलेल्या सर्व रक्कमा एका महिन्यात वसूल करण्याची कार्यवाही, कार्यकारी अधिकारी यांनी करावी. तसेच यापूढे संस्थानच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांशिवाय अन्य कोणालाही निवासस्थाने कोणत्याही परिस्थितीत देण्यात येऊ नये. तसेच सदर सर्व कार्यवाही एका महिन्यात पूर्ण करण्यात यावी व पूर्तता अहवाल राज्य शासनास सादर करण्यात यावा."*

**(ब)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 मध्ये संस्थान कर्मचारी निवासस्थाने शासकीय अधिकाऱ्यांना देणेबाबत तरतूद नाही, त्याबाबत संस्थान विश्वस्तव्यवस्थेने नियम केलेले नाहीत. परंतु श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम 2004 नुसार, साईभक्तांचे गर्दीचे नियोजन, भक्तांची सेवा, कायदा व सुव्यवस्था राखने यासंदर्भात ग्रामस्थ / नागरीक व भक्त याचे सुरक्षितता व समन्वय ठेवणेसाठी तसेच शिर्डी पोलीस स्टेशनकडे कार्यरत असणारे कर्मचाऱ्याकरीता निवासाची अंदाजे सन 1988 साली कोणतीही व्यवस्था नसल्याने, त्यांना सन 1988 पासून शिर्डी पोलीस स्टेशनकडील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय मान्यतेने संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तद्नंतर, तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.07/07/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.598 नुसार –

**1) पोलीस इन्स्पेक्टर, शिर्डी पोलीस स्टेशन**

**2) मुख्याधिकारी,नगरपंचायत शिर्डी**

**3) तहसिलदार, राहाता यांना**

व त्यानंतर कार्योत्तर मान्यतेव्दारे मा.त्रिसदस्य समितीचे दि.07/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 667 मध्ये, उपरोक्त अधिकाऱ्याव्यतिरिक्त खालील पदनामाचे

**1) उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी.**

**2) उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी.**

**3) पोलीस निरिक्षक, वाहतूक शाखा, शिर्डी पोलीस स्टेशन**

**4) पोलीस निरिक्षक, साई मंदिर सुरक्षा**

**5) राज्य गुप्तवार्ता अधिकारी**

अधिकाऱ्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे होणारा विद्युतआकार संस्थानकडे जमा करणेचे अटीवर निवासव्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तसेच त्यांची इतरत्र बदली झाल्यास त्यांचेकडून त्वरीत संस्थान निवासस्थान खाली करुन घेणेचे अटीवर उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

(क) मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना परवानाधारक तत्वाने तात्पुरते निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमप्रमाणे विद्युतआकार संस्थानकडे नियमित जमा होत आहे. तथापी, श्री संजय भा.काळे यांनी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिका क्रं.25/2012 मधील 'श्री साईबाबा संस्थान निवासस्थानाचा गैरवापर' या मुद्याबाबतचा शासनाच्या दि.28/10/2013 रोजीच्या पत्रानुसार अद्यापि कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब याचिकाकर्त्याने मा उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणुन याप्रकरणी न्यायालयाचे चौकशी करण्याची त्यांनी विनंती केली होती त्यावर मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश यांचे मार्फत चौकशीचे आदेश देऊन याचिका खारीज केलेली आहे. याप्रकरणी वास्तविक शासनाच्या आदेशानुसार वेळीच कार्यवाही अथवा या प्रकरणी संस्थानाच्या भूमिकेच्या अनुशगाने शासनास याबाबत पुनर्विचाराबाबत विनंती करणे अथवा कलम 17 (3) अंतर्गत प्रस्ताव शासनास कार्योत्तर मान्यता घेणे आवश्यक आहे.

(ड) संस्थान अधिनियम, 2004 कलम 17 'समितीची कर्तव्य व अधिकार' या शिर्षाखाली पोटकलम (3) मध्ये-
*"...विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही "*अशी तरतूद आहे.

याचाच अर्थ, वर नमुद केलेल्या प्रयोजनासाठी संस्थान व्यवस्थापन शासनाच्या पूर्वमंजूरीने केवळ वापर तत्वावर अशा प्रकारे तात्पुरती निवासस्थाने संबधीताच्या अत्यावश्यक सेवा व गरज लक्षात घेऊन, तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन देऊशकते.

तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीने व तद्नंतरचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, वेळोवेळी सध्या खालील शासकीय अधिकाऱ्यांना संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत.

| अ.क्रं | अधिकारी / कर्म. नाव | पदनाम | दिलेले निवासस्थान | तारीख |
|---|---|---|---|---|
| 01. | श्री कुंदनकुमार सोनवणे | उपविभागीय अधिकारी | साईसहवास 01/01 | 12/06/2014. |
| 02. | श्री विवेक पाटील | उपविभा.पोलीं.अधि | साईसहवास 04/04 | 02/11/2012. |
| 03. | श्री सुभाष एकनाथ दळवी | तहसिलदार, राहाता | साईसहवास 02/01 | 25/03/2014. |
| 04. | श्री धैर्यशिल रामदास जाधव | मुख्याधिकारी,नगरपंचायत | साईसहवास 03/03 | 08/11/2013. |
| 05. | श्री संपत ज्ञानोबा भोसले | पोलीस निरिक्षक | साईसहवास 01/05 | 10/10/2013. |
| 06. | श्री दत्तात्रय पुंडलीक पवार | पोलीस निरिक्षक | साईसहवास 03/06 | 20/07/2011. |
| 07. | श्री निलेश जगनाथ लहामगे | राज्य गुप्तवार्ता उपअधिकारी. | साईध्यान 02/37 | 16/01/2013. |
| 08. | श्री रमेश चद्रभान बोरुडे | पोलीस कॉन्स्टेबल | साईध्यान 02/40 | 21/07/2005 |

संस्थान अधिनियम 2004 कलम 17 (3) नुसार उपरोक्त शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देतेवेळी शासनाची पूर्व मुजरी अथवा कार्योत्तर मजुर घेणेत आलेली नाही. उपरोक्त पैकी अ.नं.05 चे अधिकारी श्री संपत ज्ञानोबा भोसले, पोलीस निरिक्षक यांना 11 महिन्याचे कराराने निवासस्थान उपलब्ध करुन देणेत आलेले आहे व इतर अधिकाऱ्यांना त्यांची सदर पदावरुन शिर्डी येथून इतरत्र बदली होईपावेतो निवासस्थान उपलब्ध करुन देणेत आलेले आहे.

(इ) मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना परवानाधारक तत्वाने तात्पुरते निवासासाठी संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेत आलेली आहे त्यांचेकडून त्यांना शासनाकडून मिळत असलेला प्रतिमहा घरभाडे भत्ता व नियमाप्रमाणे विद्युतआकार संस्थानकडे नियमित जमा होत आहे. त्यामुळे संस्थानचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी व तहसिलदार, राहाता यांनी शासनाकडून कार्यकारी अधिकारी व उपकार्यकारी अधिकारी या पदांवर नियुक्ती झालेल्या नसतांना मध्यंतरीचे काळात या पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळलेला आहे

तरी संस्थान अधिनियम 2004 कलम 17 (3) नुसार उपरोक्त शासकीय कर्मचाऱ्यांना उपलब्ध करुन देणेत आलेल्या निवासस्थानास शासनाची परवानगी मिळणेकरीता कार्योत्तर मान्यतेसाठी विनंती प्रस्ताव सादर करणेस अथवा मा. शासनाचे दि.28/10/2013 रोजीचे पत्रातील शासनाच्या उक्त निर्देशानुसार तसेच मा.उच्च न्यायालयाच्या उपस्थित भूमिकेच्या पार्श्वभूमीवर शासकीय-कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवासासाठी उपलब्ध करुन देणेत आलेली निवासस्थाने संबंधीतांकडून तात्काळ रिक्त करुन घेणे सदर्भात निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अधिकारी/ कर्मचारी वगळता इतर शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना तात्पुरते निवासासाठी देणेत आलेली निवासस्थाने देण्यामागील पार्श्वभूमी नमूद करुन दि.२८.१०.२०१३ रोजीचे पत्रान्वये शासनाने दिलेल्या आदेशाचा पुनर्विचार व्हावा व शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना तात्पुरते देण्यात आलेल्या निवासस्थानास शासनाची परवानगी/ मान्यता मिळणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना लेखी पत्राद्वारे कळविणेत यावे, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)**

**विषय नं.१०** **मंजुर आकृतीबंधानुसार विविध तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची रिक्त पदे सरळसेवेने भरणेकामी जाहीरातीनुसार आलेल्या अर्जाची पडताळणी करुन पात्र उमेदवारांच्या परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मंजुर आकृतीबंधानुसार रिक्त कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा), मेकॅनिकल अभियंता, आय.टी मॅनेजर, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर व मॅनेजर (प्रसादालय) इत्यादी तांत्रिक / अतांत्रिक पदे सरळसेवेने भरणेकामी मा.त्रिसदस्य समिती दि.08/01/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र.75 व मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खडपीठात सदरची पदे सरळसेवेने भरणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.8846/2014 ईन पीआयएल 18/2011 नुसार मान्यता मिळालेली आहे. त्याप्रमाणे सदरची पदे सरळसेवेने भरणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर तसेच दिव्य मराठी दि.4/11/2014, ईपेपर दि.3/11/2014, सामना दि.03/11/2014 व पुण्य नगरी दि.01/11/2014 इत्यादी विविध वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन दि.15/11/2014 अखेर विहीत शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता तसेच संबंधीत कामाचा अनुभव असलेल्या उमेदवाराचे अर्ज मागविण्यात आलेले आहेत. आलेल्या अर्जांची पदनिहाय संख्याची माहिती खालीलप्रमाणे -

| अ. नं. | पदनाम | मुदतीत आलेले अर्ज (दि.15/11/2014 अखेर) | मुदतीनंतर आलेले अर्ज (दि.15/11/2014 नंतर) |
|---|---|---|---|
| 01 | कार्यकारी अभियंता (Executive Engineer) | 22 | 01 |
| 02 | उप कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) (Dy.Executive Engineer) | 11 | 00 |
| 03 | यांत्रिकी अभियंता (Mechanical Engineer) | 42 | 04 |
| 04 | माहिती तंत्रज्ञान व्यवस्थापक (I.T.Manager) | 73 | 00 |
| 05 | इलेक्ट्रॉनिक्स अभियंता (ध्वनिक्षेपन व टेलीफोन) (Electronics Engineer) | 39 | 02 |
| 06 | व्यवस्थापक (प्रसादालय) Manager (Prasadalay) | 42 | 06 |
| | एकूण - | **229** | **13** |

वरीलप्रमाणे आलेल्या अर्जांची पदानुसार तपशिलवार प्राथमिक माहिती संगणकावर फिडींग करण्यात आलेली असून पदनिहाय तक्ते सोबत माहितीसाठी सादर केले आहेत.

**ब)** जाहीरातीनुसार अर्जासोबत उमेदवारानी जोडलेल्या शैक्षणिक व व्यवसायिक पात्रता प्रमाणपत्रांची तसेच संबंधीत कामाचा अनुभव याबाबत पडताळणी करुन पात्र/अपात्र उमेदवार निश्चिती करुन परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेकामी व तज्ञ सेवा देणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे यांना सदरचे कामासाठी जा.न.एसएसएस/वशी-01/4334/2014 दि.11/12/2014 अन्वये प्रस्ताव सादर करणेबाबत विनंती करणेत आली होती. कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी No GCOEP/AMD/Consult. /BGB/2014/email, date: 19/12/2014 नुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे

**Part I: Scope of the work**

1) Total number of post to be filled = 06
2) Name of the posts:-
   (i) Executive Engineer (Civil) - 01,
   (ii) Dy. Executive Engineer (water supply) - 01,
   (iii) Mechanical Engineer - 01,
   (iv) IT Manager - 01,
   (v) Electronic Engineer (Sound & Tel.) - 01
   (vi) Manager (Prasadalay) - 01
3) Total number of application received = 242
4) Checking the roster approval and number of sanctioned post.
5) Review of all received application and checking the eligibility.
6) Number of applications are high (242), a screening test will be conducted for 100 marks. It will be informed to all candidates and with minimum score required for getting eligible to interview as decided by the expert committee, short listing of all candidates will be done.
7) Interviews will be conducted for short listed candidates by the expert committee of the institute.
8) Selection committee report and a list of the selected candidates based on merit will be recommended for the appointment.

**Part II: Time Schedule**

To complete the process of selection, maximum 30 days will require after confirmation of the process.

**Part III: Honorarium for the Process**

Based on scope of the work as described above the total honorarium is worked out. It would be Rs.500 / application received The total amount is 500 x 242 = 1,21,000/- plus service tax 12.36%

The payment should be made in advance in the form of demand draft drawn in favour of "Director, College of Engineering, Pune"

Any change in tax structure governed by the goverment is applicable from time to time and liable to pay accordingly.

मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यांनी वरीलप्रमाणे आलेल्या अर्जांची पडताळणी करुन पात्र उमेदवारांची 100 गुणांची लेखी परिक्षा घेऊन Merit नुसार मुलाखतीचे आयोजन करणेचे काम 30 दिवसाचे कालावधीत पूर्ण करणार आहेत. त्याकामी त्यांनी प्रति अर्ज रु. 500 x 242 = 1,21,000/- (एक लाख एकवीस हजार मात्र) + सेवाकर अतिरिक्त इतके अगाऊ मानधनाची मागणी केलेली आहे

क)तसेच महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे यांना जा नं.एसएसएस/वशी-01/4734/2014 दि 29/12/2014 रोजीचे पत्रान्वये उमेदवाराच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता प्रमाणपत्राची तसेच संबंधीत कामाचा अनुभव याबाबत पडताळणी करुन पात्र/अपात्र उमेदवार निश्चिती करुन परिक्षेचे तसेच मुलाखतीचे आयोजन करणेकामी व तज्ञ सेवा देणेकामी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यांनी दि.05 जानेवारी, 2015 अन्वये खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे.

Services Offered :-

1.1 Nos.229 applications have been received by the SSST.

1.2 To identify examination centers to conduct online exam for various posts

1.3 To allocate examination centers and seat numbers of exam to the candidates.

1.4 To make available to SSST admit cards of the candidates.

1.5 To design, set and deploy required quantity of questions in online examination framework for online exam and conduct online exam at the identified centers.

1.6 To provide Merit list based on the logic provided by department.

Financial Terms :-

MKCL shall charge Rs 3,35,000 (Rupees Three Lakh Thirty Five Thousand Only) plus applicable taxes to Shri Saibaba Sansthan Trust for the services offered as mentioned above.

वरीलप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे याचे उपरोक्त प्रस्तावानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता प्रमाणपत्रांची कोणत्याही प्रकारची पडताळणी करणार नाहीत, पात्र/अपात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्राथमिक अहवाल सादर करणार नाहीत. त्याऐवजी ते फक्त एकूण अर्जदारांची ते ऑनलाईन परिक्षा आयोजित करुन संस्थानला गुणक्रमांकाची यादी सादर करणार आहेत ते मुलाखतीचे वेळी हजर रहाणार नाहीत त्यांनी फक्त उमेदवारांच्या ऑनलाईन परिक्षेच्या कामापोटी रु 3,35,000/- + सेवा कर अतिरिक्त इतके मानधनाची मागणी केलेली आहे.

तरी, उपरोक्त 'अ' मध्ये नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखाची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांची पडताळणी करणे, पात्र उमेदवारांची 100 गुणांची लेखी परिक्षा घेऊन Merit नुसार मुलाखतीचे आयोजन करणेकामी उपरोक्त 'ब' मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यानी सदरचे कामासाठी सादर केलेला प्रस्ताव व 'क' महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करता असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादीत, पुणे हे फक्त उमेदवाराच्या ऑनलाईन परिक्षा घेऊन मेरीट (Merit) यादी संस्थानला सादर करणार आहेत. सदरचे कामासाठी त्यांनी रु.3,35,000/- + सेवा कर अतिरिक्त इतके मानधनाची मागणी केलेली आहे.

तसेच मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे यानी कमीत कमी मानधनात 30 दिवसाचे कालावधीत आलेल्या अर्जांची पडताळणी करुन 100 गुणांची लेखी परिक्षा घेऊन नंतर मुलाखतीचे आयोजन करणार आहेत. त्यांनी सदरचे कामासाठी प्रति अर्ज रुपये 500 x 242 = 1,21,000 + सेवाकर अतिरिक्त इतके आगाऊ मानधन Director, College of Engineering, Pune या नांवे अदा करणेची मागणी केलेली आहे. तथापि, याबाबत संबंधीतांशी चर्चा करुन निर्णय घेता येईल, असे मत आहे.

वरील प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तांत्रिक/अतांत्रिक स्वरुपाची सहा रिक्त पदे भरणेची कार्यवाही पारदर्शकपणे होणेकामी मा संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे अथवा महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे या दोन संस्थेपैकी एका संस्थेची सल्लागार तथा तज्ञ सेवा घेणेस व याकामी येणाऱ्या आवश्यक त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०** यावर सविस्तर चर्चा होऊन, मजुर आकृतीबंधानुसार विविध तांत्रिक/अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांची पडताळणी करणे. पात्र उमेदवारांची 100 गुणांची लेखी परिक्षा घेऊन Merit नुसार मुलाखतीचे आयोजन करणेकामी मा.संचालक, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, शिवाजीनगर, पुणे यांचा प्रस्ताव स्वीकारणेत येऊन याकामी येणा-या रक्कम रु.१,२१,०००/- + सेवाकर मात्र आगाऊ मानधन त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. असे ठरले.

(कार्यवाही- प्र अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.११** **श्री रामनवमी उत्सव- २०१५ चे कार्यक्रमांचे नियोजनासह उत्सव साजरा करणेसाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२०१४ मध्ये क्र १७ अन्वये उत्सव साजरा करणेबाबत तरतुद आहे. श्री रामनवमी उत्सव-२०१५ सालाबादाप्रमाणे या वर्षी शुक्रवार दि.२७ मार्च २०१५ ते रविवार दि.२९मार्च २०१५ अखेर तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

श्री रामनवमी उत्सव २०१५ अनुषगाने संस्थानचे विविध विभागामार्फत खालीलप्रमाणे कामे केली जातात. संस्थानचे भक्तमंडळ सभासदांना निमत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणे, मदीरात धार्मिक विधीचे, पारायणायचे आयोजन करणे,रथ, पालखी याचे मिरवणूकीचे आयोजन करणे. उत्सव काळात निमत्रित कलाकारांचे कार्यक्रम कीर्तन कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदीर परीसरात विदधुत रोषणाई करणे, देखावे तयार केले जातात. मंदीर व मदीर परीसरात फुलांची सजावट करण्यात येते. उत्सवानिमित्ताने येणारे पदयात्री, साईभक्त यांची प्रसाद (भोजन) व्यवस्था, निवासव्यवस्था, चहा, कॉफी, दुध व्यवस्था, दर्शनरागतून बुंदीप्रसाद वाटप करण्यात येते. लाडू प्रसाद विक्री करण्यात येतो. दर्शन रागेवर उन्हाळी मडप टाकणे, सस्थान परिसरात आवश्यकतेनुसार मडप टाकण्यात येतात.

श्री रामनवमी उत्सवात साईभक्त, ग्रामस्थ गोदावरी नदीचे पवित्र जल (पाणी) घेऊन येतात. या उत्सवासाठी मोठया प्रमाणात पदयात्री, पालख्या येतात. पालख्यांची पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

श्री रामनवमी उत्सव साजरा करणेसाठी संस्थानचे विविध विभागामार्फत साईभक्ताना विनाविलंब दर्शन, प्रसाद, निवासव्यवस्था उपलब्ध करण्यात येतात.श्री राम`वमी उत्सव साजरा करणेसाठी करावयाचे नियोजनासाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील/ बाब | विभाग | श्री रामनवमी उत्सव २०१४ | | श्री रामनवमी उत्सव २०१५ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप कमानी स्टेज | बांधकाम | ७९६४७४ | ४३५०५८ | ८३६४१० |
| २ | कलाकार बिदागी- कीर्तनकारासह | मंदीर | १७०००० | ४९६४२ | ५६७६०० |
| ३ | भक्ताना मिष्टान्न मजुरीसह | प्रसादालय | ५४१८७९ | ५१३४७२ | ८००८९९ |
| ४ | विद्युत रोषणाई | विदयुत | १०००००० | ९०१२८८ | १०००००० |
| ५ | निमत्रण पत्रिका, पोष्टेज, उदीप्रसादासह, जाहिरात, बॅनर | वशी-५,८,१२ | १०००००० | ९४१८०३ | १२००००० |
| ६ | जादा कामगार | कामगार | २५०००० | २१२५५६ | ३००००० |
| ७ | पालख्या,पिण्याचे पाणी इ. | पाणीपुरवठा | ५९०००० | १८४३६७ | ६००००० |
| ८ | कुस्ती हगामा | | ७००००० | ६४९६०० | ७००००० |
| ९ | इतर खर्च | | ५१६४७ | १५३९० | ५००९१ |
| | एकुण | | ५१००००० | ३९०३१७६ | ६०५५००० |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे श्री रामनवमी उत्सव- २०१५ साजरा करणेस तसेच याकामी आवश्यक ते नियोजन करुन कार्यवाही करणेस आणि या उत्सवासाठी वर तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार येणारे अदाजे रक्कम रु.६०,५५,०००/- (अक्षरी रुपये. साठ लाख पचावन्न हजार) मात्र खर्चास मान्यता मान्यता मिळणेसाठी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव- २०१५ चे कार्यक्रमांचे नियोजनासह उत्सव साजरा करणेकामी प्रस्तावीत कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.६०,५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. कलाकाराचे बाबतीत विनामोबदला सेवा देणारे कलाकार मिळणेसाठी मा.त्रिसदस्य समितीच्या पूर्वीच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.**

**तसेच, याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खडपीठाची मान्यता घेण्यात यावी. असे ठरले.**

(कार्यवाही-सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी विभाग)

---

**विषय नं.१२** **प्रवेशद्वार क्र.०१ पुर्ववत सुरु करणे व गावकरी गेट दर्शनासाठी सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी व्ही.आय.पी.भक्तांसाठी गेट न.01 बंद करुन, गेट नं.02 ने मंदिर परिसरामध्ये प्रवेश देणेबाबत सुचविले आहे. म्हणून त्या संदर्भात मा.व्यवस्थापन समितीचे दि.28/08/2014 रोजीचे सभेमध्ये निर्णयास्तव प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.738 अनुसार "याबाबत समक्ष पाहणी करुन निर्णय घेण्यात येईल असे ठरले. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.28/08/2014 निर्णय क्र.738 नुसार मा.अध्यक्ष महोदय, मा.जिल्हाधिकारी सो., मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उपकार्यकारी अधिकारी सो., यांनी दि.02/09/2014 रोजी समक्ष पाहणी केली. व पाहणी अंती व्ही.आय.पी भक्तासाठी गेट नं.01 बंद करुन गेट नं.02 ने मंदिर परिसरामध्ये भक्तांना प्रवेश देण्याचे ठरले. त्याप्रमाणे दि.01/12/2014 पासून व्ही.आय.पी.भक्तांसाठी गेट न.01 बंद करुन गेट नं.02 ने मंदिर परिसरामध्ये भक्ताना प्रवेश देण्याचे सुरु करणेत आले आहे. तसे मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी व मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना अनुक्रमे जा.क्र.एसएसएस/वशी-संरक्षण/4157/2014 व 4158/2014 दि.02/12/2014 रोजीचे पत्रान्वये लेखी कळविणेत आलेले आहे.

दि.10/10/2013 रोजी मा.श्री. अमिताभ राजन सो., गृह अप्र मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली साई मंदीर सुरक्षेबाबत सभा झाली असता त्यांनी सभेमध्ये गांवकरी गेटवर आयकार्ड बघूनच मदीरात ग्रामस्थांना प्रवेश देण्यात यावा असे सुचविलेले आहे. तसेच दिनांक 18/09/2014 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, शिर्डी याचे कार्यालयात गांवकरी यांचे समवेत गांवकरी दर्शन व्यवस्थेबाबत तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे समवेत चर्चा झाली होती. सदर चर्चेमध्ये गांवकरी गेटबाबत झालेल्या निर्णयानुसार गुरुवार दि.18/09/2014 पासून अभिषेक गेट (गांवकरी गेट) बंद करुन समाधी मंदिराचे नंदी गेट हे "गावकरी गेट" म्हणून शिर्डी ग्रामस्थांचे दर्शनासाठी सुरु करणेत आले. सदर नंदी गेट येथील कर्तव्यावरील पहारेकरी/ सुरक्षा रक्षक यांचे मार्फत ग्रामस्थाचे ओळखपत्र तपासुन, त्यांची रजिस्टरवर नोंद करुन, ग्रामस्थांना मंदिरात दर्शनास सोडण्यास दि.18/09/2014 पासुन सुरुवात करणेत आली आहे.

त्यानंतर दि.08/12/2014 रोजी श्री अभय शेळके व इतर 24 ग्रामस्थानी गेट नं.01 पुर्ववत सुरु करणेबाबत व शिर्डी ग्रामस्थ व त्याचे नातेवाईक हयांना दर्शन व आरतीसाठी सन्मानाने नांव व सही न घेता नंदी गेटने सोडवावे याबाबत मा.कार्यकारी अधिकारी सो. यांना समक्ष भेट घेवून निवेदन दिले. सदर निवेदनामध्ये त्यांनी "नगर-मनमाड मार्गावरील प्रवेशद्वार क्रमांक 1 बंद करण्याचा निर्णय घेऊन गेल्या शेकडो वर्षांची परंपरा मोडण्याचे काम आपण करत आहात. त्याचा आम्ही तिव्र निषेध व्यक्त करीत आहोत. येत्या दोन दिवसात प्रवेशद्वार क्रमांक एक पूर्ववत सुरु केले नाही तर शिर्डी ग्रामस्थ ते सुरु करतील याची नोंद घ्यावी.

आपण आल्यावर आम्हाला आपल्याकडून मोठ्या कामाची अपेक्षा होती. मात्र ती सपशेल फेल ठरली. साईबाबा आमचे आहेत, होते आणि यापुढेही राहतील. आमच्या दैवताचे दर्शन घेण्याचा अधिकार आपण कसा काढून घेऊ शकता हा प्रश्न आहे. गावकरी गेटवर सुरक्षा कर्मचा-याकडून ग्रामस्थांची कुचंबना सातत्याने केली जात आहे. शिर्डीतील ग्रामस्थांचे कुणी नातेवाईक अथवा मुली माहेरी आल्यावर त्याना साईबाबांचे दर्शन घेता आले नाही. साईंच्या दर्शनाविनाच आमच्या मुली सासरी परत गेल्या याचे दुःख आम्हाला आहे. यापुढे गांवकरी गेटवर शिर्डी आणि परिसरातील लोकांना थेट दर्शन कोणत्याही अडकाठीशिवाय झाले पाहिजे असे नियोजन आपण करावे. सुरक्षेच्या कारणास्तव 1 नंबर प्रवेशद्वार बंद करण्याचे आपण सागता, तथापी साई भक्त व ग्रामस्थांकडून मंदिराला कोणताही धोका नाही. एक नंबर प्रवेशद्वारा समोर उभी राहत असलेली वाहने हा खरा कळीचा मुद्दा आहे. त्या वाहनांवर पोलीस प्रशासनाचे योग्य ती कार्यवाही करावी त्याबाबत आमचे दुमत नाही. मात्र त्यासाठी प्रवेशद्वार बंद करणे हा प्रकार अन्यायकारक आहे." असे म्हटलेले आहे.

यावेळी समक्ष चर्चा होऊन गेट न.01 चालू करणे व गावकरी गेट याबाबत तोडगा काढणेसाठी शिर्डी ग्रामस्थ यांची 7 ते 8 लोकांची एक समिती नेमून त्या समितीची मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे सोबत बैठक घ्यावी व बैठकीमध्ये जे निर्णय होतील त्या निर्णयाबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे चर्चेअंती ठरले. त्यानुसार दि.08/12/2014 रोजी "खालील 09 ग्रामस्थांची समिती" स्थापन केल्याचे निवेदन देणेसाठी आलेल्या गावक-यामार्फत सांगण्यात आले.

1) मा.श्री कैलासबापु कोते पा.
2) मा.श्री अभय शेळके पा
3) मा.श्री सुधाकर शिंदे पा.
4) मा.श्री प्रमोद गोंदकर पा
5) मा श्री गोपीनाथ गोंदकर पा.
6) मा.श्री पतिंगराव शेळके पा.
7) मा.श्री राजेंद्र शिंदे पा.
8) मा श्री दत्तात्रय शि. कोते पा.
9) मा.श्री नितीन शेळके पा.

दि.09/12/2014 रोजी सकाळी 10.00 वाजता उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षामध्ये उपकार्यकारी अधिकारी सो व प्रशासकीय अधिकारी श्री गमे सो. व संरक्षण अधिकारी श्री पाटणी सो. यांचे सोबत उपरोक्त समिती सदस्य व त्या व्यतिरीक्त इतर 1) श्री तारानंद कोते 2) श्री सचिन तांबे ग्रामस्थ सभेकामी हजर राहीले होते. सभेमध्ये प्रामुख्याने

खालील विषयांवर सविस्तर चर्चा झाली व त्याबाबत संस्थान प्रशासनाने निर्णय घ्यावा असे ठरले. सदर सभेमध्ये खालील प्रमाणे मागण्या शिर्डी ग्रामस्थामार्फत करणेत आलेल्या आहेत.

| अ.नं. | गावक-यांनी मागणी केलेल्या मुद्याचा तपशिल | उपकार्यकारी अधिकारी/ प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्राय | संरक्षण अधिकारी यांचे अभिप्राय. |
|---|---|---|---|
| 01. | समाधी मंदीरामध्ये सध्या गर्दीचे वेळी समाधीचे तिन बाजूने काचा लावल्या जातात. त्यामुळे साईभक्ताना समाधीस हात लावता येत नाही. तरी समाधीस काचा/ जाळया लावण्याची पध्दत बंद करण्यात यावी. | मा.व्यवस्थापन समिती दि.21/11/2010 चे सभेमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.16 वरिल निर्णय क्र.951 नुसार समाधी मंदीरात गर्दीचे वेळेस काच लावणेबाबत परिस्थीतीनुरुप मंदिर प्रमुख यांनी निर्णय घ्यावा असा निर्णय झालेला आहे. | काचा/ जाळी नसेल तर भक्त जादा वेळ समाधीवर डोके टेकून दर्शन घेण्याचा प्रयत्न करतात. काचा किंवा जाळया काढून घेण्यामुळे गर्दी निघणार नाही. त्यामुळे गर्दीचे प्रमाणानुसार काचा/ जाळया लावणे आवश्यक आहे. |
| 02. | सध्या समाधी मंदीरातील चार दर्शन रांगे पैकी बाहेरील बाजूच्या 02 दर्शन रांगा सरळ मागे निघतात व दोन आतील बाजूच्या दर्शन रांगा पुन्हा यु टर्न घेवून मागे येतात ही पध्दत बंद करण्यात यावी. व त्या ऐवजी समाधी मंदीरात दोन्ही बाजूने दोन दर्शन रांगा चालू ठेवून त्या तशाच पुढे काढण्यात याव्यात व गांवकरी यांना नंदी गेटमधून समाधीचे समोरील परिसरातून श्रीं चे दर्शनासाठी सन्मानाने सोडण्यात यावे. समाधीचे समोरील परिसर पुर्णतः मोकळा ठेवण्यात यावा. | गावक-याचे सदर सुचनेबाबत विचार करता येईल. | गांवक-यानी मागणी केल्या प्रमाणे चारही दर्शन रांगा पाठीमागे काढणे योग्य राहील. उत्तर बाजूकडील दोन दर्शन रांगा नारळी गेटने बाहेर काढता येतील व दक्षिण बाजूकडील दोन दर्शन रांगा गुरुस्थान गेटने बाहेर काढता येतील. असे केल्यामुळे मधिल पॅसेज मधून अंध भक्त, व्हील चेअरवरुन येणारे अपंग, सिनीयर सिटीझन, शिर्डी ग्रामस्थ, यांना दर्शन द्यावे असे वाटते. ज्या गांवक-यांनी साईबाबा संस्थानकरीता काही विशेष योगदान दिले आहे अथवा 50 वर्षापुर्वीचे ग्रामस्थांचाच यामध्ये समावेश असावा. |
| 03. | तिरुपती प्रमाणे शिर्डी येथेही ब्रेक दर्शनाची सुविधा सुरु करण्यात यावी. | मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी ग्रामस्थानी मांडलेली मागणी व्यवस्थापन समितीपुढे सादर करुन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले. | VIP व VVIP, ग्रामस्थ, वयोवृध्द, अंध-अपंग, यांचेसाठी ब्रेक दर्शन पध्दत सुरु करता येईल. दोन्ही बाजूला दोन दर्शन रांगा आहेत. त्या पुर्वीप्रमाणे चालू ठेवाव्या लागतील. त्याकरीता तीनही बाजूने काचा लावाव्या लागतील. अन्यथा दर्शनरांग निघणार नाही. गोंधळ निर्माण होईल. |
| 04. | शिर्डी ग्रामस्थ याचे सोबत रक्ताचे नात्यातील नातेवाईक यांना गांवकरी गेटनेच विनापास दर्शनास सोडणेत यावे. जनसंपर्क कार्यालयाकडून पासवर शिक्का मारुन आणणेची पध्दत बंद करणेत यावी. | शिर्डी ग्रामस्थ यांचे सोबत रक्ताचे नात्यातील नातेवाईक याना गांवकरी गेटने प्रवेश देणेबाबत व्यवस्थापन समिती पुढे विषय ठेवता येईल परंतू पाहुण्याना (VIP) गांवकरी गेटने सोडणेकामी पासवर शिक्का मारुन आणणे योग्य राहील पासवर शिक्का | शिर्डी ग्रामस्थ यांचे सोबत रक्ताचे नात्यातील नातेवाईक यांना गांवकरी गेटने विनापास दर्शनास सोडता येईल. परंतू ग्रामस्थांसोबत येणारे इतर पाहूने यांना पास घेवून त्यावर शिक्का मारण्याची पध्दत योग्य आहे ज्या पाहुण्याच्या पासवर शिक्का नसेल त्यांना शनिगेटने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मारण्यासाठी जनसंपर्क कार्यालयातील अजुन 02 कर्मचा-यांना अधिकार देता येईल. | प्रवेश देता येईल. पेड पासचे दिवशी तसेच आरतीकरीता फक्त शिर्डी ग्रामस्थाना सोडता येईल रक्ताचे नात्यातील पाहुण्यांना विना पास सोडणेबाबत व्यवस्थापन समितीपुढे निर्णय होणे आवश्यक आहे. |
| 05. | शिर्डी ग्रामस्थ यांना सध्या रेशन कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसन पाहून दर्शनासाठी सोडण्यात येते. परंतू त्यामुळे सदर कार्डच्या डयुप्लीकेट कॉपी करुन बनावट ओळखपत्र तयार करुन काही लोक शिर्डीतील ग्रामस्थ असल्याचे सांगतात. त्यास आळा बसणेसाठी यापुढे फक्त रेशनकार्ड (निवडणुक ओळखपत्र) पाहूनच ग्रामस्थाना दर्शनासाठी सोडण्यात यावे. त्यांची नावे रजिस्टरमध्ये लिहून घेवू नये. | रेशनकार्ड पाहून ग्रामस्थांना प्रवेश देता येईल रजिस्टरमध्ये नांव नोंदणी करणे ऐवजी बायोमेट्रीक प्रणालीचा वापर करुन थंब इम्प्रेशन सिस्टीम वापरुन गावक-याचे हाताचे ठसे व फोटो घेवून त्याना प्रवेश देणेबाबत विचार करता येईल. | शिर्डी ग्रामस्थांचे रेशन कार्ड पाहून त्यांना गांवकरी गेटने दर्शनासाठी सोडता येईल. रजिस्टरमध्ये नांव नोंदणी करण्याची पध्दत योग्यच आहे असे वाटते. |
| 06. | गेट नं.01 पुन्हा सुरु करणेत यावे. तथापी सदर गेटमधून भक्तांना दर्शनासाठी सोडू नये | पोलिस विभागाचे सुचनेवरुन गेट नं.01 बंद करणेबाबत त्रिसदस्य समितीने ठराव केलेला आहे. वाहतुक व सुरक्षिततेचे दृष्टीने निर्णय झालेला आहे. | पोलिस विभागाचा अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करावी असे वाटते |
| 07. | जनसंपर्क कार्यालयामध्ये गावक-यासाठी स्वतत्र गेट तयार करण्यात यावे. तसेच गांवकरी यांनी पास घेतल्यानंतर त्यांना नंदी गेटने सोडण्यात यावे. पासवर शिक्का मारण्याचे बंधन नको. | गांवक-यांनी जनसंपर्क कार्यालयामध्ये जाणेची आवश्यकता नाही. त्यांचे पाहुणे आल्यास त्यानी जनसंपर्क कार्यालयात फोन करुन सागावे. व पाहुण्याना जनसंपर्क कार्यालयात पाठवावे. जर ग्रामस्थांचे कोणी व्ही.आय.पी पाहुणे असेल तर त्यांनी पासवर शिक्का मारुन घ्यावा. | जनसपर्क कार्यालया मार्फत ग्रामस्थांचे नातेवाईकांना थेट पास देता येईल. परंतू पासवर शिक्का मारण्याची पध्दत योग्यच आहे. त्यामुळे अति महत्वाचे व्ही.आय.पी. यांना व्हेरीफिकेशन करुन गांवकरी गेटने प्रवेश दिला जातो. कुणीही गावकरी गेटने विना शिक्का पासधारकास सोडणे बाबत हट्ट धरु शकणार नाही. |
| 08. | द्वारकामाई मंदीरामध्ये लावलेल्या रिलींग काढून घेण्यात याव्यात. व पुर्वीप्रमाणे सर्व ग्रामस्थ व साईभक्तांना द्वारकामाईमध्ये धुनी, धान्याचे पोते, श्री चा फोटो याचे दर्शन घेणेसाठी परवानगी देण्यात यावी. श्री बाबासाहेब गायकवाड ही व्यक्ती द्वारकामाईत पुजा अर्चा करते ते बंद करणेत यावे. | प्रत्यक्ष पहाणी करुन रिलींग काढणेबाबत निर्णय घेणे योग्य राहील. द्वारकामाई मध्ये संस्थान पुजारी व्यतिरीक्त इतर कुणासही पुजा अर्चा करणेसाठी परवानगी दिलेली नाही. संस्थान पुजारी / अथवा कर्मचा-यांमार्फत ही कामे केली जातात. त्यामुळे इतर व्यक्तींनी पुजा अर्चा करुन नये असे मत आहे. | पुर्वी कमी गर्दीचे कालावधी मध्ये थेट द्वारकामाई मंदीरामध्ये साईभक्तांना प्रवेश देण्यात येत होता. परंतु गर्दीचे काळात द्वारकामाईची मंदीराची लाईन जादा बाहेर जात असल्याने मंदीर विभागामार्फत द्वारकामाई मंदीरामध्ये आत प्रवेश बंद केलेला आहे. द्वारकामाई मंदीरामध्ये सेवेक-यामार्फत जी कामे करुन घेतली जातात, ती पध्दत बंद करुन संस्थान कर्मचा-यांकडूनच सदर कामे करुन घेण्यात यावी म्हणजे तक्रारी येणार नाहीत. |
| 09. | गांवकरी गेटवर गावकरी याना ओळखतील अशा स्थानीक सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात यावी. जेणेकरुन तेथे वाद होणार नाहीत | स्थानीक सुरक्षा रक्षकांची नेमणूक करता येईल. | सध्या सरंक्षण विभागाकडे स्थानीक सुरक्षा रक्षकांची संख्या कमी आहे. आस्थापना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | विभागामार्फत स्थानीक सुरक्षा रक्षक मिळाल्यास त्यांची गांवकरी गेटवर नियुक्ती करता येईल. त्यामुळे गांवकरी गेटवर वाद होणार नाहीत. |
| 10. | निवडणुक मतदार यादीतील शिर्डीचे पुर्वीचे मुळ गांवकरी यांची स्वतत्र यादी तयार करुन, त्याना दर्शनासाठी गावकरी गेटने सोडण्यात यावे. यामध्ये गोंदकर, कोते, जगताप, शेळके, शेजवळ, गायकवाड, इनामदार, शिंदे यांसारखे पुर्वीचे जे ग्रामस्थ असतील त्यांचा समावेश असावा. आत्ताच काही वर्षापुर्वी शिर्डीमध्ये स्थायीक झालेले व दुस-या गांवातील, तालुक्यातील, जिल्हयातील, अथवा प्रांतातील नागरीक यांचा समावेश सदर ग्रामस्थांचे यादीत करु नये. | गावकरी यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करता येईल. | पुर्वीची स्थानीक ग्रामस्थांची यादी संस्थानकडे उपलब्ध नाही. त्याकरीता जा.नं. एसएसएस/ वशि/ सरक्षण/ 3614/2014 दि.30/10/2014 ने कामगार तलाठी, शिर्डी याना पत्र देवून यादीची मागणी केलेली आहे. परंतू त्यांचेकडून अद्याप यादी मिळालेली नाही. कामगार तलाठी यांचेकडून यादी मिळाल्यास ती यादी पाहून ग्रामस्थांना दर्शनासाठी सोडण्यात येईल. |
| 11. | गांवकरी गेटवर बायोमेट्रीक प्रणालीचा वापर करुन थब इम्प्रेशन सिस्टीम (पंचींग) ग्रामस्थांना दर्शनास सोडणेकामी सुरु करण्यात यावी. जेणेकरुन दररोज कार्ड दाखविणे, नांव नोदणी करणे किवा सहया घेण्याचे काम रहाणार नाही. फक्त हाताचे ठस्यावरुन गांवकरी यांना मंदीरामध्ये प्रवेश देता येईल | सदर सुचने प्रमाणे कार्यवाही करता येईल | ग्रामस्थांकरीता बायोमेट्रीक थंब इम्प्रेशन सिस्टीम (पंचींग) सुरु करणे योग्य राहील. |

तरी गांवकरी यानी समक्ष भेटून उपरोक्त प्रमाणे केलेल्या मागण्याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, ग्रामस्थांच्या मागण्या व प्रवेशद्वार क्र.०१ पुर्ववत सुरु करणे या सर्व बाबींची समिती प्रत्यक्ष जागेवर पहाणी करेल व त्यानंतर याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे ठरले.**

**(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१३** **श्री साई समाधी मंदिरामध्ये हत्यारी पोलिस कर्मचारी नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.लखमी गौतम, पोलिस अधिक्षक याचे दि.18/12/2014 चे O.No.SP-A.Nagar/741/DSB चे मा.प्रमुख जिल्हा न्यायाधिश तथा अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना पाठविलेले संदर्भिय पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून सदरचे पत्रामध्ये त्यांनी नमूद केले आहे की, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांनी 946 सुरक्षा रक्षक वेगवेगळया प्रकारच्या सुरक्षा कंपन्यांकडून भाडेतत्वावर घेतलेले आहेत यापैकी कुठल्याही सुरक्षा रक्षकांजवळ आणिबाणीची परिस्थीती हाताळण्यासाठी हत्यार उपलब्ध नाही. येथे केवळ एक पोलिस सबइन्सेक्टर, जे.की. डेप्युटेशन वर असतात. तेच येथील सुरक्षेची व्यवस्था बघतात. आणि त्यांच्याजवळ एक हत्यार कुठल्याही दुर्देवी प्रसंगाचा सामना करण्यासाठी असते. जरी मंदिराच्या सर्व गेटवर बंदुकधारी सुरक्षा रक्षक असले तरी घटना घडलेल्या जागी पोहचण्यास विलंब होवू शकतो. अशा वेळेस हजारो भक्तांचे जिवन धोक्यात येवून त्यांची काळजी घेणारा कुणीही नसेल.

काही काळापुर्वी बौधगया आणी अक्षरधाम या धार्मिक स्थळावरती सशस्त्र हल्ले झालेले आहेत. संपुर्ण भारतातील लोक श्री साई बाबाना आदर करतात आणि दररोज एक लाख लोक येथे भेट देतात. गुरुवार, शनिवार, रविवार आणि काही इतर महत्वपुर्ण दिवशी येणा-यांची सख्या वाढून ती चार लाखापर्यंत पोहचते.

वरील बाबींचा विचार करुन एक सशक्त सुरक्षा व्यवस्थेसाठी मंदिरातील भक्त आणि साईबाबांच्या मुर्तीची काळजी घेण्यासाठी येथुन पुढे 1+3 सुरक्षा गार्ड यांची नियुक्ती मुर्तीच्या रक्षणासाठी आणी अदाजे 10 सुरक्षा रक्षक मुख्य दर्शन हॉलमध्ये नियुक्त केले जातील. सध्या शिर्डी मदिराच्या सुरक्षेसाठी एक पोलिस इन्सेक्टर, एक महीला पो.सब इन्सेक्टर, 46 पुरुष आणि 21 महीला नियुक्त आहेत. परंतू असे निदर्शनास आले आहे की, मंदिरात मुक्तपणे वावरु दिले जात नाही. मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, सुरक्षा हा एक प्रमुख भाग असून पोलिस कर्मचारी केवळ गेटवरच मर्यादीत केलेले आहेत. त्यामुळे सध्याच्या सुरक्षेची परिस्थीती फारच बिकट आहे.

वरील सर्व परिस्थीतीचा विचार करुन सुरक्षा आणि सुरक्षीतता चागल्या दर्जाची पुरविण्यासाठी मंदीर आणी भक्तांच्या सुरक्षिततेसाठी वरील बाबी 01 जानेवारी 2015 पासून अमलात आणण्यात येईल. तसेच मंदिराची सुरक्षा व्यवस्था बघण्यासाठी लोकल उपविभागीय पोलिस अधिकारी व पोलीस ठाणे प्रमुख मंदिर परिसरात मुक्तपणे वावरु शकतील. असे कळविले आहे.

त्यानुसार पोलिस विभागाने दि.31/12/2014 पासुन समाधी मंदीरामध्ये हत्यारी पोलिस कर्मचारी नेमणुक करण्यास सुरुवात केली आहे. मंदीरामध्ये हत्यारी पोलिस कर्मचारी नेमणूक न करणेबाबत साई मंदीर सुरक्षाचे पोलिस निरीक्षक श्री दत्ता पवार व शिर्डी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्री प्रमोद वाघ यांचेबरोबर चर्चा केली असता आम्हाला वरिष्ठांचे आदेश असुन आम्हाला त्या प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे आहे असे सांगितले. त्यानंतर प्र.मंदीर प्रमुख व प्र.संरक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी सांगूनही मंदीरामध्ये पोलिस कर्मचारी नेमणूक करत असल्याने दि.02/01/2015 रोजी शिर्डी पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्री प्रमोद वाघ व त्यांचे सहकारी यांची मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे कक्षामध्ये उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे सोबत चर्चा झाली असता उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी आम्ही व्यवस्थापन समिती समोर विषय सादर करतो, व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तुम्हास मंदीरामध्ये पोलिस कर्मचारी नेमणूकीबाबत त्वरीत कळविणेत येईल असे सांगितले. व त्याप्रमाणे पोलिस अधिक्षक अहमदनगर यांना तुर्त समाधी मंदीरामध्ये पोलिस कर्मचा-यांची नेमणूक न करणेबाबत पत्राने कळविणेत आले आहे.

तरी समाधी मंदीरामध्ये पोलिस कर्मचा-यांची नेमणूक करणेबाबत पोलिस विभागाला परवानगी द्यावी किंवा कसे याबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनती.

**निर्णय क्र.१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई समाधी मंदिरामध्ये हत्यारी पोलिस कर्मचारी नेमणूकीबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांचेबरोबर बैठक आयोजित करणेत यावी, त्या बैठकीमध्ये हत्यारी पोलिस कर्मचा-यांची आवश्यकता, त्यांच्या तैनातीची ठिकाणे, हत्यारी पोलिसांची संख्या, त्यांची जबाबदारी या बाबतीत चर्चा करणेत येईल व आवश्यकता भासल्यास पोलिस कमिश्नर यांचेकडून आराखडा तयार करुन घेणेबाबत विचार करता येईल, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **मंदिर परिसरात मे.व्हेंटेज यांचेमार्फत बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणेचे तीन दिवसांचे Video Footage Backup पंधरा दिवसांवर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान परिसरात मंदिराचे आतील व बाहेरील बाजुस सीसीटीव्ही कंट्रोल रुममार्फत १२ PTZ व ८९ फिक्स कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. यासाठी संस्थानने ४.५ कोटी खर्च करुन अद्यावत सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा विकसीत केलेली आहे. सदर यंत्रणा मे.व्हेन्टेज यांचेमार्फत ऑक्टोबर २०११ मध्ये विकसीत करण्यात आली आहे. सदर सुरक्षा यंत्रणेचा video footage backup प्रचलित प्रथेनुसार तीन दिवसांचे आहेत. परंतु पोलिस यंत्रणेकडुन झालेल्या मंदिर सुरक्षा यंत्रणेचे ऑडीट मध्ये व राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे दि.१३/०८/२०१४ रोजीचे पत्रात, सदर video footage backup पंधरा दिवसांचे करणेबाबत सुचित करण्यात आले होते. त्यानुसार सध्याचे मे.व्हेन्टेज यांचे बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेत बदल करावे लागणार आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीने दि २०/११/२०१४ रोजीचे सभेत video footage backup बाबत निर्देशित आहे.

तातडीचे पंधरा दिवसांचे video footage backup आवश्यक असल्याने, याबाबत श्री अशोक ढगे, सल्लागार यांचे मार्फत Technical Specification मागविण्यात आलेले होते. सदरची यंत्रणा ही मे. व्हेन्टेज यांचेमार्फत बसविण्यात आली असल्याने, पंधरा दिवसांचे video footage backup ची कार्यवाही मे. व्हेन्टेज यांचेमार्फत करण्यात यावी. असे त्यांचे दि. १०/०९/२०१४ रोजीचे ई-मेलमध्ये नमुद आहे. त्यास अनुसरुन मे. व्हेन्टेज यांचेमार्फत सहा महिन्यासाठीचा Turnkey Basis व थेट खरेदी संदर्भातील प्रस्ताव मागविण्यात आला होता.

त्यानुसार त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Item | Description | Qty | Unit |
|---|---|---|---|
| NAS | Network attached storage device for upto 15 days recording for 48 Sony cameras | 1 | Nos |
| NAS | Network attached storage device for upto 15 days recording for 37 Sony cameras | 1 | Nos |
| NAS | Network attached storage device for upto 15 days recording for 40 Sony cameras | 1 | Nos |
| | वरिलप्रमाणे बॅकअपसाठी थेट खरेदी केल्यास (Direct Purchase) | रु.१८,००,०००/- | |
| | सहा महिन्यासाठी Turnkey प्रकल्पासाठी | रु.३,२५,०००/- प्रतिमहा | |

सर्व साहित्य मे. Vantage यांना खरेदी करावयाचे आहे. कारण सध्याची सिस्टीम त्यांचेमार्फत कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार मे.व्हेन्टेज यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार, खालीलप्रमाणे दोन पर्याय उपलब्ध होतात -

१) **पर्याय क्र. १**– सध्याचे video footage backup पंधरा दिवस करण्यासाठी साधारणपणे १२५ कॅमे-याची सिस्टीम असणारे बॅकअप सिस्टीमसाठी थेट व्हेन्टेजमार्फत खरेदी केल्यास रु. १८ लाख + Tax इतका खर्च अपेक्षित आहे. सदरची रक्कम दहा लाखापेक्षा जास्त असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी लागेल

२) **पर्याय क्र. २-** सध्याचे video footage backup पंधरा दिवस करण्यासाठी साधारणपणे १२५ कॅमेऱ्याची सिस्टीम असणारे बॅकअप सिस्टीमसाठी सहा महिन्याचे Turnkey तत्वार प्रकल्प राबविल्यास प्रतिमहा रु. ३.२५ लाख + Tax खर्च अपेक्षित आहे. सदरची सहा महिन्याची एकत्रित रक्कम १० लाखापेक्षा जास्त असल्याने, यासही मा उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी लागेल.

सदर प्रकल्पास मान्यता मिळालेनंतर, सदर प्रकल्प ५० दिवसात पुर्ण करता येईल.

तरी उपरोक्त विवेचनानुसार, मंदिर परिसरात मे व्हेन्टेज यांचेमार्फत बसविण्यात आलेल्या सुरक्षा यंत्रणेचे तीन दिवसांचे video footage backup पंधरा दिवसांवर करणेसाठी पर्याय क्र १ नुसार थेट खरेदी करणेसाठी रु. १८ लाख + Tax अथवा सहा महिन्याचे Turnkey तत्वावर राबविणेसाठी प्रतिमहा रु. ३.२५ लाख + Tax मात्र खर्चाचे मान्यतेसाठी यथा-योग्य निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात मे.व्हेंटेज यांचेमार्फत बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणेचे तीन दिवसांचे Video Footage Backup पंधरा दिवसांवर करणेबाबत पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी दिलेल्या पत्रासह, याची आवश्यकता का आहे याविषयी सविस्तर फेर-प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.१५** **मंदिर परिसर, द्वारावती व साई प्रसादालय येथे सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यत्रणा विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **मंदिर परसराचे सुरक्षेच्या दृष्टीने सन २०१० मेजी मे. व्हेन्टेज** याचेमार्फत सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करण्यात आली आहे. मंदिर परिसरात एकुण ८५ सीसीटीव्ही कॅमेरे, डीएफएमडी, एचएचएमडी इ. यत्रणा संस्थानने ४ कोटी खर्चुन कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने वाढ होत आता सध्या १०१ कॅमेरे कार्यान्वित आहे. अजुनही त्यात ५० ते ६० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे नुतणीकरन करण्याची आवश्यकता आहे. तसेच सध्या लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याची कार्यक्षमता कमी असल्याने, up-gradation होणे गरजेचे आहे. तसेच विविध सुरक्षा यंत्रणा (राज्य गुप्तवार्ता विभाग व पोलिस यंत्रणा) सुरक्षेच्या दृष्टीने अद्यावत सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेबाबत निर्देशित आहे.

यासंदर्भात, श्री अशोक ढगे, तांत्रिक सल्लागार व त्यांचे अभियता यानी मंदिर परिसरातील यत्रणेचा तसेच व्दारावती व साईप्रसादालयाचे दर्शनीय भागाचे सर्व्हे करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार मंदिर परिसरातील बसविण्यात आलेले केबल व अनुशंगीक साहित्य तसेच ठेवुन अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करण्याचे सुचविलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे साहित्य मंदिर व मंदिर परिसरासाठी आवश्यक आहे.

| Sr.No. | Description |
|---|---|
| 1. | High Defination HD IP network cameras for upgrade of old cameras (fixed & PTZ) plus additional cameras required |
| 2. | Networking equipment for extra zone and layer 3 switches with control room along with stacking equipment and racks |
| 3. | Recording & management servers for VMS applicable & storage devices for up to 15/30 days on motion based recording |
| 4. | Workstation & professional display panel for 24x7 applications & other control room equipment |
| 5. | Open platform Video management application with master license and cameras licenses along with client applications |
| 6. | Upgrade licenses for Face Recognition software for new IP cameras |
| 7. | X-ray Baggage scanners with accessories |
| 8. | Portable outdoor waterproof walk-through metal detectors |
| 9. | Passive cabling, accessories, conduit pipes, civil work like underground digging and refilling along with labour job for cable laying |
| 10. | Services towards installation emplementation and commissioning charges |
| 11. | Services towards End to end project management charges And training charges |
| 12. | Services towards Deputation of two permanent onsite engineer for services, support & project management for a period of one / two year |

यापैकी मंदिर परिसराचे up-gradation साठी अदाजे रु. ३.१६ कोटी खर्च अपेक्षित आहे तसेच मंदिर परिसरात अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत झालेनतर, त्या ठिकाणावरुन निघणारे बॅगेज स्कॅनर, कॅमेरे व अनुशंगीक साहित्य हे व्दारावती व प्रसादालय येथे वापरता येईल. इतर अनुशगीक साहित्य खरेदी करावे लागेल त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Description |
|---|---|
| 1. | High Definition HD IP network cameras |
| 2. | Networking equipment for extra zone and layer 3 switches with control room along with stacking equipment and racks |
| 3. | Recording and management servers for VMS applicable and storage device for up to 30 days on motion based recording |
| 4. | Workstation and professional display panels for 24x7 application and other control room equipment |
| 5. | Open platform video management application with master licenses along with client applications |
| 6. | UPS and power backup |
| 7. | Passive cabling, accessories, conduit pipes, civil work like underground digging & refilling along with labour job for cable laying |
| 8. | Services towards installation emplementation and commissioning charges |
| 9. | Services towards End to end project management charges and training charges |
| 10. | Services towards Deputation of two permanent onsite engineer for services, support & project management for a period of one year |

वरीलप्रमाणे सदरील यंत्रणा व्दारावती व साईप्रसादालयकडे अद्यावत सीसीटीव्ही विकसीत करणेकामी अंदाजे रु. ६६ लाख व रु. १.५० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदरचे ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेसाठी अद्यावत Server, UPS, CCTV कॅमेरे नियोजित आहे. तसेच बाधकाम विभागामार्फत व्दारावती व प्रसादालय विभाग येथे अद्यावत NOC Room, UPS Room, Server Room, Service Engg. Room व Supervisor room तयार करावा लागणार आहे. तसेच संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सीसीटीव्ही ऑपरेटर व सुपरवाझर यांची नेमणुक करता येईल व सदरचे ठिकाणी व्दारावती व प्रसादालय येथील कंट्रोल रुममध्ये वातानुकूलित यंत्रणा मेकॅनिकल विभागामार्फत बसवावी लागणार आहे

तरी उपरोक्त विवेंचनानुसार, मंदिर परिसराचे सीसीटीव्ही यंत्रणा up-gradation करणे, मंदिर परिसरातुन निघणारे साहित्य व्दारावती व साईप्रसादालय येथे वापरुन, नविन सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेसाठी एकत्रित रु. ४.८२ कोटी मात्र खर्चाचे मान्यतेसाठी व वरिल संबंधीत विभागांना कामाचे आदेशास्तव सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.१५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरामध्ये नवीन अद्ययावत सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेत यावी व मंदिर परिसरामध्ये सध्या असलेली सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणा श्री साईप्रसादालय व द्वारावती भक्तनिवास येथे विकसीत करणेत यावी. यासाठी येणा-या एकत्रित रु.५.३२ कोटी मात्रचे खर्चास** तत्वत: मान्यता देण्यात आली.

**तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचेऔरंगाबाद खडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१६** **साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम भक्तनिवास येथे सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परसराचे सुरक्षेच्या दृष्टीने सन २०१० रोजी मे. व्हेन्टेज यांचेमार्फत सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करण्यात आली आहे. मंदिर परिसरात एकुण ८५ सीसीटीव्ही कॅमेरे, डीएफएमडी, एचएचएमडी इ. यंत्रणा संस्थानने ४ कोटी खर्चुन कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने वाढ होत आता सध्या १०१ कॅमेरे कार्यान्वित आहे. परंतु निवासस्थानामध्ये सीसीटीव्ही यत्रणा विकसीत करण्यात आलेली नाही. तसेच विविध सुरक्षा यत्रणा (राज्य गुप्तवार्ता विभाग व पोलिस यत्रणा) सुरक्षेच्या दृष्टीने अद्यावत सीसीटीव्ही सुरक्षा यंत्रणा सर्व निवासस्थानांमध्ये विकसीत करणेबाबत निर्देशित आहे.

यासदर्भात, श्री अशोक ढगे, तांत्रिक सल्लागार व त्यांचे अभियंता यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम -१ चे दर्शनीय भागाचे सर्व्हे करुन प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार अद्यावत सीसीटीव्ही यंत्रणा सदरील ठिकाणी विकसीत करण्याचे सुचविलेले आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे साहित्य आवश्यक आहे.

| Sr.No. | Description |
|---|---|
| 1. | High Defination IR HD IP network cameras (fixed & PTZ) |
| 2. | Networking equipment for extra zone and layer 3 switches with control room along with stacking equipment and racks |
| 3. | Recording & management servers for VMS applicable & storage devices for up to 15/30 days on motion based recording |

| | |
|---|---|
| 4. | Workstation & professional display panel for 24x7 applications & other control room equipment |
| 5. | Open platform Video management application with master license and cameras licenses along with client applications |
| 6. | Licenses for Face Recognition software for new IP cameras |
| 7. | X-ray Baggage scanners with accessories |
| 8. | Portable outdoor waterproof walk-through metal detectors |
| 9. | Passive cabling, accessories, conduit pipes, civil work like underground digging and refilling along with labour job for cable laying |
| 10. | Services towards installation emplementation and commissioning charges |
| 11. | Services towards End to end project management charges And training charges |
| 12. | Services towards Deputation of two permanent onsite engineer for services, support & project management for a period of one / two year |

परंतु साईआश्रम - १ येथे १५३६ रुम आहेत. यामुळे सदरचा परिसर खुप मोठा आहे. याकरीता सीसीटीव्ही यंत्रणेसाठी खालीलप्रमाणे दोन पर्याय उपलब्ध होतात.

**पर्याय** – १) साईआश्रम -१ चा संपुर्ण परिसर सीसीटीव्ही यंत्रणेव्दारे नियंत्रीत करण्यासाठी सर्व समाविष्ट प्रकल्पासाठी अंदाजे रु. ४.२१ कोटी खर्च अपेक्षित आहे.

**पर्याय** – २) साईआश्रम -१ मधील दर्शनीय भागासाठी (In/Out gate, R-Block, Parkings, प्रत्येक विंगची Entrance) CCTV यंत्रणा विकसीत करण्याचा प्रकल्पासाठी एकत्रीत अंदाजे रु. २.२१ कोटी अपेक्षित आहे.

तसेच साईबाबा भक्तनिवासस्थानसाठी सर्व समाविष्ट ((In/Out gate, Reservation counter, Parkings व Garden) येथे सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेच्या एकत्रीत अंदाजे रु. १.१० कोटी अपेक्षित आहे.

सदरचे दोन्ही निवासस्थानची ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेसाठी अद्यावत Server, UPS, CCTV कॅमेरे नियोजित आहे. तसेच बांधकाम विभागामार्फत व्दारावती व प्रसादालय विभाग येथे अद्यावत NOC Room, UPS Room, Server Room, Service Engg. Room व Supervisor room तयार करावा लागणार आहे. तसेच संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत सीसीटीव्ही ऑपरेटर व सुपरवाझर यांची नेमणुक करता येईल व सदरचे ठिकाणी (व्दारावती व प्रसादालय) येथील कंट्रोल रुममध्ये वातानुकूलित यंत्रणा मेकॅनिकल विभागामार्फत बसवावी लागणार आहे.

तरी उपरोक्त विवेंचनानुसार, साईआश्रम -१ येथे पर्याय क्र.१ (संपुर्ण परिसर) अथवा पर्याय क्र.२ नुसार (दर्शनीय भागासाठी) अनुक्रमे सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेकामी अंदाजे रक्कम रु. ४.२१ कोटी व २.२१ कोटी मात्र खर्चाचे मान्यतेसाठी व साईबाबा भक्तनिवासस्थान सीसीटीव्ही यंत्रणा विकसीत करणेकामी अंदाजे रक्कम रु. १.१० कोटी मात्र खर्चाचे मान्यतेसाठी तसेच वरिल संबंधीत विभागांना कामाचे आदेशास्तव सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.१६ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम भक्तनिवास येथे अद्ययावत सी.सी.टी.व्ही. सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेस व त्यासाठी येणा-या एकत्रित रु.७.५२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचेऔरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१७ **शिर्डी ते सावळीविहीर पर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखे पा.साहेब, विधानसभा सदस्य यांनी शिर्डी शीव ते सावळीविहीर फाटयाचे हद्दीपर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करून देणे विषयी कळविले आहे.

शिर्डी शहर उत्तर बाजू शीव ते सावळीविहीर फाटयाचे हद्दीपर्यंत पत्रात नमुदप्रमाणे स्ट्रीट लाईटची उभारणी करावी लागणार आहे. सदर स्ट्रीट लाईट उभारणी करणेकामी नगर-मनमाड महामार्गाचे अंतराबाबत बांधकाम विभागाकडून माहिती घ्यावी लागेल. हे अंतर ४ कि.मी.किंवा त्यापेक्षा थोडे कमी अधिक असू शकते. काम मोठया स्वरुपाचे असल्याने सदर कामी इलेक्ट्रीकल कन्सल्टंट नेमावा लागेल. सदरील कामास जागतीक बँकेची परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच या कामासाठी रुपये १० लाखापेक्षा अधिक खर्च होणार असल्याने व सदरील काम संस्थान हद्दीबाहेरचे असल्याने मा.उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

सदरील काम पुर्ण झाल्यानंतर स्ट्रीट लाईटकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या मीटरव्दारे वीजपुरवठा जोडून द्यावा लागणार आहे. विद्युत पुरवठा जोडणी खर्च व स्ट्रीट लाईटची येणारी वीज बीले तसेच भविष्यात निघणारे स्ट्रीटलाईट मेन्टेनन्स कोणी करावयाचे याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे.

नगर-मनमाड महामार्गाचे काम अपुर्ण अवस्थेत आहे. काही ठिकाणी रोडचे मध्यभागी डिव्हायडर बांधलेले नाही. तर काही ठिकाणी बांधलेले डिव्हाडर तुटून गेलेले आहे. डिव्हायडर नसल्याने रस्त्यावरुन जाणारी अवजड वाहने स्ट्रीट लाईट पोलला धडकतात व पोल तुटतात. यापुर्वी शिर्डी शहरातील साईआश्रम समोरील स्ट्रीट लाईट पोलला रस्त्यावरील वाहनांची धडक बसून जवळपास सात ते आठ पोल तुटण्याचे प्रकार झालेले आहेत. त्यामुळे स्ट्रीट लाईटची उभारणी केल्यानंतर लगेचच डिव्हायडर बांधावे लागणार आहे.

सदरील स्ट्रीट लाईटची उभारणी केल्यानंतर इतरही लगतच्या राहाता, नांदुर्खी, पिंपळवाडी, रुई इत्यादि गावांची स्ट्रीट लाईट उभारणी करुन देणेविषयी मागणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.असे वाटते.

याकामी शासनाची, मा.उच्च न्यायालयाची व जागतीक बँकेची परवानगी घेणे, वीज बीले भरण्याचा निर्णय घेणे, सदरील रस्त्याचे हद्दीतील सावळीविहीर,निघोज, निमगांव ग्रामपंचायतीकडे स्ट्रीट लाईट हस्तांतरण करणे याकामास व स्ट्रीट लाईट उभारणी करणेविषयी आपले योग्य ते आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.१७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी ते सावळीविहीर पर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणेकामी विद्युत पुरवठा जोडणी खर्च, स्ट्रीट लाईटची येणारी वीज बीले तसेच भविष्यात निघणारे स्ट्रीटलाईट मेन्टेनन्स कोणी करावयाचे याबाबत माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **सन २०१५-१६ करिता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा माल व इतर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार माहे ऑक्टो.- २०१४ ते मार्च-२०१५ अखेर प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागासाठी खरेदी करत असलेल्या किराणा मालाची मुदत माहे मार्च-२०१५ अखेर संपत आहे. त्यामुळे पुढील वर्ष २०१५-१६ करिता (माहे एप्रिल-१५ ते मार्च-१६) अखेर खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन (त्रीसदस्य) समिती पुढे मान्यतेसाठी सादर करावयाचा असल्याने, संबधीत विभागाना उपरोक्त कालावधीत दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल व त्याबाबतचे खर्चाची सविस्तर मागणी सादर करणेबाबत इकडील जा.क्र.४४२५/ २०१४ दि.२५.१२.२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधीत विभागांनी त्यांचेकडील सन २०१५-१६ करिता आवश्यक किराणा मालाची मागणी कळविलेली आहे. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे.

सदरच्या परिपत्रकातील अ.क्र.३ मध्ये मागणी नोंदविताना मालाचे सविस्तर वर्णन, कंपनी, ब्रॅण्ड इ.समावेश करुन, त्यास मा.व्य समितीची मान्यता घ्यावी, असे नमुद केलेले होते. तसेच मा.व्य.समितीचे दि.२०.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००१ अन्वये संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगिक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. सदर प्रस्तावात अ.क्र.२ मध्ये नमुना निवडपध्दत अवलंबवू नये, त्या ऐवजी निविदेमध्ये मालाचे तपशिलवार स्पेसीफिकेशन द्यावे व तद्नंतर गरज भासल्यास यशस्वी निविदाधारकांकडून माल पुरवठ्याच्यावेळी नमुने मागवून निविदेमध्ये नमुद केलेल्या स्पेशिफिकेशनशी पडताळून घेऊनच मालाचे आदेश द्यावेत. असे नमुद केलेले आहे.

त्यामुळे मा.व्य समितीचे दि.२०.११.२०१४ चे सभेतील निर्णय क्र १००१ नुसार मालाचे पुर्ण स्पेसीफिकेशन ही माल वापरणा-या संबंधीत विभागांकडून मिळणे अपेक्षित होते. मात्र श्री साई प्रसादालय विभागाने खरेदी करावयाचे किराणा मालाचे नमुन्यांचे स्पेसीफिकेशन न देता त्यास मा.व्य.समितीचे मान्यता न घेता नेहमीच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे प्रस्ताव इकडे सादर केलेला आहे. त्यामुळे इतर सर्व विभागांकडूनही त्याच पध्दतीने मागणी स्विकारलेली आहे.

तरी सन २०१५-१६ करिता (माहे एप्रिल-२०१४ ते मार्च-२०१६) खरेदी करावयाच्या किराणा मालाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**(अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने भाजीपाला खरेदी...**

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कोपरगांव, राहाता येथील कृषी उत्पन्न बाजार समिती येथून जाहीर लिलावाने खरेदी करणेत येतो. संस्थानतर्फे साजरेहोणारे उत्सव तसेच सुट्यामुळे होणारे गर्दीच्या काळात साईभक्तांची संख्या वाढल्यास नाशिक येथून भाजीपाला खरेदी करणेत येतो. सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) मध्येही कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने तसेच आवश्यकतेनुसार नाशिक व इतर ठिकाणाहून भाजीपाला खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे खर्च रु.२,५०,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पन्नास लाख) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**(ब) जाहिर निविदा (E-Tender) मागवून करावयाची खरेदी..**

सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) करिता प्रसादालय, कॅन्टीन व मंदिर विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ. धान्य तसेच तांदुळ, तूप, तेल, साखर, चहा, दूध विविध प्रकारचा किराणा माल, मसाला पदार्थ, ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी, पेपरकप, बिस्कीटे, मिनरल वॉटर इ. मालाचा तपशीलवार

तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. सोबतच्या तक्त्यानुसार सन २०१५-१६ करिता निविदा पध्दतीने किराणा माल खरेदीस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.७५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंचाहत्तर कोटी) मात्र खर्च अपेक्षित आहे.

सध्या प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मितीव मंदिर विभागाकडील आलेली मागणी व त्याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्य.समितीचे सभेत सादर करता येईल, मा.व्य.समितीची मान्यता मिळालेनंतर सदरचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे मान्यतेसाठी पाठवावा लागेल.

दरम्यानचे काळात मा.मुख्यलेखाधिकारी यांनी नमुद केलेप्रमाणे तसेच मा.व्य.समितीचे दि.२० ११.२०१४ चे सभेतील निर्णय क्र १००१ नुसार खरेदी करावयाचे किराणा मालाचे स्पेसीफिकेशन व मालाचा आदर्श नमुना निश्चित करणेकामी मा.उप कार्यकारी अधिकारी याचे मार्गदर्शनानुसार त्या त्या क्षेत्रातील तज्ञांशी पत्रव्यवहार करुन तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करुन, नमुना निश्चित करता येईल. त्याप्रमाणे निविदेमध्ये मालाचे वर्णन नमुद करता येईल, असे नम्र मत आहे.

सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) साठी वार्षिक उलाढालीबाबत खालीलप्रमाणे निकष ठरवून निविदा मागविता येतील.

| अ.नं. | तपशील | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पुरवठा धारकाची अपेक्षीत वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१ | गहु | २,४५,७०,०००/- | ६१,४२,५००/- |
| ०२ | साखर | ५,९५,२०,०००/- | १,४८,८०,०००/- |
| ०३ | किराणामाल – दाळी, कडधान्ये व इतर | २१,८४,३९,५५०/- | ५,४६,०९,८८८/- |
| ०४ | गावरान तूप | २८,२८,००,०००/- | ७,०७,००,०००/- |
| ०५ | खाद्यतेल | ३,०८,००,०००/- | ७७,००,०००/- |
| ०६ | चहा व कॉफी | ४०,५०,०००/- | १०,१२,५००/- |
| ०७ | गाय दुध टोण्ड | ६,३४,०५,०००/- | १,५७,७६,२५०/- |
| ०८ | बिस्कीट | १,२०,००,०००/- | ३०,००,०००/- |
| ०९ | पेपरकप | १,२५,५०,०००/- | ३१,३७,५००/- |
| १० | ग्लासिन/पोस्टर लॅमिनेटेड पेपर पिशवी | २,५१,७५,०००/- | ६२,९३,७५०/- |
| ११ | मिनरल वॉटर | १,४५,०६,०००/- | ३६,२६,५००/- |

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळालेनंतर त्यास अधीन राहुन जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन, www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करुन मा.व्य.समितीचे दि ११ ०९.२०१४ चे सभेतील निर्णय क्र.८०८ अन्वये ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल (भाजीपाला खरेदीसह) खरेदीकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे भाजीपाला मोढ्यावरुन खरेदी करणेस व उर्वरीत किराणा माल निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे पुर्णांकित रक्कम रु.७७,५०,००,०००/- (अक्षरी रुपये सत्त्याहत्तर कोटी पन्नास लाख) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ (माहे एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६) मध्ये प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल (भाजीपाल्यासह) खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७७,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच निविदा मागवितांना गहू/ गहूआटा असे दोन्हींसाठी दर मागविणेत यावे.**

**तत्पुर्वी याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१९ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१५ विनामुल्य भेट देणेबाबत.**

प्रस्ताव- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र१४ कलम नं. १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणेतरतुद आहे.

"श्री साईबाबाचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थान मार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशीत केली जाते दरवर्षी मा.अध्यक्ष महोदय, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी याना संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात. व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication Expenses) खर्ची टाकली जाते.

"मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे दि २७.१२.२०१४ च्या निर्देशाप्रमाणे शिष्टाचाराचा भाग म्हणून मा.मुख्यमंत्री महोदय तथा सर्व मंत्री महोदय,मा.न्यायधिश,सर्व सचिव,मंत्रालय खातेप्रमुख,जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त तसेच मोठे देणगीदार याना प्रत्येकी ०१ डायरी व कॅलेंडर्स अथवा टेबल कॅलेंडर्स देणेबाबतचा प्रस्ताव पुर्नविचारार्थ ठेवण्यास हरकत नसावी कारण सिध्दी विनायक ट्रस्ट तसेच अन्य संस्था कडून अशा शिष्टाचाराच्या बाबी पाळल्या जातात." वरील नमूद धर्तीवर सुधारित प्रस्ताव पुर्नविचारार्थ त्वरीत सादर करावा.

सदर प्रस्ताव दि.३१.०१२.२०१४ रोजी फेरसादर केला असता, मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे दि.०७.०१.२०१५ च्या रोजीच्या निर्देशाप्रमाणे डायरी व कॅलेंडर्स मोफत वाटप संख्या खालील प्रमाणे.

| अ.न | तपशिल | दैनंदिनी रु.७५/- नग संख्या | दिनदर्शिका १ पाने रु.२०/- नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मा मुख्यमंत्री महोदय तथा मंत्री महोदय | ४० | ४० |
| ०२ | मा.न्यायधिश साहेब<br>(संस्थानला माहे जानेवारीत भेट देणारे) | ३० | ३० |
| ०३ | सर्व सचिव व विभागीय आयुक्त<br>(संस्थानला माहे जानेवारीत भेट देणारे) | ७० | ७० |
| ०४ | मा.जिल्हाधिकारी वगैरे<br>(संस्थानला माहे जानेवारीत भेट देणारे) | १५ | १५ |
| ०५ | मोठे देणगीदार (रुपये एक लाख किंवा त्यापुढील )<br>(संस्थानला माहे जानेवारीत भेट देणारे) | १०० | १०० |
| ०६ | मा.अध्यक्ष महोदय | ५० | ५० |
| ०७ | मा.जिल्हाधिकारी तथा मा.सदस्य, त्रिसदस्य समिती | ५० | ५० |
| ०८ | मा.कार्यकारी अधिकारी तथा मा.सदस्य, त्रिसदस्य समिती | ५० | ५० |
| ०९ | मा.उपकार्यकारी अधिकारी | ५० | ५० |
| १० | सर्व प्रशासकीय अधिकारी (प्रत्येकी ०५ नगा प्रमाणे ) | २५ | २५ |
| ११ | मुख्यलेखाधिकारी | [illegible] | १० |
| | एकुण नग | ४९० | ४९० |
| | एकुण किंमत | ३६,७५०/- | ९,८००/- |

श्री साई दैनंदिनी मोफत वाटप किंमत रु.३६,७५०/- + श्री साई दिनदर्शिका मोफत वाटप किंमत रु.९,८००/- एकूण रुपये.४६,५५०/- (अक्षरी रुपये. सेहेचाळीस हजार पाचशे पन्नास मात्र.)

संस्थानतर्फे वेळोवेळी प्रकाशने/फोटो/सीडी उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.२२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता मिळालेली होती. तथापी मागील वर्षी दैनंदिनी व दिनदर्शिका २०१४ मोफत वाटप प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४.११.२०१३ आयत्या वेळेचा विषय क्र ०६ निर्णय क्र.९२५ अन्वये अमान्य करणेत आलेला आहे.

तसेच श्री संजय भास्कर काळे, कोपरगांव यांचे मा.अध्यक्ष साहेब यांना अग्रेषित पत्र आवक क्र.१४४५१ दि.०१.१२.२०१२ चे पत्रान्वये प्रकाशने विभाग दि.१६.०१.२०१३ चे मंजूर टिपण्णी नुसार मंत्रालय यांना डायरी व कॅलेंडर्स विनामूल्य वाटपास जरी मा.व्यवस्थापन समिती सभेची मान्यता असली तरी मा.उच्च न्यायलयाची प्रथम परवानगी घ्यावी व नंतरच मोफत वाटप करावी असे नमूद केले आहे.

संस्थानव्दारे डायरी/ कॅलेंडर्स सन २०१३ पासून विधीमंडळ सदस्य व मंत्रालयातील अधिकारी यांना मोफत वाटप करण्यात आलेले नाहीत.

सबब शिष्टाचार म्हणून मा.मुख्यमंत्री महोदय तथा मंत्री महोदय व मंत्रालयातील अधिकारी याना संस्थानव्दारे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१५ विनामूल्य भेट देणेकामी मा.व्यवस्थापन सभेपुढे विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी तर्फे मान्यवराना श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१५ विनामुल्य भेट देणे हा विषय जानेवारी उलटून गेल्याने कालबाह्य झाला आहे या विषयावर पुढील वर्षी विचार करणेत यावा, यावर्षी विनामुल्य दैनंदिनी व दिनदर्शिका देऊ नयेत, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२०** **साईटेक प्रकल्प सद्यस्थिती व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याचे पेमेंटबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17(1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 799.

**प्रस्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत यांचे मार्गदर्शनाखाली साईटेक प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणाली कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करून दिलेल्या आहेत

करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पातील सर्व कार्य ाली ह्या अठरा (18) महिन्यांच्या कालावधीत, एकुण सहा टप्प्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होत्या. मुळ करारनाम्यानुसार प्रकल्प जानेवारी 2010 ला सुरु होऊन जुन 2011 पुर्ण होणे अपेक्षित होते. परंतु सुरुवातीच्या काळात आलेल्या विविध अडचणींमुळे उदा-सर्व्हर रुमच्या जागेतील बदल, फायबर केबल टाकणेकामी रस्त्याच्या कडेने असलेल्या दुकाने व रहदारी याची अडचण इ. कारणास्तव प्रकल्प निर्धारीत वेळेत पुर्ण करणे अशक्य झाले होते. प्रकल्पासाठी तयार करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे व श्री साईबाबा संस्थान याना सहमतीने निर्धारीत वेळेत बदल करण्याचा अधिकार आहे त्यानुसार प्रकल्प उभारणीचे कामास सुरवातीस 13/03/2013 व 30/08/2013 अशी मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

करारनाम्यानुसार प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली सस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली 01 ऑगष्ट 2011 रोजी स्वीकारण्यात आलेली आहे, सबब कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार ऑगष्ट 2011 पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याना माहे नोव्हेंबर 2013 पर्यंतच्या बीलाची रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली असून, दि. 17/07/2014 रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. 591 नुसार माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 च्या बीलच्या एकुण रकमेच्या 75% रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे. माहे मार्च 2014 ते जुलै 2014 पर्यतचे बीलांबाबत निर्णय घेणेसंदर्भात सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 चे सभेत ठेवण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. 837 अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेल होते -

कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे याच्या हलगर्जीपणामुळे व चुकीमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास दिरंगाई झालेली आहे. गेल्या तीन महिन्यापासून कामाला गती मिळाली असून कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा पाठीमागील कटु अनुभवाचा फारसा विचार न करता केवळ प्रायोगिक तत्वावर 3 महिन्यांचा कालावधी त्यांना काम पूर्ण करण्यास वाढवून दिलेला होता. परंतु तरीही कामात फारसी प्रगती झालेली नाही. त्यामुळे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित बील दिले जावे. आवश्यक ऑडीट व फायनालिटी क्लॉजला अनुसरुन त्याचे बरोबरचा करार रद्द केला जाईल, असे कॉग्नीझट टेक्नॉलाजी, पुणे यांना कळविणेत यावे.

तसेच यापुढे स्टॅण्डबाय ॲरेंजमेंट सर्वकाळ, सर्व कारणांकरिता केली जावी, असे ठरले.

उपरोक्त निर्देशाप्रमाणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याना नोटीस पाठविणेकामी आयटी विभागाच्या मंजुर टिपणीअन्वये सस्थानचे विधी विभागास कळविण्यात आलेले होते. सदरकामी विधी विभागामार्फत मान्यतेसाठी ठेवण्यात आलेल्या टिपणीसंदर्भात मा.कार्यकारी अधिकारी सो.यानी दि. 25/12/2014 रोजी विधी अधिकारी व आयटी विभागप्रमुख यांचेशी सयुक्त चर्चा केलेली आहे. सदर चर्चेमध्ये मा.कार्यकारी अधिकारी सो., यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींबाबत वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविलेल्या सुधारणा तथा अतिरीक्त सुविधांचे बाबतीत त्यांनी सकारात्मक कामकाज केलेले असल्याचे अढळून आलेले आहे. सबब सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत केलेल्या कार्यप्रणालींचे कामाबाबतची प्रगती पाहता, कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे यांना नोटीस पाठविणे अगोदर प्रकल्पाची सद्यस्थिती सविस्तरपणे मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावी.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे थकित पेमेंट न मिळाल्यास प्रकल्पाबाबतच्या काम करणे कंपनीस अवघड होणार असल्याचे पत्र इकडिल विभागास दिलेले होते, सबब साईटेक प्रकल्पाचे कामकाजासंबधीचा Support व Development कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी बद केल्यास पर्यायी व्यवस्था राबविणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि 09/10/2014 चे सभेत ठेवण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. 912 अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेल होते .

साईटेक प्रकल्प आऊटसोर्समार्फत चालविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे मदतीने व मान्यतेने संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख यांनी निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करावी, असे ठरले

उपरोक्त दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान सचलनालय विभागाचे प्रधान सचिव, श्री राजेश अग्रवाल सो., यानेशी चर्चा केली असता, त्यांनी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचलनालय विभागाचे प्रतिनीधी, श्री मुकेश सोमकुवर याना मा.कार्यकारी अधिकारी सो. व मा.उपकार्यकारी अधिकारी सो. याचेशी समक्ष चर्चा करणेकामी दि. 13/10/2014 रोजी शिर्डी येथे पाठविलेले होते. श्री.मुकेश सोमकुंवर व त्यांचे सहकारी यांनी संस्थानचे मागणीनुसार दि. 14/08/2014 ते 16/08/2014 या का ावधीमध्ये शिर्डी येथे येऊन साईटेक प्रकल्पाचे थर्ड पार्टी ऑडीट केलेले असून रिपोर्ट सस्थानला सादर केलेला आहे दि 13/10/2014 रोजी श्री.मुकेश सोमकुंवर व त्यांचे सहकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी सा ो, व आयटी विभाग यांची मा.कार्यकारी अधिकारी सो. याचे उपस्थितीत बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये प्रकल्पाचे प्रगतीबाबत झालेल्या चर्चेअंती, श्री. मुकेश सोमकुवर यांनी प्रकल्पाचा अवाका व Third Party Audit मध्ये निदर्शनास आलेल्या बाबींचा अभ्यास करता सद्यस्थितीत प्रकल्पाचे उर्वरीत कामे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना ठराविक कालावधीची मुदत देऊन त्यानेकडूनच करुन घेणे तांत्रिक दृष्ट्या योग्य

होईल, तसेच दरम्यानचे काळात आयटी विभागाने प्रकल्पाचे देखभालीसाठी नविन टेंडरची प्रक्रिया सुरु करावी, असे कळविलेले होते.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 912 अन्वये स्टॅण्डबाय अॅरेंजमेंट सर्वकाळ, सर्व कारणाकरिता करण्याकरिता आयटी विभागामार्फत निविदेचा मुसदा बनविणेची कार्यवाही सुरु करण्यात आलेली, असून सदरचा मसुदा तपासणी व मान्यतेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून आतापर्यंत पुढीलप्रमाणे कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत.

**नेटवर्क-**

साईटेक प्रकल्पाअंतर्गत विविध विभागात कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली ह्या सर्व्हरला जोडण्यासाठी पुढीलप्रमाणे नेटवर्कची उभारणी करण्यात आलेली आहे.

1. कॅट-6 केबलद्वारे विविध विभागांमध्ये एकुण 349 डेटा पॉइंट कार्यरत करण्यात आलेले आहेत
2. शिर्डीमधील संस्थानचे विविध ठिकाणच्या इमारतीमध्ये असलेल्या विभागांना जोडण्यासाठी फायबर केबलद्वारे दोन मार्गांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. काही कारणामुळे पहिला मार्ग बंद पडल्यास कार्यप्रणाली तात्काळ दुसऱ्या मार्गावर चालू होतात.
3. फायबर केबलचे दोन्ही मार्ग काही कारणास्तव बंद पडल्यास Wi-Max या तत्रज्ञानाचा उपयोग करुन कार्यप्रणाली कार्यरत ठेवण्याची तजवीज करण्यात आलेली आहे.
4. संस्थानचे मुबई, बैंगलोर, सिकदराबाद व चेन्नई येथील कार्यालय व्हीपीएन या तत्रज्ञानाचा उपयोग करुन सर्व्हरला जोडलेली आहेत. सदरच्या कार्यालयामध्ये साईटेक प्रकल्पाअतर्गत देणगी, दर्शन/आरती पास, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री तसेच साईलीला व साईभक्तमंडळ सभासद ह्या कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी होणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद थेट सर्व्हरला होत असलेकारणाने प्रशासनास आवश्यक असलेली माहिती विनाविलंब उपलब्ध होत असते.
5. साईटेक प्रकल्पाअंतर्गत साईभक्ताना इंटरनेटवर देणगी, दर्शन/आरती पास, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री तसेच साईलीला व साईभक्तमंडळ सभासद ह्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत सदरची कार्यप्रणाली अधिक सक्षमपणे चालणेसाठी बीएसएनएल यांची 10 एमबीपीएस ची लिंक कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. तसेच बीएसएनएल यांची 10 एमबीपीएस ची लिंक काही कारणास्तव बंद पडल्यास साईभक्तांना सेवा घेण्यास काही अडचण येऊ नये यासाठी आयटी कमिटीचे अध्यक्ष मा.श्री.के व्ही.रमणी सो. यांनी देणगीस्वरुपात एअरटेल या कंपनीची 10 एमबीपीएसची लिंक कार्यान्वीत करुन दिलेली आहे.

**हार्डवेअर -**

प्रकल्पाअतर्गत कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून पुढीलप्रमाणे हार्डवेअर संस्थानला प्राप्त झालेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | संगणक | - | 168 |
| 2. | संगणक (Dual Monitor) | - | 16 |
| 3. | लपटॉप | - | 15 |
| 4. | सर्व्हर | - | 16 |
| 5. | किऑस्क (टच स्क्रीन) | - | 06 |
| 6 | युपीएस | - | 26 (विविध क्षमतेचे) |
| 7. | प्रिंटर्स | - | 118 |

**डेटा सेंटर -**

प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली सुरळीत चालाव्यात व सर्व माहिती सुरक्षित राहावी या करीता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत अद्यायावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन आयटी विभागामध्ये डेटा सेंटरची उभारणी करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत डेटा सेंटरमध्ये ऑनलाईन सर्व्हिसेस व प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींसाठी एकुण 16 सर्व्हर कार्यरत आहेत. डेटा सेंटरमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे सुविधा कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.

1. फायर डिटेक्शन
2. फायर सप्रेशन
3. बायोमेट्रीक व कार्ड रिडर आसेस कट्रोल

काही तांत्रिक कारणांमुळे सदरचे डेटा सेंटर बंद पडल्यास कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणाली चालू राहण्यासाठी डीआर सेंटरची उभारणी साईआश्रम 1 या ठीकाणी करण्यात आलेली आहे.

**सॉफ्टवेअर -**

करारनाम्यानुसार एकुण 37 कार्यप्रणाली साईटेक प्रकल्पाअतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी विकसीत करुन विविध विभागात कार्यान्वीत करावयाच्या आहेत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सदरच्या 37 कार्यप्रणालींसह संस्थानचे मागणीनुसार ऑनलाईन सर्व्हिसेस हि अतिरीक्त कार्यप्रणाली अशा एकुण 38 कार्यप्रणाली संबधीत विभागात

कार्यान्वीत करून दिलेल्या आहेत कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींच्या वापरबाबतची सद्यस्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यप्रणाली | सद्यस्थिती |
|---|---|---|
| 1 | अकाऊंट | अकाऊंट विभागात चालणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद सध्या कार्यप्रणालीमध्ये घेण्यात येत आहे<br>नविन कार्यप्रणालीमध्ये ट्रायल बॅलंस व डेडस्टॉक संदर्भातील कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. |
| 2 | प्रसादालय | चालू आहे. |
| 3 | खरेदी | चालू आहे.<br>कार्यप्रणालीमध्ये आवश्यक असणारे बदल तथा सुधारणा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याचेकडून करून घेण्यात येत आहेत. |
| 4 | भांडार | चालू आहे.<br>स्टॉक व्हेरीफीकेशन व रिपोर्टस् तपाणीची कार्यवाही अद्याप बाकी आहे. |
| 5 | रुम रिझर्वेशन | चालू आहे. |
| 6 | दर्शन पास | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार फिंगरप्रिंटची सुविधा तसेच ऑनलाईन सर्व्हिसेसमार्फत बुक न झालेला आरतीची कोटा कार्यप्रणालीत ट्रांसफर होण्याची सुविधा सदरचे कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी समाविष्ट केलेली असून लवकरच कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 7 | चेक / डीडी | चालू आहे. |
| 8 | देणगी कार्यालय | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतीची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत केलेली आहे. |
| 9 | पगारबील | माहे नोव्हेंबर 2014 पासून पगारबीलाची कार्यवाही सदरचे कार्यप्रणालीमधून सुरु करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त कार्यवाही करताना आलेल्या अडचणी तथा सुधारणा वेळोवेळी कॉग्नीझंट यांचेकडून सोडविल्या जातात.<br>वेतन निश्चिती, फरक बीले या संदर्भातील सुविधा कार्यान्वीत करणे अंतिम टप्प्यात आहे. |
| 10 | कामगार | चालू आहे.<br>कार्यप्रणालीमध्ये कायम कर्मचाऱ्यांच्या रजासबंधी माहिती भरण्याचे काम चालू आहे.<br>कंत्राटी कामगार, गैरशिस्त वर्तनसंबंधी नोटीस इ. बाबतची सुविधेचा वापर अद्यापा सुरु करणे बाकी आहे. |
| 11 | लाडू प्रसाद | चालू आहे. |
| 12 | मनी ऑर्डर | चालू आहे. |
| 13 | टेलिफोन बीलींग | चालू आहे.<br>कार्यप्रणालीमध्ये अपेक्षित सुधारणा कॉग्नीझंट याना कळविलेल्या आहेत, सदरच्या सुधारणा करणे अद्याप बाकी आहे |
| 14 | कँटीन | चालू आहे. |
| 15 | इन्फॉर्मेशन फॉर सिनीअर ऑफीसर्स | चालू आहे. |
| 16 | इनवर्ड / आऊटवर्ड | चालू आहे<br>सदरची कार्यप्रणाली सर्व विभागांध्ये कार्यान्वीत करणे बाकी आहे. |
| 17 | भक्तमंडळ सभासद | चालू आहे |
| 18 | प्रकाशने | चालू आहे<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदरच्या कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट यांचेमार्फत बारकोड ची सुविधा समाविष्ट करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| 19 | साईलीला | कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. डेटा व्हेरीफीकेशन करुन, माहे जानेवारी 2015 चे प्रिटींग कार्यप्रणालीमधून काढणे प्रस्तावीत आहे. |
| 20 | विद्युत विभाग | चालू आहे. |
| 21 | किऑस्क | चालू आहे. |
| 22 | विधी विभाग | चालू आहे. |
| 23 | सभा कामकाज | चालू आहे |
| 24 | वाहन विभाग | चालू आहे. |
| 25 | पाणी पुरवठा | चालू आहे. |
| 26 | कामगार कोठी / विक्री | चालू आहे.<br>**मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत केलेली आहे.** |
| 27 | बांधकाम | चालू आहे. |
| 28 | गेस्ट ईन्फॉर्मेशन | चालू आहे. |
| 29 | वैद्यकिय अनुदान | चालू आहे. |
| 30 | एमआयएस | तुर्त कार्यान्वीत झालेल्या काही कार्यप्रणालीच्या रिपोर्ट कार्यप्रणालीमध्ये विकसीत करण्यात आलेले आहेत. आवश्यक रिपोर्टस् बाबतची माहिती कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना देणे बाकी आहे. |
| 31 | संरक्षण विभाग | चालू आहे. |
| 32 | शैक्षणिक संकुल | चालू आहे.<br>कार्यप्रणाली अधिक सुविधा तथा सुधारणा अपेक्षित आहे. सदरच्या सुविधा तथा सुधारणा कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविलेल्या आहेत. |
| 33 | उत्सव | चालू आहे. |
| 34 | इंटीग्रेशन वुईथ एचएमएस | एचएमएस हि कार्यप्रणाली संस्थान (रुग्णालये) मार्फत सुरु केलेनंतर सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 35 | ओल्ड डेटा मायग्रेशन | पुर्ण झालेले आहे. |
| 36 | Proxy & Email integration/setup | पुर्ण झालेले आहे. |
| 37 | रेकॉर्ड | चालू आहे. |
| 38 | दर्शन पास-2 | सदरची कार्यप्रणाली नविन दर्शन लाईन पुर्ण झालेनंतर कार्यान्वीत करण्यात येणार आहे. |
| 39 | ऑनलाईन सर्व्हिसेस | चालू आहे.<br>**मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदर कार्यप्रणालीमध्ये वेळावेळी साईभक्तांसाठी वेगवेगळी माहिती प्रकाशीत करण्याची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत केलेले आहे.**<br>**सदरच्या कार्यप्रणालीचा आजपोवतो 29,63,491 साईभक्तांनी लाभ घेतलेला असून 68,78,33,540/- रु. रक्कम संस्थानचे खाती जमा झालेली आहे.** |
| 40 | माहिती सुविधा केंद्र | साईटेक प्रकल्पाअंतर्गत मुंबई, बेंगलोर, चेन्नई व सिकंदराबाद येथे तेथील साईभक्तासाठी देणगी, दर्शन/आरती, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री, साईलीला व भक्त मंडळ सभासद ह्या कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. सदर कार्यप्रणालींचा आजपोवतो 1,26,075 साईभक्तानी लाभ घेतलेला आहे. |

कॉग्नीझंट यांनी आजपर्यंत सर्व कार्यप्रणाली संबधीत विभागामध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या असून, कार्यप्रणालींचा वापर संबधीतानी सुरु केलेला आहे. कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणाली वापरत असताना येणाऱ्या अडचणी तथा आवश्यक सुधारणा वेळोवेळी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कळविल्या जातात, व त्या सोडविण्याचे काम कॉग्नीझंट यांचेकडून चालू आहे.

संस्थानचे विनंतीवरुन लेखापरिक्षक अभयशास्त्री अँड असोसिएटस् यानी शिर्डी येथे येऊन अकाऊंट विभागात कार्यान्वित करण्यात आलेल्या कार्यप्रणालीची पाहणी करुन त्याचा अहवाल संस्थानला दिलेला होता. मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे निर्देशानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधी, अकाऊंट विभाग व आयटी विभाग यानी दि. 16/09/2014 रोजी एकत्रित सदर अहवालावर चर्चा केलेली आहे. अहवालामध्ये नमुद केलेल्या बहुतेक बाबींचे या अगोदरच निरसन झालेले असल्याचे कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे याचे प्रतिनीधींनी निदर्शनास आणून दिलेले आहे. अहवालात नमुद केलेले बाबींपैकी ट्रायल बॅलंस व डेडस्टॉक संबधीचे काम सध्या अंतिम टप्प्यात आहे.

ऑनलाईन सर्व्हिससला साईभक्तांचा लक्षणीय प्रतिसाद लाभत असल्याने सुरवातीस याकामी कार्यान्वीत करण्यात आलेल्या सर्व्हरची क्षमता अपुरी पडू लागली. सबब, साईभक्तांना सदर सुविधेचा लाभ घेण्यास अनेक अडचणी येऊ लागल्या. सबब कार्यप्रणालीसाठी वापरण्यात येणारी रिलायस कंपनीची 2 एमबीपीएसच्या लिंकऐवजी बीएसएनएल ची 10 एमबीपीएस लिंक संस्थानमार्फत कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. बीएसएनएलची 10 एमबीपीएसची काही कारणास्तव बंद पडल्यास कार्यप्रणाली अखंड कार्यान्वीत राहावी यासाठी एअरटेल कंपनीची 512 केबीपीएसचो लिंक घेण्यात आलेली आहे. एअरटेल कंपनीची 512 केबीपीएस लिंक अपग्रेड करुन 10 एमबीपीएस करणे कामी आयटी कमिटी अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो.यांनी देणगीस्वरुपात एक वर्षाकरिता कंपनीस पुरवठा आदेश दिलेला आहे. कार्यप्रणाली सुरळीत चालावी व साईभक्तांना विनासायास या सुविधेचा लाभ घेता यावा, यासाठी मा.श्री.के.व्ही.रमणी सो. यानी देणगीस्वरुपात उच्च क्षमतेचे दोन सर्व्हर दिलेले असून कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत ते कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. सद्यस्थितीस सदरची कार्यप्रणाली सुरळीत चालू असून आजपोवतो 29,63,491 साईभक्तांनी सदर कार्यप्रणालीमार्फत विविध सेवाचा लाभ घेतलेला असून 68,78,33,540/- रु. रक्कम संस्थानचे खाती जमा झालेली आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी त्यांचे दि. 09/12/2014 चे पत्रान्वये प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कार्यप्रणालीबाबतची सद्यस्थिती इकडील विभागास कळविलेली आहे. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या सर्व कार्यप्रणाली (कामगार हि कार्यप्रणाली वगळता) सुरळीत सुरु झालेल्या असल्याने, त्यांचे माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 चे पमेंटमधील 25% रक्कम तसेच मार्च 2014 पासूनचे पेमेंट लवकरात लवकर अदा करावे असी त्यांनी पत्रामध्ये विनंती केलेली आहे.

**मागणी :** उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कडून झालेली कार्यवाही पाहता, मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे, मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 निर्णय क्र. 837 अन्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना नोटीस देण्याचे विषयावर निर्णय घेणे कामी व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 चे पमेंटमधील 25% रक्कम तसेच मार्च 2014 पासूनचे पेमेंट अदा करणेसंदर्भात निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सविनय सादर. करणेस मान्यता असावी असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :** मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 निर्णय क्र. 837 अन्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे याना नोटीस देण्याचे विषयावर निर्णय घेणे कामी व कॉग्नीझट टेक्नॉलॉजी, पुणे याचे माहे डिसेंबर 2013 ते फेब्रुवारी 2014 चे पमेंटमधील 25% रक्कम तसेच मार्च 2014 पासूनचे पेमेंट अदा करणेसंदर्भात निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.२० **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना डिसेंबर २०१३ ते फेब्रुवारी २०१४ या कालावधीतील बाकी असलेली २५% रक्कम आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सॉफ्टवेअर रिक्वॉयरमेंटचा अभ्यास करुन त्यांचे पुढील पेमेंटबाबत या प्रकल्पाची प्रगती पाहून निर्णय घेतला जाईल, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.२१ **शैक्षणिक संकुलाकडील ग्रंथपालांना पदावर कायम करुन पदाची विहीत वेतनश्रेणी देणेबाबतच्या मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०.११.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१००४ (ब) मध्ये दुरुस्ती करणेसाठी फेरसादर.**

प्रस्ताव- **सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद**-सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.4(भाग 4) दि. 17 ऑगस्ट 2004 रोजी राज्यपालानी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील 17(2 ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** –1)दि.12/06/2014 रोजीची सभा निर्णय क्र.517

2)दि.20/11/2014 रोजीची सभा निर्णय क्र.1004 (ब)

**प्रास्ताविक**– उपरोक्त विषयान्वये माध्यमिक शाळा संहितेनुसार पदवीधर ग्रंथपालांची अर्हता असलेली जाहीरात देवून अर्ज मागवून जाहीरातीने प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन उमेदवाराच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आल्या. दि. 20/08/2010 रोजी निवड समितीद्वारे मुलाखती घेवून खालील उमेदवारांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

| कर्मचारी नांव व हुद्दा | नियुक्ती आदेश क्र. | विभाग | शैक्षणिक अर्हता | नेमणूक दिनांक | परिविक्षाधीन कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| श्री सुनिल उत्तमराव शेळ्वळ (ग्रंथपाल) | जा. नं. एसएसएस/ कविम/ 5482/2012 दि.01फेब्रुवारी 2012 | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर | बी. ए., एम. लिब., आय. सी. | दि.01/02/2012 | दि. 31 जानेवारी 2015<br>3 वर्ष |
| श्री भाऊसाहेब बाबुराव शिंदे (ग्रंथपाल) | जा. नं. एसएसएस/ कनिष्ठ/ 5479/2012 दि.01फेब्रुवारी 2012 | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय | बी. एससी., एम.लिब., आय. सी. | दि.01/02/2012 | दि. 31 जानेवारी 2015<br>3 वर्ष |



सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचा एस. एल. पी. 9732 /2012 / दि. 24 जानेवारी 2014 रोजीचे आदेशास अधिन राहून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी दि. 31/01/2014 रोजी संपुष्टात आलेला असल्याने त्याना त्यांचे नेमणूक दिनांक 01/02/2012 पासून सुधारीत वेतनश्रेणी 9300 - 34800 ग्रेडपे 4300 मात्र देण्यात येवून ग्रंथपाल या पदावर संस्थान सेवेत कायम करण्यात यावे.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** उपरोक्त प्रस्तावातील नमूद शासन निर्णय क्रमांक एसएसएन/1702/09/ 2002 माशि 2 दिनांक 03 ऑगस्ट 2006, दि.24 जानेवारी 2014 रोजीच्या मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांचा एस.एल.पी.9732/2012 रोजीच्या आदेशास आधिन राहून व माध्यमिक शाळा संहितेनुसार ग्रंथपाल, हे पद शिक्षकेतर संवर्गात येत असल्याने (शिक्षकेतर कर्मचारी) यांना दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी व ग्रंथपाल पदावर संबधित व्यक्तिची मुळ वेतनश्रेणीवर नियुक्ती होईल असा आहे. त्यानुसार वरील ग्रंथपालाचा दोन वर्षाचा परिविक्षाधिन कालावधी दि.31/01/2014 रोजी संपुष्टात आल्याने त्याना दि.01/02/2014 पासून संस्थान सेवेत कायम करण्यात

यावे. तसेच त्यांचे नेमणूक दिनांक 01/02/2012 पासून पदवीधर ग्रंथपाल पदाची वेतनश्रेणी 9300-34800 ग्रेड पे 4300 देणेकामी निर्णयार्थ सविनय फेरसादर.

**निर्णय क्र.२१** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित ग्रंथपालाना वेतनश्रेणी देणेबाबत सन २००६ चे शासन निर्णयानंतर काही शासन निर्णय प्रकाशित झाले आहेत काय? याविषयी पडताळणी करुन अभ्यासपुर्वक प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय/ प्राचार्या, कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं.२२** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल माध्यमिक विभाग प्राचार्य रिक्त पद पदोन्नतीने भरणेबाबत.

**प्रस्ताव-** सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद-सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक** – दि 11/09/2014 रोजीची सभा निर्णय क्रमांक 780

**प्रास्ताविक**- सौ.झेड.व्ही.इनामदार याची संस्थान मध्ये जा.न.एसएसएस/वशी/4391/1991दि.24एप्रिल1991 च्या आदेशानुसार (प्राथमिक विभाग मुख्याध्यापिका) त्यांची नेमणुक करण्यात आली होती.शालेय दाखल्यानुसार त्यांची जन्म तारीख 16 आक्टोंबर 1954 असून दि.16 आक्टोंबर 2014 रोजी त्यांचे वय 60 वर्षे पूर्ण झाले असून संस्थान आस्थापना नियमानुसार त्या दि.31 आक्टोंबर 2014 रोजी त्या सेवानिवृत झालेल्या आहेत.

याबाबत मा.त्रिसदस्य समितीचे दि.11/09/2014 रोजी सभेत प्रस्ताव ठेवणेत आला होता निर्णय क्र. 780 अन्वये यावर सविस्तर चर्चा होवून, श्री साईबाबा इंग्लिशमिडीयम स्कुलच्या प्राचार्या श्रीमती इनामदार यांचे पदाचा अतिरिक्त व तात्पुरता कार्यभार सध्या श्री. तांबोळी यांचेवर तात्पुरता सोपविण्यात यावा. सदरहू रिक्त असलेले प्राचार्यांचे पद पदोन्नतीने भरण्यात यावे, त्यासाठी सेवाजेष्ठता, शैक्षणिकपात्रता तसेच पाच वर्षाचे गोपनिय अहवाल यासह ५ उमेदवाराच्या माहितीचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत सादर करावा यावा, असे ठरले.

**मागणी** – शालेय कामकाज सकाळ व दुपार असे दोन सत्रात चालू असल्याने शाळासंहितानुसार सौ इनामदार यांचे दीर्घ रजा/ सुट्टी कालावधीत शिक्षकांच्या सेवाजेष्ठतेनुसार प्राथमिक विभागाकडील कार्यालयीन कार्यभार सहा. शिक्षिका श्रीमती शिल्पा सुरेश वैदय व माध्यमिक विभागाकडील कार्यालयीन कार्यभार सहा. शिक्षक श्री आसिफ अल्लाबक्ष तांबोळी यांचेकडे सोपविण्यातआलेलाआहे. या दरम्यान श्री तांबोळी व श्रीमती वैद्य यांचेकडे त्यांचेवरील वर्गाची जबाबदारी सांभाळून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलाहोता. शाळा संहिता नियमानुसार विहित केलेप्रमाणे आठवडयातून ४ ते ६ तास प्रत्यक्ष शिकविण्याचे काम मुख्याध्यापकांना करावे लागते,म्हणजे आठवडयातून किमान ८ तासिका शिकविण्याचे काम करावे लागते. शैक्षणिक वर्ष २०१४- १५ मध्ये माध्यमिक विभाग इयत्ता 8 वी ते 10 वी एकूण ६ वर्ग तुकडी असून विद्यार्थी एकूण पट संख्या २५५ आहे.

| अ.नं. | तपशिल | शाळा संहितानुसार मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक पात्रता |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक अर्हता | बी.टी., बी.एड. किंवा समतुल्य अर्हता धारण करणारा पदवीधर |
| २ | अनुभव | माध्यमिक शाळेत शिकविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव |
| ३ | समाधानकारक काम | संबंधित शिक्षकांच्या मागील पाच वर्षाच्या कालावधीतील वार्षिक गोपनीय अहवालात समाधानकारक काम असलेबाबत अनुकूल शेरा. |

शाळा संहितानुसार उपरोक्त प्रमाणे पात्रता असणा-या सहाय्यक शिक्षकाला मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करता येते. माध्यमिक विभाग प्राचार्य/ मुख्याध्यापक पदाची वेतनश्रेणी:- वेतन बॅन्ड 9300- 34800+ ग्रेड वेतन 4800 अशी आहे. मा. त्रिसदस्य समितीचे दि.11/09/2014 निर्णय क्र. 780 अन्वये आवश्यक पात्रता व सेवाजेष्ठतेनुसार खालीलप्रमाणे सहाय्यकशिक्षक माध्यमिक विभागाकडे सध्या कार्यरत असूनत्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**माध्यमिक विभाग सहा.शिक्षकविद्यमान वेतनश्रेणी-९३००-३४८०० ग्रेड पे ४४००**

| अ. नं. | कर्मचारी नांव | नेमणूक तारीख | शैक्षणिक पात्रता | विषय | अनुभव | काम समाधानकारक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीआसिफअ. तांबोळी | 19/06/1997 | बी. एस्सी , बी.एड (फिजीकल) | गणित | १७ वर्षे | होय |
| २ | कु.स्वप्ना वि. जगताप | 13/06/1998 | बी. एस्सी., बी.एड. | शास्त्र | १६ वर्षे | होय |
| ३ | श्री प्रभाकर वि. नागरे | 18/07/1998 | बी. एस्सी., बी.एड. | भूमिती | १६ वर्षे | होय |
| ४ | श्रीम. विशाखा वा. बेंद्रे | 24/06/1999 | बी. ए., बी.एड. | इतिहास | १५ वर्षे | होय |
| ५ | श्री कृष्णदास गो.लोहकरे | 01/07/2001 | बी.ए. बी.एड. | हिंदी संस्कृत | १३ वर्षे | होय |

सन २००९ ते सन २०१४ अखेर ५ वर्षाचे गोपनिय अहवाल.

| अ.नं. | कर्मचारी नांव | सतत नेमणूक तारीख | सेवा निवृत्ती तारीख | सन २००९-२०१० | सन २०१०-२०११ | सन २०११-२०१२ | सन २०१२-२०१३ | सन २०१३-२०१४ | सरासरी ग्रेड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री आसिफ अ. तांबोळी | 19/06/1997 | ३०/०६/२०२६ | A | A | A | A | A | A |
| २ | कु.स्वप्ना वि.जगताप | 13/06/1998 | ३१/१२/२०३२ | A | A | A | A | A | A |
| ३ | श्री प्रभाकर वि नागरे | 18/07/1998 | ३०/०६/२०२७ | A | A | A | A | A | A |
| ४ | श्रीम. विशाखा वा. बेंद्रे | 24/06/1999 | ३०/०५/२०२८ | A | A | A | A | A | A |
| ५ | श्री कृष्णदास गो लोहकरे | 01/07/2001 | ३०/११/२०३० | A | A+ | A | B+ | A | A |

मा त्रिसदस्य समितीचे दि.11/09/2014 रोजी सभेतील निर्णय क्र ७८० नुसार श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्य पदाचा अतिरिक्त व तात्पुरता कार्यभार सध्या श्री तांबोळी यांचेकडे सोपविण्यात आला आहे, माध्यमिक विभागाकडील रिक्त असलेले प्राचार्याचे पद पदोन्नतीने भरणेकामी श्री तांबोळी व इतर ४ उमेदवारांच्या सेवाजेष्ठता, शैक्षणिकपात्रता तसेच पाच वर्षाचे गोपनिय अहवाल विचारात घ्यावे लागतील.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**– माध्यमिक शाळा संहितेनुसार उपरोक्त नमूद केलेल्या सहाय्यक शिक्षकांमधून सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव व समाधानकारक काम विचारात घेता पदोन्नतीने प्राचार्य रिक्त पद भरता येईल. उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेल्या बाबी विचारात घेता तसेच मा. त्रिसदस्य समितीने दि. ११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयात नमूद केलेनुसार, यापुर्वी प्रस्तावीत केलेप्रमाणे श्री तांबोळी यांचे सह इतर ०४ सेवाजेष्ठ सहाय्यक शिक्षकांची गोपनिय अहवालाची प्रतवारी A (अ) या श्रेणीची आहे तसेच त्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव विचारात घेता, या सहाय्यक शिक्षकां मधून पदोन्नतीने प्राचार्य हे रिक्त पद भरता येईल.

तरी श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल माध्यामिक विभाग प्राचार्य रिक्त पद पदोन्नतीने भरणेकामी निर्णयार्थ सादर,

**निर्णय क्र.२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल माध्यमिक विभाग प्राचार्य रिक्त पद सेवा नियमास अनुसरुन पदोन्नतीने भरणेबाबत कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.२३** **रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरतीसाठी निवडसमितीतील तिसरा सदस्य निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील रिक्त पदांवर भरती करणेकामी मा. त्रिसदस्यीय समिति व मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्णयानुसार दि. 26/10/2013 व दि. 26/11/2013 रोजी विविध वर्तमान पत्रे व संस्थान वेबसाईटवर विविध पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले होते. जाहिरातींस अनुसरून आलेल्या अर्जांची छाननी करुन पात्र अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती मा. उच्च न्यायालयाने गठीत केलेल्या निवड समितीसमोर दि 01/02/2014 रोजी घेण्यात आल्या होत्या

मुलाखतीचा सिलबंद अहवाल व त्यासंबंधीत सर्व कागदपत्रे मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. 12/04/2014 रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आली होती. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. 271 पारीत झाला आहे की, दि. 01/02/2014 रोजी झालेल्या मुलाखती रद्द करण्यात याव्यात रुग्णालयांसाठी भरावयाच्या विविध पदांसाठी फेर जाहिरात देण्यात यावी व सदर जाहिरातीमध्ये वैद्यकिय संचालक पदासाठी वयापेक्षा अनुभवाला प्राधान्य देण्यात यावे. वयाची अट घालू नये अथवा किती वयोमर्यादा ठेवायची याबाबत विचार-विनिमय करणेत येऊन निश्चित करण्यात यावी व मा. औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे समिती गठीत करणेत येऊन मुलाखती घेण्यात याव्यात, असे ठरले. तसेच याकामी जाहिरातीसाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आले आहेत.

मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे पीआयएल 18/2011 मधील दि. 13/08/2013 रोजीच्या आदेशानुसार उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी तारीख निश्चित करणेकामी मा. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई आणि मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांना दि. 12/08/2014 व दि. 24/09/2014 रोजी पत्र पाठविण्यात आले होते. तसेच वेळोवेळी दूरध्वनीद्वारे व समक्ष संपर्क साधलेला आहे. मा. संचालक आरोग्य सेवा, मुंबई यांनी फॅक्स व ई-मेलव्दारे असे कळविले आहे की, मुलाखती घेणेमाठी त्यांचे वतीने त्यांनी उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक यांची नेमणूक केलेली आहे. वास्तविक मा हायकोर्टाच्या आदेशानुसार अशा प्रकारे त्यांचे प्रतिनिधीमार्फत मुलाखत घेण्यास परवानगी देण्यात आलेली नाही. याच कारणासाठी दि. 01/02/2014 रोजी घेण्यात आलेल्या मुलाखती मा. व्यवस्थापन मंडळाने दि 12/04/2014 रोजीच्या सभेत रद्द केलेल्या आहेत. अशा परिस्थितीत मा. संचालक मुलाखतीसाठी उपलब्ध नसलेस त्याचे प्रतिनिधी समोर मुलाखती घेण्यास मान्यता मिळावी यासाठी सिव्हील ॲप्लीकेशन न. 287/2015 मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद याचे समोर संस्थान हायकोर्ट ॲड मार्फत

दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि. 12/01/2015 रोजीच्या आदेशाने मा. संचालकांचे प्रतिनिधी मार्फत मुलाखत घेण्यास मान्यता दिली आहे.

मा. हायकोर्टाचे दि. 13/08/2013 रोजीचे आदेशामध्ये असे म्हटले आहे की, निवड समितीचा तिसरा सदस्य मा. व्यवस्थापन मंडळाने नियुक्त करावा. त्यास अनुसरून निवड समितीच्या तिसऱ्या सदस्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. तो त्या क्षेत्रातील तज्ञ असावा.

येणेप्रमाणे मा. संचालक यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधीमार्फत मुलाखती घेणेस तसेच निवड समितीचा तिसरा सदस्य ठरविणेस मान्यता असावी

**निर्णय क्र.२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालयांसाठी वैद्यकिय संचालक, निवासी उपवैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी व इतर कर्मचारी पदे भरतीसाठी निवडसमितीतील तिसरा सदस्य म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर यांची निवड करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४** **११ महिने कालावधीसाठी नेमणूक असलेल्या श्रीमती संगिता शामराव पवार, हिस्टोपॅथ टेक्निशियन व श्री.बाबासाहेब लहानु म्हस्के, परफ्युजनिस्ट यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासन मान्य कर्मचारी आकृतीबंधामध्ये शासन निर्णयात पुढीलप्रमाणे तरतूद आहे. अटी-शर्ती क्र.०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी. अटी-शर्ती क्र. ०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही. याप्रमाणे आकृतीबंधामध्ये तरतूद आहे.

अ) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१/०८/२००९ रोजीचे ६५८ (4) निर्णयानुसार श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आवश्यक असणारी पॅरामेडीकल पदे जाहिरात देऊन भरणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. दि. ०५/०१/२०१० रोजीचे दै. सकाळ व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आवश्यक हिस्टोपॅथ तंत्रज्ञ व इतर पॅरामेडिकल स्टाफची पदे भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करुन सदर पदाकरीता लेखी, प्रात्यक्षिक व तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. सदर जाहीरातीमध्ये हिस्टोपॅथ तंत्रज्ञाची दोन पदे असून एक पद खुल्या प्रवर्गासाठी व दुसरे पद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत. त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे निर्णयानुसार दोन उमेदवारांची निवड करुन त्यांना नेमणुक आदेश देण्यात आले. परतु त्यापैकी श्री रशिद रज्जाक शेख यांनी राजीनामा दिल्याने तसेच सदरचे जागेवर अनुसूचित जाती प्रवर्गातून उमेदवाराची नेमणूक करणे आवश्यक असल्याने त्यांचे जागेवर श्रीमती संगिता शामराव पवार याना खालीलप्रमाणे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देण्यात आलेली आहे. त्यांना दरमहा रू. १०,०००/- एकत्रित वेतन अदा केले जात आहे.

| अ नं | मा व्य स सभा दिनांक – निर्णय क्र | नेमणूक आदेश | नेमणूक कालावधी | हजर तारीख | ११ महिने मुदतवाढ संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १३/०७/२०१० | ६०६४-०७/०१/२०११ | १०,०००-११महिने | ०८/०१/२०११ | ०७/१२/२०११ |
| 2 | १४/०१/२०१२-६० | ९०५-२८/०१/२०१२ | १०,०००-११महिने | १२/१२/२०११ | ११/११/२०१२ |
| 3 | ०८/०१/२०१३-२९ | १३५२-०९/०२/२०१३ | १०,०००-११महिने | ११/०२/२०१३ | १०/०१/२०१४ |
| 4 | ०८/०१/२०१४-६३ | ७०३४-३०/०१/२०१४ | १०,०००-११महिने | ३१/०१/२०१४ | ३०/१२/२०१४ |

ब) मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/१२/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र ९८० नुसार परफ्यूजनिस्ट व इतर वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरणेकामी दि. ०२/०४/२०११ रोजी व दि. ०४/०४/२०११ रोजी विविध वर्तमानपत्रांमध्ये वॉक इन इंटरव्ह्युवची जाहीरात प्रसिध्द करणेत आली होती. परफ्यूजनिस्ट हे पद अनुसूचीत जाती या प्रवर्गाकरीता आरक्षीत होते परंतु सदर वर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्याने खुल्या प्रवर्गातील श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची परफ्यूजनिस्ट या पदावर ११ महिने कालावधीकरीता मासिक फिक्स पे रू. २१०००/- वर नेमणूक करणेकामी निवड करण्यात आलेली होती. तदनंतर त्यांना खालीलप्रमाणे मा व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार वेळोवेळी ११ महिने मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

| अ नं | मा व्य स सभा दिनांक – निर्णय क्र | नेमणूक आदेश | नेमणूक कालावधी | हजर तारीख | ११ महिने मुदतवाढ संपुष्टात येत असलेची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०५/१२/२०१०-९८० | ३५१-२१/०४/२०११ | २१०००-११ महिने | २८/०४/२०११ | २७/०३/२०१२ |
| २ | १९/०२/२०१२-२१२ | ६९४१-३१/०३/२०१२ | २१०००-११ महिने | ०२/०४/२०१२ | ०१/०३/२०१३ |
| ३ | ०७/०२/२०१३-१०७ | १५/१७-०८/०३/२०१३ | २१०००-११ महिने | ०९/०३/२०१३ | ०८/०२/२०१४ |
| ४ | ०४/०२/२०१४-१४९ | ७९४३-२२/०३/२०१४ | २१०००-११ महिने | १४/०३/२०१४ | १३/०१/२०१५ |

वरील दोनही रिक्त पदासाठी दि. ३०/०७/२०१४ रोजीचे वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. त्यासाठी नोकरी मागणी अर्ज देखील आलेले आहेत. परंतु निवड प्रक्रीयेस बराच कालावधी लागेल. त्यांच्या सेवेची रूग्णालयास आवश्यकता आहे.

तरी, उपरोक्त अ मधील श्रीमती संगिता शामराव पवार यांचा ११ महिने मुदतवाढ कालावधी दि.३०/१२/२०१४ रोजी व ब मधील श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांचा ११ महिने मुदतवाढ कालावधी दि.१३/०१/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने श्रीमती संगिता शामराव पवार व श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर नेमणूक देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील अ मधील श्रीमती संगिता शामराव पवार यांचा ११ महिने मुदतवाढ कालावधी दि.३०/१२/२०१४ रोजी व ब मधील श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांचा ११ महिने मुदतवाढ कालावधी दि.१३/०१/२०१५ रोजी संपुष्टात येत असल्याने श्रीमती संगिता शामराव पवार व श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढील ११ महिने कालावधीकरीता किंवा जाहिरातीव्दारे पदे भरेपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर नेमणूक देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.२५ **श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांचे इन्सेंटीव्ह रक्कम मिळणेबाबतचे रिट पिटीशन क्र.५९७९/ २०१३ बाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील खालील 15 वैद्यकीय अधिकारी यानी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांना जसा इन्सेन्टीव्ह (वैद्यकीय बिलातील हिस्सा) मिळतो तसा [illegible] यासाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र.5979/2013 दाखल केले होते सदर प्रकरणी दि. 23.04.2014 रोजी मा. न्यायालयाने आदेश दिला आहे की, मा. व्यवस्थापन मंडळाने अर्जदार यांचे दि. 05.02.2013 व दि. 18.04.2013 रोजीचे अर्जाबाबत सहा महिन्याचे आत निर्णय घ्यावा.

| अ. नं. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| 1 | डॉ. रविंद्र कुमार कुलकर्णी | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी |
| 2 | डॉ. भाऊसाहेब भागवत साबळे | वैद्यकीय अधिकारी |
| 3 | डॉ. सुनिल मुरलीधर सोनटक्के | निवासी वैद्यकीय अधिकारी |
| 4 | डॉ. रजन अशोक महाजन | ईएनटी. सर्जन |
| 5 | डॉ. दादासाहेब लुमा काबळे | त्वचारोग तज्ञ |
| 6 | डॉ. प्रशांत दिलीप काळे | निवासी वैद्यकीय अधिकारी |
| 7 | डॉ. शितल ओमप्रकाश बागडीया | निवासी वैद्यकीय अधिकारी |
| 8 | डॉ. वैभव दिलीप काबळे | कनिष्ठ भुलतज्ञ |
| 9 | डॉ. नितीन माधवराव वर्पे | ऑर्थोपेडीक सर्जन |
| 10 | डॉ. महेंद्रा केदराज नेमनाथ | स्त्रीरोग तज्ञ |
| 11 | डॉ. रचना सुनिल साबळे | बालरोग तज्ञ |
| 12 | डॉ. मधुरा मुकुंद कुलकर्णी | कनिष्ठ पॅथॉलॉजिस्ट |
| 13 | डॉ. ज्योती विठ्ठल पवांदे | निवासी वैद्यकीय अधिकारी |
| 14 | डॉ. मनिषा लक्ष्मण शिरसाठ | कनिष्ठ भुलतज्ञ |
| 15 | डॉ. मनिषा उमेशचंद्र अग्रवाल | नेत्ररोग तज्ञ |

श्री साईबाबा हॉस्पिटल दि. 15.05.2006 पासून सुरु झाले जे रुग्ण आर्थिक दृष्टया सबल आहेत त्यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सशुल्क उपचार देण्यात येतात व त्याचा योग्य तो मोबदला संबंधित डॉक्टरांना संस्थानच्या नियमाप्रमाणे देण्यात येतो. याबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि 30.06.2006 रोजीच्या सभेत निर्णय क्र. 328 झालेला आहे. मा. व्यवस्थापन मंडळाचे दि. 19.08.2006 रोजीचे सभेत निर्णय क्र. 552 असा आहे की, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मानद डॉक्टर व पूर्णवेळ डॉक्टर यांना बिलातून हिस्सा देताना भेदभाव करु नये.

आता श्री साईनाथ रुग्णालयातील 15 डॉक्टर्सनी दि. 05.02.2013 व दि. 18.04.2013 रोजीच्या अर्जान्वये मागणी केली आहे की, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टरांना ज्याप्रमाणे इन्सेन्टीव्ह मिळतो त्याप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टरांना मिळावा. परंतु श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांची आर्थिक कुवत कमी असते किंवा काही रुग्ण बिलाव भरु शकत नाही त्यांना वैद्यकीय बिलात 100 % माफी द्यावी लागते. तसेच सदरचे वैद्यकिय अधिकारी याना शासनाच्या 6 व्या वेतन आयोगानुसार वेतन व अन्य सुविधा प्रदान केल्या जातात. त्यामुळे अशा परिस्थितीत श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टराना इन्सेन्टीव्ह अदा करणे शक्य होणार नाही. असे त्यांना कळविण्यात आलेले आहे. आता सदरच्या पिटीशनवर यानी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद याचे समोर कंटेम्प्ट पिटीशन क्र. 510/2014 दाखल केले आहे.

तरी प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी यांचे इन्सेंटीव्ह रक्कम मिळणेचे रिट पिटीशन क्र.५९७९/ २०१३ बाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे समोर कंटेम्प्ट पिटीशन क्र. 510/2014 दाखल केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक (सन २०१५-१६) या वर्षाकरिता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन 2015-2016 या वर्षाकरीता लागणाऱ्या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमिकल्स, क्ष-किरण फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो मटेरीयल, सि.टी.स्कॅन व एमआरआय फिल्म्स, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि 19/04/2014 चे परीपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव/ शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधाची मागणी कमी करुन व नविन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. तो सोबत पान नं. 1 ते 151 सादर केला आहे. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | सन 2015-2016 करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|
| 1. | गोळया | 56434305.59 |
| 2. | इंजेक्शन व आय. व्ही. फ्ल्युडस् | 103464791.31 |
| 3. | लिक्विड ओरल्स् | 3301435.19 |
| 4. | मलम | 744340.28 |
| 5. | आय, इअर, व नोझल ड्रॉप्स | 3353907.30 |
| 6. | डेंटल मटेरीयल | 256991.06 |
| 7. | क्ष-किरण, सि.टी. स्कॅन व एम.आर.आय. मशिनसाठी लागणारे फिल्म्स व इतर साहित्य | 16379727.30 |
| 8. | श्री साईनाथ रुग्णालय लॅब केमीकल्स | 13268415.71 |
| 9. | श्री साईबाबा रुग्णालय लॅब केमीकल्स | 48285148.86 |
| 10. | ब्लड बँक केमीकल्स | 4877065.56 |
| 11. | Miscellaneous (इतर किरकोळ साहित्य) | 6766882.51 |
| 12. | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | 50341510.03 |
| 13. | कॅथलॅब विभाग, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर व परफ्युजीनीस्ट यांचे सर्जीकल साहित्य (नविन एक कार्डीयाक ओ टी. सह) | 79760708.80 |
| 14. | डायलेसीस युनिट | 983900.00 |
| 15. | न्युरो ऑपरेशन थिएटरसाठीचे साहित्य | 1305255.00 |
| 16. | आयुर्वेदीक औषधे | 3413187.69 |
| 17. | कॅटगट ॲन्ड सुचर्स मटेरियल (श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल सर्व ओ.टी.) | 64398819.47 |
| 18. | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices / Ortho & Neuro Surgery Items etc.) | 10,00,00000.00 |
| | **एकुण रक्कम रु. -** | **557336391.66** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु. -** | **557336392.00** |

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

01) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्या इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतरुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

| अ.नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03 12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) 01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंतरुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 |
| २ | बाहयरुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी. स्कॅन, एम.आर.आय., 2-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ आठ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03 12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) 01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅथलॅब प्रोसीज्यर | ४६१६ | ४९२२ | ५४८२ | ७३३२ | ९२५४ | ९८०५ |
| २. | ह्दय शस्त्रक्रिया | ७२१ | १०२३ | १२१६ | १४९१ | १५७९ | १७०० |
| ३. | ऑप्थलमिक शस्त्रक्रिया | २८९ | ५४२ | ६९९ | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | |
| ४. | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ७१० | ७२८ | ७६३ | ८१७ | ९२५ | १०३० |
| ५. | जनरल शस्त्रक्रिया | ८१७ | १५३५ | १६६४ | २२४९ | २२२१ | ११८४ |
| ६. | न्युरो शस्त्रक्रिया | २५३ | ४८९ | ५७१ | ६११ | ५८६ | ३३४ |
| ७. | युरोलॉजी शस्त्रक्रिया | ३२८ | ३९७ | ४४० | ५४८ | ५७० | ६१५ |
| ८. | सि.टी.स्कॅन | ८०११ | ८०२४ | ९९९५ | ९६५६ | ९५४६ | ८७८० |
| ९. | एम.आर.आय | ७९४३ | ८७७७ | १००६० | १५५९६ | १३०५० | १३३१७ |
| १०. | २- डि इको | ६४०२ | ६७८५ | ८७९३ | ११९६० | १४११३ | १६५११ |
| ११. | डायलेसिस | १७७७ | १८५० | १९६० | २०७८ | २५१६ | २३३७ |
| १२. | अंतरुग्ण संख्या | ११९४७ | १२६८९ | १३४८९ | १५५३३ | १७२६६ | १७२२६ |
| १३. | बाह्यरुग्ण संख्या | ६६५४३ | ७३०६८ | १०२४७८ | १३०१०५ | १४७१४७ | १५३०३४ |
| १. | एकुण संख्या | १०९८९० | १२०९८६ | १५०२१३ | १८९१५३ | २०७९४० | २२६७५६ |
| | दर गतवर्षीचे तुलनेत टक्केवारी नुसार दिवणारीवाढ | २०% | १०% | २४% | २६% | १०% | १०% |

उपरोक्त माहितीवरुन श्री साईबाबा व श्री साई 1'. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णाची संख्या हि दिवसेंदिवस वाढतीच आहे. श्री साईबाबा रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात लवकरच राजीव गांधी योजना सुरु होत आहे.

02) दि.01/04/2013 ते 31/03/2014 या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणार खप तसेच साईबाबा रुग्णालय सुरु होऊन आठ वर्ष झालेले आहे. त्यामुळे तेथील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे.

03) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळ्या, मलम, सर्जिकल साहित्य इत्यादींची एकत्रीत मागणी केलेली आहे.

04) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीत यांचेसाठी विशिष्ट रक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याची अमंलबजावणी देखील चालु झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणाऱ्या औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

01) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णाची संख्या, शस्त्रक्रियाची संख्या इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतररुग्ण व बाह्यरुग्णांची संख्या-

| अ.नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03 12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) 01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंतररुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 |
| २ | बाह्यरुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, ऑर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी. स्कॅन, एम.आर.आय., 2-डि इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ आठ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियाचा / तपासण्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03 12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) 01 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कॅथलॅब प्रोसीज्यर | ४६१६ | ४९२२ | ५४८२ | ७३३२ | ९२५४ | ९८०५ |
| २. | ह्रदय शस्त्रक्रिया | ७२१ | १०२३ | १२१६ | १४९१ | १५७९ | १७०० |
| ३. | ऑप्थलमिक शस्त्रक्रिया | २८९ | ५४२ | ६०९ | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | |
| ४. | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | ७१० | ७२८ | ७१२ | ८१७ | ९२५ | १०३० |
| ५. | जनरल शस्त्रक्रिया | ८१७ | १५३५ | १६६४ | २२४९ | २२२१ | १९८४ |
| ६. | न्युरो शस्त्रक्रिया | २५३ | ४८९ | ५७१ | ६११ | ५८६ | ३३४ |
| ७. | युरोलॉजी शस्त्रक्रिया | ३२८ | ३९७ | ४४० | ५४८ | ५७० | ६१५ |
| ८. | सि.टी.स्कॅन | ८०९१ | ८०२४ | ९९९५ | ९६५६ | ९५४६ | ८७८० |
| ९. | एम.आर.आय | ७९४३ | ८७७७ | १००६० | १५५९६ | १३०५० | १३३१७ |
| १०. | २- डि इको | ६४०२ | ६७८५ | ८७९३ | ११९६० | १४११३ | १६५११ |
| ११. | डायलेसिस | १७७७ | १८५० | १९६० | २०७८ | २५१६ | २३३७ |
| १२. | अंतररुग्ण संख्या | ११९४७ | १२६८९ | १३४८९ | १५५३३ | १७२६६ | १७२२६ |
| १३. | बाह्यरुग्ण संख्या | ६६५४३ | ७३०६८ | १०२४७८ | १३०१०५ | १४७१४७ | १५३०३४ |
| १. | एकुण संख्या | १०९८९० | १२०९८६ | १५०२१३ | १८९१५३ | २०७९४० | २२६७५६ |
| | दर गतवर्षीचे तुलनेत टक्केवारी नुसार दिवणारीवाढ | २०% | १०% | २४% | २६"' | १०% | १०% |

उपरोक्त माहितीवरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या हि दिवसेंदिवस वाढतीच आहे. श्री साईबाबा रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णाच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयात लवकरच राजीव गांधी योजना सुरु होत आहे.

02) दि.01/04/2013 ते 31/03/2014 या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणार खप तसेच साईबाबा रुग्णालय सुरु होऊन आठ वर्ष झालेले आहे. त्यामुळे तेथील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढतच आहे.

03) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, गोळया, मलम, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रीत मागणी केलेली आहे.

04) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कायमस्वरुपी पध्दतीने कार्यरत असलेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबीत यांचेसाठी विशिष्ट रक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याची अमंलबजावणी देखील चालु झालेली आहे. त्यामुळे रुग्णासाठी लागणाऱ्या औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

05) महाराष्ट्र शासनाने दि.16/11/2013 पासून सुरु केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत दोन्ही रुग्णालयात होणाऱ्या शस्त्रक्रिया कराव्या लागणार आहे व त्यामध्ये रुग्णांना दाखल आहे तोपर्यंत व डिसचार्ज दिल्यानंतर पुढील 10 दिवसांची औषधे मोफत दयावयाची आहे. पुढील उपचारासाठी (follow up) तीन महिन्याचे औषधे एक वर्षा करिता दयावयाची आहे. त्यामुळे देखील औषधांचे मागणीत खुपच वाढ झालेली आहेत त्यासाठी देखील अंदाजे रुग्णांची संख्या विचारात धरुन अंदाजे औषधे मागणी केलेली आहे. सदर मागणी प्रत्यक्ष आलेल्या रुग्णानुसार कमी - जास्त होऊ शकते.

06) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या याचा विचार करुन मागणी सुचवलेली आहे.

07) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इ. मुळे वाढणारी गर्दी व राजीव गांधी योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा. किडनी स्टोन शिबिरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, अध्यात्मीक शिबिरे, पालखी सोहळा इत्यादी)

08) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून 13 ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादींचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि 01/04/2013 ते 31/03/2014 अखेर एकुण 10228 तर श्री साईबाबा रुग्णालयात सदर कालावधीत 15471 इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहे.

09) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावीत केलेले आहे. ती आपण रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतुद केलेली आहे.

सोबतच्या तक्त्यात औषधाची रक्कम भरतांना गतवर्षातील मजुर दराने संस्थानने औषधे खरेदी केलेले आहे ते दर केवळ हिशोबासाठी धरणेत आलेले आहे प्रत्यक्षात निविदेमध्ये प्राप्त होणारे दर ह्यापेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. दि.01/04/2013 ते दि.31/03/2014 (12 महिने) या महिन्याच्या कालावधीमध्ये औषधे खरेदीवर एकुण रु.12,79,43,752/- इतका खर्च झालेला आहे. व On Consignment Basis वरील Item साठी एकुण रक्कम रु. 22,33,08,406/- इतका खर्च झालेला आहे.

* औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षाप्रमाणे खालील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-

1) औषधे खरेदीकामी वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात यावी.

2) ई-निविदाची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन सदर समितीने वेळोवेळी केलेली कार्यवाही मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवता येईल.

3) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी शक्य तेथे नामांकित थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. तसेच नामांकित कपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

4) ई-निविदा मागवितांना उत्पादक कंपन्याची अट तशीच ठेऊन सर्व उत्पादक कपन्याचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात येऊन त्याना जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावे.

5) प्रत्येक औषधांसाठी प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या कपन्याचे दर तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावेत व त्यातील नामांकित कपन्याचे व गतवर्षाचा संबंधित विभागाचा वापरताना आलेला अनुभव, अडचणी, मालाचा दर्जा, पुरवठा वेळेवर न करणाऱ्या कपन्या व अधिकृत विक्रेते यांना शक्यतो टाळून दर स्विकारण्यात यावेत.

6) ज्या औषधांसाठी/ साहित्यासाठी उत्पादक कपन्यांचे दर येणार नाहीत, त्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या कंपन्यापैकी नामांकित कंपन्यांचे दर स्विकारण्यात यावेत.

7) सर्व प्राप्त ई-निविदा हया मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात येऊन तांत्रिक बाबींची छाननी करुन तदंतर पात्र निविदाधारकाच्या Commercial निविदा Online उघडून खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

8) मागणी केलेल्या औषधाच्या साठ्यापैकी काही औषधाची अतिरिक्त मागणी करण्याची आवश्यकता भासल्यास ती वार्षीक दर करारानुसार वार्षीक दर करार मा. कार्यकारी अधिकारी याचे अधिकारात रु.25,000/- पर्यंत मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करावी.

9) रु.25,000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी याचे मजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.

10) सदर खरेदीमध्ये औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा तर On Consignment Basis वरील Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices इत्यादी आयटमची स्वतत्र ई-निविदा करावी लागेल, त्यामध्ये सुरुवातीस औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा करावी लागणार आहे.

सोबतच्या तक्त्यातील Annual Tender Req. 2015-16 या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, साहित्य, ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जीकल साहित्य इत्यादी खरेदी करण्यास अंदाजे एकुण

रु.557336392/- इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षीचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात झालेला खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

सदरचे खरेदीस रु. 10 लाखापेक्षा जास्त खर्च असल्यामुळे त्यास मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागेल.

तरी उपरोक्त प्रमाणे औषधे खरेदीकामी येणाऱ्या अदाजे रु.557336392/- चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. 1 ते 10 चे प्रस्तावास मान्यता घेण्यास तसेच मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षिक (सन २०१५-१६) या वर्षाकरिता लागणारे औषधे/ सर्जिकल साहित्य प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.५५,७३,३६,३९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खडपीठाची परवानगी घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ विधी अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय याचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषय. .र चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा विषय नं०१.** **माउच्च न्यायालय., खंडपीठ, औरंगाबाद यांचे दि.22-12-2014 रोजीचे आदेश नुसार संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मेजय भवानी. एन्टरप्राईजेस, पुणे व मे.लि.सिक्युरिटी फोर्स प्रा.आर.मॉडर्न व्ही.,पुणे यांची लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणुन नेमणुक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.27-02-2011 रोजीचे सभेतील निर्णय क्र.137 नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांची दि.01-04-2011 पासून ते दि.31-03-2013 अखेर 02 वर्षे कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे संस्थानला कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मा व्यवस्थापन समितीचे दि.26-03-2011 रोजीचे सभेतील निर्णय क्र.211 नुसार अनुक्रमे 1) मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे, 2) मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), 3) मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, 4) मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे व 5) मे जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची दि.01-05-2011 पासून ते दि.30-04-2013 अखेर 02 वर्षे या कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्यानंतर त्यांना नविन कंत्राटदाराची नेमणुक होईपर्यंत मुदतवाढ देणेत आलेली आहे.

त्याप्रमाणे संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानला प्रतिदिनी व मजुर संख्येनुसार कंत्राटी पध्दतीने खालीलप्रमाणे अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत.

| अ. नं. | एजन्सीचे नांव | सबंधीत एजन्सीला नेमून दिलेला परिसर | पुरविणेत येणारी प्रतिदिनी कंत्राटी कर्मचारी संख्या | | | विभागांना दिलेल्या मंजुरीप्रमाणे कंत्राटी कर्मचारी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अकुशल | कुशल | एकुण | अकुशल | कुशल | एकुण |
| 1. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे (लेबर कॉन्ट्रॅक्टर) | संस्थानचे सर्व संबंधीत विभाग | 904 | 284 | **1188** | 1120 | 431 | **1551** |
| 2. | मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | हॉस्पीटल, द्वारावती धर्मशाळा इ.परिसर | 106 | 05 | **111** | 116 | 05 | **121** |
| 3. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी) (महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | मंदिर व महाद्वार परिसर | 60 | 23 | **83** | 82 | 34 | **116** |
| 4. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | मंदिर व मंदिर परिसर | 84 | 06 | **90** | 98 | 06 | **104** |
| 5. | मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि., पुणे (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | नविन पिंपळवाडी रोड दर्शनलाईन, साई प्रसाद-01 व 02, प्रसादालय, साई आश्रम इ.परिसर | 180 | 09 | **189** | 391 | 22 | **413** |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6. | मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर) | साईबाबा भक्तनिवासस्थान, वाहन व शैक्षणिक संकुल परिसर | 72 | 04 | 76 | 76 | 04 | 80 |
| | | एकुण (2 ते 6) | 502 | 47 | 549 | 763 | 71 | 834 |
| | | एकुण (1 ते 6) | 1406 | 331 | 1737 | 1883 | 502 | 2385 |

सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कामाची (कॉन्ट्रॅक्टची) मुदत अनुक्रमे दि.31-03-2013 व दि.30-04-2013 अखेर संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे पुढील 03 वर्ष कालावधीसाठी संस्थानला अकुशल, कुशल कामगार, सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी प्रचलित पध्दतीप्रमाणे नविन ठेकेदाराची/कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक होईपर्यंत मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांचे व्यतिरिक्त वरिल लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस/करारास मा.व्यवस्थापन समितीचे दि.26-02-2013 रोजीचे सभेतील निर्णय क्र.166 अन्वये मुदतवाढ देणेत आलेली असुन, त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील तीन वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदाराची/ कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करणेसाठी विविध वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दीस देऊन, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून "सिलबंद निविदा "मागविणेत आल्या होत्या. "सिलबंद निविदा " विक्रीची मुदत दि.01-02-2014 पासून ते दि.12-02-2014 पर्यंत अशी होती. तसेच "सिलबंद निविदा " स्विकारण्याची अंतिम मुदत दि 13-02-2014 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानला अकुशल, कुशल कामगार, अनुभवी सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून विक्री झालेल्या 37 निविदांपैकी संस्थानचे मुंबई कार्यालयास-07 व शिर्डी कार्यालयास-14 अशा एकूण-21 "सिलबंद निविदा " प्राप्त झालेल्या आहेत.

त्यानुसार पात्र 18 निविदाधारकांना मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.12-06-2014 रोजीचे सभेपुढे समक्ष बोलविणेत येवुन, कर्मचाऱ्यांना सध्या मिळत असलेल्या रोजगारापेक्षा कमी रोजगार देता येणार नाही, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतनदराप्रमाणे वेतन व त्या नियमाप्रमाणे टॅक्स वगैरे यासाठी सर्वांचे दर एकच राहतील, फक्त सर्व्हिस चार्जेसवरच चर्चा/वाटाघाटी केल्या जातील. त्यामुळे पुन्हा एकदा बंद पाकिटामध्ये फक्त सर्व्हिस चार्जेचा दर देणेत यावा, असे सांगणेत येऊ न, निविदामधील दर वाचुन दाखविणेत आले. व पुनश्च संधी म्हणुन सर्व निविदाधारकांना अंतिम दर देणेसाठी पाकीटे पुरविणेत आली. आणि त्यांचेकडुन पुन्हा बंद पाकीटामध्ये अंतिम दर घेण्यात आला. निविदाधारकांनी निविदेमध्ये दिलेल्या मुळ सर्व्हिस चार्जेस दराचा तपशिल व चर्चा/वाटाघाटी अंती देऊ केलेला दर घेणेत आला.

त्यावर सविस्तर चर्चा होवुन, " प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी. असा निर्णय, निर्णय क्र.456 अन्वये पारीत करणेत आला आहे.

त्याप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे संस्थानचे वतीने सिव्हील ॲप्लीकेशन क्रमांक 10427/2014 इन पी.आय.एल.क्र.18/2011 संस्थान वकिलामार्फत दाखल करणेत आले होता. त्यावर सुनावणी होऊन, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.22-12-2014 रोजीचे आदेशान्वये खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

"As the sansthan has finalized the bidders, namely, m/s.Jaibhavani Enterprises, Chinchwad, (Tender No.60), and M/s Modern V.R Security force Private Ltd. Aundh (Tender No.59) we allow the sansthan to split the work between the two tenders equally." मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे दि 22-12-2014 रोजीचे आदेशास / मान्यतेस अनुसरून लेबर व सिक्युरिटी कंत्राटी कर्मचारी पुरविणेचे काम दोन्ही एजन्सीमध्ये समप्रमाणात विभागून देऊन 1) मे मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,औंध, पुणे-411 007 यांना सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणे व 2) मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे-411 019 यांना परिशिष्ट ब प्रमाणे संस्थानचे संबधीत विभागाना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी त्यांचे न्युनतम (कमी) दराची निविदा/दरपत्रक स्वीकारणेत येऊन, त्यांना दि.01-03-2015 पासुन ते दि.28-02-2018 अखेर 03 वर्षे या कालावधीसाठी खालील दराप्रमाणे कार्यादेश देणेस मान्यता असावी.

1) अकुशल कामगार- रू.254.38/- प्रतिदिन (झोन नं.3 नुसार किमान वेतनदराप्रमाणे) वेतनदर

2) अकुशल कामगार- 277.46/- प्रतिदिन (किमान वेतनदराप्रमाणे, झोन नं.01) वेतनदर (मुंबई, सिकंदराबाद, चेन्नई करीता)

3) कुशल कामगार-रू.285.15/- प्रतिदिन (झोन नं 3 नुसार किमान वेतनदराप्रमाणे) वेतनदर

4) कुशल कामगार-प्रतिदिनी रू.308.23 (झोन-01 प्रमाणे) किमान वेतनदराप्रमाणे वेतनदर (मुंबई, सिकंदराबाद, चेन्नई करीता)

ब) सुरक्षा कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतनदर देणेत यावा.

5) सुरक्षा अधिकारी (माजी सैनिक)-रूपये-409.50/- प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)
6) सुरक्षा पर्यवेक्षक (माजी सैनिक)-रूपये-313.83/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)
7) सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक)-रूपये-295.50/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)
8) सुरक्षा गार्ड (माजी सैनिक)-रूपये-274.50/-प्रतिदिनी (चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे)
9) सुरक्षा गार्ड (सिव्हीलीयन/पुरूष, स्त्री)-रूपये-254.38/- प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)
10) सुरक्षा गार्ड (मुंबई कार्यालय, झोन नं.01)-रूपये-277.46/-प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)
11) व्यायामशाळा प्रशिक्षक/लिपीक (कुशल)-रूपये-285.15/-प्रतिदिनी (किमान वेतन दराप्रमाणे)

मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,औंध, पुणे-411 007 व मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे-411 019 यांना किमान वेतन व चर्चा वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदरावर 0.0001% इतका सर्व्हिस चार्ज, अधिक संपूर्ण बिलाचे रक्कमेवर 12.36% इतका सर्व्हिस टॅक्स, अधिक प्रॉव्हीडंट फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह 13.61% इतकी रक्कम, अधिक कामावर नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स पॉलीसी प्रिमियम अंशदान याप्रमाणे रक्कम देणेत यावी. तसेच माहे ऑक्टोंबर ते सप्टेंबर या कालावधीत (प्रत्येक वर्षी) कंत्राटी कामगारांना मिळणाऱ्या वेतनाचे रक्कमेवर 8.33% याप्रमाणे सानुग्रह अनुदान रक्कम कंत्राटी कामगारांना दिपावली सणाचे अगोदर अदा करणेकामी संबंधीत कंत्राटदारास देता येईल.

उपरोक्त दर हे सध्या लागु असलेले किमान वेतनदर, भविष्यनिर्वाह निधी, सर्व्हिस टॅक्स यास अधिन राहून आहेत. केवळ किमान वेतन अधिनियम, 1948 मधील तरतुदी अंतर्गत शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.03 (मुंबई, सिकंदराबाद, चेन्नई इ. कार्यालयासाठी झोन नं.01 ) प्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंट फंड अधिनियम अंतर्गत प्रॉव्हीडंट फंड अंशदान दर, व सर्व्हिस टॅक्स दर यातच शासनाकडुन वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारीत दर लागु करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देता येतील.

सबब, मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., औंध, पुणे यांना सोबतचे परिशिष्ट अ प्रमाणे व मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, चिंचवड, पुणे यांना परिशिष्ट ब प्रमाणे संस्थानचे संबंधीत विभागांना कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी दि.01-03-2015 पासुन ते दि.28-02-2018 अखेर 03 वर्षे या कालावधीसाठी उपरोक्त नमुद केलेल्या दराप्रमाणे कार्यादेश देणेत आलेला आहे.

माहितीसाठी सादर.

**निर्णय क्र.२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.२२.१२.२०१४ रोजीचे आदेशानुसार संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, पुणे व मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., पुणे यांना लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणुन दि.01-03-2015 पासुन ते दि.28-02-2018 अखेर 03 वर्षे या कालावधीसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या दराप्रमाणे देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**तसेच महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रॉव्हीडंट फंड अधिनियम अंतर्गत प्रॉव्हीडंट फंड अंशदान दर व सर्व्हिस टॅक्स दर यातच शासनाकडुन वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारीत दर लागु करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.२८** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** भक्तांना समाधी मंदिरामध्ये ऑन लाईन प्रसाद दाखविणे व पाठविणेबाबत ॲडव्हर दिनू मोरीया यांनी प्रस्तावीत केलेली संकल्पना श्री सिध्दीविनायक, मुंबई न्यासामध्ये वापरणेत येत असून कार्यकारी अधिकारी यांनी तेथे प्रत्यक्ष पाहून यावी व त्याचा अहवाल सादर करावा. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**वरील निर्णय क्र.०१ ते २८ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर सायंकाळी ०७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/-xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी